**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. नरेंद्र पाटील)**

**<u>कोणत्याही विभागाचे माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नसल्याबाबत</u>**

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, नेहमीप्रमाणे प्रसंग आलेला आहे. कोणीही माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. आता आपण यासाठी किती वेळा सभागृह तहकूब करायचे हे ठरवू द्यावे. कोणाचे काय, कोणाचे काय चालले आहे. विषय महत्त्वाचा आहे. सर्व सन्माननीय सदस्य तयारी करून येथे येतात, अतिशय पोटतिडकीने या विषयावर त्यांना बोलायचे असते. मात्र शासनामार्फत अशी उपेक्षा होणार असेल तर मग अशा विशेष सत्राची आपल्याला गरजच काय आहे असाही प्रश्न निर्माण होईल. ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. जर अशा प्रकारची अनास्था दाखवायची असेल तर हा विषयच बंद करावा अशी आपल्याला विनंती आहे. आपण आपला निर्णय घेऊ शकता की, सभागृह किती वेळासाठी स्थगित करावयाचे आहे.

**तालिका सभापती** : मी माननीय मंत्र्यांना निरोप पाठवितो. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.01 ते 10.11 पर्यंत स्थगित झाली.)

----

....B

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. नरेंद्र पाटील)**

**पृ.शी.:** राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात पडलेला भीषण दुष्काळ, अवकाळी पाऊस व गारपीट आणि तीव्र टंचाई यामुळे निर्माण झालेली परिस्थिती तसेच अवकाळी पाऊस,गारपीटीमुळे खरीप व रब्बी पिकांच्या झालेल्या हानीमुळे राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट

**मु.शी.:** "राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात पडलेला भीषण दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट आणि तीव्र टंचाई यामुळे निर्माण झालेली परिस्थिती" या विषयावर ***सर्वश्री.धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, अमरसिंह पंडित, जयंत प्र.पाटील, शरद रणपिसे, सतिश चव्हाण, संजय दत्त, संदीप बाजोरिया, विक्रम काळे, ख्वाजा बेग, प्रकाश गजभिये, प्रा.जोगेंद्र कवाडे, राजेंद्र मुळक, अमरनाथ राजूरकर, सुभाष झांबड, चंद्रकांत रघुवंशी, जयवंतराव जाधव, अब्दुल्ला खान दुर्राणी, श्रीमती दिप्ती चवधरी, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, वि.प.स.*** यांचा प्रस्ताव तसेच "अवकाळी पाऊस, गारपीटीमुळे खरीप व रब्बी पिकांच्या झालेल्या हानीमुळे राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट" या विषयावर श्री.पांडुरंग फुंडकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.गोपीकिशन बाजोरिया, प्रा.अनिल सोले, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री विजय गिरकर, महादेव जानकर, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाले.)

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, काल मी धानाच्या सपोर्ट प्राईसबद्दल बोलली आहे. आज मी कॉटनच्या सपोर्ट प्राईसबद्दल बोलणार आहे. सपोर्ट प्राईसचा विचार केला तर सन 2011-12 मध्ये मिडियम कॉटनला 2500 रुपये, लांब धाग्याला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस........

3000 रुपये, सन 2012-13 मध्ये मिडियम कॉटनला 3600 रुपये आणि लांब धाग्याला 3900 रुपये, सन 2013-14 मध्ये मिडियम कॉटनला 3600 रुपये आणि लांब धाग्याला 4000 होता, सन 2014-15 मध्ये मिडियम कॉटनला 2750 रुपये आणि लांब धाग्याला 4050 रुपये सपोर्ट प्राईस आपण दिलेली आहे. त्याचबरोबर सोयाबीनला देखील सपोर्ट प्राईस दिलेली आहे. सन 2012-13 मध्ये ब्लॅक सोयाबीनला 2200 रुपये आणि पिवळ्या सोयाबीनला 2240 रुपये, सन 2013-14 मध्ये ब्लॅक सोयाबीनला 2500 रुपये आणि पिवळ्या सोयाबीनला 2560 रुपये, सन 2014-15 मध्ये ब्लॅक सोयाबीनला 2500 रुपये आणि पिवळ्या सोयाबीनला 2560 रुपये सपोर्ट प्राईस आपण दिलेली आहे.

सभापती महोदय, सपोर्ट प्राईस देत असताना संपूर्ण देशाचा विचार केला जातो आणि आपण उत्पन्नावर आधारित भाव मागत असतो. संपूर्ण देशाचा विचार केला तर आंध्र प्रदेशमध्ये प्रति हेक्टरी 38772.50 रुपये खर्च येतो आणि उत्पन्न 17.32 क्विंटल होते. त्यांचा खरा प्रति क्विंटल खर्च 3557.48 रुपये आहे. हरियाणा मध्ये प्रति हेक्टरी 38803 रुपये येतो आणि 18.64 क्विंटल उत्पादन होते. त्याचा खर्च 3229.48 एवढा होतो. मध्य प्रदेशमध्ये सर्वात कमी खर्च येतो. त्या ठिकाणी प्रति हेक्टरी 22993.93 एवढा खर्च येतो आणि उत्पादन 16.34 क्विंटल आहे. 2459.30 रुपये एवढा खर्च आहे. महाराष्ट्रात मात्र सर्वात जास्त खर्च आहे. प्रति हेक्टरी 45743.38 एवढा खर्च आहे आणि उत्पन्न मात्र 15.34 आहे. कोणत्याही राज्यामध्ये एवढा खर्च नाही, तेवढा उत्पादन खर्च आपल्या राज्यात आहे. आपल्या राज्यात प्रति क्विंटल 3985.05 रुपये एवढा खर्च येत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजीची भावना आहे.

सभापती महोदय, आपण पाहिले तर आंतरराष्ट्रीय बाजारात भाव कमी होत आले आहेत आणि आपल्या देशात मात्र भाव वाढत चालले आहेत. देशाचे भाव वाढलेले असतात आणि आंतरराष्ट्रीय बाजारभाव कमी होतात त्यावेळी आपल्याकडील कापसाला भाव मिळत नाही. भाव वाढविण्यासारखी परिस्थिती नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजीची भावना आहे.

...3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.......

परंतु, शेतकऱ्यांची जी मागणी आहे, ती आपण पूर्ण केली पाहिजे. शेतकऱ्यांनी सिंचन मागितले आहे, उत्तम प्रतीची बियाणे मागितली आहेत.

सभापती महोदय, मी शासनाचे अभिनंदन करीन. बी.टी.बियाणांचा प्रति क्विंटल 100 रुपये एवढा दर कमी करुन सरकारने शेतकऱ्यांना न्याय दिलेला आहे. एका थैलीमागे 250 रुपये कमी केल्यामुळे बी.टी.बियाणांचा भाव कमी झाला आहे. रासायनिक खतांच्या बाबतीत देखील आमची मागणी आहे की, त्याबाबतीतही दिलासा दिला तर अधिक चांगले होईल. मुळात उत्पादन खर्च कमी करण्याची गरज आहे. शासनाने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, आपण इस्त्रायलला एक समिती पाठविली. त्या ठिकाणी प्रति हेक्टरी 60 क्विंटल कापसाचे उत्पादन होते. त्या ठिकाणी कापसाचे मोठे बोंड असते. आमचे म्हणणे आहे की, आपण त्या ठिकाणी अधिकाऱ्यांना अभ्यास करण्यासाठी पाठविले, तेथून इकडे बियाणे आणले. परंतु, त्याचा योग्य परिणाम आपल्या येथे झाला नाही. त्यामुळे उत्पादन वाढविण्याकरिता आणि खर्च कमी करण्याकरिता शासनाने प्रयत्न केला पाहिजे. असे केले तर शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळू शकतो, शेतकऱ्याला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकते आणि त्याचा लाभ वाढू शकतो.

सभापती महोदय, धानाचे भाव कमी आहेत व त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी असेल, शेतकरी भाव वाढवून घेण्याकरिता प्रयत्न करीत असेल तर ते वावगे नाही. त्यासाठी शासनाने उत्पादनाचा खर्च कमी करावा, उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. हे म्हणत असताना हळुहळु लक्षात आले की, धानाचे मार्केट कमी होत चालले आहे. याचा अर्थ उत्पादन कमी होत चालले आहे. धानाचे उत्पादन कमी होणे हे खऱ्या अर्थाने घातक ठरणार आहे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी व्यापाऱ्यांकडे माल घेऊन येतात. त्या ठिकाणी या मालावर 100 ते 150 रुपये सेस आणि इतर कर आकारला जातो व त्याची वसुली शेतकऱ्यांकडून केली जाते. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून तेवढे पैसे शेतकऱ्याला कमी मिळतात. त्याचप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माल न नेता त्याची

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस........

बाहेर विक्री केली तरी कृषी उत्पन्न बाजार समित्या त्यावर कर आकारतात. वास्तविक पाहता, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रिमायसेसमध्ये ज्या मालाची विक्री किंवा खरेदी होत नाही, त्यावर कर आकारण्याचा अधिकार कृषी उत्पन्न बाजार समित्यांना नाही. याबाबत देखील शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, तुरीच्या वाढलेल्या भावाबाबत चर्चा होत आहे. खऱ्या अर्थाने पाहिले तर जेवढी डाळ आपल्याला लागते, तेवढ्या डाळीचे उत्पादन आपल्या देशात किंवा राज्यात होत नाही. आपल्या देशात होणारे डाळीचे उत्पादन 30 लाख 20 हजार टन एवढे आहे. म्हणजे, 16.48 एवढे उत्पादन होते. सन 2012-2013 मध्ये 16.48, सन 2013-2014 मध्ये 16.02, सन 2014-2015 मध्ये 16.16 एवढे तुरीच्या डाळीचे उत्पादन आपण घेऊ शकलो आहोत. तुरीच्या डाळीचा सर्वात जास्त वापर आपल्या देशात आणि आपल्या राज्यात केला जातो. आपल्याकडे पुरेसे उत्पादन होत नसल्यामुळे आणि वापर जास्त असल्यामुळे आपण तुरीची डाळ आयात करतो. आपण जवळपास 12.74 टक्के तुरीची डाळ आपल्या देशात मागविली आहे. सन 2013-2014 मध्ये 12.74 टक्के, सन 2014-2015 मध्ये 12.54 टक्के, सन 2015-2016 च्या ऑगस्टपर्यंत 8.83 टक्के तुरीची डाळ विदेशातून आपल्या देशात आली आहे. सप्टेंबर पासून विदेशी तुर येण्यास सुरुवात होते. ती आल्यानंतर आपण मोठ्या प्रमाणावर तुरीच्या डाळीची मागणी पूर्ण करु शकू. मी या खात्याच्या मंत्री पदाचा कार्यभार पाहिला आहे. त्यामुळे मला माहीत आहे की, आपण 15 टक्केही तुर पिकवीत नव्हतो. आपल्या येथे चना डाळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. चना डाळीचे उत्पादन 48.76 टक्के आहे. आपल्या येथे तुरीच्या डाळीचा वापर जास्त आहे व उत्पादन कमी आहे. त्यामुळे आपण तुरीची डाळ आयात करतो. तुरीवर प्रक्रिया करण्यासाठी खर्च येतो. तुरीचे तुकडे होतात, त्यामुळे नुकसान होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेपेक्षा आपले भाव जास्त असतात. मला सांगावयाचे आहे की, आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये मार्च, 2014 पर्यंत प्रति क्विंटल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.......

भाव 4000 रुपये होता, मार्च, 2015 ला 5000 रुपये होता आणि जुलै, 2015 ला 10000 रुपये झाला. सप्टेंबर, 2015 ला तो 15000 रुपये झाला. आयात तुरीचे दर जर एवढे चढे असतील तर त्याचा किती परिणाम आपल्या येथे होऊ शकतो, याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. यासाठी आपल्या राज्यामध्ये तुरीचे उत्पादन वाढविणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, एकदा प्रवास करीत असताना मला एक शेतकरी भेटला.

..C-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.......

ते दोघे आपसात चर्चा करीत होते. तो शेतकरी सांगत होता की, मी तुरीचे उत्पादन घेणे बंद केले आहे आणि तूर डाळ महाग झाली म्हणून तोच बोलत होता. मी त्याला म्हटले की, तू जर तुरीचे उत्पादन घेणे बंद केले तर देशात, राज्यात तुरडाळ महाग होणार नाही काय ? तू पैसेवाला शेतकरी आहे. तुझी पैसे खर्च करण्याची हिम्मत असून देखील तू शेतात तूर पिकवत नाही. मग तुला राज्यातील बाजार भावाबाबत बोलण्याचा अधिकार नाही. त्याने मला सांगितले की, आमचे चुकले. आम्ही असे करावयास नको होते.

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने या सर्व गोष्टींचा विचार करीत असताना इंटरनॅशनल मार्केटपेक्षा आपल्या देशातील बाजार भाव मोठ्या प्रमाणात आहेत. सन 2012 ते 14 मध्ये तांदळाचे भाव जवळपास 64.4 डॉलर्सने आणि गव्हाचे इंटरनॅशनल भाव 62.9 डॉलरने महाग होते. World Trade Organisation is fighting to keep Sonia, Congress dream alive अशा पद्धतीचा एक रिपोर्ट आलेला आहे. ड्रिम कसे होते हे मला कळत नाही. परंतु, सन 2006 पर्यंत हेच भाव भारतात कमी व विदेशात जास्त होते. सन 2004 ते 2006 या कालावधीत भारतात तांदूळ प्रती टन 191.3 डॉलर्स होता आणि विदेशी तो 309.4 डॉलर्स होता. आपण ज्यावेळी आपल्या देशातील माल विदेशात पाठवत होतो त्यावेळी शेतकऱ्याला त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होत होता. आपल्यापेक्षा विदेशात तांदळाचा भाव जवळपास 38.2 डॉलर्सने जास्त होता तर गव्हाचा भाव 71.5 डॉलर्सने जास्त होता. आता हे चित्र बदलले आहे. सन 2007 ते 2009 या कालावधीत 293.2 डॉलर्स भाव होता. सन 2010 ते 2012 मध्ये 3043.3 डॉलर्स प्रती क्विंटल म्हणजे 190.4 टक्के होता. म्हणजे 81.1 टक्क्याने आपल्यापेक्षा तिकडे भाव कमी झालेले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार केला तर भाव मिळण्याकरिता जे चित्र आपल्या डोळ्यासमोर असावयास पाहिजे ते नसल्यामुळे आपण मोठ्या प्रमाणात एक्सपोर्ट करु शकत नाही हे खऱ्या अर्थाने आपले दुर्दैव आहे.

सभापती महोदय, मी सभागृहाचे लक्ष महागाईच्या निर्देशांकाकडे वेधू इच्छिते. काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर असताना महागाईचा दर सन 1995 मध्ये 9.69 टक्के, सन 1996 मध्ये 10.41 टक्के, सन 1997 मध्ये 6.29 टक्के आणि सन 1998 मध्ये 15.32 टक्के होता. माननीय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.......

पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार सत्तेवर असताना सन 1999 मध्ये 0.87 टक्के, सन 2001 मध्ये 5.16 टक्के, सन 2002 मध्ये 3.20 टक्के, सन 2003 मध्ये 3.72 टक्के आणि सन 2004 मध्ये 3.76 टक्के महागाईचा दर होता. त्यानंतर केंद्रात पुन्हा काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आले आणि पुन्हा महागाईचा इंडेक्स वाढत गेला. सन 2005 मध्ये 5.57 टक्के, सन 2006 मध्ये 5.79 टक्के, सन 2007 मध्ये 6.39 टक्के, सन 2008 मध्ये 8.32 टक्के, सन 2009 मध्ये 10.83 टक्के आणि सन 2010 मध्ये 12.11 टक्के, सन 2011 मध्ये 8.87 टक्के, सन 2012 मध्ये 8.30 टक्के आणि सन 2013 मध्ये 10.92 टक्के अशा प्रकारे महागाईचा इंडेक्स वाढत गेला. त्यानंतर माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेवर आले. सगळीकडे महागाई वाढली, महागाई वाढली अशी ओरड होते. हा कन्झ्युमर प्राईजेस इंडेक्स आहे. सन 2014 मध्ये महागाईचा दर 10.92 टक्क्यांवरुन 6.37 टक्क्यांवर आला आणि सन 2015 मध्ये तो 5.75 टक्क्यांवर आलेला आहे. आपण महागाई कमी झाले असे स्पष्टपणे म्हणू शकतो, अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, शेतकऱ्यांना ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या त्यांना देणे गरजेचे आहे आणि त्या देत असताना शासनाने शेतकऱ्यांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. सिंचनाच्या बाबतीत, उत्पादन खर्च कमी करण्याच्या दृष्टीकोनातून, उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून आणि देशाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने प्रयत्न करावा, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

--------

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

राज्यातील मरावाडा, विदर्भासह विविध भागात भीषण दुष्काळ आणि तीव्र टंचाई निर्माण होणे, दुष्काळ व टंचाई निवारणार्थ शासनाकडून कोणत्याही उपाययोजना करण्यात न येणे, नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून गेल्या वर्षभरात 3100 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, माहे जानेवारी, 2015 पासून शेतकरी आत्महत्येच्या प्रमाणात वाढ होणे या संदर्भात जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे तो निश्चितच सर्वांना काळजी करावयास लागणारा आहे. राज्यातील शेतकऱ्यांवर जे संकट आलेले आहे विशेषतः विदर्भ, मराठवाडा, खान्देश, उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मग तो जिराईत शेती करणारा शेतकरी असो किंवा बागायती शेती करणारा शेतकरी असो. अवकाळी पावसामुळे, दुष्काळी परिस्थितीमुळे, टंचाईमुळे फळबागांचे आणि खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. हे नैसर्गिक संकट आहे हे बरोबर आहे. त्याबाबत वाद करण्याचे काही कारण नाही. परंतु, सरकारने वेळीच दक्षता घेऊन नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना पुरेशी मदत केली असती तर नैसर्गिक संकटानंतर जे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे संकट रात्यात आले आहे त्याला थोडाफार तरी प्रतिबंध करता आला असता, असे मला वाटते. म्हणजे नैसर्गिक संकट आल्यानंतर संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची मदत न करता त्यांना पुन्हा संकटात टाकण्याचे काम शासनाच्या या भूमिकेमुळे झालेले आहे, असे मला खेदाने म्हणावेसे वाटते. त्याला आगीतून निघून फोफाट्यात पडणे, असे म्हटले जाते. म्हणजे अगोदरच निसर्गाची अवकृपा आणि त्यात शासनाची अवकृपा अशा दुहेरी अडचणीत सापडल्यामुळे आमचा शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहे.

सभापती महोदय, मी या संदर्भात जास्त बोलणार नाही. परंतु, एक गोष्ट निश्चित आहे की, ज्या शेतकऱ्यांनी सावकारांकडून कर्ज घेतले होते त्या सावकारांचे कर्जफेड करण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारली. म्हणजे आपण सावकारांच्या तिजोऱ्या भरल्या. सावकारांनी कर्ज देताना शेतकऱ्यांची लुटमार केली, त्यांची शेती स्वतःच्या नावावर करून घेतली. आपण शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम सावकारांना देऊन सावकारांच्या तिजोऱ्या भरल्या. परंतु,

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

अडचणीत सापडलेला, संकटात सापडलेला, दुदैवाच्या फेऱ्यात सापडलेल्या शेतकऱ्याला दिलासा देण्याचे काम मात्र शासनाने आज पर्यंत केलेले नाही. खरे पाहिले तर मागील संपूर्ण आठवडा याच गोंधळात गेला. मी माननीय सभापतींना धन्यवाद देतो की, त्यांनी ही कोंडी फोडली आणि सोमवार पासून या विषयावरील चर्चेला सुरुवात झाली. परंतु, विरोधी पक्षाला हे का करावे लागले, सरकारला का धारेवर धरावे लागले, अशा प्रकारचा गोंधळ का घालावा लागला ? आंधळे, बहिरे, मुके झालेल्या सरकारचे डोळे उघडण्यासाठी, बहिऱ्या झालेल्या सरकारच्या कानापर्यंत शेतकऱ्यांच्या दु:खाचा आवाज पोहोचविण्यासाठी आणि मुके झालेल्या शेतकऱ्यांच्या भावनांना वाचा फोडण्यासाठी विरोधी पक्षाला हे सर्व करावे लागले. याला कोण जबाबदार आहे ? जर सरकार चांगले असते, सरकारने सर्व दक्षता घेतली असती, सरकारने शेतकऱ्यांना मदत केली असती, सरकारने शेतकऱ्यांना योग्य प्रकारची आर्थिक मदत केली असती, योग्य प्रकारे बी-बियाणे पुरविले असते, शेतीसाठी लागणारी मदत पुरविली असती, शेतकऱ्यांना दिलासा दिला असता की, शेतकऱ्यांनो तुम्ही आत्महत्या करु नका, सरकार खंबीरपणे तुमच्या पाठीशी उभे आहे, तर मागील आठवड्यातील संपूर्ण वेळ शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी वाया गेला नसता आणि याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे, असे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढत आहेत. रोज वर्तमानपत्र उघले की, वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर दोन-चार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या बातम्या वाचावयास मिळतात. हे सर्व बघून वाईट वाटते. फुले, शाहू, आंबेडकर, शिवबांच्या महाराष्ट्रात जर दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ होत असेल तर देशात आणि जगात राज्याची प्रतिमा चांगली राहणार नाही, याकडे सरकारने लक्ष द्यावे.

..D-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

वर्तमानपत्रात अशी बातमी आलेली आहे की, महाराष्ट्रात सरासरी दररोज 11 शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात ही गोंष्ट आपल्या राज्याला भूषणावह नाही. सरकारने शेतकऱ्यांची कर्ज माफी करावी अशी मागणी सातत्याने करण्यात येत आहे. सत्ताधारी पक्षात बसलेली आमची मित्रमंडळी आहे, हे लोक एका वर्षाअगोदर विरोधी पक्षात होते. सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते आता उपस्थित नाहीत, मी त्यांना फार मानतो ते शेतकऱ्यांचे कैवारी आहेत, आपण जेव्हा विरोधी पक्षात बसत होता, तेव्हा आपण शेतकऱ्यांचे कैवारी होता. सत्तेत गेल्यावर आपण शेतकऱ्यांचे वैरी कसे झाला आहात, याचे मला दु:ख वाटते. विरोधात असताना शेतकऱ्यांचे कैवारी व सत्तेत गेल्यावर शेतकऱ्यांचे वैरी ही भूमिका आपणाला शोभादायक नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आपण 15 वर्षे आघाडी शासनाने काय केले हे सांगण्यापेक्षा आज शेतकरी संकटात सापडला आहे, त्यासाठी सरकार काय मदत करणार आहे ते सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी काल भाषण करतांना सांगितले की, 15 वर्षापर्यंत सरकारने काही केले नाही व एका वर्षात या सरकारकडून अपेक्षा करीत आहात. याबाबत मला असे म्हणावयाचे आहे की, शेतकरी आज अडचणीत व संकटात आहे, त्यामुळे आज काय करता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. 'कल की बात जाने दो आज की बात करो'. आज महाराष्ट्राची व केंद्राची सत्ता तुमच्याकडे आहे, राज्याची तिजोरी तुमच्याकडे आहे, जगाची सत्ता तुमच्याकडे असल्यावर शेतकऱ्यांना मदत का मिळत नाही, शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून का रोखू शकत नाही, हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. गेल्या 15 वर्षात आघाडीच्या सरकारने काय केले याचा हिशेब मागण्याऐवजी वर्षभरात शेतकऱ्यांच्या आत्महत्या का वाढल्या आहेत. याचा तपास करुन सरकार काही उपाययोजना करणार आहे काय ? हा खरा महत्वाचा भाग आहे.

सभापती महोदय, मुडदे मोजण्याऐवजी शेतकऱ्यांचे मुडदे पडणार नाहीत, याची काळजी सरकारने घ्यावी. शेतकऱ्यांच्या घरी मुलींच्या लग्नासाठी पैसे नाहीत, मुलांची फी भरण्यासाठी पैसे नाहीत, माणसांना व गुरांना पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे, गुरांना चाऱ्याची टंचाई आहे,

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

पाण्यावरुन जिल्ह्या-जिल्ह्यात मारामाऱ्या सुरु झाल्या आहेत. आमच्या जिल्ह्याचे पाणी त्या जिल्ह्याला देऊ नका. अशा प्रकारची परिस्थिती असल्यामुळे हे संकट आणखी जास्त गंभीर होत चालले आहे. याबाबत सरकारने योग्य प्रकारची दक्षता घेतली पाहिजे.

सभापती महोदय, मागील वर्षी 7000 कोटी रुपये शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल असे जाहीर केले होते. शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईपोटी 4800 कोटी रुपये देण्याची घोषणा केली होती, त्यापैकी 800 कोटी रुपये अद्यापही का देण्यात आले नाहीत, असा प्रश्न विरोधी पक्ष नेत्यांनी विचारला तर त्याबाबत मंत्री महोदयांना वाईट वाटण्याचे काय कारण आहे. 800 कोटी रुपये का दिले नाहीत याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे. कापूस, धान, सोयाबीन, ऊस, संत्रा या शेतीमालाचे दिवसेंदिवस भाव कमी होत चालले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी आता भाषण करताना महागाई कमी झाली असा विषय मांडला आहे. खरे पाहिले तर महागाईवर चर्चा करण्याचा हा प्रस्ताव नाही. आता आपण दुष्काळाच्या विषयावर चर्चा करीत आहोत. शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत चर्चा करीत आहोत, महागाईचा विषय यामध्ये नाही. सन्माननीय सदस्या महागाई कमी झाली असे सांगत आहेत याचे मला आश्चर्य वाटते. तूरदाळीचे भाव 200 रुपये किलोवर गेले आहेत, बटाटा, टोमॅटो, कांदा यांचे भाव वाढत आहेत. तरी देखील महागाई कमी झाली असे सत्ताधारी लोक सांगत आहेत त्यामुळे हे सरकार कोणत्या स्वप्नात आहे हे मला समजत नाही. महागाई आकाशाला भिडली आहे, सर्वसामान्य जनतेला व गरीब माणसाला जगणे कठीण होत चालले आहे. हातावर आणून पानावर खाणाऱ्या आमच्या दलित माणसाला जगणे कठीण होत चालले आहे. अशा वेळी महागाई कमी झाली असे म्हणण्याची हिंमत कशी काय केली जाते ? इतका निर्ढावलेपणा शासनामध्ये कसा काय येतो हे मला समजत नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आपण मला माफ करा पण हा निर्ढावलेपणाच आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील 15747 गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. आणेवारीची पध्दत इंग्रजाच्या काळापासून म्हणजे 1857 पासून चालत आली आहे. नवीन

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

परिस्थितीत आणेवारी मोजण्याच्या पध्दतीत सरकार काही सुधारणा करणार आहे किंवा नाही. 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असून देखील त्या लोकांना सरकारी मदत मिळाली नाही. पाणी व चारा टंचाई आहे, जनावरांसाठी छावण्या निर्माण केल्या आहेत. जनावरे जेव्हा छावणीत जातात तेव्हा माणसांना देखील त्यांची देखभाल करण्यासाठी जावे लागते. त्या लोकांसाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी अत्यंत महत्वाची बाब काल त्यांच्या भाषणात सांगितली होती. भारतीय शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून भारत सरकारने आंतरराष्ट्रीय किर्तीचे कृषी शास्त्रज्ञ डॉ. एन.एच.स्वामीनाथन् यांच्या अध्यक्षेतेखाली सन 2004 मध्ये कृषी आयोगाची स्थापना केली होती. 2004 ते 2006 या कालावधीत या आयोगाने चार अहवाल शासनाकडे सादर केले आहेत. पाचवा आणि शेवटचा अहवाल 4 ऑक्टोबर, 2006 रोजी सादर केला आहे. या अहवालात भारतीय शेतकऱ्यांच्या दूरवस्थेची विविध कारणे नमूद करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांची दूरवस्था होऊ नये, शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली पाहिजे. त्यासाठी विस्तृत स्वरूपाची उपाययोजना सुचविण्यात आली आहे. मला या गोष्टींचे आश्चर्य वाटते की, 4 ऑक्टोबर, 2006 रोजी स्वामीनाथन आयोगाने शेतकऱ्यांची दूरवस्था दूर झाली पाहिजे यासाठी अहवाल सादर केला, त्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे 5 ऑक्टोबर, 2006 रोजी केंद्र सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी सातव्या वेतन आयोगाची घोषणा केली होती. सरकारी कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची मागणी नसताना अडीच वर्षाअगोदर सातवा वेतन आयोग केंद्र सरकारने परस्पर जाहीर करून त्यांच्या पगारात 50 टक्के वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला. स्वामीनाथन आयोगाने ज्या अत्यंत व मूलभूत अशा सूचना केल्या आहेत तो अहवाल सरकारने का दाबून ठेवला आहे. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी सरकारने मान्य केल्या असत्या तर कदाचित आज शेतकऱ्यांची दूरवस्था झाली आहे ती झाली नसती. स्वामीनाथन अहवालात असे नमूद केले आहे की, शेतकऱ्यांचा खर्च वजा जाता त्यांचे

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

उत्पन्न सरकारी नोकराप्रमाणे असले पाहिजे. शेती मालाला हमी भाव देतांना त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षा 50 टक्के जास्त हमी भाव मिळाला पाहिजे. शेतीमालाची आधारभूत किंमत लागू करण्याच्या पध्दतीत सुधारणा केली पाहिजे. शेतीमालाच्या किंमतीमध्ये जे चढउतार होतात व त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते ते होऊ नये म्हणून मूल्य स्थिरता निधी निर्माण करण्यात यावा. अशी शिफारस स्वामीनाथन आयोगाने केली आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना वारंवार नैसर्गिक आपत्ती सहन करावी लागते. त्यामुळे त्यांच्यावर विपरित परिणाम होतो. त्यापासून शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी शेतीमालावर आयात कर लावण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली आहे. एका पाठोपाठ येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमधून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कायम कृषी आपातकाल निधी म्हणजे ॲग्रीकल्चर रिक्स फंड स्थापन करण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली आहे. आपणाकडे डिझास्टर मॅनेजमेंट आहे. काश्मिरमध्ये महापूर आला, उत्तराखंडमध्ये महापूर आला, चेन्नईमध्ये महापूर आला, आपातकाल परिस्थिती निर्माण झाली तर त्याला तोंड देण्यासाठी व योग्य प्रकारे तातडीची उपाययोजना करण्यासाठी ॲग्रीकल्चर रिक्स फंड ही संस्था स्थापन करण्यात आली आहे.

...E-1..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे......

त्याच पध्दतीने या स्वामीनाथन आयोगाने ही शिफारस केली आहे. त्यानुसार ॲग्रीकल्चर रिस्क फंड निर्माण करण्यात यावा. आज पावसाच्या पाण्याचे योग्यप्रकारे व्यवस्थापन केले जात नाही. शेतकऱ्यांची अवस्था पाहून असे वाटते की, आमच्या राज्यातील शेतकरी असे म्हणत असतील की,

आशिया लूट गया मेरी नजर के सामने
होकर बेघर मैं अपने ही घर के सामने

सभापती महोदय, श्री.भालेराव नावाचे कवि असे म्हणतो की,

शिक पोरा शिक, शेतकऱ्याच्या पोरा आता लढायला शिक
मरु नको आता, आता मारायला शिक
ज्याला तू निवडून दिले त्याला पाडायला शिक

एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

--------------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यातील मराठवाडा व विदर्भासह सर्वदूर पडलेल्या दुष्काळाच्या प्रश्नावर अतिशय महत्वाची चर्चा या सभागृहात सुरु आहे. वारंवार उल्लेख झाला की, विरोधी बाकावर असणारे आज सत्ताधारी बाजूला आहेत आणि सत्ताधारी बाकावर होते ते आज विरोधी बाजूला बसलेले आहेत. हा बदल झाल्यामुळे सत्ताधारी पक्षात असलेले लोक काय करीत आहेत?

सभापती महोदय, गणितामध्ये त्रिकोण नावाची कल्पना आहे. त्रिकोणाला तीन बाजू असतात. त्यातील एक बाजू पायाची आणि दोन कोनांमुळे तो त्रिकोण तयार होतो. पायाची बाजू ही तुमची ब्युरोक्रसी आहे. उर्वरित दोन बाजूंपैकी एक बाजू इकडून तिकडे गेली किंवा तिकडून इकडे आली तर त्याच्यावर परिणाम होतो का हे तपासण्याची वेळ आलेली आहे. काल पुरवणी मागण्यांवरील चर्चेवरील उत्तराच्या भाषणात राज्याचे अर्थमंत्री अतिशय आवेशाने म्हणाले की, या देशातील विद्यार्थी अभिमानाने लिहितात की, माझा देश कृषी प्रधान देश आहे, त्याचा मला अभिमान वाटतो. आपल्याकडून याची पुनरावृत्ती झाली हे ऐकून आम्हालाही बरे वाटले. परंतु दुर्दैवाने असे म्हणण्याची त्यांच्यावर वेळ येऊ नये की, भारत माझा देश आहे, तो कृषी प्रधान आहे, आता मला त्याची लाज वाटू लागली आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात, विद्यार्थ्यांची फी का मिळत नाही, विद्यार्थ्यांची शुल्क माफी का होत नाही, वसतिगृहात राहणाऱ्या मुलांना घराकडे का परतावे लागते, शिक्षणाच्या प्रवाहातून ते बाजूला का जात आहेत? तुमचा हाच उपक्रम आहे की, शिक्षण व्यवस्थेतून गळती झालेल्या विद्यार्थ्यांची गणना करायची. प्रत्यक्ष करायचे काहीच नाही. पण मोजदाद मात्र सुरु करायची. हे सगळे प्रकार शासन आणि प्रशासनाचा भाग आहे. आम्ही असे समजतो की, सत्तारुढ हे शासन आहे आणि तुमच्या हाताखाली काम करणारे राज्याचे प्रशासन आहे.

सभापती महोदय, मला सन्माननीय सत्तारुढ पक्षामधील आज जे विविध विभागाच्या मंत्री पदावर कार्यरत आहेत त्यांच्याबद्दल नितांत आदर आहे. त्यांच्या कार्यक्षमतेवर माझा विश्वास आहे. परंतु ज्या पध्दतीने काही ठराविक मंत्र्यांकडे तीन-तीन, चार-चार खात्यांचा कारभार सोपविलेला आहे, तो पाहता राज्यावर ओढवलेल्या या परिस्थितीचा विचार करता या कामाचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे, याची नोंद सरकारने घ्यावी. एका मंत्र्याकडे किती खाती आहेत, त्यांच्याकडे किती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E.3

SGB/ ST/ AKN/ 10:40

श्री.हेमंत टकले.....

भारतीय प्रशासन सेवेतील उच्चपदस्थ रिपोर्टिंग करतात, त्यांच्या वेळेचे नियोजन काय आहे, त्यांच्या दालनामधील बैठकांना किती वेळ मिळणार आहे, त्यांना प्रत्यक्ष परिस्थितीकडे जाण्यासाठी किती वेळ लागणार आहे या सगळयाची सांगड घातली गेली पाहिजे. ते राजकीय अपरिहार्यतेमुळे थांबले असेल तर राज्याच्या दृष्टीने अतिशय दुर्दैवी आहे. सातत्याने सांगितले जाते की, गेल्या 4-5 वर्षापासून हे संकट राज्यावर येत आहे. पाऊस कमी होत आहे. नापिकी होत आहे, गारपीट होत आहे, शेती उत्पादनाला योग्य भाव मिळत नाही, किटकनाशके मिळत नाहीत, त्यांचे भाव वाढले आहेत, अवकाळी पाऊस येतो. मागील 4-5 वर्षे या समस्या सातत्याने भेडसावत आहेत. या समस्या वाढत चालल्या आहेत. याचे कारण असे की, हवामानामध्ये बदल होत आहे.

सभापती महोदय, आज तुम्ही या संकटांचा सामना करीत आहात. आज डिसेंबर महिन्यात ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कमी झाली आहे. डिसेंबर महिन्यात जर राज्यात ही परिस्थिती असेल तर मार्च-एप्रिल नंतर पाण्यासाठी काय करायचे हा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे त्याबाबत नियोजन करायचे असेल तर तंत्रज्ञानामध्ये काही तरी बदल घडवायचा, शेतकऱ्यांना त्याबाबत मार्गदर्शन करायची गरज आहे. संख्यात्मक मांडणी हा प्रशासनाचा खूप आवडीचा भाग असतो. अमुक इतक्या आत्महत्या झालेल्या आहेत, जी गणना केली त्यातील पात्र व अपात्र वर्गवारी केली जाते. मंत्रालयातील विभागांमध्ये ज्याप्रमाणे आवक व जावक नोंदी केलेल्या कागदपत्रांचा ट्रे असतो त्याप्रमाणे या आत्महत्या प्रकरणांची वर्गवारी का केली जाते? शेतकऱ्यांच्या विश्वासार्हतेबद्दल आपण प्रश्नचिन्ह निर्माण करीत आहात. आपली परिपूर्ण यंत्रणा असताना तळातील माणसाला वरपर्यंत येण्याची मजबुरी कमी करता येणार नाही का?

सभापती महोदय, सत्तेवर कोणीही असो, मोठया प्रमाणात तज्ज्ञांचा सल्ला घेतला जातो. याच्याशी निगडित विषय चर्चेला आला की, राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे असे सभागृहात सांगितले जाते. त्यांनी काय काय करायचे याचे रेफरन्स दिले जातात. छत्रपती शिवाजी स्मारक त्यांनी करायचे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक त्यांनी करायचे, त्यांनी पाणी टंचाईचा आढावा घ्यायचा, त्यांनी किटकनाशकाबद्दल सांगायचे. अष्टभूजा दैवतासारखी माणसे आपल्याकडे आहेत का अशी शंका येते. या कामाचे विकेंद्रीकरण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

का होऊ शकत नाही? त्याच्यात भर म्हणून दुष्काळाबाबत राज्य सरकारने केंद्र सरकारला अहवाल पाठवायचा आणि केंद्र सरकारकडून त्यांचे पथक पाहणी करण्यासाठी राज्यात पाठविले जाते. त्या

...4..



**(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.हुस्नबानू खलिफे)**

श्री.हेमंत टकले....

केंद्रीय पथकाकडून औपचारिकपणा म्हणून फिरता दौरा केला जातो. हे नाटक कशासाठी असते? तुम्हीच सांगितले आहे की, तंत्रज्ञानाचा वापर करीत आहात. शासनाने गुगलवर जे फोटो अपलोड केले आहेत, त्यात अन्नधान्याची राज्यातील परिस्थिती काय आहे, किती उपलब्धता आहे, धरणामध्ये पाण्याचा साठा किती आहे, शेतकऱ्यांच्या अडचणी काय आहेत हे नमूद केले आहे. दिल्लीत बसून याचा आढावा न घेता त्यांना राज्यात येऊन पाहणी करावी लागते, याचा अर्थ तुम्ही जे सादर करीत आहात त्यावर विश्वास ठेवायला ते तयार नाहीत. ही विश्वासार्हता का गमावली याचा विचार केला पाहिजे. आढावा बैठका घेतल्या पाहिजेत. विभागवार बैठका होतात, त्या बैठकांना लोकप्रतिनिधींना बोलावले जाते का याची मला माहिती नाही.परंतु त्या निमित्ताने होणाऱ्या बैठकीमध्ये टँकरबाबत तक्रारी सुरु होतात. शेतकऱ्यांना मिळणारी बियाणे निकृष्ट असल्याबाबत तक्रारी सुरु होतात.

.....एफ.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

त्याचे पुढे काय होते ? यासंबंधातील निर्णय प्रक्रिया जो पर्यंत मंत्रालयातून हलत नाही तो पर्यंत काहीही होणार नाही. यासाठी आपल्याला मंत्रालयात 24 तास कार्यरत असलेला सेल निर्माण करावा लागेल. प्रत्येक तलाठ्यांपर्यत मंत्रालयातील अधिकारी पोहोचले पाहिजेत. त्याच्याकडे सोपविण्यात आलेल्या दुष्काळी गावाची स्थिती काय आहे, त्या गावात पाणीसाठा किती आहे, गावातील शेतकरी काय म्हणत आहेत, विद्यार्थ्यांची काय परिस्थिती आहे यासंबंधातील सर्व आढावा त्याने मंत्रालयातील अधिकाऱ्यांना कळविला पाहिजे. असे केले तर त्यावर कोणत्या उपाययोजना केल्या आहेत याची नोंद आपल्याला मंत्रालयात बसून घेता येईल.

माननीय मुख्यमंत्र्यांचा आणि या शासनाच्या मंत्रिमंडळाचा सातत्याने एकच जागर आहे की, कर्जमाफी हा काय उपाय होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी कर्ज माफी ऐवजी कर्ज मुक्ती करावी असा शब्द वापरला आहे. हा मराठीतील चांगला शब्द आहे. मराठीत या शब्दाला थोडे वरचे स्थान आहे हे मान्य आहे. ते काय म्हणतात आम्ही दीर्घकालीन उपाययोजना करणार आहोत. म्हणजे एखादा माणूस आजारी पडला, त्याचा आजार वाढत गेला, त्याला रूग्णालयात नेले, त्याला आयसीयुमध्ये भरती केले, त्याला व्हेंटीलेटरवर ठेवल्यानंतर सांगायचे की, थांब बाबा आम्ही दीर्घकालीन आपले काय होत आहे याचा आम्ही विचार करतो आणि मग तुला बाहेर काढतो. तो पर्यंत तो जीवंत राहणार आहे काय ? आम्ही मागतो म्हणून आपण कर्ज माफी देत नाही. हा आपला हट्ट कशासाठी आहे. आपल्याला शेतकऱ्याला त्याच्या पायावर उभे करावयाचे असेल तर सुरूवातीलाच त्याची पाटी आपण कोरी करावी. त्याचा 7/12 आपण कोरा करावा. तेथून त्याला आपण आपल्या विकासाच्या रस्त्यावर घेऊन चला. त्यालाच आपण अपंग बनवून ठेवला असेल तर पुढे तो कसा काय सुदृढ होईल, तो आपल्या मुला-बाळांचा कसा काय सांभाळ करू शकेल, त्यांना शिक्षण कसे काय देणार आहे ? या मूलभूत गोष्टींकडे आपण लक्ष देणार नसाल तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही. यासाठी आपल्याला काही तरी पर्याय शोधावा लागेल. आम्ही सांगतो म्हणून आपण देत नाही हे बरोबर नाही. आपण काही देणार नाहीत हे आम्हाला माहीत असल्यामुळे आम्ही काही मागणार देखील नाही. आपल्या सर्वांना जगवणारा आज शेतामध्ये मर मर मरतो आहे. आज त्या शेतकऱ्याची अवस्था काय आहे ? तो आज आपल्याकडे आशेने का बघतो आहे, याचा विचार आपण करणार आहात की नाही ?

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदया, काल मला आपण या विषयावर कशाला बोलता, आपण कधीच शेती केली नाही असे कोणी तरी म्हणाले. मी आपल्याला सांगतो की, मी पक्षाच्या कार्यालयात बसतो. माझ्याकडे अडचणीत आलेले शेतकरी येतात. काही महिन्यांपूर्वी मराठवाड्यातील एक शेतकरी माझ्याकडे आला होता. तो दोन-तीन दिवस पिशवी हातामध्ये घेऊन चकरा मारत होता. त्याच्या अंगावर फाटके कपडे होत, त्याची दाढी वाढली होती. हा शेतीसाठी मदत मागत असेल असे मला वाटले. त्याला मी बसविले आणि त्याच्याशी बोललो. तो मला म्हणाला की, बीड मधील एका गावात माझी शेत जमीन आहे. गेली तीन वर्षे सतत नापिकी असल्यामुळे कोणतेही पीक घेता आले नाही. त्यामुळे कर्ज बाजारी झालो. त्यात भरीस भर म्हणून माझ्या पत्नीला कॅन्सर झाला. मुंबईला आल्यावर टाटा रूग्णालयात स्वस्तात उपचार होतील असे त्याला वाटले. पत्नीचा आजार बरा होईल म्हणून त्याने तिला मुंबईला दाखल केले. तिच्यावर औषधोपचार सुरू आहे. तो मदत मागत फिरत होता. त्याने मला सर्व कागदपत्र दाखविली. त्याने मला सांगितले की, पत्नीवर आता केमोथेरपी सुरू आहे. ती शेवटच्या उपचारांकडे आलेली आहे. या शेतकऱ्याचे वय साठीच्या पुढे होते. काल आपल्या सामाजिक न्याय मंत्र्यांनी 60 वर्षावरील नागरिकांना ज्येष्ठ नागरिक म्हणणार आहे असे सांगून दिलासा देण्याचा प्रयत्न देखील केला. तो म्हणाला मला औषधे मिळाली आहेत. पण डॉक्टरांनी सांगितले की, हिला जगवायचे असेल तर पूरक आहार देणे आवश्यक आहे. तिला फळे द्यायला पाहिजेत. त्याच्यासाठी माझ्याकडे पैसे नाहीत. तिला महिना भर आहार द्यायचा आहे. मी त्याला काही पैसे देऊ केले. मी त्याला मदत देऊ केली. मी त्याला एक रक्कम देतो असे म्हटले. मी त्याला म्हटले की, मी तुला दहा हजार रूपये देतो. ते तुला दोन महिने पुरतील. त्याने दहा हजार रूपयांचा चेक पाहिल्यानंतर मला म्हणाला की, साहेब, आपण मला पाचच हजार रूपये द्यावेत. मी घरात कोणाशीही बोललेलो नाही. पण मला डॉक्टरांनी सांगितले आहे की, तुझी पत्नी एक महिन्यांच्या वर जगणार नाही म्हणून मला पाचच हजार रूपये हवे आहेत. शेतकऱ्यांचा प्रामाणिकपणा हा तेथे दिसतो. दहा हजार रूपये देऊ केलेले असताना तो नको म्हणतो. आम्ही कर्ज माफी का मागतो आहे याची कुठे तरी जाणीव किंवा बोचरी आपणाला बसली पाहिजे म्हणून मी ही गोष्ट आपल्याला मुद्दामहून सांगत आहे.

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

आपण सगळीकडे दुर्लक्षच करणार आहात काय ? आपण शेतकऱ्यांच्या वेदनेकडे बघणार आहात की नाही ? आपण त्याला फक्त एवढेच सांगत आहात की, आम्ही पुढे हे करणार आहे, ते करणार आहे. आज नापिकी झाली आहे, शेतात काहीही पिकत नाही. त्याच्या हाताला काम नाही. यासाठी त्याला कोणता पर्याय देणार आहात ? त्याच्या गावात शेतीचे काम नसेल तर मग त्याने काय करायचे ? याचे उत्तर आपणाकडे आहे काय ? त्याचे उत्तर आपणाला शोधावे लागेल. हा प्रश्न वाटतो तितका सोपा नाही. आज हवामानात बदल घडत आहेत. ते बदल लक्षात घेता अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे. सगळेच आपण पिकविले पाहिजे अशी सक्ती कोणावरही नाही. आपण जे पिकविले त्यास योग्य भाव दिला तरच शेतकरी जगेल. त्याचा माल परदेशात गेला तरच त्याला भाव मिळेल. आमच्या नाशिकची द्राक्षे परदेशात जातात. टोमॅटो परदेशात जातात. आजच सकाळी बातम्यांमध्ये एका शेतकऱ्याची भेंडी परदेशात गेल्याचे दाखविण्यात आले. अशा शेतकऱ्यांमध्ये कौशल्य आहे. त्यांच्यामध्ये नवीन काही तरी करण्याची ऊर्मी आहे. त्यांच्यात करून दाखविण्याची आवश्यकता आहे. त्यांना धीर देण्याची आवश्यकता आहे. आपण मोठ्या प्रमाणावर शेतीमाल एक्सपोर्ट करू शकलो तर त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून आपल्याकडे जे पीकत नाही ते दुसऱ्या देशांतून घेता येईल. आज आपल्याला पाहिजे तेवढी डाळ परदेशातून आणता येईल. आपण एक्सपोर्ट केलेल्या मालातून मिळणारे पैसे डाळ विकत घेण्यासाठी वापरता येतील. त्याचे आपल्याला नियोजन करावे लागेल.

आपण समित्या कशासाठी नेमत असतो. गेल्या शासनामध्ये केळकर समितीच्या अहवालावर चर्चा झाली. त्या समितीवर चर्चा करताना पाठीमागे जाऊन दांडेकर समितीचा संदर्भ देण्यात आला. त्यातून असमतोलाची भावना उत्पन्न करण्यात आली. त्यामुळे छुप्या रस्त्याने वेगळ्या विदर्भाची मागणी करण्यात येते. त्याला सत्ताधाऱ्यांचेही आशीर्वाद असतात. त्यातूनच या मागण्या होतात. मूळ विषयापासून लांब जाण्यासाठी हा विषय आणत आहात काय ? महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकरी मग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

तो मराठवाड्यातील असो किंवा विदर्भातील असो हा आपला आहे असे समजले पाहिजे. त्याचे आजचे दु:ख आपल्याला दूर करावयाचे आहे. त्यावर मलमपट्टी करून उपयोगाचे नाही. आपण नुसती मलमपट्टी केली तर तो जगणार नाही, याची जाणीव आपण ठेवली पाहिजे.

काल सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटीचा उल्लेख केला होता. योगायोगाने माननीय उद्योग राज्यमंत्री श्री.पोटे-पाटील हे आता सभागृहात देखील उपस्थित आहेत. काल त्यांनी सांगितले की, या राज्यात गेल्या वर्षभरात मोठ्या प्रमाणावर उद्योगामध्ये गुंतवणूक झालेली असून त्यातून नवा रोजगार निर्माण केला आहे. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी नावाचे एक कलम आहे. आपण मला सांगावे आज महाराष्ट्रामध्ये किती कॉर्पोरेटस् आहेत, त्यांचा टर्न ओव्हर किती आहे, त्यांची प्रॉफीटॅबिलीटी किती आहे, त्यांचा नेट प्रॉफीट किती आहे ? त्या नेट प्रॉफिटमधून त्यांना कॉर्पोरेट रिस्पॉन्सिबिलीटी मिळते. माझ्या अंदाजाने सर्व कॉर्पोरेटस् जगताने 2 टक्के निधी देणे आवश्यक आहे. तो निधी एकत्र केला तर जी रक्कम येईल ती शेतकऱ्यांसाठी कम्पलसरी वापरली पाहिजे. शेतकऱ्यांना जगविणे ही एक सोशल रिस्पॉन्सिबिलीटी आहे. हे शासन करणार आहे काय ? शासन सर्व उद्योजकांची मिटींग घेऊन त्यांना सांगणार आहे काय ? कायदा केला की, पळवाट असतेच. कायदा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पळवाट तयार असते. मोठे उद्योजक वेगवेगळ्या नावाने आपले ट्रस्ट स्थापन करतात व 2 टक्के निधी हा त्या ट्रस्टकडे जातो. मग ते मनमानी करून वाटेल तसे पैसे वाटतात.

G 1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

आणि मग आपले प्रश्न निर्माण झाले की, पुन्हा कटोरा घेऊन आपण उद्योजकांच्या संस्थाकडे जातो. शेतकरी आत्महत्या का करतात याची कारण मीमांसा शोधण्याचे काम मग टाटा सोशल इंस्टिट्यूट ऑफ सायन्सकडे दिले जाते. आपल्याही इंस्टिट्युटस आहेत, आपल्याही इस्टीट्यूटला अभ्यास करता येतो परंतु आपल्या इस्टीट्यूट सक्षम केल्या जात नाहीत, आपल्या इस्टीट्यूट तशाच लुळया पांगळया ठेवायच्या आणि सर्व आधार उद्योजकांचा इंस्टिट्युटचा घ्यावयाचा. अशा पध्दतीने आपण कुबड्या किती काळ घेऊन आपल्या राज्याचे प्रश्न सोडवणार आहोत? कोठे तरी याला थांबवले पाहिजे अशा पध्दतीचा एक बेसिक विचार या निमित्ताने करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, माणसे जगवण आणि जनावरे जगवणे हा या गोष्टीचा मूलभूत हेतू आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई यांनी त्यांच्या भाषणात सांगितले आहे की, महागाई कमी झाली, अच्छे दिन यायला लागले, आता सगळीकडे आबादीआबाद झाले आहे. परंतु असे झाले असते तर राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या नसत्या. या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आज विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होत आहेत, विद्यार्थ्यांच्या शाळेच्या फी भरली जात नाही, विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहापासून बाहेर जात आहेत. यापुढे अजून बेरोजगारी व बेकारी वाढणार असून त्यातून नवे प्रश्न निर्माण होणार आहेत. या प्रश्नांची दखल आज आपण घेतली नाही तर येणारा भविष्यकाळ सगळयांसाठी अंधःकारमय राहील. या सर्व प्रश्नाकडे बघण्याची आपली प्रवृत्ती आम्हाला खेदजनक वाटते. त्यामुळे आता तरी आपण बदलणार आहोत की, नाही, सत्ताधारी आणि विरोधीपक्षाचे नाते विळा-भोपळयाचे असते असे समजण्याचे कारण नाही. आपण 36 चा आकडा न होता आपण 63 चा आकडा होऊ या. आपण एकत्र येऊन या सर्व गोष्टींचा विचार करुन, या प्रश्नाकडे गांभीर्याने बघितले तर या प्रश्नावर आपल्याला काही तरी उपाययोजना करता येतील. या ठिकाणी मी आकडेवारी देणार नाही, कोणत्या गावात काय झाले, विहिरी कोठे गेल्या, शेततळयांचे काय झाले, मालगुजारी तलावाचे काय झाले आणि जलयुक्त शिवार योजनेमध्ये कशी आबादीआबाद झाली यातील भ्रष्टाचाराच्या संदर्भात मी काही बोलणार नाही. या सगळयाचे परिणाम तुम्ही भोगत नाही तर राज्यातील कष्टकरी, शेतकरी भोगतो आहे. तुम्हाला वाटत असेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2..

श्री. हेमंत टकले .....

की, त्याला फसवले तर कळणार नाही. परंतु आपण हे लक्षात ठेवा, तो तुमच्या-आमच्यापेक्षा अधिक शहाणा आहे. त्याला काय करावयाचे आणि केव्हा करावयाचे हे नक्की समजते. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, सगळया प्रश्नांची दखल घेऊन या बाबतीतील मूलभूत गोष्टीकडे जर लक्ष दिले, जर आपल्या अधिकाराचे विकेंद्रीकरण झाले, ज्या ज्या खात्याला मंत्री आणि राज्यमंत्री आहेत, त्या राज्यमंत्र्यांना या कामासाठी अधिकचा दिलासा देण्यासाठी मोकळीक दिली व ही मंडळी रस्त्यावर न उतरता शेतामध्ये उतरली तर शेतामध्ये पाणी आहे की, नाही, वीज आहे की, नाही हे दिसून येईल.

सभापती महोदय, हे सरकार एका एका गोष्टीचे अजून किती भांडवल करणार आहे ? शेतकऱ्याला वीज,पाणी मिळाले पाहिजे व हे शासन सर्व उपलब्ध करुन देत आहे असे सन्माननीय सदस्य श्री. फुंडकर साहेब सांगतात,सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस सांगतात. असे असतानाही राज्यातील शेतकरी आत्महत्या करीतच आहेत. त्यामुळे हा जो विरोधाभास आहे तो आपल्याला कोठे तरी संपवावा लागेल, यातून निश्चितपणे आपल्याला मार्ग काढावा लागेल. आम्ही विरोधक म्हणून सांगत नाही, तर आपल्या त्रुटी नजरेला आणून द्याव्यात,त्रुटीवर आपल्याला मार्गदर्शन मिळावे तसेच त्यातून पुढील मार्ग अजून चांगला आखला जावा यासाठी ठराव असतात, चर्चा असते. या चर्चेच्या अमृतमंथनातून जे काही अमृत निघेल ते या देशाच्या आणि राज्याच्या शेतकऱ्यासाठी जीवनदायी आहे व त्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत अशी माझी या ठरावाच्या निमित्ताने आग्रहाची मागणी आहे. मी यापेक्षा अधिक काही बोलू इच्छित नाही. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे हे आपल्या भाषणाच्या शेवटी ज्या प्रमाणे कविता करुन भाषणाचा समारोप करतात त्या प्रमाणे मी एक कविता सांगून माझे भाषण संपविणार आहे.

माती रुसलीय, आकाश रागावलय,
नदी वाट पाहून थकलीय,वारा निपचित पडलाय,
झाडांनी अबोला धरलाय ,तुरळक ढगांची येरझार मंदावलीय,
पक्षांची गाणी हरवलीय, कडकडीत उन्हाने सावली धास्तावलीय,
कातरवेळ,सांजसंकूण,तांबडी पहाट जागा सोडून सैरभैर झालीय,

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

अशावेळी मोती पिकविणारे हात, दगड फोडताहेत,
कशासाठी? पोटासाठी जगताहेत, विचका झालेल्या निसर्गाशी भांडतायत,
कुणीच नाही का कैवारी, का सगळेच झाले मारेकरी,
मग मात्र हातावरचं डोकं सटकलय,घेतली छन्नी आणि हातोडा
उभा ठाकला एका महाकाय पाषणापाशी,जीवाच्या आकांताने घाव घालत सुटला,
खपल्या फिरु लागल्या भोवताली,अंगातून रक्त झिरपू लागतय,
बघता बघता पाषाणातून साकार झाली, एक भव्य मुर्ती,
मातीत उभी, नजर आकाशात, आणि कसं काय कुणास ठाऊक,
मूर्तीच्या मुखवटयावर स्मितहास्यय,
एक दिवस हे चक्र बदलेल, माती रुसवा सोडेल,
आकाशही गाणं गाईल,तू फक्त लढतच रहा,

हा लढण्याचा दिलासा, राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला,या शासनाकडून मिळावा अशी आग्रहाची मागणी करुन मी माझे विचार थांबवतो. मला संधी दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदया, विरोधी पक्ष नेते आणि सत्ताधारी पक्षाच्या वतीने दुष्काळ आणि टंचाईच्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्रात गेल्या दोन तीन वर्षापासून सातत्याने दुष्काळ पडतो आहे. दुष्काळाच्या झळा आपण सातत्याने सोसतो आहे. यावेळचा दुष्काळ थोडा वेगळा व मोठा आहे. आता या दुष्काळात ग्रामीण भाग मोठया प्रमाणात होरपळू लागला आहे. दुष्काळाच्या झळा बसू लागल्या आहेत. या दुष्काळामुळे सर्वातमोठा पाण्यावर आणि पावसावर झाला आहे. पाऊस नाही त्यामुळे पाणी नाही, पाणी नाही म्हणून पीक नाही, पिके नाही त्यामुळे चारा नाही आणि हे सर्वच नाही त्यामुळे हाताला काम मिळणे अडचणीचे झाले आहे. हे सर्व नुकसान दुष्काळामुळे झाले असून या दुष्काळाचा सर्वात मोठा फटका शेतकरी व शेतमजुराला बसला आहे. आमच्या भागात दर वर्षी दुष्काळ पडतच असतो. आमच्या भागात ऊसतोड कामगार प्रत्येक वर्षी स्थलांतर करीत असतात. परंतु यावर्षी आमच्या भागातून ऊसतोड कामगारांचे स्थलांतर मोठया प्रमाणात झाले आहे. या दुष्काळामुळे पुढे काय होईल हे आज तरी सांगता येत नाही. आज मराठवाडयातील धरणांमध्ये जेमतेम 8-10 टक्के पाणी शिल्लक आहे. हे 8-10 टक्के पाणी किती दिवस पुरणार आहे हे सांगता येत नाही. आता पावसाला सुरुवात जून महिन्यात नाही तर जुलै महिन्यात होत असते. आपल्याला पावसाची वाट 7-8 महिने पहावी लागणार आहे. आमच्याकडे आता जे काही पाणी आहे ते जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत पुरेल परंतु मार्च महिन्यापासून पिण्याच्या पाण्यामुळे काय होईल हे सांगता येत नाही. या दुष्काळामुळे मराठवाडयातील अनेक गावातून मोठया प्रमाणात स्थलांतर होण्याची भिती आहे. आतापर्यंत आपण अनेक दुष्काळ, अनेक संकटे पाहिले आहेत. 1972 च्या दुष्काळाला आपण सगळयात मोठा दुष्काळ म्हणतो. 1972 च्या दुष्काळात अन्नधान्याची टंचाई होती परंतु त्यावेळी पाण्याची टंचाई नव्हती.

H-1/......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

त्यावेळी पाणी टंचाई नव्हती. आता आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो आहोत. एकवेळ अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली तर ते आजुबाजूच्या राज्यातून धान्य आण्ता येईल. पण पाण्याची टंचाई निर्माण झाली तर ते पाणी कोठून आणणार हा महत्वाचा प्रश्न आहे. आपण रेल्वे व्हॅगनने पाणी पुरवू असे सरकारकडून सांगण्यात आले. परंतु मराठवाड्यातील सर्व भागात रेल्वे पोहोचलेली नाही. तेव्हा त्या भागात पाणी पुरवठा कसा करणार आहात हा देखील प्रश्न आहे. हे टंचाईचे संकट कमी म्हणून की काय, आपण माणुसकी सोडायला लागलो आहोत. आपण कालही पाहिले की दोन्ही बाजूचे सदस्य त्यावरुन वाद घालत होते. नाशिकचे पाणी खाली मराठवाड्यामध्ये सोडण्यास सांगितले तर नाशिक आणि नगरच्या लोकांकडून लगेच प्रतिक्रिया येते. उजनी धरणातील पाणी लातूर जिल्ह्यासाठी मागितले तर सोलापूर वासियांकडून लगेच प्रतिक्रिया येते. सोलापूरमध्ये एका पक्षाच्या प्रमुखांनी सांगितले की, "लातूरला रक्ताचे पाट जातील पण आम्ही पाणी जाऊ देणार नाही." ही कोणती भाषा आहे ? नाशिक आणि नगरचे लोक देखील तीच गोष्ट करीत आहेत. ही माणुसकीला शोभणारी गोष्ट नाही. दुर्दैव असे की, या घोषणेमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची क्षमता असणारे आणि तशी आकांक्षा असणारे लोक सुद्धा सामील होतात हे पाहिल्यावर ज्यांनी एकत्रित महाराष्ट्रासाठी लढा दिला त्या नेत्यांना काय वाटत असेल ? आपण स्व.यशवंतराव चव्हाणांचे नाव घेतो, त्यांना काय वाटत असेल याचा कधी विचार केला काय ? आपण पिण्याच्या पाण्यासाठी अशाप्रकारे आडवे जात असाल तर आपणास काय बोलायचे, आपण कशासाठी राजकारण करत आहात ? फक्त सर्वसामान्य लोकांसाठी समानतेच्या गोष्टी बोलायच्या काय ? आपण किती सीमित राजकारण करायला लागलो आहोत याचा विचार करावा. आपण समाजकारणाला केव्हाच मूठमाती दिलेली आहे. या सर्व गोष्टींचा विचार ज्यांना करायचा नसेल त्यांनी करु नये, परंतु सरकारने मात्र या संदर्भात न्यायाची आणि माणुसकीची भूमिका घेणे गरजेचे आहे. कोणाला शेती जगवावयाची आहे, कोणाला कारखाने जगवावयाचे आहेत, आम्हाला माणसे जगविण्याची चिंता आहे. आज माणसे जगविणे गरजेचे झाले आहे, पुढच्या काळात तोच मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. परतीचा पाऊस होईल अशी आपणा सर्वांची अपेक्षा होती, परंतु परतीचा पाऊस झाला नाही. त्यामुळे पाणी कोठून आणायचे अशी चिंता निर्माण झालेली आहे. आपण पाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

टंचाईचा सामना कसा करण्ार आहात ? मराठवाड्यात ही समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावणार आहे. .2.



श्री.विनायक मेटे....

सभापती महोदया, चारा टंचाई निर्माण झाली तर आपण चारा आजूबाजूच्या राज्यांतून आणू शकतो. आज बीड जिल्ह्यामध्ये 100हून जास्त चारा छावण्या झालेल्या आहेत. या छावण्यांमध्ये हजारो जनावरे आहेत. त्या ठिकाणी पाणी टंचाई असल्यामुळे तेथे टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. पण टँकरने पुरवठा करण्यात येणारे पाणी सुद्धा आटू लागले आहे.

सभापती महोदया, मराठवाडा विभागाने नाशिक आणि त्या परिसरातील पाण्याची मागणी केली तेव्हा काही प्रमाणात पाणी सोडलेले आहे. पण ते जायकवाडी धरणापर्यत आहे. जायकवाडी धरणाचे पाणी औरंगाबाद शहरासाठी वापरले जाते. ते शेतीसाठी वापरले जात नाही. ते पाणी पिण्यासाठी आणि कारखान्यांसाठी वापरले जात आहे. तेव्हा माझी मागणी आहे की, कारखान्यांना पुरविण्यात येणारे पाणी बंद करावे. तसेच बिअर आणि अन्य उत्पादनासाठी पाणी वापरले जात आहे ते देखील तातडीने बंद करावे. आपण फक्त पिण्यासाठी पाणी वापरावे आणि खालच्या धरणात सोडावे कारण त्या धरणावर अनेक शहरे अवलंबून आहेत. तेव्हा या संदर्भात शासनाने निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, आजशेतकरी आत्महत्या करीत आहेत. मराठवाड्यात हजाराच्यावर शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. बीड जिल्हयात जवळपास 300 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. या आत्महत्या कर्जबाजारीपणामुळे होत आहेत की अन्य कारणामुळे होत आहेत याच्या खोलात मी जात नाही. ज्या शेतक-यांनी आत्महत्या केल्या त्यांच्या घरी मी जाऊन आलो आहे. काही शेतकऱ्यांवर लाखो रुपयांचे कर्ज होते म्हणून त्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत तसेच काही शेतकऱ्यांवर 20-25 हजार रुपयांचे कर्ज होते म्हणून देखील आत्महत्या केलेल्या आहेत. जो शेतकरी पूर्वीच्या काळामध्ये अनेक संकटांचा सामना करायचा, अनेक संकटे अंगावर झेलून स्वतःच्या हिमतीवर संकटाना परतावून लावून स्वाभिमानाने उभा रहायचा, तो शेतकरी आज 10-20 हजार रुपयांच्या कर्जासाठी आत्महत्या का करीत आहे याचा विचार आपण सर्वानी करणे गरजेचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. (बेल वाजविण्यात आली.) मी बोलण्यास सुरुवात करुन फक्त पाच मिनिटे झालेली आहेत. थोड्याशा कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करण्याची जी मानसिकता होत चालली आहे ती

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. आपण शेतकऱ्यांना उभारी देण्याकरिता एखादा कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. एखादा साथीचा आजार पसरावा त्याप्रमाणे विदर्भ् आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये आत्महत्येची साथ पसरलेली आहे की काय असे वाटू लागले आहे.

सभापती महोदया, आपला देश कृषी प्रधान आहे असे आपण मानतो. तसा उल्लेखही अनेक सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. असे असताना आपला शेतकरी आत्महत्या का करतो याचा आपण निश्चितपणे विचार करणे गरजेचे आहे. पूर्वी आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण नव्हता. परंतु आता आपण अन्नधान्याच्या बाबतीत निश्चितपणे स्वयंपूर्ण झालेलो आहोत आणि याचे संपूर्ण श्रेय शेतकरी बांधवांना आहे. असा शेतकरी संपूर्ण देशाला अन्नधान्य पुरवितो आहे, तो शेतकरी आज संकटात आला आहे,त्याबद्दल आपण कोणती भूमिका घेणार आहोत ? (बेल वाजविण्यात आली.) या विषयावर बोलण्यासाठी मला अजून 20 मिनिटे लागतील.

**तालिका सभापती (ॲड.हुस्नबानू खलिफे):** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते आपणास इतका वेळ देता येणार नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ते अजून 20 मिनिटे बोलणार आहेत. म्हणजे त्यांचे भाषण 11.40 वाजता संपेल. त्यानंतरच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी आपण किती वेळ देणार आहात ते आम्हाला सांगावे. काल असे ठरले होते की, या विषयावर पहिला आठवडा वाया गेलेला आहे. दुष्काळाची चर्चा असल्यामुळे आज बोलण्यासाठी अडथळा आणू नका. जर वेळ कमी पडत असले तर आपण माननीय मंत्र्यांचे उत्तर उद्या ठेवावे. आपण बाकीच्या सदस्यांना बोलण्यासाठी फक्त एक एक मिनिट देणार आहात काय ? प्रत्येक सदस्याला किमान पाच पाच मिनिटे बोलण्यासाठी द्यावीत.

**तालिका सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, या विषयावर अजून 10 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. तेव्हा प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी दहा मिनिटांच्या आत आपले भाषण पूर्ण करावे अशी विनंती आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी मांडलेला मुद्दा लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांच्या अगोदरच्या वक्त्यांनी अर्धा ते एक तास घेतलेला आहे. आपण यासंबंधीची माहिती घ्यावी.

........ I-1

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

येथून पुढे सन्माननीय सदस्यांना पाच-पाच मिनिटात भाषण संपविण्यास सांगितले जात असेल तर मग आम्हा शेवटी बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांवर हा अन्याय का ? मागचा संपूर्ण आठवडा या विषयावरील चर्चा घेण्याच्या मागणीवरून वाया गेला.

**तालिका सभापती** : मला वाटते सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी पाच मिनिटांमध्ये आपले भाषण संपवावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, मला माझे मुद्दे मांडण्यासाठी अजून 20 मिनिटे लागणार आहेत. माझे भाषण संपविण्याच्या अनुषंगाने जी चर्चा झाली त्यामध्ये सभागृहाचे 10 मिनिटे वाया गेले आहेत.

सभापती महोदया, आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो आहोत. अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. परंतु त्या तुलनेत शेतमालाचे भाव वाढवू शकलो काय ? नाही. आज राज्यातील शेतकरी अडचणीत आला आहे. त्यामुळे त्या शेतकऱ्याला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सर्वांनी मिळवून प्रयत्न केला पाहजे. शेतकऱ्यांवर जागतिकीकरण, बदलते हवामान आणि आयात-निर्यातीवर घालण्यात आलेल्या निर्बंधामुळे ही वेळ आली आहे. आज सरकार शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव देण्यास तयार नाही. कोणत्या पक्षाचे सरकार सत्तेत आहे हा विषय नाही. परंतु ही वस्तुस्थिती आहे की, अद्यापपर्यंत शेतकऱ्यांऱ्यासाठी धोरण निश्चित केलेले नाही. आपल्या राज्यातील 55 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. राज्याची आर्थिक पाहणी अहवालावरून निदर्शनास आले की, राज्यामध्ये शेतीचे उत्पन्ना केवळ 11 टक्के आहे. उर्वरित 45 टक्के लोक शेतीवर अवलंबून नसताना सुध्दा त्यांचे उत्पन्न 89 टक्के आहे. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, आपण ही विषमता कधी दूर करणार आहात, राज्यातील शेतकऱ्यांसाठी कोणते धोरण आखणार आहात ? आज अशी परिस्थिती आहे की, शेतकऱ्यांसाठी विशिष्ट धोरण नाही, त्यांच्या शेती मालाला हमी भाव नाही. त्यामुळे जोपर्यंत शेती मालाला शेतीच्या खर्चावर आधारित हमी भाव दिला जात नाही तोपर्यंत शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा होऊ शकत नाही. शेतकऱ्यांसाठी मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्याशिवाय या परिस्थितीत फरक पडणार नाही, असे मला वाटते. सभापती महोदया, राज्य सरकारला जर हे चित्र बदलावयाचे असेल तर त्यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने सकारात्मक कार्यक्रम आखला पाहिजे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

सभापती महोदया, आता राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना 7 वा वेतन आयोग लागू होईल. त्या वेतन आयोगानुसार वर्ग-3 व 4 च्या कर्मचाऱ्यांना दरमहा 25-30 हजार रुपये पगार मिळेल. त्यामुळे त्यांच्या इतकाच पगार किंवा किमान दरमहा 25-30 हजार रुपये शेतकऱ्यांना देण्याच्या अनुषंगाने धोरण आखणे गरजेचे आहे. सभापती महोदया, माझी शासनाला विनंती आहे की, राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या पिकांचा 100 टक्के विमा उतरविणे गरजेचे आहे. तसेच त्या विम्याचा संपूर्ण हप्ता राज्य सरकारने भरला पाहिजे. असे केले तर उद्या कोणतेही संकट आले तरी त्या शेतकऱ्यांना स्वतंत्र पॅकेज देण्याची वेळ राज्य सरकारवर येणार नाही. त्यावेळी शेतकऱ्यांना शासनाकडे आशेने वा दयेने पाहण्याची गरज भासणार नाही. तसेच जो गरीब आणि 60 वर्षाच्या वरील शेतकरी आहे त्याला शासनाने पेन्शन योजना लागू केली पाहिजे. मी तर म्हणेन की, त्यांच्यासाठी पेन्शन योजना लागू करणे गरजेचे आहे. या गोष्टी केल्या तर राज्यातील शेतकरी निश्चितपणे या संकटातून बाहेर आल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदया, हमी भावाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, राज्यातील जवळजवळ 75 टक्के बाजार समित्या या दलालांचे अड्डे झाल्या आहेत. माझी स्पेसिफिक मागणी आहे की, या बाजार समित्या बरखास्त केल्या पाहिजेत आणि तेथे नवीन यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. हे जर लवकर होत नसेल तर शेतकऱ्यांना खुल्या बाजारामध्ये आपला माल विकण्याची परवानगी दिली पाहिजे. राज्य सरकार कोणालाही शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला माल खुल्या बाजारात विकण्याची परवानगी देते. मात्र शेतकऱ्यांना तशा प्रकारची परवानगी दिली जात नाही. आपल्या मालाला किती भाव मिळाला पाहिजे ही बाब शेतकऱ्यांच्या हातामध्ये नाही. असे असताना सुध्दा आपण शेतकऱ्यांना काहीच आधार देत नाही. मग अशा परिस्थितीत शेतकरी आत्महत्या करणार नाहीत तर काय करणार ?

सभापती महोदया, आज शेतकऱ्यांवर जे संकट आलेले आहे त्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी पॅकेज जाहीर करण्याऐवजी त्यांचे मूलभूत प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने निश्चितपणे पुढाकार घेतला पाहिजे. तसेच शेती माल प्रक्रिया उद्योगाच्या बाबतीत सुध्दा मार्ग काढला पाहिजे. शेती माल प्रक्रिया उद्योग निर्माण करणे हा धोरणाचा भाग आहे. कापूस, सोयाबीन किंवा अन्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेती माल असेल त्यांच्या भावाच्या बाबतीत विचार केला पाहिजे. सभापती महोदया, सर्वात जास्त

..3..



श्री.विनायक मेटे....

कापूस विदर्भ आणि मराठवाड्यात पिकतो. परंतु सर्वात जास्त सूतगिरण्या मात्र पश्चिम महाराष्ट्रात आहेत. ज्या ठिकाणी कापसाचे एक बोंडही उत्पादन होत नाही त्या ठिकाणी सर्वात जास्त सूतगिरण्या आहेत.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगू इच्छिते की, कृपया आपण आपले भाषण थांबवावे. आपण 20 मिनिटांपेक्षा जास्त वेळ भाषण केलेले आहे. आता सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवर यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, माझी विनंती आहे की, आपण कृपया माझ्यावर अन्याय करु नका. आपण मला अजून बोलण्याची संधी दिली नाही तर मी वेलमध्ये येऊन बसेन. मागचा संपूर्ण आठवडा या विषयावरील चर्चा घेण्याच्या मुद्यावरुन गोंधळात वाया गेला. त्या आठवड्यात सभागृहाचे कोणतेही कामकाज होऊ शकले नाही. मी पुन्हा विनंती करतो की, मला माझे भाषण आटोपते घेण्यास सांगू माझ्यावर अन्याय करु नका.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे या प्रस्तावावर आपले मत मांडत आहेत. मला वाटते त्यांना अजून पाच मिनिटे बोलण्याची संधी द्यावी. काँग्रेस पक्षाच्या वतीने तीन सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडायचे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सुध्दा विचार मांडावयाचे आहेत.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदया, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. जेव्हापासून आम्ही या सभागृहात आलो तेव्हापासून बघत आहोत की, शेवटच्या वक्त्यांना कमी वेळेत विचार मांडण्यास सांगितले जाते. विधानपरिषद नियमानुसार पक्षाची सदस्य संख्या विचारात घेऊन, प्रत्येक पक्षाला सदस्य संख्येनुसार वेळ विभागून दिली जाते. ती यादी माननीय पीठासीन अधिकाऱ्यांकडे दिली जाते. ज्यावेळी आपल्याकडे यादी येते त्यावेळी आपण पहिल्या वक्त्यापासून ते शेवटच्या वक्त्यापर्यंत सर्वांना सारखीच वेळ विभागून द्यावयास पाहिजे. ही पध्दत याच अधिवेशनापासून सुरु व्हावयास पाहिजे. आवश्यकता पडल्यास या विषयी माननीय सभापती यांच्याशी चर्चा करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेवटच्या वक्त्यांवर अशा प्रकारचा अन्याय पुन्हा या सभागृहात होता कामा नये, अशी माझी विनंती आहे.

..4..



श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, माझे स्पेसिफिक मत आहे की, धोरणाच्या बाबतीत शासनाने भूमिका घेणे गरजेचे आहे. राज्यातील शेतकऱ्याला वाचवायचे असेल तर त्यांच्यासाठी मूलभूत स्वरूपाच्या काही गोष्टी करणे गरजेचे आहे. हे खरे आहे की, शासन या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न करीत आहे. केवळ शासनच नव्हे तर अनेक पक्ष, अनेक संघटना सुध्दा दुष्काळी भागात जाऊन आपापल्या पध्दतीने मदत करीत आहेत. यावर मी जास्त भाष्य करणार नाही.

सभापती महोदया, शासनाने अनेक चांगल्या योजना सुरु केलेल्या आहेत. उदाहरणार्थ राज्य सरकारने दुष्काळी भागात जनावरांच्या छावण्या सुरु केल्या आहेत. त्या ठिकाणी चांगल्या पध्दतीने काम सुरु आहे. परंतु त्या छावणीतून एका जनावाराला केवळ 15 किलो चारा मिळतो. हा चारा मोठ्या जनावरांना कमी पडतो. त्यामुळे माझी मागणी आहे की, जनावरांना 15 किलो नव्हे तर किमान 20 किलो चारा द्यावा. आज विविध ठिकाणी ऊस उपलब्ध आहे. परंतु तो ओला आहे. ओला ऊस जनावरांनी खाल्ला तर जनावरे आजारी पडण्याची भिती असते. या ठिकाणी मी माननीय श्री.शरद पवार साहेबांचा जरूर उल्लेख करु इच्छितो. त्यांनी दुष्काळी परिस्थितीत गुजरातमधून सुग्रास जातीचे गवत आणून ते जनावरांसाठी शेतकऱ्यांना दिले होते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..जे..

श्री. विनायक मेटे ....

सरकारच्या वतीने तशा पध्दतीचा सुग्रास गुजरातमधून आणून देण्याचा प्रयत्न झाला तर निश्चितपणे शेतकऱ्यांच्या जनावरांना त्याचा चांगल्याप्रकारे उपयोग होऊ शकेल. दुसरा मुद्दा असा आहे की, छावणीसाठी 3 हजार जनावरांची अट आहे. शिवसंग्रामच्या वतीने आज जवळपास 16 ठिकाणी छावण्या सुरू आहेत. एका छावणीत 6 हजार जनावरे झालेली आहेत. त्यामुळे आपणाकडून छावणीच्या संदर्भात 3 हजाराची अट ठेवून चालणार नाही. जनावरे वाढली तर त्यांना सुध्दा मान्यता द्यावी लागेल, त्या दृष्टीने निर्णय घेणे गरजेचे आहे, अशी मला शासनाला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय, शासन कमी भावाने धान्य देते. मी संपूर्ण महाराष्ट्राबद्दल बोलत नाही. फक्त बीडचे सांगतो. 2/3 रूपये किलोने धान्य मिळते. सभापती महोदय, गंभीर गोष्ट आहे. दररोज किमान 5 ट्रक धान्य काळ्याबाजाराने बीडमधून हैद्राबादला जातात. सदर प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांशी बोलून सर्व सांगितले आहे. परंतु अजूनही त्यावर कारवाई होत नाही. लोकांनी ट्रक पकडून दिले आहेत, मात्र अजूनही त्यावरही कारवाई होत नाही. शासनाने चांगली योजना केली आहे. पण यातून पाणी टँकर लॉबी, धान्य दलालांची लॉबी तयार होत आहे. त्यावर कडकपणे शासन करणे अत्यंत आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर रॉकेलचा प्रश्न आहे. मोठ्या नेत्यांचे रॉकेलचे टँकर पकडले आहेत. कॅसोना रॉकेल आहे. मोठे नेते आहेत. (अडथळा) पक्षाचे नाव घे्त नाही. तुमच्या पक्षाचे नेते आहेत, त्यांचे टँकर पकडले आहेत. अशा पध्दतीने लॉबी होत आहे. शासनाने गरीब शेतकऱ्यांच्या भल्यासाठी, दुष्काळासाठी हे सर्व केले आहे. टाळूवरचे लोणी खाण्याचा प्रकार या ठिकाणी दिसू लागला आहे. तुम्ही कानात सांगा की, टाळूवरचे लोणी खाणे बरे नाही. हे करणे जास्त गरजेचे आहे. शासन हाताला काम देते. एमआरईजीएसमध्ये शासनाने करोडो रूपयांची कामे सुरू केली आहेत. मात्र बरीचशी कामे बोगस आहेत. बोगस कामे कुठे आहेत ते मी सांगतो. 20-25 कोटी रूपयांची कामे बोगस झाली आहेत. ही कामे नवगण राजुरीला, ईटला, नांदुरघाटला, देवीबाभळगावला, आशाबेलुऱ्याला झाली आहेत. ही सर्व बोगस कामे लेखी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ....

दिलेली आहेत. चौकशा नेमल्या आहेत. आता समोर येत चालले आहे. काल काही सन्माननीय सदस्यांनी बोलताना उल्लेख केला. शेकापचे सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी पक्षाच्या वतीने चांगली कामे सुरुआहेत असे सांगितले, शिवसेना पक्षाच्या वतीने कामे सुरु आहेत. अनेक स्वयंसेवी संस्था, संघटना चांगल्याप्रकारे कामे करतात यामध्ये दुमत नाही. शिवसंग्रामच्या वतीने आणि मराठवाडा लोकविकास मंचच्या वतीने अनेक ठिकाणी छावण्या सुरु केल्या आहेत. आत्महत्याग्रस्त कुटुंबाला 25 हजार रुपये देऊन आधार दिला आहे. एवढेच नव्हे तर आता मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुली उच्च शिक्षण घेत असतील, लग्नाला आल्या असतील तर अशा सर्व मुलींना दत्तक घेण्याची आमची तयारी आहे, त्यांचे लग्न सुध्दा करुन देण्याची तयारी आहे. आमचा व्यक्तिगत भाग नाही. मुद्दा असा आहे की, स्वयंसेवी संस्था, पक्ष यांची मदत एका ठिकाणी मिळते. मात्र गरज आहे तेथे माहीत नसल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे पोहचली जात नाही. माझी विनंती आहे की, पक्ष असतील, स्वयंसेवी संघटना असतील सर्वांमध्ये समन्वय असणे गरजेचे आहे. मदतीचा भाग महत्त्वाचा आहे. सर्व ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत या ठिकाणी असे करा, त्या ठिकाणी असे करा असे सांगितले गेले पाहिजे तरच सर्व ठिकाणी मदत पोहचणे शक्य होईल नाही तर बातमी पेपरमध्ये येईल, तेवढ्यापुरती मदत होईल. गरजू तसेच राहतील. शासनाला विनंती आहे की, यामध्ये समन्वय करावा. माझी आपल्याला अजून एक विनंती आहे की, आपण यामध्ये राजकारण न आणता माणुसकीच्या दृष्टीने शेतकरी कसा वाचेल, जगेल या संदर्भात धोरण आखावे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. रामहरी रूपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, राज्यातील दुष्काळाची भीषण परिस्थिती आणि उद्‌भवलेली संकटाची स्थिती यावर बोलताना मी प्रामुख्याने थोड्या वेळेत माझे थोडे महत्त्वाचे मुद्दे मांडणार आहे. मी जास्त न बोलण्यापेक्षा शासनापुढे सध्याची परिस्थिती ठेवू इच्छितो. मी त्या संदर्भात 2-3 उपायही सूचविणार आहे. सध्या बोलले जाते की, मराठवाड्यात दुष्काळ आहे, विदर्भात दुष्काळ आहे आणि असतोही. यंदा त्यावर कोणी जास्त बोलले नाही. मी सरकारचे लक्ष वेधू इच्छितो की, यंदा सर्वात जास्त वाईट परिस्थिती पश्चिम महाराष्ट्रात आहे. पश्चिम महाराष्ट्रात सर्वात कमी पाऊस झाला आह. नोंद आहे. शासनाची आकडेवारी आहे. सर्वात कमी पाऊस पश्चिम महाराष्ट्रात झाला आहे. पश्चिम महाराष्ट्र हा पूर्ण डोंगराळ प्रदेश आहे. चढ उताराची शेती असणारा प्रदेश पश्चिम महाराष्ट्र आहे आणि त्यात सुध्दा क्रांती करून आसाममधील पानमळ्यासारख्या उतारावर डाळिंबाच्या बागा लावल्या जातात. कष्टही मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे तिकडील परिस्थिती वेगळी आहे. मला सरकारला सांगावयाचे आहे की, मागच्या 2 वर्षांपूर्वी ऊसाला टनाला 2000 रूपये भाव होता, आज टनाला 900 रूपये भाव आहे. मागच्या 3 वर्षांपूर्वी ऊसाला टनाला 2700 रूपये भाव होता, आज टनाला 900 रूपये भाव आहे. मागच्या तीन वर्षांत तो कमी झाला आहे. अगोदर ऊसाला टनाला 2700 रूपये दर मिळत होता. आता एफआरपी टनाला 900 रूपयांपेक्षा जास्त कारखाने देऊ शकत नाहीत, त्यावेळी 56 रूपये किलो साखर होती आणि आता 18-20 रूपये किलो साखर आहे. कोणालाही हे परवडणार नाही. परिस्थिती बदलली आहे आणि यास शासनाचे धोरण कारणीभूत आहे हे नीट लक्षात घेतले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रात 200 कारखाने आहेत. सोलापूर जिल्ह्यात 32 कारखाने आहेत. 2-3 कोटी लोकांचा उदरनिर्वाहाचा हा धंदा आहे, तो अडचणीत आला आहे. माझा स्वत:चा गेल्या वर्षी 10 एकर ऊस होता, आज 5 एकर सुध्दा नाही. निम्म्याने ऊसाचे उत्पादन घटले आहे. कोणीही ऊस पीक घेण्यास तयार नाही. साखर कारखान्याचे करायचे काय अशी परिस्थिती आहे, एक वर्ष अशी परिस्थिती राहिली तर सर्व लोखंड भंगारात विकावे लागेल. एवढा मोठा धंदा महाराष्ट्रात कोलॅप्स होण्याच्या मार्गावर आहे. मात्र कोणीही या बाबीकडे गांभीर्याने बघत नाही. असे झाले तर लोकांचे जीवनमान बिघडेलच



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. रामहरी रूपनवर ....

आणि शासनाच्या तिजोरीमध्ये येणारा मोठा महसुलही थांबेल. त्यामुळे त्याच्याकडे पाहताना लक्ष दिले पाहिजे. आपल्या राज्यातील अतिशय कष्टाने उभा केलेला उद्योग हा आहे, तो टिकला पाहिजे. मात्र कोणीही याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही हे मी सरकारच्या निदर्शनास आणू इच्छितो. शासनाने त्याकडे लक्ष दिले पाहिजे. दुष्काळ पडला आहे. 2 रूपये डिझेल व पेट्रोलवर टॅक्स लावला आहे. 1600 कोटी रूपये शासनाच्या तिजोरीत जमा होणार आहेत. मात्र दुष्काळ जाहीर केलेला नाही, हे कसे काय आहे ? प्रत्येकाच्या खिशातून 2 रूपये जाणार आहेत. दुष्काळ जाहीर नाही म्हणून ते शेतकऱ्याला मिळणार नाही. सरकारची थोडीशी फसवणुकीची भाषा आहे. शासनाने दुष्काळ जाहीर केला पाहिजे. दुष्काळासाठी 1600 कोटी रूपये खर्च झाले पाहिजेत असे सांगणे आहे.

सभापती महोदय, ऊसाच्या बाबतीत जसे आहे तसेच दुधाच्या बाबतीत आहे. 3 वर्षांपूर्वी 27 रूपये लिटरने दूध विकत होतो, आज 18 रूपये लिटरने विकत आहे. दुधाचे दर निम्मे झाले आहेत. दूध उद्योगही अडचणीत आला आहे. दुधावर जगणारी सर्व माणसे पश्चिम महाराष्ट्रात असून प्रश्न जास्त आहेत. पश्चिम महाराष्ट्र मुंबईलाच नव्हे तर महाराष्ट्रात दूध पुरवितो. पुरक उद्योग करतो. शेतकरी दिवसा शेती करतो आणि संध्याकाळी, पहाटे गायी, म्हैशी यांची धार काढतो. पुरक उद्योक करत आहे. हे चुकीचे आहे का ? तो अडचणीत आला आहे. शासनाचे दुधाबाबतचे धोरण निश्चित नाही. शासन दूध दर निश्चित करीत नाही. दुधाच्या भुकटीवर बंदी आहे.

....K

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रुपनवर.........

दुधाची पावडर तयार करणारे प्लँट आम्ही उभे केले. परंतु, दुध भुकटी निर्यातीवर केंद्र सरकारने बंदी आणली आहे. पावडर तयार करता येत नाही आणि दुध कोणी घेत नाही, अशा दुहेरी अडचणीत शेतकरी सापडला आहे. नैसर्गिक संकट येणे स्वाभाविक आहे. परंतु, सरकारी धोरणामुळे शेतकरी अडचणीत येत असेल तर ते बरोबर नाही. ऊस आणि दुध या संदर्भातील सरकारी धोरणे अडचणीची आहेत, ती बदली पाहिजेत आणि वेळेत बदलली पाहिजेत. आपण जर वेळेत निर्णय घेतला नाही तर काही उपयोग होणार नाही. शासनाच्या लक्षात आणून देण्यासाठी मी ही बाब प्रकर्षाने सभागृहात मांडली आहे. दुधाचे दर 27 रुपयांवरुन 18 रुपयांवर आले आहेत आणि चारा व पेंढीचे दर तिप्पट झाले आहेत. अनुषंगिक लागणाऱ्या खर्चात तिप्पट वाढ झाली आहे आणि उत्पादन मात्र एक पटही नाही, अशी परिस्थिती आहे. सत्ता कोणाचीही असो, अशा प्रकारे कोणतेही राज्य चालत नाही आणि चालणार नाही. या संदर्भात शासन स्तरावरुन अभ्यास झाला पाहिजे, आमचे म्हणणे लक्षात घेतले पाहिजे आणि वेळेत निर्णय घेतला गेला पाहिजे, अशी मागणी मी या निमित्ताने करणार आहे.

सभापती महोदय, ठिबक सिंचनाव्दारे शेती करावी, असे सरकारचे म्हणणे आहे आणि ते बरोबरही आहे. मुळातच पाण्याची कमतरता आहे, पाऊस बिनभरवशाचा झाला आहे, त्यामुळे ठिबकचा वापर अनिवार्य ठरत आहे. परंतु, या सरकारने ठिबकसाठी असलेल्या सबसिडीत कपात केली आहे. पूर्वी 70 टक्के सबसिडी होती, या सरकारने ती 35 टक्क्यांवर आणली आहे. असे कसे उफराटे धोरण शासन ठरविते, हे आम्हाला कळत नाही. यामुळे जनतेमध्ये या शासनाच्या विरुध्द फार मोठी नाराजी आहे. या शासनाच्या विरुध्द शेतकरी बोलत आहेत, ते उगीच नाही. आपण मंत्री झाला, त्यांना बरे वाटले नाही म्हणून ते बोलतात, असे नाही. आपण मंत्री झाल्याबद्दल त्यांना आनंदच झाला आहे, पण मंत्री म्हणून आपण असे वागत आहात, याबाबत त्यांच्या मनात आपल्याबद्दल राग आहे. अतिशय हौसेने त्यांनी आपल्याला मंत्री केले आहे. पण आपण त्याप्रमाणे वागत नाही, म्हणून त्यांच्या मनात राग निर्माण झाला आहे.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रुपनवर.........

सभापती महोदय, दहा-पंधरा वर्षानंतर एखाद्या वर्षी दुष्काळ येतो. परंतु, महाराष्ट्रात सतत गेल्या तीन वर्षांपासून दुष्काळी परिस्थिती आहे. सलग तीन वर्षे महाराष्ट्रात दुष्काळ येण्याची ही पहिली वेळ आहे आणि आपणही सरकारमध्ये येण्याची ही पहिली वेळ आहे. त्यामुळे आपली जबाबदारी तीपटीने वाढली आहे.

सभापती महोदय, दुधाला दर नाहीत, ऊसाला दर नाही, संत्र्याला दर नाही, केळीला दर नाही, कांद्याला दर नाही, कापसाला दर नाही, सोयाबीनला दर नाही, कशालाच दर नाही. एखाद्या पिकाला, एखाद्या वर्षी दर मिळत नाही, हे आम्ही समजू शकतो. परंतु, सर्वच पिकांना दर न मिळणे, ही परिस्थिती आपण गांभीर्याने घेणार आहात की नाही ? शासनाने गांभीर्याने याबाबत विचार केला, धोरणे ठरविली तर निश्चितपणे सर्व उत्पादनांना दर मिळू शकतो. शेतकऱ्याच्या मालाला दर कसा मिळेल, याचे धोरण ठरविता येते. ते ठरविण्याची आवश्यकता आहे. तशी मानसिकता तयार झाली पाहिजे.

सभापती महोदय, या राज्यातील माण, खटाव, फलटण, आटपाडी, जत, कवठेमहांकाळ, सांगोला, मंगळवेढा ही कायम दुष्काळी तालुके आहेत. या तालुक्यांनी कधीही सुकाळ बघितलेला नाही. त्यामुळे स्व.वसंतदादा पाटील यांनी माण हा स्वतंत्र जिल्हा निर्माण करण्याची संकल्पना मांडली होती. आज सांगोला तालुक्यात 500 टँकर, माण तालुक्यात 500 टँकर सुरु आहेत. गेल्या 10 वर्षांपासून या तालुक्यांमध्ये सतत टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. या दुष्काळी तालुक्यांबाबत कोणी बोलणार आहे की नाही ? या तालुक्यांसाठी आपण धोरण ठरविणार आहात की नाही ? ही माणसे भविष्यात जगू शकणार नाहीत. या तालुक्यांमधील निम्मी माणसे लष्करात आहेत आणि निम्मी माणसे मुंबई राहून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. या तालुक्यांचा, तेथील माणसांचा आणि तेथील परिस्थितीचा सरकारने सहानुभूतिने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, माणसांचे एक वेळ राहू द्या. पण आज शेळ्या, मेंढ्या देखील मरत आहेत. या सरकारने गोवंश हत्या बंदीचा कायदा केला. त्यामुळे भाकड जनावरांचे प्रमाण वाढले,

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रुपनवर.........

ती जनावरे सांभाळावी लागत आहेत. पण शेळ्या-मेंढ्यांचे काय ? मांस उपलब्ध होण्यासाठी या जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था असली पाहिजे. पण या सरकारने चराऊ कुरणांवर बंदी आणली. आता ही जनावरे जगू शकणार आहेत का ? सरकारचे या संदर्भातील नेमके धोरण काय आहे, हेच कळत नाही. एका बाजूला एखाद्या गोष्टीची टंचाई निर्माण करायची आणि दुसऱ्या बाजूला त्यासाठी प्रोत्साहन द्यायचे, असे हे धोरण आहे. एका बाजूला दारुबंदी करायची आणि दुसऱ्या बाजूला दारुची लायसन्स वाटत फिरायचे, असे हे सरकार करीत आहे. महंमद गजनीच्या कारभारसारखा हा कारभार सुरु आहे, असे म्हटले तर वावगे ठरु नये.

सभापती महोदय, केंद्र सरकारने राज्य सरकारला कृषी पुरक उद्योगांसाठी 40 हजार कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. पुण्यातील काही एन.जी.ओ.नी कृषी पुरक उद्योगासाठी मदत करायची, ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवायचे, यासाठी मोदी सरकारकडून या राज्याला निधी मिळत आहे. परंतु, आपल्या सरकारचे त्याबाबत धोरण नसल्यामुळे केंद्र सरकारकडून मिळालेले अनुदान खर्चाविना केंद्र सरकारला परत जात आहे. अशा प्रकारे दोन ते तीन वेळा अनुदान परत गेले आहे. आपल्या राज्यात कृषी पुरक उद्योग उभे राहिले पाहिजेत. आपण ज्वारीचा दर ठरवू शकत नाही. पण ज्वारीचे पीठ केले आणि ते पीठ बाजारात विकायचे म्हटले तर त्या पीठाचा दर आपण ठरवू शकतो. ज्वारी स्वच्छ करणे, ज्वारीचे पीठ करणे, असे अनेक प्रकारचे जे साधे, साधे प्रक्रिया उद्योग आहेत त्यासाठीची यंत्र कृषी खात्यामार्फत मोफत दिली जात आहेत. ज्वारीचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न झाला पाहिजे. शेतकऱ्याला त्याच्या मालाचा दर ठरविता आला पाहिजे.

सभापती महोदय, शेतात पीक आले आहे, पाणी उपलब्ध आहे, डी.पी.आहे पण वीज नाही, अशी परिस्थिती काही ठिकाणी आहे. काही ठिकाणी वीज आहे पण डी.पी.63 वॅटचा आणि लोड 150 वॅटचा, अशीही परिस्थिती आहे. त्यामुळे शेतकऱ्याची गरज काय आहे, त्यांना काय दिले पहिजे, हे ठरवून त्याप्रमाणे योजना आखली पाहिजे. प्रत्येक वेळी सरकारी तिजोरीतून पैसेच खर्च केले पाहिजेत, असे नसते. आपण जर आपली मॅनेजमेंट चांगली ठेवली तरी शेतकऱ्याला दिलासा मिळू शकतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रुपनवर.........

सभापती महोदय, तुर डाळीचा विषय या राज्यात गाजला. यापूर्वी रेट होल्डिंग ॲक्ट या राज्यात होता. तो कायदा शासनाने रद्द केला. तो कायदा जर शासनाने रिव्हाईज केला असता तर व्यापाऱ्यांना साठा करण्याची परवानगी मिळाली नसती आणि डाळीचा प्रश्न निर्माण झाला नसता. म्हणून शासनाने या कायद्याचा पुनर्विचार करावा, अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, पाऊस नाही, पीक नाही, पाणी नाही, मजुरी नाही, काम नाही, अशा परिस्थितीमध्ये 49 टक्के धरणे भरली आहेत. त्या पाण्याचा वापर योग्य पध्दतीने कसा केला पाहजे, याचे धोरण ठरविणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी सरकारला आपल्या माध्यमातून काही सूचना करु इच्छितो. आपण आणेवारीची पध्दत बदलली पाहिजे. ज्या ठिकाणी बदलण्यात आली आहे, त्या ठिकाणी नुकसान भरपाई दिली पाहिजे. शक्य असेल तेवढी कर्जमाफी केली पाहिजे. पण काही तरी दिलासा शेतकऱ्याला दिला पाहिजे, त्या दृष्टीने कृती केली पाहिजे. ठिबकसाठी सबसिडी दिली पाहिजे. ज्या व्यवस्था आहेत त्या शेतकऱ्यांपर्यंत कशा पोहोचतील आणि शेतकरी कसा जगेल, हे सरकारने पाहिले पाहिजे. आपल्या राज्यावर संकट आलेले आहे, सर्वांनी त्याचा मुकाबला केला पाहिजे, हे आम्हालाही मान्य आहे. परंतु, यासाठी सरकारने पुढाकार घेतला पाहिजे आणि त्यानंतर सर्वांनी सरकारला सहकार्य केले पाहिजे. कृषी पुरक उद्योग राज्यात उभे राहण्यासाठी सरकारने पावले उचलली पाहिजेत. आपल्याकडे जी साधनसंपत्ती उपलब्ध आहे ती टंचाईग्रस्त भागात कशी वापरता येईल, हे सरकारने पाहिले पाहिजे. अशा काही सूचना सरकारला करतो आणि थांबतो.

--------------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, विरोधी पक्षाने नियम 260 अन्वये उपस्थित केलेल्या दुष्काळी परिस्थितीवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये अतिशय दुष्काळाची आणि टंचाईची परिस्थिती आहे. अशी परिस्थिती नेहमीच महाराष्ट्रात असते. गेल्या वर्षी राज्यात 24 हजार गावांमध्ये 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी होती. या वर्षी सुध्दा मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे पाणी टंचाई जाणवत आहे. या वर्षी 15500 गावांमध्ये 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी जाहीर झाली आहे. ज्या तालुक्यांमध्ये 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असते, त्या तालुक्यांमध्ये आपण दुष्काळी परिस्थिती, टंचाईसदृष परिस्थिती जाहीर करतो आणि टंचाई निवारण उपाययोजना लागू करतो. साधारणपणे वीज बिलामध्ये 33 टक्के सुट, विद्यार्थ्यांची फी माफ करणे, टँकरने पाणी पुरवठा करणे, अशा दुष्काळ निवारण उपाययोजना आपण करतो. परंतु, प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही.

सभापती महोदय, मी स्वत: वाहनाने मराठवाड्यातील दुष्काळाची पहाणी केली आहे. मराठवाड्यामध्ये तीव्र पाणी टंचाई आहे. तेथील परिस्थिती अतिशय नाजूक आहे. सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवर यांनी सांगितल्याप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रामधील काही जिल्ह्यांमध्ये विशेष करुन कायमस्वरुपी दुष्काळी तालुक्यांमधील परिस्थितीही अतिशय गंभीर आहे. गेल्या 10-15 वर्षातील परिस्थिती आपण बघितली तर प्रत्येक दोन-तीन वर्षानंतर या ठिकाणी दुष्काळ पडलेला आहे. सन 2003-2004 मध्ये, सन 2011-2012 मध्ये या ठिकाणची परिस्थिती अतिशय गंभीर होती. या परिस्थितीत टँकरने पाणी पुरवठा करणे, जनावरांसाठी चारा छावण्या उघडणे, अशा काही उपाययोजना आपण करीत असतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...L-1.......

श्री.प्रभाकर घार्गे........

हे सर्व करीत असताना शासनाचे त्यावर कोट्यवधी रुपये खर्च होतात. परंतु, हा भाग अद्याप कायम स्वरुपी दुष्काळातून बाहेर पडलेला नाही. आज त्या भागातील लोकांची अवस्था अत्यंत गंभीर आणि दयनीय आहे. राज्यात मागील वर्षी जवळपास 3100 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. मराठवाडा, विदर्भ आणि इतर भागातही काही प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. आपण सभागृहात नेहमीच चर्चा करुन त्यावर तात्पुरती उपाययोजना करतो. माझी या निमित्ताने शासनाला मागणी आहे की, राज्यात किती पाऊस पडला याचा आपण तालुकावार विचार केला पाहिजे. आपण सातारा जिल्ह्याचे उदाहरण घेतले तर महाबळेश्वर येथे 5 हजार मिलीमिटर पाऊस पडतो. परंतु, सातारा जिल्ह्यातील माण, खटाव तालुक्यात फक्त 250 ते 300 मिलीमिटर पाऊस पडतो. आपण यावर्षाची परिस्थिती बघितली तर महाबळेश्वर सारख्या ठिकाणी सुद्धा फक्त 50 टक्के पाऊस पडलेला आहे. सातारा जिल्ह्यातील पाटण, कोरेगांव किंवा सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात फक्त 50 टक्के पाऊस झालेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात केवळ 50 टक्के पाऊस झालेला आहे. यावर्षी आपल्याला या तालुक्यांमध्ये देखील टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा लागणार आहे. आज दुष्काळी भागातील परिस्थिती याही पेक्षा वाईट असणार आहे. आम्ही जिल्हाधिकारी, माननीय पालकमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करुन त्या भागात तात्पुरत्या उपाययोजना लवकरात लवकर करण्याची मागणी केलेली आहे. परंतु, शासनाकडून आम्हाला त्यासाठी योग्य ते सहकार्य मिळालेले नाही. सातारा जिल्ह्यातील माण, खटाव, आटपाडी, सांगोला तालुक्यात आजही टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्या भागात काही उपसा सिंचन योजना सुरु आहेत. त्या योजनांच्या लाईट बिलाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. लाईट बिलासाठी पाणीपट्टी आकारावयाचे म्हटले तर अद्याप तेथील छोट्या पाटांची कामे पूर्ण झालेली नाहीत.

सभापती महोदय, उरमोडी धरणात 9 टीएमसी पाणी आहे. परंतु, एकाही एकराला पाणी दिले जात नाही. उरमोडी धरण भरलेले आहे. परंतु, लाईट बिल कोणी भरावयाचे म्हणून त्या धरणातून पिण्यासाठी देखील पाणी सोडले जात नाही. ज्यावेळी सन 2011-12 मध्ये टंचाई निर्माण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे........

झाली होती त्यावेळी टेंभू योजनेचे लाईट बिल टंचाईतून भरण्याची तरतूद केल्यामुळे सातारा, सांगली जिल्ह्यातील पूर्व भाग, सांगोला, आटपाडी भागात टेंभू योजनेच्या माध्यमातून पिण्याचे पाणी उपलब्ध होऊ शकले. उरमोडी येथील योजनेचे दिड-दोन कोटी रुपये विजेचे बिल न भरल्यामुळे तेथील योजना बंद आहे. हे वीज बिल भरले तर शासनाचा टँकरवर होणारा खर्च देखील वाचणार आहे. शासनाने टँकर, चारा छावन्या सुरु केल्या तर त्या माध्यमातून 50 ते 100 कोटी रुपये या दोन-तीन जिल्ह्यांमध्ये खर्च होणार आहेत. त्याऐवजी आपण 5-10 कोटी रुपये वीज बिल भरण्याची टंचाईतून प्रोव्हिजन केली तर त्या भागाला चांगले पाणी मिळेल आणि ज्या भागातून कॅनॉल गेलेले आहेत त्या भागातील पिण्याचा पाण्याचा आणि चाऱ्याचा देखील प्रश्न सुटणार आहे. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, ज्या ठिकाणी 50 पैशापेक्षा कमी आणेवारी जाहीर झालेली आहे तेथे आपण आताच उपाययोजना करण्यास सुरुवात केली पाहिजे. अन्यथा परिस्थिती हाताबाहेर जाईल. मार्च, एप्रिल महिन्यात ज्यावेळी टंचाई परिस्थिती अधिक कठीण होईल त्यावेळी पिण्याचे पाणी आणि चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर होईल. त्यावेळी आपल्या समोर टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे, चारा छावन्या सुरु करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. आज लोक नाईलाज म्हणून टँकरचे पाणी पितात. अनेक ठिकाणी पाणी नाही. शासनाने लाईट बिल भरुन त्या ठिकाणी कॅनॉलचे पाणी सोडले तर शेतकऱ्यांना विहिरींच्या माध्यमातून स्वच्छ पाणी मिळू शकते. शासनाने तातडीची उपाययोजना म्हणून याचा विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आपण दुष्काळाचा विचार करीत असताना कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेवर असले तरी नळ पाणी पुरवठा योजना किंवा उपसा सिंचन योजनांसाठी निधीची अडचण निर्माण होते. पश्चिम महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांचा विकास झालेला आहे अशी सर्वांची कल्पना आहे. परंतु, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, राज्यात जवळपास 87 ते 100 तालुके कायम स्वरुपी दुष्काळी आहेत. त्यांचा वेगळा विचार करुन तेथील उपसा सिंचन योजनांच्या दृष्टीकोनातून शासनाने प्रयत्न करावा. केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान सुरु केले. शासनाने जो 13.5 टक्के

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे........

सर्व्हिस टॅक्स होता त्यामध्ये अर्धा टक्क्याची वाढ केलेली आहे. ही चांगली गोष्ट आहे. याबाबत कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. परंतु, जे तालुके कायम स्वरुपी दुष्काळी, कायम स्वरुपी टंचाईग्रस्त आहेत त्या तालुक्यांसाठी शासनाने वेगळी उपाययोजना करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवर यांनी सांगितले की, देशपातळीवर कच्च्या तेलाचे भाव कमी झाल्याने पेट्रोल, डिझेलचे दर कमी झालेले आहेत. शासनाने त्यावर प्रती लिटर 1-2 रुपया अधिभार लावावा आणि त्यातून जो निधी जमा होईल तो आपल्याला दुष्काळी आणि टंचाईग्रस्त भागातील कामांवर खर्च करता येईल. शासन व्हॅटच्या माध्यमातून कर गोळा करते. कोणत्याही शेती मालावर व्हॅट लावण्यात आलेला नाही. उदाहरणार्थ ज्वारी, गहू इत्यादी मालांवर व्हॅट लावण्यात आलेला नाही. या योजना पूर्ण होईपर्यंत शासनाने व्हॅटवर एक-दोन टक्के अधिभार लावावा आणि कायम स्वरुपी दुष्काळी तालुक्यांना न्याय द्यावा. त्याशिवाय दुष्काळाच्या दुष्ट चक्रातून शेतकरी कधीही बाहेर पडणार नाही. आपल्याला प्रत्येक दोन-तीन वर्षांनी दुष्काळाला सामोरे जावे लागते. आपण शेकडो कोटी रुपये खर्च करुन तात्पुरती उपाययोजना करतो. परंतु, जी परिस्थिती आहे ती तशीच राहते. मघाशी सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे लोक पुणे, मुंबई सारख्या ठिकाणी स्थलांतर करीत आहेत. आता त्याचा परिणाम शहरांवर देखील होत आहे. आज शहरातील लोकसंख्या वाटत आहे. तेथे नागरीकरणामुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. म्हणून शासनाने प्रामुख्याने या गोष्टीचा विचार करणे अतिशय गरजेचे आहे.

सभापती महोदय, शासनाने टंचाई जाहीर केली. शासनाने कर्जमाफी करावी अशी सर्व सन्माननीय सदस्यांची आणि जनतेची देखील मागणी आहे. शासनाने टंचाईमध्ये पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याची मुभा दिलेली आहे. सन 2011 व 2012 मध्ये पीक कर्जाचे पुनर्गठन करण्यात आले होते आणि आता पीक कर्जाचे पुनर्गठन केले तर पुनर्गठन केल्यानंतर त्यावरील व्याज

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे........

जवळपास 13 टक्के होते. शेतकऱ्यांनी 50 हजार रुपयांपर्यंत पीक कर्ज घेतले तर त्यावर शून्य टक्के आणि 4 लाख रुपयांपर्यत पीक कर्ज घेतले तर त्यावर 2 टक्के व्याज आकारले जाते. आज सातारा जिल्ह्यात पीक कर्जाचा शून्य टक्के व्याज दर आहे. शेतकऱ्यांनी जर 12-13 टक्के व्याज दराने कर्ज घेतले तर पुन्हा शेतकरी कर्जबाजारी होणार आहे आणि तो या दुष्ट चक्रातून कधीही बाहेर पडू शकणार नाही. माझे असे मत आहे की, दुष्काळाची दोन पद्धतीने तुलना केली पाहिजे. ज्या भागात पाऊस न पडल्यामुळे पेरणी झालेली नाही त्यांचा तोटा तर झालेलाच आहे परंतु, ज्यांनी पाऊस पडल्यानंतर पेरणी केली आणि त्यांचे पीक हातातून गेले त्यांचा डबल तोटा झालेला आहे. पेरणीसाठी आलेला खर्च त्या शेतकऱ्याच्या माथी पडलेला आहे. पीक कर्ज आणि त्यावरील व्याज यामुळे ज्यावेळी शेतकरी मेटाकुटीला येतो तेव्हा आत्महत्या केल्याशिवाय त्याच्या समोर दुसरा पर्याय राहत नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, आपण दोन-तीन वेळा पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याऐवजी शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली तर आनंदच आहे. परंतु, दुष्काळी परिस्थितीत शासनाने कमीत कमी कर्जावरील व्याज तरी माफ करावे, अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदय, शेती मालाचे दर अत्यंत कमी झालेले आहेत. ऊस, सोयाबीन इत्यादी पिकांचे दर पडलेले आहे. त्याच बरोबर दुधाचे दर देखील कमी झालेले आहेत. आज कांदा, बटाट्याचे दर 5-6 रुपये किलो आहेत. मागील 10 वर्षाच्या तुलनेत सर्वच शेती मालाचे दर अतिशय कमी झालेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही. म्हणून शासनाने शेती मालाच्या उत्पादन खर्चावर आधारीत दर देण्याचा दृष्टीने प्रयत्न करावा. शासनाने कायम स्वरुपी दुष्काळी भागाचा वेगळा विचार करुन त्यासाठी वेगळा निधी उभारुन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--------

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 च्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दुष्काळाच्या प्रस्तावार बरीच चर्चा झालेली आहे. प्रत्येक अधिवेशनात दुष्काळाचे आणि शेतीचे प्रश्न उपस्थित होतात. त्या प्रश्नांवर चर्चा देखील होते. परंतु, ती चर्चा वांजोटीच ठरते. कारण, त्या संदर्भात शासनाकडून ठोस निर्णय घेतल्याचे दिसत नाही आणि शासनाची तशी इच्छाशक्ती देखील नाही, हे अत्यंत क्लेशदायक आहे. आपण देशाच्या स्वातंत्र्यानंतरचा इतिहास बघितला तर देशात मोठ्या प्रमाणावर अन्न धान्याची टंचाई होती. पूर्वी परराष्ट्र मंत्र्यांना एकच काम असायचे आणि ते म्हणजे प्रत्येक देशात जाऊन अन्न धान्यची व्यवस्था करणे. आपल्या देशातील शेतकऱ्यांनी दिवसरात्र कष्ट करुन देशाला अन्न धान्यात स्वंपूर्ण बनविले आहे. आज देशातील शेतकऱ्यांच्या कष्टामुळे आपण इतर देशात अन्न धान्याची निर्यात करतो. या देशात एवढे मोठे स्थित्यंतर कोणी घडवून आणले ? हे स्थित्यंतर शेतकऱ्यांनी घडवून आणले आहे. परंतु, आज शेतकऱ्यांची अवस्था काय आहे ? प्रत्येक बाबतीत शेतकऱ्यांना दुय्यम स्थान दिले जाते. काल आपण कै.शरद जोशी यांना अखेरचा सलाम केला. शेतकऱ्यांवर अन्याय का होतो ? कारण, शेतकरी संघटित नाही म्हणून त्यांच्यावर अन्याय होतो.

..M-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

डॉ.सुधीर तांबे...

जो वर्ग संघटीत आहे, त्याच्या विरुध्द शासन किंवा या देशातील राज्यकर्ते कोणताही विपरीत निर्णय करण्याची हिंमत करीत नाहीत. या देशातील शेतकरी संघटीत नसल्यामुळे त्यांची सातत्याने अवहेलना केली जाते. आपण नेहमी म्हणतो शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. शेतकऱ्यावर आपण कोणताही उपकार करीत नाही हे मला सभागृहाला सांगावयाचे आहे. शेतकऱ्यांनी स्वातंत्र्यानंतरच्या काळात या देशातील लोकांसाठी किती दिले आहे, त्याचा एकदा हिशोब मांडला पाहिजे. जे दिलेले आहे ते त्यांना परत कले तर त्या शेतकऱ्यांला तुमच्याकडे काहीही देण्याची गरज भासणार नाही. आपण शेतकऱ्यांकडून लेव्ही गोळा केली, या देशातील टाटा व बिर्ला यांना देखील शेतकऱ्यांच्या बळावर साखर स्वस्त पाहिजे. या देशातील डॉक्टर व इंजिनिअर यांना देखील साखर स्वस्त पाहिजे. या देशातील लोकांना शेतकऱ्यांच्या बळावर दूध स्वस्त पाहिजे, गहू स्वस्त पाहिजे. असे निर्णय कोणाच्या बळावर आपण करीत आहात ? हे आपण शेतकऱ्यांच्या खिशातून अन्यायकारक रितीने काढून घेत आहोत. कांद्याचे भाव वाढले की, आपण निर्यात बंदी लागू करतो. गव्हाचे भाव वाढले की, आपण गहू आयात करतो. अशा प्रकारे अत्यंत कृत्रिमरित्या देशातील वस्तूंचे भाव सातत्याने कमी केले आहेत व देशातील शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात अन्याय केला आहे. प्रत्येक मंत्री महोदय सांगतात की मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. मुख्यमंत्री सांगतात की, मी स्वतः शेतकरी आहे. शेतकऱ्याचे दु:ख आपण कधी तरी जाणून घेतले आहे काय ?

सभापती महोदय, आरोग्य व शिक्षणाकडे पाहिले तर या सर्व बाबतीत शेतकऱ्यांना दुय्यम दर्जाच्या सेवा मिळत आहेत. मोठी हॉस्पीटल व मोठ्या शैक्षणिक संस्था, महाविद्यालये शहरात आहेत. शेतकऱ्यांच्या मुलांना चांगले शिक्षण दिले जात नाही. शेतकरी अत्यंत नैसर्गिक प्रतिकूल परिस्थितीत राहत आहेत. तेथे विंचू व काटे असतात, दरवर्षी विजेचा धक्का लागून किती तरी शेतकरी मृत्युमुखी पडत आहेत, याची आकडेवारी काढण्यात यावी. साप चावून किती शेतकरी मरतात याची आकडेवारी काढावी. त्यामुळे आपण शेतकऱ्यांवर किती मोठा अन्याय करतो हे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

आपल्या लक्षात येईल.

सभापती महोदय, आज संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ पडला असताना आम्ही स्मार्ट सिटीची चर्चा करीत आहोत. या देशातील संपत्तीवर शेतकऱ्यांचा अधिकारी नाही काय ? एक लाख कोटी रुपयांचे कर्ज काढून बुलेट ट्रेन आणली जाणार आहे. आम्हाला बुलेट ट्रेन महत्वाची आहे काय ? महाराष्ट्रात दररोज 11 शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्यांच्या जीवनाची सरकारला काहीच पर्वा राहिली नाही. त्याच्या जीवनाचे काही मोल राहिले नाही. मला असे म्हणावयाचे आहे की, सरकारची संवेदनशीलता कोठे गेली. शासनाकडे आता संवेदनशीलता राहिली नाही. शासन म्हणेल की, नैसर्गिक संकट आहे, परंतु या नैसर्गिक संकटाबरोबरच शासनाची चुकीची धोरणे तेवढीच जबाबदार आहेत, शेतकऱ्यांची कर्ज माफी सरकार तातडीने का करु शकत नाही. या देशाचे पंतप्रधान राजकीय कारणासाठी बिहारमध्ये जातात व सांगतात की, आम्ही 1 लाख 25 हजार कोटी रुपयांचे पॅकेज देऊ. महाराष्ट्रातील गरीब शेतकऱ्यांसाठी 10 ते 20 हजार कोटी रुपये का पंतप्रधान देऊ शकत नाहीत. ते नेहमी आघाडी शासनाची तुलना करतात. माझा प्रश्न असा आहे की, त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान श्री.मनमोहन सिंह यांनी खास करुन विदर्भासाठी पॅकेज दिले होते. विशेष निधी दिला होता. युपीए सरकारने 72 हजार कोटी रुपये दिले होते व महाराष्ट्र शासनाने सहा हजार कोटी रुपये दिले होते.

सभापती महोदय, एलबीटी रद्द करणे ही बाब अत्यंत तातडीची होती काय ? एलबीटी रद्द करुन सहा हजार कोटी रुपयांची भरपाई देण्यात येणार आहे, ही रक्कम शेतकऱ्यांना दिली असती तर शेतकरी सुखी झाला असता. परंतु शेतकरी दु:खी असला, शेतकऱ्याकडे पैसे नसले तर बाजारपेठेत कोण येणार या प्रश्नांचे मला उत्तर मिळाले पाहिजे. व्यापाऱ्यांनी देखील ही बाब लक्षात घेतली पाहिजे. या देशातील श्रीमंत लोकांनी ही बाब लक्षात घेतली पाहिजे.शेतकऱ्यांचे आपल्यावर उपकार आहेत, आपण शेतकऱ्यांना मदत करतो म्हणजे काही वेगळे करतो असे नाही. तो शेतकऱ्यांचा अधिकार आहे. जगभरातील शेतकरी अडचणीत असतात, त्या देशातील सरकार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मदत करतात. आपण शेतकऱ्यांना निगेटिव्ह सबसिडी दिलेली आहे. हीच गोष्ट स्व.शरद जोशी यांनी आयुष्यभर मांडली आहे. आज जे चित्र आपण पाहत आहोत ते अत्यंत चिंतेचे आहे, शासनाकडे संवेदनशीलता नाही. काही निर्णय शासनाने घेण्याची आवश्यकता आहे. ऊस पिकाबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. जेव्हा ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत असतो, तेव्हा त्याला मदत करण्याची जबाबदारी शासनाच नाही काय ? सरकार त्यांना बिनव्याजी कर्ज देते. त्यांना एफआरपी द्यावयाची आहे. एफआरपी काढण्यात येते त्यामधील फरकाची रक्कम शासनाने दिली पाहिजे. ही रक्कम साखर कारखाने कोठून देणार आहेत. काहीही करुन सहकार मोडून काढावयाचा असा निर्णय या शासनाने घेतला आहे. सहकारामुळे आपणाला राजकीय धोका आहे, असे कदाचित यांना वाटत असावे, सहकार मोडून काढावयाचा असल्यामुळे जाणीवपूर्वक ऊस उत्पादक शेतकरी व कारखानदारांना मदत केली जात नाही. दूधाच्या व्यवसायाला मदत केली जात नाही. हे साहजिक आहे की, कोणत्याही देशात एखाद्या गोष्टीचे उत्पादन वाढते तेव्हा त्या उत्पादनातील काही भाग परदेशात पाठवावा लागतो. ही धोरणात्मक बाब आहे, दूधाचे उत्पादन वाढल्यानंतर त्याची पावडर तयार केली पाहिजे. त्यासाठी जे अनुदान दिले जात होते ते अनुदान या शासनाने बंद केले आहे. हे या सरकारचे पाप आहे, याची उत्तरे जनतेसमारे या सरकारला द्यावी लागणार आहेत. शेतकरी अडाणी व भोळा असला तरी त्याला निर्बुध्द समजण्याचे कारण नाही. तो सर्व बघत असतो, त्याची शिक्षा या सरकारला मिळाल्याशिवाय राहणार नाही असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या शासनाने तातडीने शेतकऱ्यांना कर्ज मुक्ती दिली पाहिजे. काल देखील आपण पाहिले की, पेट्रोल व डिझेलचे आंतरराष्ट्रीय भाव कोसळले आहेत, केंद्र शासनाला लाखो कोटी रुपये पेट्रोल व डिझेलच्या माध्यमातून मिळाले आहेत. त्यातील थोडा तरी भाग शेतकऱ्यांच्या वाट्याला येऊ देणार की नाही. त्यातील काहीच पैसा देत नाही ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे, शासनाने तातडीने शेतकऱ्यांची कर्जमुक्ती केली पाहिजे. शासनाने ऊस,केळी,सोयाबीन, कापूस, धान अशा वेगवेगळ्या पिकांना तातडीने मदत करण्याची गरज आहे. पीक विम्यासाठी

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

चांगली योजना आणण्याची गरज आहे. दुष्काळ सातत्याने पडतो, दरवर्षी गारपीट होते, गेल्या चार ते पाच वर्षापासून राज्यात व देशात दुष्काळ पडत आहे. दुष्काळासाठी एक वेगळा निधी केंद्र व राज्य शासनाने काढला पाहिजे. ऊसाच्या व साखरेच्या किंमतीमध्ये जे चढउतार होतात त्यासाठी स्थिरता निधी म्हणजे स्टॅबिलिटी फंड निर्माण करण्याची गरज आहे. ज्यावेळी अशा पध्दतीने भाव कोसळतात त्यावेळी शासनाने मदत केली पाहिजे. त्याचप्रमाणे जो गरीब शेतकरी आहे, त्यांच्यासाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु झाली आहे. ही योजना अत्यंत चांगली आहे, यामध्ये आणखी काही गंभीर आजारांचा समावेश करावयाचा राहिला असेल तर तो करण्यात यावा. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना ही केंद्र सरकारने सुरु केली होती. या योजनेसाठी 75 टक्के निधी केंद्र शासन व 25 टक्के निधी राज्य शासन देते. जे छोटे आजार राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत नाहीत ते आजार राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेत आहेत. या सर्व आजारांचा राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत समावेश होता. परंतु गेल्या वर्षभरापासून ते बंद करण्यात आले आहेत. आरोग्य मंत्री यांचे असे म्हणणे आहे की, सुधारित योजना आणणार आहे ती योजना तातडीने आणावी अशी आमची मागणी आहे. जेणेकरुन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेबराबर राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना जोडली तर ग्रामीण भागातील गरीब लोकांच्या आरोग्याचे प्रश्न मिटतील.

सभापती महोदय, चर्चा होत असताना विदर्भ, मराठवाडा येथे मोठा दुष्काळ आहे, याबाबत सर्वांना चिंता वाटत आहे. महाराष्ट्रातील जवळपास 15 हजार गावे दुष्काळी जाहीर करण्यात आली आहेत. उत्तर महाराष्ट्रातील जळगांव जिल्ह्यातील 2 हजार गावे आहेत, नंदूरबारमधील 800 गावे आहेत, धुळे जिल्ह्यातील 600 गावे आहेत, जवळपास 1/4 गावे म्हणजे चार हजार गावे ही उत्तर महाराष्ट्रातील आहेत. उत्तर महाराष्ट्रातील दुष्काळाबाबत शासनाने काळजी घेतली पाहिजे. तेथील शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे. परवा मालेगावच्या तरूण शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या नावाने त्यांनी पत्र लिहिले होते. श्रीरामपूर येथे आत्महत्या करण्यात आली

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

आहे. आत्महत्या मराठवाड्यात होतात हे चित्र बदलायचे असेल तर त्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. जो भाग चांगला आहे तेथे काही तरी योग्य चालू आहे, त्या भागातून आपण काही काढून घेणार आहात काय ? जायकवाडीच्या निमित्ताने मला हा प्रश्न येथे मांडावयाचा आहे. जायकवाडीच्या पाण्याच्या संदर्भात बरेच वाद निर्माण झाले आहेत. अहमदनगर व नाशिकचे पाणी जायकवाडीला पिण्यासाठी देण्यात काही दुमत नाही. पिण्याच्या पाण्याची किती गरज आहे ती निश्चितपणे समजावून सांगितली पाहिजे. तेवढे पाणी तुम्ही जरूर घेऊन जावे. एकीकडे अहमदनगर आणि नाशिक उध्दवस्त करावयाचे आणि मराठवाड्याचेही भले करावयाचे नाही. असेतत्वज्ञान चालणार नाही. सभापती महोदय, मला या निमित्ताने इतकेच सांगावयाचे आहे की, याच्या पाठीमागील डाव वेगळा आहे, जे पाणी पश्चिमेकडे जाते. त्या पाण्यावर महाराष्ट्राचा हक्क आहे. ते पाणी महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रात पडते. त्यावर फक्त महाराष्ट्राचा हक्क असला पाहिजे. ते पाणी गुजरातकडे जाता कामा नये. यासाठी काळजी घेण्याची गरज आहे. आम्हाला अशी शंका येत आहे की, आपल्या हक्काचे पाणी गुजरातला जाऊ द्यावयाचे असा राज्य शासनाचा घाट आहे.

...N-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे......

कारण गोदावरी खोरे चुकीचे आहे. आज पश्चिमेकडे जाणारे जे पाणी आहे त्याचा चांगला सर्व्हे कोणीही केलेला नाही. जवळजवळ 50 टीएमसी पाणी पश्चिमेकडे जाणारे आहे ते गोदावरी खोऱ्यामध्ये आणू शकतो. ते पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये आणले तर मराठवाड्याचे सुध्दा हित होणार आहे. पावसाळ्यात येणारे पाणी मराठवाड्यामध्ये पोहोचू शकते. त्यातून नगर, नाशिक विरुध्द मराठवाडा असा जो प्रादेशिक वाद निर्माण केला आहे तो प्रादेशिक वाद बंद होईल. मी पुन्हा एकदा भाषणाचा समारोप करीत असताना सांगू इच्छितो की, स्वामीनाथन आयोगाने ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्याची तातडीने अंमलात आणाव्यात. शेतकरी दिवसरात्र शेतात राबतो, त्यामुळे आम्ही सर्वजण चांगले जीवन जगत असतो. त्या शेतकऱ्यावर अन्याय होऊ नये, त्याच्यासाठी तातडीने कर्जमुक्तीची शासनाने घोषणा करावी एवढी विनंती करून माझे भाषण पूर्ण करतो.

-------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील दुष्काळाच्या संदर्भात होत असलेल्या चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मी उभा आहे. काही फॅक्ट आणि फायडिंग, जी वास्तविकता आहे आणि ज्याचा शेतकऱ्यांशी जवळचा संबंध आहे त्याबद्दल आणि शासनाची भूमिका याबद्दल मागील वर्षभरात ज्या गोष्टी घडल्या त्या उदाहरणासहित सांगू इच्छितो.

सभापती महोदय, दिनांक 17 डिसेंबर, 2014 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी यवतमाळ जिल्हयाची आढावा बैठक घेतली होती. दिनांक 4 मार्च, 2015 रोजी यवतमाळ येथे माननीय मुख्यमंत्र्यांनी आढावा बैठक घेतली होती. पुन्हा दिनांक 8 डिसेंबर, 2015 रोजी म्हणजे आठ दिवसांपूर्वी नागपूर येथे यवतमाळ जिल्हयाची आढावा बैठक माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतली. या तीनही बैठकांमध्ये शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने ज्या महत्वाच्या बाबी होत्या, त्या दिनांक 17 डिसेंबर, 2014 रोजी जशा होत्या तशाच अवस्थेत आजही आहेत. यवतमाळ येथील आढावा बैठकीत धडक सिंचन विहीर योजनेबाबत अधिकाऱ्यांना 30 जूनपर्यंत अल्टीमेटम देण्यात आला होता, कोणती कामे कशा पध्दतीने करावीत याचे दिग्दर्शन करण्यात आले होते. आठ दिवसांपूर्वी झालेल्या आढावा बैठकीत शेतकऱ्यांच्या विहिरींबाबत, सिंचनाच्या प्रश्नाबाबत मुख्य सचिवांनी जिल्हाधिकाऱ्यांवर अक्षरशः खडसावले. त्यांनी सांगितले की, तुम्ही ॲक्शन प्लॅन तयार करावा. शेतकऱ्यांच्या या प्रश्नाबाबत, यवतमाळ जिल्हयासारख्या आत्महत्याग्रस्त जिल्हयामध्ये मुख्य सचिवांना एक वर्षानंतर जिल्हाधिकाऱ्यांना ॲक्शन प्लॅन तयार करण्याविषयी सूचना द्यावी लागते, वर्षभराच्या काळात या अधिकाऱ्यांची काम करण्याची प्रवृत्ती तीच असेल तर शेतकऱ्यांबाबत या सरकारचा अधिकाऱ्यांवर वचक किती आहे हे दिसून येते. ज्या योजनांबाबत ॲक्शन प्लॅन तयार करण्याबाबत सांगितले जाते, त्या योजनांना क्रिटिकल पाथ मेथड लावली नाही तर त्या योजना तशाच पडून राहतील. 30 जूनला जी कामे पूर्ण करावयाची आहेत त्याची 1 जूनला काय स्थिती असली पाहिजे, 31 मे पर्यंत जी कामे पूर्ण करावयाची आहेत त्याची 1 मे रोजी काय स्थिती असली पाहिजे, जी कामे सुरु करीत आहात, त्या कामांना अल्टीमेटम देत असताना क्रिटिकल पाथ मेथड लावल्याशिवाय ती पूर्ण होणार नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांचा आणि शासनाचा अधिकाऱ्यांवर असाच वचक राहिला तर या शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना गांभीर्याने घेतल्या जाणार नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग.......

सभापती महोदय, जलयुक्त शिवार अभियान ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात आली. ही योजना नवीन नाही. 1992 मध्ये रोजगार हमी योजनेत ही योजना कृषी पंढरी योजना म्हणून नावारुपास आली. 1992 मध्ये या सर्व गोष्टी पाणलोट विकास कार्यक्रम, हरियाली या नावाने राबविण्यात आली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री.शरद पवार यांना पत्र लिहिले, त्यामध्ये 24 टीएमसी पाणी या योजनेच्या माध्यमातून वाढले असे नमूद केले होते. परंतु 1 टीएमसी पाण्यामध्ये 4800 हेक्टर जमीन ओलिताखाली येते. त्यानुसार माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री.शरद पवार यांना कळविल्यानुसार 24 टीएमसी पाण्यामध्ये 1,15, 200 हेक्टर जमीन ओलिताखाली आली पाहिजे होती. परंतु हे खरे नाही. ही वास्तव परिस्थिती लक्षात घेतली पाहिजे.

सभापती महोदय, एखाद्या शेतकऱ्याकडे 10 एकर जमीन असली तरी सांगताना 5 एकर जमीन भारी व 5 एकर जमीन हलकी आहे असे म्हटले जाते. म्हणजे 10 एकर जमीन भारी आहे असे समजले जाते. संपूर्ण देशामध्ये वेगवेगळ्या पोताची जमीन आहे. त्या जमिनीची पाणी साठवण क्षमता वेगवेगळी असते. विदर्भामध्ये बसाल्ट जमीन असून कोकणामध्ये लॅटरेट जमीन आढळते. खडकाळ जमिनीवर जलसंधारणाच्या योजना राबविल्या तर त्या जमिनीमध्ये शेतीसाठी झिरपणारा पाणीसाठा कमी होतो. पुरेसा पाणीसाठा होऊ शकत नाही. जमिनीची पाणी रिचार्ज करण्याची, भूगर्भातील पाणी वाढविण्याची क्षमता 433 बीसीएम आहे. त्यापैकी 36 बीसीएम पाणी रिचार्ज क्षमता या देशाची आणि महाराष्ट्राची आहे. सन 2004 मधील सर्वेक्षण अहवालानुसार ही क्षमता 2.38 बीसीएमपर्यंत गाठू शकलो आणि 2008 च्या सर्वेक्षण अहवालानुसार 2.73 बीसीएम एवढी क्षमता गाठू शकलो. नैसर्गिक पध्दतीने पाणी रिचार्ज करण्याची जी क्षमता आहे ती पूर्णपणे गाठू शकलो नाही.

सभापती महोदय, पाणी अडवा आणि पाणी जिरवा या योजनेच्या माध्यमातून 1992 ते 2012 पर्यंत 8,28,322.16 लाख रुपये आणि 175 कोटी मनुष्यदिन खर्ची पडले. एवढे प्रयत्न करुनही पुरेशी जलसिंचन क्षमता गाठू शकलो नाही. यवतमाळ जिल्हयातील दोन तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात आले. फेर तपासणी किंवा फेर आणेवारीची प्रक्रिया करणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहोत असे सांगितले जाते. हा ताळमेळ शेतकऱ्यांच्या हिताचा नाही. शेतकऱ्यांची ड्रिप योजनेची, सूक्ष्म सिंचन योजनेची कितीतरी प्रकरणे प्रलंबित आहेत. डीपीडीसीच्या बैठकीत विचारणा केली

...4...



श्री.ख्वाजा बेग........

असता अधिकारी सांगतात की, सर्व अनुदान वितरित करण्यात आले आहे. नंतर कळून येते की, अजूनही अनुदान शिल्लक आहे. प्रत्यक्षात अधिकाऱ्यांना भेटून प्रलंबित गोष्टी मार्गी लावण्यासाठी शिष्टाई करावी लागते. आता अधिकारी सुध्दा खोटे बोलू लागले आहेत. याचा अर्थ शासनाचा त्यांच्यावर वचक राहिलेला नाही. शेतकऱ्यांच्या अपघात विमा योजनेच्या फायली गहाळ होत आहेत. अधीक्षक कार्यालयात चौकशी केल्यानंतर असे आढळून आले की, दत्तात्रय गुटले या शेतकऱ्याची फाईल गहाळ झाली आहे. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांची जी परिस्थिती आहे, त्या वास्तव परिस्थितीच्या अनुषंगाने मी मागणी करतो की, आणेवारीची पध्दत बदलून तांत्रिकदृष्टया पध्दत सुरु करण्यात यावी. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात याव्यात. शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करण्यात यावा.

.....ओ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग...

संपूर्ण कर्ज माफी करण्यात यावी. सिंचनाची व्यवस्था करण्यात यावी. अरूणावती नदीचे पाणी रस्त्यावर जास्त वाहते, कॅनॉलमधून कमी वाहते. ही बाब देखील मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. तसेच जेथे कुठे कॅनॉल असतील त्यांचे लायनिंग करण्यात यावे. ओलितासाठी वीज देण्यात यावी. ती वीज देखील पूर्ण दाबाची असली पाहिजे. विजेच्या कमी दाबामुळे आज मोटारी जळत आहेत. कापसाला सात हजार रूपये देण्याची मागणी आपण केली होती. ती मागणी आपण पूर्ण करावी. त्याच प्रमाणे सोयाबीनला पाच हजार रूपये देण्याची मागणी आपलीच होती. आता आपण शासनामध्ये असल्यामुळे ती मागणी पूर्ण करण्याची आपली जबाबदारी आहे.

मी या निमित्ताने एक महत्वाची सूचना करणार आहे. आपण कृत्रिमरित्या जलसिंचन करू शकतो. सर्व शासकीय इमारतींवर रेन वॉटर हार्वेस्टींग करणे बंधनकारक केले पाहिजे. आपण आर्किटेक्ट नेमतो. सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर आपण एनओसी देतो. त्यामुळे आजच्या घडीला पाण्याचे नियोजन करण्यासाठी आपण संबंधित महानगरपालिकेला रेन वॉटर हार्वेस्टींगचे नियोजन केले असेल तरच इमारतींना परवानगी द्यावी अशा प्रकारच्या सूचना द्याव्यात. रेन वॉटर हार्वेस्टींग ही आजची गरज आहे. एवढे बोलून शेवटी शेतकऱ्याचे शासनाकडे काय म्हणणे आहे ते मी चार ओळीमध्ये सांगतो.

"हर खार हमारा है, हर फूल हमारा है,
हमने ही लहू दे कर गुलशन को संवारा है,
सौ जख्म मिले हमको, एक आह न की हमने,
वह जर्फ तुम्हारा था, ये जर्फ हमारा है."

शेतकऱ्यांची ही भावना आपण समजून घ्यावी आणि त्यांचे कर्ज माफ करावे अशी विनंती करतो. धन्यवाद.

......

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला वेळ दिल्याबद्दल धन्यवाद. मी अत्यंत महत्वाच्या विषयावर बोलण्यासाठी उभा आहे. आज राज्यात दुष्काळ आहे. पाणी टंचाई आहे, चारा टंचाई आहे.

**उप सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सर्व सन्माननीय सदस्यांना संधी देणार आहे. उपलब्ध असलेला वेळ आणि करावयाची भाषणे यात आपण समन्वय साधावा. नंतर मग कोणतीही शंका नको. त्यामुळे प्रत्येकाने 5 ते 7 मिनिटे बोलावे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, दुष्काळाने पूर्ण महाराष्ट्र होरपळलेला आहे. शेतकरी हवालदिल झालेला आहे. राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे लक्ष विदर्भात होत असलेल्या हिवाळी अधिवेशनाकडे लागलेले आहे. आम्हाला शेतकरी रोज फोन करून विचारतात की, काही पॅकेज जाहीर झाले आहे काय ? हे सरकार आमचे कर्ज माफ करणार आहे काय ? हे सरकार लबाडाचे आहे. या सरकारला संवेदना नाही. गेले आठवडाभर विरोधी पक्षा सोबत शिवसेना देखील होती. या सर्वांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर रान उठविले. तरी देखील या सरकारला घाम फुटत नाही. दुष्काळ हा काही आज आलेला नाही. दर वर्षी दुष्काळ येतो. आमच्या सरकारने पैशाचा पाऊस पाडलेला आहे. आपण शेतकऱ्यांचे बँक अकौंट पहावे. मी सुद्धा एक छोटा शेतकरी आहे. माझ्या बँक अकौंटमध्ये 5 हजार, 7 हजार रूपये जमा होत होते. हा पैसा आला कुठून म्हणून मी विचारणा केली तेव्हा लाल्याचे पैसे आले, दुष्काळाचे पैसे आलेले आहेत. पुराचे पैसे आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख म्हणायचे की, एकदा समुद्रात मासे आले नाही म्हणून त्याचे पैसे सुद्धा सरकारने दिलेले आहेत. हे सरकार आल्यापासून त्यांनी एका कवडीचीही मदत केलेली नाही. हे सरकार फक्त आश्वासनांवर आश्वासने देत आहे. हे आम्हाला बोलायची गरज नाही. शेतकरी आता बोलत आहेत की, त्यांना मतदानासाठी येऊ द्यावे. आज अशी परिस्थिती असताना आमचे बाबा बरे होते. बाबा म्हणजे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण होय.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड...

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळ पडला होता तेव्हा बाबा झोपले नव्हते. त्यांनी चाऱ्याची व्यवस्था केली होती. दुष्काळावर मात करण्यासाठी आम्ही जे केले होते ते तरी आपण कमीतकमी करावे असे मला सुचवायचे आहे. जे कॉंग्रेस-राष्ट्रवादीने केले ते तरी आपण करावे. आमच्या आपल्याकडून अधिकच्या अपेक्षा नाहीत.

सभापती महोदय, येथे फक्त नाव बदलण्याचेच काम सुरू आहे. या देशाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरून यांनी योजना आयोगाची स्थापना केली होती. पण त्याचे नाव आता नीती आयोग असे करण्यात आले आहे. आज आपली शेतकऱ्यांना डुबविण्याचीच नीती आहे. आज मागासवर्गीयांना खतम करण्याची आपली नीती आहे. मी एक गोष्ट सभागृहाला सांगू इच्छितो. यवतमाळ जिल्ह्यामध्ये आज सर्वात जास्त आत्महत्या होत आहेत. जवळ जवळ 60 टक्के भटक्या व विमुक्त जातीतील लोक आज आत्महत्या करीत आहेत. त्याचे कारण या सरकारने भटक्या विमुक्त जातींसाठी असलेल्या सर्व योजना बंद केलेल्या आहेत. आश्रमशाळांचे अनुदान बंद केले आहे. यवतमाळ जिल्ह्यात 148 आश्रमशाळा व शाळा चालत होत्या. त्यांचे अनुदान बंद केले आहे, शिक्षकांचा पगार बंद केला आहे. हे शासन सर्व काही आकसापोटी करीत आहे. या सरकारचे म्हणणे आहे की, हे कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीचे पाप आहे. आमची जी मुले शिकत होती त्यांचा घास काढून घेण्याचे काम हे सरकार करीत आहे. या देशाची आर्थिकस्थिती ही शेतीवर अवलंबून आहे. आपल्या घरामध्ये गहू, तांदूळ, डाळ, कडधान्य, साखर, गूळ असते. ते पिकविण्याचे शेतकऱ्यांनी बंद केले तर काय होईल ? आपण एक दिवस तरी जगू शकतो काय ? अन्न आणि वस्त्र या दोन गोष्टींशिवाय आपण जगूच शकत नाही. या सरकारची नीती शेतकऱ्यांना मदत करण्याची नाही. आम्ही कर्ज माफी मागितली तर आपण कोणाची कर्ज माफी केली ? आपण सावकाराची कर्ज माफी केली. माझ्या गावाच्या आसपास असणाऱ्या 25 गावांत एकाही शेतकऱ्याचे कर्ज माफ झालेले नाही. आपण कोणाला कर्जमाफी दिली आहे याची चौकशी सीबीआय मार्फत केली पाहिजे. कुठल्या सावकाराची कर्जमाफी झाली हे उघड झाले पाहिजे. यात फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे. या शासनाने कोट्यवधी रूपये आपल्या कार्यकर्त्यांना, आपल्या सावकारांना वाटलेले आहेत. त्याची चौकशी झाली पाहिजे. आपण कोणत्या सावकारांचे कर्ज माफ केले आहे हे पुढे आले पाहिजे.

..4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड...

सभापती महोदय, मी 1977 मध्ये मंत्रालयात नोकरीला लागलो होतो. माझा पहिला पगार 400 रूपये होता. त्यावेळी कापसाचा प्रति क्विंटल 400 रूपये भाव होता. सोन्याचा भाव देखील 400 रूपये तोळा होता.

P-1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 1977 मध्ये कापसाला 1200 रुपये भाव होता.

श्री. हरिसिंग राठोड : सभापती महोदय, ठीक आहे. 1977 मध्ये कापसाला 1200 रुपये भाव होता असे आपण मानू या. 1977 मध्ये सोन्याचा भाव 400 रुपये तोळा होता, आता सोन्याचा भाव 26 हजार रुपये तोळा आहे. आताचे पगार जर 20-25 हजार रुपये आहे असे घरले तर आज कापसाला भाव किती असावयास पाहिजे ? यामध्ये गणितीय शोध झाला पाहिजे. आजही कापसाला 4 हजार रुपये भाव आहे.

सभापती महोदय, मी या सरकारला धन्यवाद देतो. या सरकारने डाळीचे भाव 200 रुपये केले ते 250 रुपये झाले पाहिजे असे मी म्हणेन. या शासनाने सगळयांचे भाव वाढवून दिले पाहिजे, कांदे,बटाटे,तेल,साखर,दुधाचे या सर्वांचे भाव वाढवले पाहिजे. (अडथळा) या शासनाने फक्त शेतकऱ्यांच्या मालाचे भाव कंट्रोल केले आहेत. परंतु जोपर्यंत शेतकऱ्याच्या मालाचे भाव वाढणार नाही तोपर्यंत शेतकरी कधीही सुखी होऊ शकणार नाही. तुम्ही शेतकऱ्यासाठी कितीही कर्जमाफी दिली तरी शेतकरी सुखी होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्याच्या मालाच्या भावाचे नियोजन होण्याची आवश्यकता आहे. केवळ योजना आयोगाचे नाव बदलून चालत नाही तर या सरकारने प्रथम आपली निती सुधारली पाहिजे. या सरकारला आता संवेदना उरलेल्या नाहीत. या सरकारला जर शेतकऱ्यांबद्दल संवेदना असती तर अधिवेशनाच्या आठ दिवसात या सरकारने शेतकऱ्यांच्या संदर्भात काही तरी घोषणा केली असती. हे अधिवेशन संपल्यानंतर आम्ही घरी जाऊ तेव्हा आमच्या शेतकरी बांधवाना अधिवेशनात कोणती घोषणा झाली त्याबद्दल आम्ही कोणती माहिती देऊ शकू ? या अधिवेशनाचे नेमके फलित काय आहे हे तरी आम्हाला समजून सांगावे. हे अधिवेशन विदर्भात सुरु असून या अधिवेशनात तुम्ही विदर्भासाठी कोणते पॅकेज दिले आहे ?

सभापती महोदय, विदर्भाचा मुख्यमंत्री असताना ते विदर्भातील जनतेच्या तोंडाला केवळ पाणेच पुसत असतील तर प्रथम यांनी अधिवेशनाचा खेळ प्रथम बंद केला पाहिजे. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाईल अशा प्रकारची घोषणा शासनाच्या वतीने या अधिवेशनात दिली गेली पाहिजे नाही तर जनता तुम्हाला रस्त्यावर फिरु देणार नाही एवढे सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 च्या प्रस्तावावर बोलतांना मला महत्वाचे थोडे मुद्दे मांडावयाचे आहेत. मागच्या आठवडयात विरोधी पक्षाने शेतकऱ्यांना कर्ज माफ द्यावी अशी मागणी सभागृहात लावून धरली होती त्यामुळे आपण शेतकऱ्यांच्या प्रश्नावर या ठिकाणी चर्चा करीत आहोत. या चर्चेनंतर शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले जाईल अशी अपेक्षा आम्ही या चर्चेच्या माध्यमातून व्यक्त करीत आहोत. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर या सभागृहात सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

सभापती महोदय, शेतकऱ्यांने आत्महत्या केल्यानंतर त्याची बायको, त्याचे कुटुंब पूर्णपणे उध्वस्त होत असते, या विषयाकडे सरकारला लक्ष देण्यासाठी वेळ नाही. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला 1 लाख रुपये मिळत असतात परंतु त्यातील अर्धे पैसे सुध्दा त्या कुटुंबाला मिळत नाही. मुलीच्या लग्नाच्या काळजी तसेच नापिकीमुळे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. सावकाराकडून शेतकऱ्याची पिळवणूक थांबविण्यासाठी सन 2010 मध्ये नवा सावकारी अधिनियम मागच्या सरकारने पारीत केला होता. या कायद्याला केंद्रसरकारची मंजूरी मिळून सन 2010 मध्ये तो लागू झाला. त्यानंतर राज्यभरातील शेतकऱ्यांनी या कायद्याअंतर्गत एआर आणि डीडीआर यांच्याकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. परंतु कायद्यात असलेल्या त्रुटींमुळे अशी प्रकरणे निकाली निघाली नाहीत. अशा प्रकारच्या तकारींचा निपटारा करण्यासाठी स्वतंत्र एआर आणि डीडीआर यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता आहे. एआर आणि डीडीआर यांना प्रशिक्षण सुध्दा मिळालेले नाही. तक्रार निकाली काढण्याची कालमर्यादा सुध्दा ठरवून देण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, सावकाराने जर तिसऱ्या व्यक्तीला जमिनी विकल्या असतील तर त्या जमिनी मुळ शेतकऱ्याला कशा परत मिळणार ? या अधिनियमाचा पूर्वलक्षी प्रभाव 30 वर्षाचा असण्याची आवश्यकता आहे. सन 2010 मधील सावकारी अधिनियमात या अधिवेशनात दुरुस्ती व्हावी अशा प्रकारची मागणी काही शेतकऱ्यांनी केलेली आहे. त्यामुळे या विषयाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सन 2010 मधील सावकारी अधिनियमात बदल करुन सावकाराकडे गेलेल्या जमिनी मुळ मालकाला परत मिळण्यासाठी कशी मदत करता येईल हे शासनाने पाहिले पाहिजे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

सभापती महोदय, मी जवळ जवळ 10 वर्षापासून शेतकऱ्यांमध्ये फिरत आहे. त्यामुळे मला स्वतःला असे वाटते की, आपण दर वेळेस शेतकऱ्यांना ही मदत करा, ती मदत करा अशी मागणी करीत असतो. परंतु शेतकऱ्याला शेती करण्यासाठी जी काही साधनसामुग्री लागत असते त्यामध्ये बी-बियाणे, खते, फवारणीची औषधे व बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शासनाच्या वतीने मदत मिळवून दिली तर शेतकऱ्याला चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळेल व त्यामुळे शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणार नाही.

सभापती महोदय, शेतकऱ्याला जी मदत लागते ती मदत हे शासन करीत नाही तर हे शासन विकास, विकास आणि विकासाचे गोजिरवाणे चित्र तयार करीत आहे. विकास करण्यासाठी हे शासन वाटेल ती रक्कम खर्च करण्यास तयार आहे. हे शासन बुलेट ट्रेनसाठी 58 हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. या बुलेट ट्रेनचा वापर किती लोक करणार आहेत ? आज मुंबईतील लोकलमध्ये रोज किती तरी लोक मरत आहेत, शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्याकडे हे शासन लक्ष ने देता बुलेट ट्रेनसाठी 58 हजार कोटी रुपये खर्च करीत आहे.

सभापती महोदय, माझे उत्पन्न महिन्याला 10 हजार रुपये असेल तर मी प्रथम जेवणाच्या सामुग्रीसाठी प्रायोरिटी देईन, मुलांच्या शिक्षणासाठी, कपडयालत्त्यासाठी प्रायोरिटी देईन व नंतर उरलेले पैसे चंगळवादासाठी खर्च करेन. परंतु हे सरकार शेतकरी मरत असताना बुलेट ट्रेन सुरु करीत आहे. हे सरकार कोणासाठी बुलेट ट्रेने सुरु करीत आहे, हे सरकार कोणासाठी एलबीटी रद्द करीत आहे, टोल कोणासाठी रद्द करीत आहे. ज्यांच्याकडे 15-20 लाखांच्या गाडया आहेत ते टोल सहज भरु शकतात. टोल किंवा एलबीटी माफ करु नका असे आम्ही म्हणत नाही. पहिल्यांदा मरत असलेल्या शेतकऱ्याला मदत केल्यानंतर मग तुम्ही टोल किंवा एलबीटी रद्द केला तरी चालेल.

सभापती महोदय, आज शेतकऱ्याच्या शेतात पाणी नाही, जनावरांना चारा नाही, त्याच्या मुलांना खाण्यासाठी काहीही नाही. शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर त्याच्या विधवा पत्नीला मोठया संकटाला तोंड द्यावे लागत असते. खरे म्हणजे मला विधवा शब्द सुध्दा नकोसा वाटतो. विधवा महिलेची स्थिती, तिच्या मुलींचे लग्न, कुटुंबाला काय खाऊ घालावयाचे अशी भयंकर स्थिती असताना आपण केवळ विकासाची भाषा करीत आहोत. ...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

सभापती महोदय, मला असे वाटते की, पुण्या-मुंबईचे जे सधन लोक आहे त्यांच्या करमणुकीवर शेतकऱ्यांसाठी अन्नदाता कर लावला पाहिजे. सिनेमाच्या तिकीटावर शेतकऱ्यासाठी 5-10 रुपये कर लावला तर हे लोक आनंदाने कर देतील. हॉटेलमध्ये जर 5-10 हजाराचे बिल होत असेल तर त्यावर 100 रुपये कर लावला तर ते लोक हा कर निश्चितच देतील. शासनाच्या तिजोरीत पैसा नसेल तर हा पैसा कसा उभा करता येईल याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आज एका एका सिनेमाचे आठवड्याचे उत्पन्न 100-100,200-200 कोटी रुपये असते. फिल्म इंडस्ट्रीने शेतकऱ्याला जगवायचे ठरवले तर ही फिल्म इंडस्ट्री शेतकऱ्याला जगवू शकते. आपल्याकडे पैसा नाही अशी परिस्थिती नाही तर आपल्याकडे शेतकऱ्याला मदत करण्याची इच्छाशक्ती नाही.

सभापती महोदय, आज संत्रा उत्पादक शेतकरी संत्र्याला भाव नसल्यामुळे संत्रा फेकून देत आहे. आंबा,डाळींब उत्पादकांची सुध्दा तीच परिस्थिती आहे. आज शेतकऱ्यांच्या कोणत्याही मालाला भाव नाही.

सभापती महोदय, स्वामीनाथन समितीने ज्या शिफारशी सूचविलेल्या आहेत त्या शिफारशींची हे शासन अंमलबजावणी करीत नाही. त्यामुळे मला असे वाटते की, शेतकऱ्याला केंद्र बिंदु ठेवून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कोटयावधी रुपये खर्च होणार असले तरी या शासनाने त्याला प्राधान्य दिले पाहिजे.

Q-1/.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

ती उभी करण्यासाठी सर्व प्रयत्न केले पाहिजेत. आपण सलग तीन-चार वर्षे असा कार्यक्रम राबविला तर आपणास निश्चितपणे यश येऊ शकते. त्यासाठी आपली इच्छा शक्ती पाहिजे. कर्जमाफी करणार नाही, शेतकरी मेला तरी चालेल, आम्ही फक्त जलयुक्त शिवार बांधलेले आहेत, त्यातून दोन-चार वर्षात काही तरी चमत्कार होईल,आमच्याकडे जादुची कांडी नाही, तुम्ही पंधरा वर्षे काय केले अशी उत्तरे कृपा करुन आम्हाला देऊ नका. आपण शेतकऱ्यांना वाचवावे, एवढेच मी सांगते आणि माझे भाषण पूर्ण करते.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गेल्या सात दिवसांपासून नागपूरनगरीमध्ये हिवाळी अधिवेशन सुरु आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विधानसभा आणि विधानपरिषदेचे कामकाज सलग तीन-चार दिवस तहकूब झाली,रणकंदन झाले, परंतु एवढे होऊनही शेतकऱ्यांना न्याय मिळालेला नाही. पूर्वी विरोधी पक्षामध्ये असणारी मंडळी आता सत्तेवर आली आहेत. लोकांच्या त्यांच्याकडून खूप मोठ्या अपेक्षा होत्या.परंतु त्यांनी लोकांच्या अपेक्षांचा भंग केलेला आहे.

सभापती महोदय, अलीकडेच केंद्रीय अर्थविषयक समितीने पिकांच्या आधारभूत किंमतीमध्ये वाढ केली पाहिजे असे सांगितले. आपण शेतकऱ्यांच्या मालाला भाव देत नाही. शेतकरी अडचणीत सापडलेला आहे त्याला मदत करीत नाही. विदर्भातील 63 जागांपैकी जवळपास 40 जागांवर आपणास जनतेने निवडून दिलेले आहे. तरी सुद्धा विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहे, ही शोकांतिका आहे. आज आधारभूत किंमतीपेक्षा उत्पादन खर्च वाढलेला आहे. आपण कापसाला 4 हजार 150 रुपये आधारभूत किंमत देतो परंतु त्याचा उत्पादन खर्च 6 हजार 505 रुपये आहे आणि प्रत्यक्षात आपण कापसाला 3 हजार 500 रुपये भाव देतो. ही तफावत प्रत्येक पिकाच्या बाबतीत आहे. आपणास कापूस, मूग, उडीद, तूर, सोयाबीन, या पिकांना हमीभाव द्यावा लागेल. शेतकऱ्यांना कर्जमाफी नको आहे. त्याला कर्जमुक्ती पाहिजे. त्यांची कर्जापासून मुक्ती झाली तर तो कधीच आत्महत्या करणार नाही.

सभापती महोदय, आपणा सर्वांना माहीत आहे की, नागपूरची संत्री जगामध्ये प्रसिद्ध आहे. या वर्षी संत्रा पिकाचे जास्त उत्पादन झालेले आहे. असे असतानाही शेतकरी हताश झालेला आहे. सत्तेमध्ये असणारी माणसे अगोदर नेहमी म्हणायची की, रोज संत्री खावी. आज संत्रा उत्पादक शेतकरी संकटात सापडलेला आहे. संत्री रस्त्यावर आली आहेत. या सरकारला संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचा विसर पडलेला आहे. त्यांच्या बालेकिल्ल्यामध्ये संत्री शेती संकटात सापडलेली आहे. आम्ही नापिकी समजू शकतो. परंतु संत्रा पिकाचे विक्रमी उत्पादन झाले असताना संत्रा पिकाला जो भाव मिळणे आवश्यक होते तो भाव मिळालेला नाही. आज संत्रा बाजारामध्ये मातीमोल झालेला

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

आहे. आज संत्रा बाजारामध्ये चार ते पाच किलो रुपयाने विकली जात आहेत. आपली संत्री परदेशात निर्यात केली जात होती त्या देशामध्ये चायना आणि अन्य देशातील संत्री निर्यात होत आहेत. विदर्भातील जवळपास दीड लाख क्षेत्रावर संत्रा पीक घेण्यात येते आणि यामध्ये कमीत कमी दीड हजार कोटी रुपयांची उलाढाल होते. आज कोणताही व्यापारी संत्रा विकत घेण्यासाठी पुढे येत नाही. त्यामुळे आज संत्री रस्त्यावर विकताना दिसत आहेत.

**उप सभापती :** सभागृहाची वेळ दुपारी 12.45 वाजेपर्यंत होती. मी सभागृहाची वेळ अर्धातास वाढवीत आहे. दुपारी 1.15 वाजता ही चर्चा संपेल.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, आपणास संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यायचा असेल तर संत्र्यावर प्रक्रिया करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करुन दिली पाहिजे. आपल्या येथून बांगला देशामध्ये संत्रा निर्यात होते. तेथे संत्र्याला 150 ते 200 रुपये भाव मिळत होता. परंतु बांगला देशाने आयात शुल्क वाढविल्यामुळे आपला संत्रा तेथे निर्यात होऊ श्कत नाही. येथील संत्र्याला तेथे बंदी घातलेली आहे. बांगला देशाने चीन, भूतान या देशांना आयात शुल्क माफ केलेले आहे. परंतु त्याठिकाणी भारताला आयात शुल्क द्यावे लागत आहे. आज संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत साप्डलेला असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना एकरी 20 ते 25 हजार रुपयांची मदत करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सोयाबीन पिकावर येला मोझॅईक नावाचा रोग आल्यामुळे विदर्भातील संपूर्ण सोयाबीन पीक नष्ट झाले आहे. विदर्भात मागील अकरा महिन्यांमध्ये 1 हजार 236 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. राज्याचे मुख्यंत्री, वित्त मंत्री आणि वीज मंत्री हे विदर्भातील असताना सुद्धा विदर्भातील शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झालेली नाही ही शरमेची बाब आहे.

सभापती महोदय, कालच एका मोर्चामध्ये एका शेतकऱ्याने विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्या शेतकऱ्याची प्रकृती चिंताजनक आहे. त्या शेतकऱ्याला पाहण्यासाठी माननीय मुख्यमंत्री गेले नाहीत, माननीय कृषी मंत्री गेले नाहीत. आपण विदर्भातील सुपुत्र असाल तर आपण विदर्भातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे.

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

सभापती महोदय, या सरकारने शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करुनच अधिवेशनाची सांगता करायची आहे. त्याशिवाय आम्ही आपणास जाऊ देणार नाही. आपणास शेतकऱ्यांसाठी काही ना काही घोषणा करावीच लागेल. या सरकारने राजीनामा द्यावा असे मी म्हणणार नाही. हे कॉर्पोरेट सरकार आहे. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी 72 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले होते. आपण देखील तशी हिम्मत दाखवावी. त्यांच्या काळात जे चांगले दिवस होते ते आता येणार नाहीत.

सभापती महोदय, मी जाता जाता एक छोटीशी कविता वाचून दाखवितो.

किसानों के बेहाल.

"अदानी अंबानी मलाई खाये,हमारा किसान भूखा सो जाये,
सावकार हो गए मालामाल,यह है मेरे मोदी का कमाल.
किसान के गले में फांसी का फंदा,जहर खरीदने किसान मांग रहा चंदा,
.किसान हो गया कर्ज से कंगाल, यह है मेरे मोदी का कमाल.
देवेंन्द्र, उध्दव इकठ्ठा आये, किसान को कर्ज माफी दिलाये,
किसान को कर्ज मुक्ति दिलाये,खडसे जी जरा ईमानदारी से वादा निभाये,
किसानों के हो रहे हाल, यह है मेरे मोदी का कमाल.
डान्सिंग बार आपको शुरु है करना,एलबीटी टोल टैक्स बंद है करना,
विदेश जाने से सरकारी तिजोरी हो गई कंगाल,यह है मेरे मोदी का कमाल.
महंगाई का पहाड़ बढ़ रहा है, गन्ना, सोयाबिन, संत्रा सड़ रहा है,
खरीद नहीं रहा कोई कपास और धान,नाटक कर रहा है कमल और बाण.
दूध के हो रहे भाव बेहाल,यह है मेरे मोदी का कमाल."

एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती स्मिता वाघ (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने मी केवळ चार बाबी सभागृहाच्या निदर्शनास आणून देणार आहे. महोदय, गेल्या चार वर्षांपासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होताना, महिला शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची फारच कमी उदाहरणे आहेत. कारण महिला या मुळातच सहनशील असतात. त्यामुळे त्या आत्महत्याकडे वळत नाहीत. घरातील कर्त्या पुरुषाने आत्महत्या केली तर ती महिला आपल्या कुटुंबाच्या मागे गंभीर आणि भक्कमपणे उभी राहते. ती आपल्या मुलांचा सांभाळ करते. त्यामुळे राज्य सरकारने महिलांना मॉरल सपोर्ट देण्याची आवश्यकता आहे, किंबहुना त्यांना मदतीचा हात देण्याची आवश्यकता आहे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कृषी सेवा केंद्रांच्या माध्यमातून खते आणि बी-बियाणे विकली जातात. जर त्या केंद्रांवर या वस्तूंचा तुटवडा पडला तर त्या ठिकाणी मारामाऱ्या होतात. अनेकदा भाव स्थिर नसल्यामुळे जास्त पैसे देऊन खते व बी-बियाणे खरेदी करावी लागतात. पूर्वी असे प्रकार व्हायचे. परंतु मी या सरकारचे खरोखरच अभिनंदन करते. या सरकारने पाच वर्षे खते आणि बी-बियाण्यांचे भाव स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे राज्यात खते आणि बी-बियाण्यांचे भाव स्थिर आहेत. तसेच राज्यातील शेतकऱ्यांना खते व बी-बियाण्यांचा मुबलक प्रमाणात पुरवठा केला जातो. ज्या ठिकाणी दुष्काळ आहे त्या ठिकाणी इतर प्रकल्पावर खर्च करण्यापेक्षा शेतीला लागून जे बंधारे आणि नद्या असतील त्यांचे खोलीकरण केले. तसेच त्यापासून दोन किलोमीटर अंतरावर बंधारे बांधले. या माध्यमातून कमी खर्चात मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध होऊ शकते. त्या बंधाऱ्यांना लागून असलेल्या विहिरींमध्ये बारमाही पाणी उपलब्ध झाले तर शेतकरी एक पिकाऐवजी दोन-तीन पिके घेऊ शकतील. परिणामी त्यांचे जीवनमान उंचावले जाऊ शकते.

सभापती महोदय, राज्य सरकारने 5 तारखेला कृषी मृदा दिन साजरा केला. कृषी मृदा दिनाच्या निमित्ताने 10 एकरच्या आतील जमिनीच्या मातीचे परीक्षण करण्यात आले. त्या शेतकऱ्यांनी कोणते खत आणि किती प्रमाणात वापरावे याचे मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांनी कोणत्या खताचे प्रमाण कमी केले पाहिजे आणि कोणत्या खताचे प्रमाण वाढविले पाहिजे याचा चार्ट

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती स्मिता वाघ....

शेतकऱ्यांना वितरित केला. मला वाटते की, याला जोडून एक बाब केली पाहिजे की, ज्या ठिकाणी दुष्काळ आहे त्या ठिकाणी कमी पाण्यावर येणाऱ्या शेत मालाचे उत्पादन घेतले तर कमी पाण्यात चांगल्या प्रकारचे उत्पादन घेता येऊ शकते. अशी पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त केल्यास त्याचा शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यास उपयोग होऊ शकतो, एवढेच या निमित्ताने सांगते.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानते व माझे भाषण संपविते.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराव वडकुते (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. आपण मला या प्रस्तावावर बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल सर्वप्रथम मी आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी दिल्याशिवाय सभागृहाचे कामकाज चालवू नये या मागणीवरुन आम्ही सभागृहाचे कामकाज होऊ दिले नाही. यासाठी आम्ही उपोषणास सुध्दा बसलो. परंतु तरी सुध्दा सरकारला पाझर फुटला नाही. मराठीत म्हण आहे की, "......लाजावे नाही तर पाहणाऱ्याने तरी लाजावे". म्हणून आम्ही लाजलो. शेतकऱ्यांच्या पदरात काही तरी पडले पाहिजे म्हणून आम्ही चर्चेला तयार झालो. मी नवीन आमदार आहे. चर्चेतून शेतकऱ्यांना काही तरी मिळेल असे वाटले होते. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांचे भाषण मी ऐकले. आम्हाला असे वाटले होते की, ते खरोखरच शेतकऱ्यांचे फार कैवारी आहेत. आघाडी सरकारच्या काळात शेतकऱ्यांच्या कापसाला अमुक इतका भाव मिळाला पाहिजे अशी ते वारंवार मागणी करीत होते. परंतु या प्रस्तावावरील त्यांचे भाषण ऐकल्यानंतर मला आश्चर्याचा धक्काच बसला. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांचे भाषण सुरु असताना सागितले की, आपण या समस्येतून मार्ग कसा काढावा या बाबत उपाययोजना सुचवा. महोदय, मी सांगू इच्छितो की, वारंवार अगोदरच्या सरकारने 50 वर्षे काय केले हे आता सांगता कामा नये. राज्यातील दुष्काळ हे निसर्गनिर्मित संकट आहे. प्रत्येक अधिवेशनात गेल्या 50 वर्षाच्या कामकाजाचा उल्लेख केला जातो. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी केलेले भाषण तरुण भारत या वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे. त्यांनी सांगितले आहे की, अगोदरच्या सरकारने गेल्या 50 वर्षात काय केले, आमचे सरकार येऊन एक वर्ष झाले आहे. एका वर्षात आमच्या सरकारकडून अपेक्षा करु नका. सभापती महोदय, किल्लारीला भूकंप झाला त्यावेळी माननीय श्री.शरद पवार साहेबांनी मागच्या किंवा पुढच्या सरकारने काय केले याचा विचार केला नाही. त्यामुळे समोर आलेल्या संकटावर मात करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत याचा विचार केला. राज्यात दुष्काळ पडलेला असताना आपण विनाकारण उणी-धुणी काढता कामा नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराव वडकुते....

सभापती महोदय, मी विद्यार्थीदशेत असताना 1971 मध्ये दुष्काळ पडला होता. त्यावेळी देशाची लोकसंख्या 40 कोटी होती. तरी सुध्दा देशात पुरेसे अन्नधान्य नव्हते. त्या काळात बाहेरुन अन्नधान्य आयात करावे लागले. परंतु आजची परिस्थिती बघितली तर आज आपला देश अन्नधान्याची निर्यात करीत आहे. एवढे मोठे काम माननीय श्री.शरद पवार साहेबांनी कृषी धोरणाच्या माध्यमातून केले आहे. तरी सुध्दा आपण सांगत आहात की, अगोदरच्या सरकारने काहीच केले नाही. भारतीय जनता पक्षाचे आमदार सांगतात की, सरकार आमच्या पक्षाचे असले तरी आम्ही माननीय श्री.शरद पवार साहेबांचा सल्ला ऐकतो. मी निदर्शनास आणून देतो की, माननीय श्री.शरद पवार साहेब केंद्रीय कृषी मंत्री असताना त्यांनी 71 हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले. मग आपल्याला शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात काय अडचण आहे ? कालच बातमी आली की, बुलेट ट्रेन सुरु करण्यासाठी 1 लाख कोटी रुपयांचे कर्ज काढण्यात येणार आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कर्ज घ्यावे लागले किंवा राज्याची तिजोरी खाली करावी लागली तरी चालेल, परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविल्या पाहिजे असे सांगितलेले आहे.

सभापती महोदय, मी धनगर समाजाचा आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, आपल्याला अहिल्यादेवीचा इतिहास आहे. संपूर्ण देशामध्ये नव्हे जगामध्ये अहिल्यादेवीने सांगितले की, राज्य सरकारने राज्यातील जनतेच्या हिताच्या दृष्टीने कारभार केला पाहिजे. अहिल्यादेवींनी स्वतःची वैयक्तिक तिजोरी लोकांच्या हितासाठी खाली केली होती. हा इतिहास आपण घेतला लक्षात पाहिजे. या ठिकाणी सांगण्यात आले की, 4 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री आहे. त्यांना सरकारी आकडा माहीत आहे. मागच्या 10 महिन्यात परभणी जिल्ह्यात 68 आत्महत्या झाल्या. 29 नोव्हेंबर, 2015 ते 5 डिसेंबर, 2015 या एका आठवड्यात 8 आत्महत्या झाल्या आहेत. सलग तीन वर्षांपासून मराठवाड्यात सातत्याने दुष्काळ पडत आहे. सन्माननीय मंत्री श्री.बबनराव लोणीकर यांच्या मेव्हण्याने केलेल्या आत्महत्येची चर्चा झाली. या बाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी खुलासा केला. त्यांनी सांगितले की, त्यांच्या आत्महत्येचे कारण वेगळे

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराव वडकुते....

होते. परंतु माननीय मंत्री श्री.बबनराव लोणीकर यांना माहीत असेल की, त्यांच्या मेव्हण्यावर जिंतूर बँकेचे 1 लाख रुपयांचे कर्ज होते.

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बोलताना माझ्या नावाचा उल्लेख केला आहे. त्यामुळे....

श्री.रामराव वडकुते : मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण आमच्या परभणी जिल्ह्यातील असल्यामुळे मी आपल्या नावाचा उल्लेख केला. मी आपल्यासोबत या विषयावर चर्चा केली आहे. राज्यातील एका माननीय मंत्र्याच्या मेव्हण्याने आत्महत्या करावयास नको होती. माननीय मंत्र्यांनी मला सांगितले की, त्यांच्या मेव्हण्याच्या आत्महत्येचे कारण वेगळे असू शकते. सभापती महोदय, पूर्वीच्या कालखंडात गावामध्ये भांडणे झाल्यास गावातील पंच गावातील भांडणे मिटवायचे. माननीय मंत्री श्री.बबनराव लोणीकर यांनी सांगितले की, माझ्या मेव्हण्याने घरातील भांडणामुळे आत्महत्या केली आहे. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, आपण घरातील भांडणे मिटवू शकत नसाल तर राज्यातील भांडणे कशी मिटविणार ? राज्यातील जनतेने काय म्हणून तुमच्या हातात सत्ता दिली आहे ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येता कामा नये. या ठिकाणी उल्लेख झाला की, माझ्या मेव्हण्याने दुष्काळामुळे आत्महत्या केली. मी सांगू इच्छितो की, माझ्या नातेवाईकाकडे 55 एकर जमीन आहे. त्यांना शेतीतून 22 लाखाचे उत्पादन झाले होते. मला वाटते सन्माननीय सदस्यांनी नेमके कोणत्या विषयात राजकारण करावे हे समजून घेतले पाहिजे. तसेच दुसरी गोष्ट अशी की, त्यांच्या गावात धरण आहे. त्या धरणात मुबलक पाणी उपलब्ध आहे. त्या गावातील विहिरीला 50 फुटावर पाणी आहे. माझ्या नातेवाईकाला 6 लाख रुपये किंमतीचे सोयाबीनचे पीक झालेले आहे. त्यांना 5 मुली आहेत. त्या सर्व मुलींच्या नाते मुदत ठेवी आहेत. तसेच पत्नीच्या नावे सुध्दा मुदत ठेव आहे. त्यामुळे दुष्काळ किंवा शेतीला कंटाळून त्यांनी आत्महत्या केली असे नाही. कौटुंबिक कारणांमुळे त्यांनी आत्महत्या केली असा मी खुलासा देखील केलेला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एखाद्या व्यक्तिगत प्रकरणाला राजकीय वळण देता कामा नये.

..एस..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामराव वडकुते : सभापती महोदय, मला यास राजकीय वळण देण्याची इच्छा नाही. जिंतूर बँकेचे त्यावर 71 लाख रूपयांचे कर्ज आहे अशी माझ्याकडे माहिती आहे. 50 लाख रूपयांचे उत्पन्न झाले असेल तर .... (अडथळा) ठीक आहे. मला मान्य आहे.

**उप सभापती** : आपण सभागृहाच्या कामकाजामध्ये या विषयांना घेत नाही.

श्री. रामराव वडकुते : सभापती महोदय, ठीक आहे. माझा त्याबद्दल काही वाद नाही. पण मी मराठवाड्यातील परिस्थितीच्या दृष्टीकोनातून सांगत होतो की, त्याकडे गंभीरपणे बघितले पाहिजे. (अडथळा) मी कर्जामुळे झालेले सांगितले आहे. आपल्याला माहीत असेल की, लातूर येथे ....

**उप सभापती** : सभागृहात एक विषय झाला आहे, तो वारंवार रिपिट करू नका. आपण जो प्रश्न विचारला, त्याचे माननीय मंत्र्यांनी एका प्रश्नाच्या वेळी उत्तर दिले होते. त्यावेळी मीही होतो. त्यामुळे इतक्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरू असताना ही चर्चा बंद करावी.

श्री. रामराव वडकुते : सभापती महोदय, ठीक आहे. मी त्यांची दिलगिरी व्यक्त करतो. पण जे घडले ते मी सांगितले होते. मी शेतकऱ्याच्या आत्महत्येच्या बाबतीत सांगितले. आज परिस्थिती पाहिली तर असे दिसेल की, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न फार मोठ्या प्रमाणात गंभीर झाला आहे. शेतकऱ्यांच्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आहे. आपण गोवंश हत्या बंदी केली आहे. भाकड जनावरांच्या बाबतीत शासनाचे नियोजन नाही. शेतकऱ्यांच्या भाकड जनावरांना देण्यास चारा नाही. चाऱ्याचे डेपो उघडलेले नाहीत. जनवरांच्या छावण्या देखील नाहीत. छावण्या उघडताना त्यामध्ये आमच्या शेळ्या-मेंढ्यांच्या छावण्यासुध्दा त्यामध्ये समाविष्ट करण्याची मी शासनाला विनंती करीत आहे. कारण शेळ्या-मेंढ्यांच्या चाऱ्याचा प्रश्न मोठा आहे. मराठवाड्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न फार मोठ्या प्रमाणात गंभीर झाला आहे. पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाकडे लक्ष दिले पाहिजे. अधिग्रहण करण्याच्या नियमात सुध्दा बदल करण्याची गरज आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. विहीर किंवा बोअर अधिग्रहित करावयाची असेल, लोकांना पाणी देण्यास सुरूवात केली तर पंचायत समितीचे सभापती, गट विकास अधिकारी काही महिन्याभर उशिरा जातात आणि



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामराव वडकुते ....

तेव्हापासून त्याला पैसे दिले जातात. त्यामुळे खेड्यातील लोकांना पिण्याचे पाणी सुध्दा मिळत नाही अशी परिस्थिती आहे. आपल्याला माहीत आहे की, मराठवाड्यात सोयाबीनसाठी एकर, दोन एकर सुध्दा ....

**उप सभापती** : मी तुम्हाला समज दिली आहे.

श्री. रामराव वडकुते : सभापती महादय, मी माझे भाषण दोन मिनिटांत पूर्ण करतो. अन्याय करू नये. मला दुष्काळावर बोलू द्यावे. आमची वाईट परिस्थिती आहे आमच्यावर सर्व ठिकाणी अन्याय होत आहे. आम्हाला काही उपाययोजना सांगू द्याव्यात. कापसाला भाव देण्याच्या दृष्टीने, शेतकऱ्याला पॅकेज देण्याच्या दृष्टीने विचार करावा. आज शेतकरी आत्महत्या करू लागला आहे. मात्र शासन पॅकेज सुध्दा जाहीर करीत नाही. कर्जमाफीची घोषणा करीत नाही. आपण दीर्घकालीन योजनेचा विचार करता, परंतु सध्या शेतकऱ्यांच्या पदरात काय पडणार आहे हे जाहीर करीत नाही. आपण हे जाहीर करावे. शेतकऱ्याला 25 हजार रूपयांचे पॅकेज द्यावे. सोयाबीन, कापूस, संत्री या उत्पादनाच्या शेतकऱ्यांना पॅकेज द्यावे. पिण्याच्या पाण्यासाठी नियोजन करावे. (अडथळा) ऊसाच्या एफआरपीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी कालच बैठक घेतली. सदर बाबतीतील निर्णय ते घेतील. माननीय मुख्यमंत्र्यांना एवढेच सांगतो की, धनगराच्या छावण्याच्या संदर्भात सुध्दा पहावे. (अडथळा) पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा. मी धनगर समाजाबाबत बोलत आहे. मुख्यमंत्री महोदय, आपण आपल्या पहिल्या कॅबिनेटमध्ये निर्णय घेतो असे सांगितले, पुन्हा 15 दिवसांत एर्जींना विचारतो असे सांगितले. काल नवीन फतवा काढला की, 3 टप्प्यांत त्याचे करणार आहे. त्या टीस कंपनीचा आणि 3 टप्प्यांचा मी जाहीर निषेध करतो. तुम्ही बोललेले शब्द पाळले पाहिजेत, ताबडतोब ते दिले पाहिजे म्हणजे आमच्या शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागतील. आपण कर्जमाफीचे धोरण लवकर जाहीर करावे, एवढे सांगून थांबतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष झांबड (औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मराठवाडा व विदर्भ येथील दुष्काळाच्या विषयावर नियम 260 अन्वये सुरू असलेल्या चर्चेत बोलण्याची मला संधी दिल्याबद्दल आपले धन्यवाद. मागच्या हिवाळी अधिवेशनात सुध्दा यावर चर्चा झाली. आता सुध्दा मागच्या आववड्यात फक्त शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली पाहिजे म्हणून 5 दिवस सदन चालले नाही. काल पुरवणी मागण्यांवर माननीय अर्थमंत्री उत्तर देत होते, त्यावेळी त्यांनी संगितले की, आम्ही शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार नाही. त्याकरिता उपाययोजना राबवू. विम्याच्या माध्यमातून योजना सांगितल्या, जलयुक्त शिवाराच्या माध्यमातून योजना सांगितल्या. अनेक योजना सरकारने हाती घेतल्या आहेत. परंतु आज जो शेतकरी संकटात सापडला आहे, दुष्काळी परिस्थितीमुळे आत्महत्या करत आहे, याबाबत कोणत्याही उपाययोजना सांगितल्या नाहीत. सदनात बरीच चर्चा झाली आहे. मालाच्या भावावर, दुष्काळावर, पाण्यावर चर्चा झाली आहे. शेतकरी असा व्यक्ती आहे की, जो स्वतःचे मॅनेजमेंट निसर्गाच्या भरवश्यावर करतो. शेतकरी आपले नियोजन निसर्गाकडे बघून, कोणती पेरणी करायची, कशी करायची याचे नियाजन करतो. परंतु तो शेवटी निसर्गावरच अवलंबून असतो. आजपर्यंत शेतकरी निसर्गासमोर कधीच हरला नाही. पण आज वेळ आलेली आहे. गेल्या 4 वर्षांपासून महाराष्ट्रात दुष्काळ भेडसावत आहे. सन 1972 च्या दुष्काळापेक्षा भयानक परिस्थिती गेल्या 4 वर्षांत आली. शेतकरी त्यासमोर हरला आहे. शेतकऱ्याला अशा वेळी सरकार मदत करत नसेल, कर्जमाफी करत नसेल तर दु:खाची गोष्ट आहे. निसर्गासमोर शेतकरी संपूर्णपणे हरला आहे. पाण्याच्या नियोजनाचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या समान पाणी वाटपाचा प्रश्न आहे. अनेक प्रश्न गांभीर्याने मराठवाड्यात भेडसावत आहेत. सन्माननीय सदस्यांनी सदनात जायकवाडीचा प्रश्न उपस्थित केला. जायकवाडीचे पाणी उत्तर महाराष्ट्रातून अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातून येते, ते पाणी सोडण्याकरिता मराठवाडा, नाशिक व अहमदनगर असा वाद उभा राहिला आहे. पिण्याच्या पाण्याकरिता जायकवाडीचे पाणी सोडण्यात आले पाहिजे. पाणी किती पाहिजे याची फक्त मागणी झाली पाहिजे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, जायकवाडी धरण हे फक्त पिण्याच्या पाण्याकरिता झालेले नाही. हे धरण शेतकऱ्यांकरिता झाले आहे. शेतकऱ्यांच्या पाण्याच्या

..4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष झांबड ....

प्रश्नाकरिता झाले आहे. कोर्टात महाराष्ट्र शासनाने ॲफिडेव्हिट दिले. 12.84 टीएमसी पाणी सोडण्याचा प्रश्न आला, त्यावेळी हे पाणी फक्त पिण्याकरिता सोडण्यात येत आहे असे शासनाने कोर्टात ॲफिडेव्हिट दिले. मला निदर्शनास आणून द्यायचे आहे की, धरण होताना शेतकऱ्यांच्या पाण्याच्या प्रश्नाकरिता झाले आहे. आज 12.84 टीएमसी पाणी सोडण्याकरिता पिण्याचे पाणी म्हणून ॲफिडेव्हिट दिले आहे. आज त्यावर निगराणी ठेवली जात आहे. सरकारच्या माध्यमातून कोणता शेतकरी आपल्या मालाकरिता पाणी वापरतो काय हे पाहिले जावून त्यांचे विजेचे कनेक्शन बंद केले जाणार आहे, मोटारी बंद केल्या जात आहेत. 12.84 टीएमसी पाण्यामध्ये फक्त जायकवाडीमध्ये 7 टीएमसी पाणी आले आणि त्यावर सुध्दा तो वादंग आहे. बिअरच्या कारखान्याला लाखो लिटर पाणी दिले जाते. पिण्याच्या पाण्याला 10 टक्के वापर होत असेल तर 90 टक्के बीअर व दारूच्या फॅक्टरकरिता पाण्याचा उपयोग होतो. शेतकरी वंचित राहिला आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी धरणामध्ये गेल्या आहेत. मात्र शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही, ही परिस्थिती मराठवाड्याची झाली आहे. मराठवाड्यावर किती दिवस अन्याय चालणार आहे ? मराठवाड्यातील हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. परंतु मराठवाड्याला न्याय देण्याचे काम होत नाही. सरकार न्याय देत नाही असे मी म्हणत नाही. मराठवाड्यावर कायमस्वरूपी अन्याय झाला आहे, याला वाचा फोडण्याचे काम मराठवाड्यातील प्रत्येक आमदार पोटतिडकीने बाजू मांडून करत आहे. मात्र आजपर्यंत न्याय मिळत नाही या गोष्टीचा खेद, दु:ख वाटते. जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून मराठवाड्यात कामे सुरू आहेत. पेपरमध्ये मोठ्या बातम्या येत आहेत की, जलयुक्त शिवार योजनेच्या कामांमध्ये भ्रष्टाचर झाला आहे, निकृष्ठ दर्जाची कामे होत आहेत. शासनाच्या माध्यमातून ही सर्व कामे सुरु करण्यात आल्याबद्दल खरे धन्यवाद देईन. मराठवाड्यातील छोट्या-मोठ्या नद्या, नाले यांचे खोलीकरण व रुंदीकरण करून त्यावर जलयुक्त शिवार योजनेचे काम झाले पाहिजे. त्यामुळे मराठवाड्याच्या सिंचनाचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागू शकतो. मराठवाड्यात कोल्हापूरी बंधारे झाले आहेत.

....T

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष झांबड..........

सभापती महोदय, राज्य शासनामार्फत के.टी.वेअर बंधारे बांधण्यात आले आहेत. परंतु, त्यावर गेट लावलेले नाहीत. त्या ठिकाणी हायड्रोलिक गेट बसवून नदीकडच्या भागाची खोली आणि रुंदी वाढविली तर जलसिंचनाचा प्रश्न मार्गी लागू शकेल. यादृष्टीने शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, दुष्काळावर कायमस्वरुपी मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले असले तरी या माध्यमातून शेतकऱ्यांना भविष्यात मदत होणार आहे. आज शेतकऱ्याची परिस्थिती काय आहे ? आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत व त्यांना वाचविण्याची जबाबदारी शासनाची आहे. आपल्या माध्यमातून मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करु इच्छितो की, आपण कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचा प्रयत्न करीत असला तरी आजच्या परिस्थितीत शेतकऱ्याला वाचविण्याचे काम आपण केले पाहिजे आणि त्यासाठी संपूर्ण कर्जमाफी दिली पाहिजे.

सभापती महोदय, मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यात वैजापूर तालुका आहे. मी या तालुक्याचा रहिवासी आहे. रामकृष्ण गोदावरी योजना शासनाने शेतकऱ्यांसाठी राबविली. परंतु, गेल्या 15 वर्षांपासून ती बंद आहे. ही योजना कर्जबाजारी झाली आहे. या संदर्भात सरकारकडे प्रस्ताव देण्यात आला आहे. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करुन ही योजना जलसंपदा विभागाने हातात घ्यावी, ती सुरु करावी आणि शेतकऱ्यांना पाणी द्यावे, अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, अनेक प्रश्न आहेत. परंतु, वेळेअभावी मी माझे भाषण पूर्ण करीत आहे.

--------------

...2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये दुष्काळी परिस्थितीबाबत सत्तारूढ पक्षाव्दारा आणि विरोधी पक्षाव्दारा उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेत सहभागी होण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपण मला या चर्चेत सहभागी होण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, कृषी क्षेत्राला उद्योगाचा दर्जा दिला पाहिजे, अशी पहिली मागणी मी या निमित्ताने करीत आहे. उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या मालाचा भाव ठरविता येत नाही आणि त्यामुळे दुष्काळाशी सामनाही करता येत नाही. शासनाने कृषीला उद्योगाचा दर्जा दिल्यास यामधून मार्ग निघू शकेल.

सभापती महोदय, कृषी पंपांना चोवीस तास वीज मिळाली पाहिजे, ही माझी दुसरी मागणी आहे. शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले पाहिजे, अशी तिसरी मागणी असून कापसाला 8 हजार रुपये, धानाला 3500 रुपये, संत्र्याला 30 हजार रुपये भाव दिला पाहिजे, अशी शेवटची मागणी करतो, आपले आभार मानतो आणि थांबतो.

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3....

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, दुष्काळी परिस्थिती बाबत सत्तारुढ आणि विरोधी पक्षाने दिलेल्या नियम 260 अन्वयेच्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. मला केवळ मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थित एक सूचना करावयाची आहे.

सभापती महोदय, दुष्काळी परिस्थितीबाबत सभागृहात सर्वंकष चर्चा झालेली आहे. आज मराठवाड्यात भीषण दुष्काळ आहे. त्या ठिकाणी सिंचनाचे तर सोडूनच द्या परंतु पिण्याचे पाणी देखील नाही. त्यामुळे तेथील लोक ठाणे, मुंबई या शहरांमध्ये रोजगारासाठी येत आहेत. या शहरांमधील बांधकाम व्यवसायाची किंवा अन्य उद्योगांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. आज या व्यवसायातही मोठ्या प्रमाणावर नोकर कपात होत आहे. आज मराठवाड्यातील लोक नोकरीसाठी, कामधंद्यासाठी या शहरांकडे धाव घेत आहेत. परंतु, या उद्योगांची सध्याची स्थिती लक्षात घेता कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती या शहरांमध्ये निर्माण होऊ शकते, हे मी या चर्चेच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

सभापती महोदय, आपण मला एक सूचना मांडण्याची परवानगी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि थांबतो.

------------

**उप सभापती :** आता सभागृहाची विशेष बैठक मी स्थगित करीत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.30 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.14 ते दुपारी 1.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...U-1.......

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**कै.शरद जोशी यांना श्रद्धांजली अर्पण करण्याबाबत**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यात दु:खद घटना घडलेली आहे. शेतकऱ्यांचे नेते कै.शरद जोशी यांचे निधन झाले आहे. मला जाणीव आहे की, या सभागृहाचे सदस्य असतील, राज्यपाल असतील किंवा पंतप्रधान असतील तरच त्यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहात शोक प्रस्ताव मांडण्यात येतो, असा नियम आहे. परंतु, माझ्याकडे यादी आहे. आपण अपवादात्मक दृष्टीकोनातून अनेक थोर व्यक्ती, उद्योगपतींच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केलेली आहे. माझी आग्रहाची विनंती आहे की, आजचे कामकाज सुरु होण्यापूर्वी आपण कै.शरद जोशी यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्याची परवानगी द्यावी. माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय गटनेत्यांना माझी विनंती आहे की, ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शेतकऱ्यांसाठी आणि शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव मिळावा यासाठी वेचले त्यांना या सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. आजचे कामकाज सुरु होण्यापूर्वी आपण कै.शरद जोशी यांना श्रद्धांजली वाहण्याची परवानगी द्यावी, अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, शेतकऱ्यांचे नेते, ज्यांनी संपूर्ण देशातील शेतकऱ्यांना शेती मालाच्या भावासाठी संघर्ष करावयास शिकविले आणि फक्त संघर्षच नाही तर त्या संघर्षातून त्यांनी शेतकऱ्यांना बरेच काही मिळून दिले ते शेतकऱ्यांचे नेते कै.शरद जोशी आज आपल्यात नाहीत. त्यांचे 4 दिवसांपूर्वी दु:खद निधन झाले आहे. काल पुणे येथे त्यांचा अंत्यविधी झाला. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी त्यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहात शोक प्रस्ताव मांडण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे. कै.शरद जोशी यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात यावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : शोक प्रस्ताव आता सुरु करावयाचा का मी त्यासाठी वेळ ठरवून देऊ.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी कै.शरद जोशी यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करावी, अशी विनंती केलेली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना शोक प्रस्तावावर बोलावयाचे आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, काल आपल्या दालनात आमची चर्चा सुरु होती. कै.शरद जोशी यांच्या निधनाची बातमी आल्यानंतर त्यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करावी असा विचार माझ्या मनात आला. आपण शोक प्रस्तावाबाबत नियम तयार केलेले आहेत. परंतु, आपण नेहमी असे मानतो की, नियमासाठी माणसे नाहीत, माणसांसाठी नियम आहेत. आपण अनेक वेळा अपवाद करुन विविध मान्यवर व्यक्तींना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केलेली आहे. सेनापती बापट, गोळवलकर गुरुजी, अरुणा असफअली, मदर तेरेसा, ऊषा मेहता त्याच बरोबर साहित्यिक विजय तेंडुलकर, निरुपणकार नाना धर्माधिकारी अशा अनेक महान व्यक्तींना आपण सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केलेली आहे. एका बाजूला शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत आणि राज्यात शेती मालाच्या प्रश्नाच्या आंदोलनातून राजकारणातील आणि समाजकारणातील अनेक पिढ्या घडलेल्या आहेत. आपल्याला तांत्रिक दृष्ट्या एखादे व्यक्तिमत्व, नेतृत्व म्हणून कै.शरद जोशी यांची गणना करता येणार नाही. त्यांनी एक वेगळ्या प्रकारचे वैचारीक वळण देखील त्या विचाराला दिलेले आहे.

सभापती महोदय, माझी अशी सूचना आहे की, अशा दु:खद घटना घडल्यानंतर आपल्या समोर अधिवेशन काळात अशा प्रकारचा पेच प्रसंग निर्माण होतो आणि त्या संदर्भातील नियम काय आहेत यावर आपण चर्चा करतो. आज कामकाज सल्लागार समितीची बैठक होणार आहे. माझी अशी सूचना आहे की, कामकाज सल्लागार समितीची बैठक होण्यापूर्वी ज्यावेळी अशी दुर्दैवी घटना घडलेली असते त्यावेळी माननीय सभापती आणि माननीय अध्यक्षांनी 6-7 तासात किंवा त्या दिवसभरात चर्चा करण्याचा औपचारीक नाही, परंतु अनौपचारीक प्रघात ठरवून दिला तर या संदर्भात वेळेवर निर्णय होऊ शकतील, असे मला वाटते. कै.शरद जोशी यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करावी, अशी माझी सूचना आहे.

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, शेतकऱ्यांचे नेते कै.शरद जोशी यांच्या योगदानाची महाराष्ट्रातील आणि देशातील शेतकऱ्यांना जाणीव आहे. कै.शरद जोशी यांनी शेतकऱ्यांना संघटित केले नसते तर शेतकऱ्यांकडून जो संयुक्तपणे लढा उभारला जातो तो आज आपल्या दृष्टीक्षेपात आला नसता. कै.शरद जोशी यांचे या संदर्भात खूप मोठे योगदान आहे. त्यांच्या दु:खद निधनानंतर त्यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. या संदर्भात परंपरा आहेत, नियम आहेत, हे सर्व ठीक आहे. आपण यापूर्वी देखील अपवाद केलेले आहेत. आपण 61 महान व्यक्तींना ते सभागृहाचे सदस्य नसतांना त्यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली वाहिलेली आहे. आपण कै.शरद जोशी यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, आदरणीय शेतकऱ्यांचे नेते कै.शरद जोशी यांनी शेतकऱ्यांच्या शेती मालाला भाव द्यावा म्हणून देशात पहिले आंदोलन उभे केले. माझी आपल्याला विनंती आहे की, कै.शरद जोशी यांच्या नावाने इयत्ता 5 वी ते 10 वीच्या पाठ्यपुस्तकात त्यांचा इतिहास लिहिला गेला तर खूप चांगले होईल.

**सभापती** : ज्यावेळी शोक प्रस्तावावर चर्चा होईल त्यावेळी आपण या संदर्भात बोलावे. मी सभागृहाच्या भावना ऐकून घेतलेल्या आहेत. माझ्याही मनात हाच विषय होता.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन कै.शरद जोशी यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहात शोक प्रस्ताव मांडावा.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, शेतकऱ्यांचे नेते कै.शरद जोशी यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्याबाबत सभागृहात चर्चा सुरु आहे. शासनाच्या वतीने काल मी त्यांच्या अंत्यविधीला गेलो होतो. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार, माननीय मंत्री श्री.विनोद तावडे साहेब माझ्या बरोबर होते. सन्मानीय सदस्यांनी कै.शरद जोशी यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करावी, असा विषय उपस्थित केलेला आहे. आपण प्रथा, परंपरेनुसार, परंतु, काही वेळा अपवादही केलेले आहेत. ती उदाहरणे देखील आपल्यासमोर आहेत. मला असे वाटते

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष बापट.......

की, त्यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करावयाची म्हटली तर ते दोन्ही सभागृहात झाले पाहिजे. आज कामकाज सल्लागार समितीची बैठक होणार आहे. आपण सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन त्या बैठकीत चर्चा करुन या संदर्भात योग्य तो निर्णय घेऊ.

**सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, याला प्रोप्रायटी केव्हा असते तर अशी घटना घडल्यानंतर त्यांना लवकर श्रद्धांजली अर्पण केली तर ते जास्त योग्य होते. मला असे वाटते की, आपल्याकडे प्रिसिडन्स आहेत की, ते सभागृहाचे सदस्य नसताना देखील आपण त्यांच्या निधनाबद्दल त्यांना सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केलेली आहे, नाही अशातला भाग नाही. परंतु, यासाठी कामकाज सल्लागार समितीची बैठक होण्याची वाट न बघता आपणच या संदर्भात निर्णय घ्यावा. मला स्वत:ला असे वाटते की, आपण प्रश्नोत्तरे झाल्यानंतर शोक प्रस्ताव घ्यावा.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, आपण असे करु की, कै.शरद जोशी यांच्या दु:खद निधनाबद्दल ज्यावेळी विधानपरिषदेत शोक प्रस्ताव मांडण्यात येईल त्याच वेळी विधान सभेत झाले तर ते जास्त योग्य होईल.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सभागृहाने या संदर्भात आपल्या भावना केलेल्या असल्यामुळे कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीचा विषय येत नाही. आपण या संदर्भात वेळ निश्चित करावी आणि त्या प्रमाणे शोक प्रस्ताव मांडण्यात यावा.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी तसे विधान सभेला कळवावे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, शासनातर्फे आमचा त्याला विरोधी नाही. ही चांगली सूचना आहे. आम्ही त्याचे स्वागतच करतो. आपण या संदर्भात वेळ निश्चित करावी.

**सभापती** : ठीक आहे. शासनाने या संदर्भात भूमिका मांडलेली आहे. फक्त वेळेचे नियोजन एवढाच विषय आहे. प्रश्नोत्तरे आणि लेईंग डाऊन झाल्यानंतर आपण सभागृहाच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करु. माझी आपणा सर्वांना विनंती आहे की, आपण वेळेची मर्यादा पाळावी आणि शोक प्रस्तावावर फक्त गट नेत्यांनीच बोलावे.

-------

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**पुणे शहराला स्वतंत्रपणे स्मार्ट सिटीचा दर्जा देण्याच्या मागणीबाबत**

**(1)** * **११२१९ श्री.अनंत गाडगीळळःळ** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) केंद्र शासनाने देशातील १०० शहरे स्मार्ट सिटी योजनेत समावेश करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेसाठी राज्य शासनाने मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक, पुणे-पिंपरी-चिंचवड, अमरावती, नागपूर, सोलापूर आणि औरंगाबाद या दहा शहरांची निवड केली आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, शासनाने पुणे व पिंपरी-चिंचवड शहराची एकत्रित शिफारस केली असून हा पुणेकरांवर अन्याय आहे, त्यामुळे पुणे शहराला स्वतंत्रपणे स्मार्ट सिटीचा दर्जा द्यावा अशी मागणी एका राजकीय पक्षाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, या मागणीनुसार शासनाने पुण्याला स्मार्ट सिटीचा दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.रणजित पाटील, श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.
(2) होय, हे खरे आहे.
(3), (4) व (५) राज्य शासनाकडून घोषित करण्यात आलेल्या राज्यातील १० संभाव्य स्मार्ट शहरांच्या यादीमध्ये पुणे शहराचा समावेश आहे.

त्यानुसार, पुणे महानगरपालिकेचा स्मार्ट सिटी प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत माझ्या पहिल्या क्रमांकाचा प्रश्न आहे. पुणे महानगरपालिकेच्या 9 तारखेच्या बैठकीत पुण्याच्या स्मार्ट सिटीकरिता 3,500 कोटी रुपये निश्चित करण्यात आले होते. परंतु, 14 तारखेला ती रक्कम साधारणत: 3 हजार कोटी रुपयांवर आली.

..V-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11219...

श्री.अनंत गाडगीळ...

पाच दिवसात 500 कोटी रुपये कमी कसे व कशाकरिता झाले आहेत. दुसरा प्रश्न असा आहे की, केंद्र शासन 500 कोटी रुपये देणार, राज्य शासन 250 कोटी रुपये देणार व महानगरपालिका 250 कोटी रुपये देणार आहे. उरलेल्या खर्चासाठी एसपीव्ही नेमण्यात येणार आहे, एसपीव्हीला युटीलिटी टॅक्स घेण्याचा अधिकार देऊन सर्व सामान्य माणसावर कर लावून तो निधी वसूल करण्यात येणार आहे काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, महानगरपालिकेच्या सभेमध्ये अटी घालून एसव्हीपीला मान्यता देण्यात आली आहे. या अटी स्वीकारल्या गेल्या नाहीत तर पुणे ही स्मार्ट सीटी होणार आहे काय ? तसेच शेवटचा प्रन असा आहे की, स्मार्ट सीटी यशस्वी करण्याकरिता प्रोत्साहन मिळावे म्हणून स्मार्ट मंत्री अशी योजना हे सरकार आखत आहे हे खरे आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सदर प्रश्न वाचल्यावर मला असे अभिप्रेत होते की, या प्रश्नामधून पुणे, पिंपरी-चिंचवड यांचे ॲगलोमरेशन करुन जो प्रस्ताव गेला होता त्याच्यामुळे पुणेकरांवर अन्याय होईल म्हणून हे ॲगलोमरेशन न करता केवळ पुण्यासाठी स्मार्ट सीटी करावी असे या प्रश्नातून अभिप्रेत होत आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी जे प्रश्न विचारले त्या सर्वांना मिळून असे उत्तर देता येईल की, एसपीव्हीबाबत अगोदर देखील काही योजना राबविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये जेएनएनयुआरएम मधून ज्या योजना राबविल्या त्या देखील एसपीव्हीच्या माध्यमातून मागील काळात राबविण्यात आल्या आहेत. हा प्रकल्प महानगरपालिकेच्या स्तरावर करावयाचा आहे. सदर प्रकल्प पुणे महानगरपालिकेला निश्चित करावयाचा आहे. त्यानुसार ते एसपीव्हीबाबत जे धोरण आखतील, त्यांनी कसे काम करायला पाहिजे. आर्थिकदृष्ट्या सक्षम असेल तर एसपीव्हीची कार्यवाही न करता पुणे महानगरपलिकेवर किंवा तेथील घटनात्मक जनरल बॉडीवर कोणतीही गदा येणार नाही. आपण एसपीव्हीचे किती इन्व्हॉलमेंट घेतो, स्टेक किती घेतो, त्यानुसार पुढील कामे ठरणार आहेत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी एसपीव्हीबाबत सांगितले आहे. जेएनएनयुआरएम योजना महानगरपालिकेने राबविली आहे. एसपीव्ही कंपनीने राबविली नाही. माझा प्रश्न असा आहे की, 74 व्या घटना दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचे

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11219...

श्री.शरद रणपिसे...

अधिकार अबाधित रहावे असे राज्य घटनेने ठरविले आहे. त्याला अनुसरुन माझा प्रश्न असा आहे की, एसपीव्ही कंपनीचे अध्यक्ष महापौर असावेत, अशी उप सूचना पुणे महानगरपालिकेने प्रस्ताव पाठविताना केली आहे. त्याचप्रमाणे कर्ज काढतांना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची परवानगी घ्यावी. कारण एसपीव्ही कंपनी कोट्यावधी रुपयांचे कर्ज काढेल, महानगरपालिकेला सांगेल की, हे कर्ज तुम्ही फेडा. त्यामुळे महानगरपालिकेची स्वायतत्ता राहणार नाही. त्यामुळे माझा पॉईंटेड प्रश्न असा आहे की, महानगरपालिकेची स्वायतत्ता राहण्यासाठी एसपीव्ही कंपनीचे अध्यक्ष महापौर असावे, अशी उप सूचना देण्यात आलेली आहे, तसेच कर्ज काढतांना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची परवानगी घ्यावी, ती उप सूचना राज्य सरकार केंद्र सरकारकडे पाठविणार आहे काय ? कारण हा विषय केंद्र शासनाचा आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, कोणत्याही परिस्थितीत एसपीव्ही कंपनीमध्ये जे लोकप्रतिनिधी असतील ते इतर अधिकारी किंवा सदस्यापेक्षा बहुमताचे राहतील याबाबतची उप सूचना महानगरपालिकेने दिलेली आहे. याबाबत राज्य सरकारची भूमिका आपण विशद करावी. केंद्र शासनाची मान्यता असेल तर राज्य सरकार याबाबत शिफारस करणार काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मघाशी राज्यमंत्री महोदयांनी उत्तर देतांना एक बाब आपल्या समोर मांडली आहे. एसपीव्ही हे जेएनएनयुआरएममध्ये होते. मी आपणाला त्याचे उदाहरण सांगतो, जेएनएनयुआरएमच्या अंतर्गत (..अडथळा...) माझे म्हणणे आपण ऐकून घ्यावे मी चुकीचे रेकॉर्डवर कधीच बोलत नाही. 24x7 पाणी पुरवठ्याच्या ज्या योजना मंजूर झाल्या त्यामध्ये एसपीव्ही करायची अट होती. सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक या ठिकाणी आहेत. तशीच एसपीव्ही नागपूर महानगरपालिकेने केली होती, त्यावेळी युपीएचे केंद्र सरकार होते, त्या सरकारने महानगरपालिकेला अवॉर्ड दिले होते. एवढेच नव्हे तर या मॉडेलवर इतर महानगरपालिकांनी एसपीव्ही तयार करुन 24x7 पाणी पुरवठ्याची योजना तयार करावी असे केंद्र सरकारने इतर

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महानगरपालिकांना सुचविले होते. काही महागरनपालिकांनी एसपीव्ही तयार केली होती. मी सभागृहाच्या माध्यमातून आपले आणि सर्व जनतेचा संभ्रम दूर करतो की, एसपीव्ही म्हणजे बाहेरची कंपनी नाही. ही राज्य व केंद्र शासनाची एसपीव्ही नाही. ही एसपीव्ही म्हणजे महानगरपालिकेचे स्पेशल परपज व्हेईकल आहे. त्यामुळे ते तयार करण्याचे सर्व अधिकार हे महानगरपालिकेचेच आहेत. मी विधानसभेत देखील सांगितले व येथे देखील आश्वासित करु इच्छितो की, राज्य व केंद्र सरकारला कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही महानगरपालिकेच्या स्वायत्तेवर घाला आणायचा नाही. जेएनएनयुआरएम मध्ये एसपीव्हीचे तत्व स्वीकारण्यात आले होते. मुळात महानगरपालिकांची विकास कामांवर पैसे गुंतविण्याची क्षमता कमी असते. ज्यावेळी महानगरपालिका कर्ज उभारतात त्यावेळी त्यांच्या फिस्कल बॅलन्सच्या आधारावर त्यांना कर्ज मिळते. त्यामुळे त्यांना स्वस्त दराने कर्ज मिळू शकत नाही. त्यांचे रेटिंग खाली येते, कारण इतर सर्व दायित्व त्यांच्याकडे असतात. ज्यावेळी आपण महानगरपालिकेच्या अंतर्गत एसपीव्ही तयार करतो व त्यामध्ये इक्विटी टाकतो, ती इक्विटी टाकल्यामुळे त्याला लॅन्ड मॉनेटाईज करता येते, त्यामध्ये इक्विटी असते, त्याच्यावर इतर गोष्टींचा बोजा महानगरपालिकांच्या दायित्वाचा आहे, तो नसल्यामुळे त्या प्रोजेक्टपुरते त्यांना कमी दराने पैसा उभारता येतो. आज अनेक देश देखील लो-कॉस्ट इन्व्हेस्टमेंट करण्यास तयार आहेत, हे इन्व्हेस्टमेंट करण्यासाठी एसपीव्हीला एक लिव्हरेजिंग मिळते. कारण त्यांचे रेटिंग हाय असते. एवढ्याचसाठी एसपीव्हीचा रुट स्वीकारण्यात आलेला आहे. हा नवीन रुट नाही. मागच्या काळात देखील हा रुट स्वीकारला होता. मी पुन्हा एकदा विश्वास देतो की, ज्या महानगरपालिकांनी ठराव केले आहेत ते सर्व राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविले आहेत. त्यामुळे महानगरपालिकांच्या कोणत्याही अधिकारावर राज्य सरकारला घाला घालावयाचा नाही. मला या निमित्ताने एक गोष्ट सांगावयाची आहे की, प्रत्येक शहरात महानगरपलिकांनी चार ते पाच लाख लोकांना एंगेज केले होते, यातील पहिला टप्पा असा होता की, महानगरपालिकांनी सिटीझन एंगेजमेंट करावयाची व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) V-4

VVK/ AKN/ ST/ 13:40

ता.प्र.क्र.11219...

श्री.देवेंद्र फडणवीस....

त्यामधून कोणती कामे पहिली घेतली पाहिजे याबाबत प्राधान्यक्रम ठरवायचा. त्यानुसार प्रत्येक महानगरपालिकेने ते केले आहे. यासाठी पाच-पाच लोकांनी कन्सल्टेशनमध्ये भाग घेतला आहे. त्यामुळे जसे नगरसेवक हे स्टेक होल्डर आहेत, तसेय बिगर स्टेक होल्डर जनता देखील आहे. ही योजना सर्वांना सोबत घेऊन करावी लागणार आहे. राज्य सरकारचे स्पष्ट मत आहे की, यासंदर्भात महानगरपालिकांनी ज्या सूचना दिलेल्या आहेत, त्याचा राज्य सरकार गांभीर्याने विचार करणार आहे. त्याबाबत केंद्र सरकारकडे काही कळविण्याची आवश्यकता असेल तर तसे कळविण्यात येईल. त्यासंदर्भातील ठराव आम्ही ऑलरेडी पाठविले आहेत.

....W-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11219....

श्री.देवेंद्र फडणवीस......

ठराव आम्ही ऑलरेडी पाठविला आहे. या पलीकडे सर्व पक्षीय नेत्यांसोबत मी स्वत: बैठक घेणार आहे. त्या बैठकीमध्ये काही कन्क्ल्यूझन्स असतील, अडचणी असतील त्यावर विचार करु. शेवटी तुम्हालाही विकास करायचा आहे आणि आम्हालाही विकास करायचा आहे. त्यामुळे सगळ्याच व्यवहार्य सूचना आहेत त्या सूचना आम्ही निश्चितपणे त्यामध्ये समाविष्ट करु. या ज्या काही स्मार्ट सिटी करावयाच्या आहेत ते प्रपोजल पुढे नेऊ.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, स्मार्ट सिटीबद्दलचा हा प्रश्न आहे. त्यामध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराचा उल्लेख आहे. स्मार्ट सिटीबद्दल अनेक उपसूचना आलेल्या आहेत. त्याबद्दल गट नेत्यांसोबत बैठक घेऊन चर्चा करण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. प्रश्न असा आहे की, ज्या उपसूचना महापालिकेने केलेल्या आहेत त्या आपण केंद्र सरकारकडे पाठविल्या आणि केंद्र सरकारने त्या उपसूचना स्वीकारु शकत नाही, आहे त्या स्वरुपात स्वीकार करावा लागेल असे सांगितले तर केंद्र सरकारकडे महापालिकेची बाजू मांडण्यासाठी वाव आहे का? जर उपसूचना ओव्हररुल केल्या तर प्रश्न संपुष्टात येऊ शकतो. उपसूचना केराच्या टोपलीत जातील.

सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड भागाचे प्रतिनिधी या सभागृहात नाहीत. तेथील नागरिकांची अपेक्षा होती की, स्मार्ट सिटीमध्ये पिंपरी-चिंचवडचा समावेश व्हावा. माननीय मुख्यमंत्र्यांनी पुण्याबद्दलचे अनेक निर्णय योग्यप्रकारे घेतले आहेत. कोणत्या टप्प्यावर आयुक्तांनी कशाप्रकारे लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यायचे याबाबत ग्रे एरिया किंवा खूप धुसरता आहे. एसपीव्हीकडून योग्य पध्दतीने काम झाले नाही तर दोन वर्षानी त्यात आणखी काही बदल करण्याचा वाव असला पाहिजे. अन्यथा त्याबद्दलचे उत्तरदायित्व घेतले जात नाही. माननीय मुख्यमंत्री जरुर गटनेत्यांची बैठक घेतील. पालकमंत्री बैठक घेत असतात. प्रत्यक्ष महापालिका आयुक्त काय करतात हे कोणाला कळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. आमदार, गटनेते यांना सहभागी करुन किमान सहा महिन्यातून एकदा याबद्दल नियमित आढावा घेतला जाईल काय?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, ज्या वेगवेगळया उपसूचना आल्या आहेत त्या संदर्भात निश्चितपणे आम्ही केंद्र सरकारशी चर्चा करु. केंद्र सरकारने गाईडलाईन्स दिल्या आहेत. कायदा नाही. त्यामुळे त्या गाईडलाईन्स अंतर्गत काम करावयाचे आहे. उदाहरणादाखल सांगू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W.2

SGB/ ST/ AKN/ AKN/ ST/ 13:50

ता.प्र.क्र.11219....

श्री.देवेंद्र फडणवीस......

इच्छितो की, पहिल्यांदा केंद्र सरकारने अशा गाईडलाईन्स दिल्या की, सेल्फ सर्टिफिकेशनवर 100 मार्कांचे इव्हॅल्यूएशन करायचे आणि त्या आधारे शहरे करायची. सेल्फ सर्टिफिकेशन होत होते त्यात सगळी स्टॅटिक्स, मानके होती. त्यावेळी मुंबईसारखी महाराष्ट्रातील महापालिका 14 व्या क्रमांकावर दिसत होती. आम्ही केंद्र सरकारला विनंती केली की, यामध्ये 60 टक्के मार्क स्टॅटिक्स ठेवा आणि 40 टक्के मार्क डायनॅमिक ठेवा. म्हणजे त्यांचे प्रेझेंटेशन असेल, महापालिकेने आतापर्यंत केलेल्या रिफॉर्म्स, टॅक्स कलेक्शन व इतर बाबी डायनॅमिकमध्ये ठेवा. केंद्र सरकारने ते मान्य केले. त्या आधारे आपण प्रस्ताव पाठविला आहे. त्यामुळे ही सगळी प्रोसेस वॉटर टाईट कम्पार्टमेंट नाही. यामध्ये एक फ्रेमवर्क आपल्याला मिळाले आहे. जे फ्रेमवर्क काश्मीरमध्ये चालेल ते या ठिकाणी चालेल असे नाही. त्यामध्ये निश्चितपणे ज्या आवश्यक बाबी आहेत, त्याबाबत मी स्वतः केंद्रीय मंत्री श्री.व्यंकय्या नायडू यांच्याशी बोललो आहे. मी त्यांना सांगितले की, आमच्या या संदर्भात काही शिफारशी आहेत. ते म्हणाले जरूर मांडाव्यात, वेगवेगळी राज्ये भूमिका मांडतात, त्यातील जे योग्य आहे ते आम्ही निश्चितपणे स्वीकारू. या संदर्भात निश्चितपणे आम्ही सगळ्या भावना त्यांच्यापर्यंत पोहोचवू. साधारणपणे यामध्ये एंगेजमेंट आहे. प्रस्ताव महासभेपर्यंत पोहोचले ते स्थायी समितीकडून पोहोचले आहेत. त्यावेळी ते नियम होते. स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर महासभेकडे प्रस्ताव गेले. कदाचित नंतर अधिक चर्चा झाली असावी, त्या चर्चेमधून आणखी काही सूचना पुढे आल्या असतील. म्हणून एंगेजमेंट झालेली नाही असे नाही. ती एंगेजमेंट झालेली आहे. जरूर यामध्ये अधिक एंगेजमेंट करण्यात यावी. महापालिकेच्या बाहेरच्या लोकप्रतिनिधी आहेत त्यांनाही या संदर्भात माहिती मिळावी. त्यांनाही या संदर्भात काय चालले आहे याबाबत विश्वासात घ्यावे. तशी सूचना देण्यात येईल. पिंपरी-चिंचवड शहराच्या संदर्भात आपण प्रस्ताव पाठविला. आपल्याला माहिती आहे की, जेएनएनआरयुएमच्या काळापासून अर्बन ॲग्लोमरेशन अशी एक कन्सेप्ट आली. आता आपण हा प्रस्ताव कम्बाईन पाठविला. याचे कारण असे की, आपल्याला आणखी एक शहर त्यामध्ये येईल असे वाटत होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यासोबत हे अर्बन ॲग्लोमरेशन याकरिता बसू शकत होते की, यांचे पोलीस आयुक्तालय आहे, पीएमपीएल म्हणजे ट्रान्सपोर्ट आहे, त्यामुळे प्रस्ताव पाठविला. केंद्र सरकारसमोर प्रश्न आला की,

...3...



ता.प्र.क्र.11219....

श्री.देवेंद्र फडणवीस......

काश्मीरने जम्मू आणि श्रीनगर शहराचा एकत्रित प्रस्ताव पाठविला. त्या दोन शहरांमध्ये खूप अंतर आहे. त्यामुळे केंद्र सरकारने त्यातील एक स्वीकारला आणि बाकी पेंडिंग ठेवले. त्यावर त्यांनी अंतिम निर्णय जरी कळविला असला तरी त्यांच्याकडे आपला पिंपरी-चिंचवड पुण्याचा आणि जम्मू श्रीनगरचा असे दोन प्रस्ताव आले होते. त्यांनी 100 ऐवजी 98 शहरे निवडली आहेत. उर्वरित दोन शहरांमध्ये पिंपरी-चिंचवडचा कसा समावेश करता येईल यासाठी आमचा प्रयत्न आहे.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, स्मार्ट सिटीबद्दलचा हा प्रश्न आहे. केंद्र सरकार दरवर्षी 100 कोटी रुपये आणि राज्य सरकार दरवर्षी 50 कोटी रुपये उपलब्ध करुन देणार आहे. एसपीव्हीच्या माध्यमातून हा निधी दिला जाणार आहे. केंद्र सरकारचा 100 कोटी रुपयांचा निधी एसपीव्हीच्या भांडवलासाठी जमा होणार असून राज्य सरकारचे 50 कोटी रुपये कंपनीच्या कामकाजाकरिता दिले जाणार आहेत. माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, 24x7 पाणी पुरवठा योजनेकरिता जेएनएनयुआरएम अंतर्गत काही ठिकाणी एसपीव्ही कंपनी स्थापन झालेली आहे. मी 20 वर्षे नगरसेवक म्हणून काम केले आहे. माननीय मुख्यमंत्री देखील या शहराचे महापौर होते. पुण्यामध्ये 24X7 पाणी पुरवठा योजनेसाठी कधीही एसपीव्ही स्थापन झालेली नाही. पुणे महापालिकेला जेएनएनयुआरएम अंतर्गत 2700 कोटी रुपयांचा निधी मिळाला. पुढील 5 वर्षात 750 कोटी रुपये दिले जाणार आहेत. त्यातील 500 कोटी रुपये भांडवलासाठी आणि 250 कोटी रुपये कंपनीच्या कामासाठी दिले जाणार आहेत. बाणेरची निवड केली, त्याचा विकास करताना एसपीव्ही स्थापन केली. यापूर्वी महापालिकेमध्ये ठराव झाला, त्यामध्ये जमीन गहाण न ठेवणे, कर्ज घेण्याकरिता महापालिकेची मंजुरी घेणे या अटी होत्या. आता डायरेक्ट केंद्र सरकारकडे ठराव गेलेला आहे. माझी विनंती आहे की, याकरिता आपण सर्व गटनेत्यांबरोबर बसू. कारण केंद्र सरकारकडे जो प्रस्ताव गेला आहे तो परत येईल. त्याबाबत कायमस्वरुपी प्रोग्रॅम बनवावा.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातून 10 महापालिका निवडल्या गेल्या आहेत. त्यांच्यासाठी एक निकष तयार करावा. अन्यथा या एसपीव्ही आणि स्मार्ट सिटीला भवितव्य राहणार नाही असे मला वाटते.

...4...

16-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W.4

SGB/ ST/ AKN/ AKN/ ST/ 13:50

ता.प्र.क्र.11219....

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा स्पष्ट करतो की, एसपीव्हीला कर्ज उभारावयाचे असेल तर महापालिकेची मान्यता घ्यावीच लागते. महापालिकेच्या मान्यतेशिवाय ते घेता येत नाही. एसपीव्ही राज्य सरकारची नाही किंवा केंद्र सरकारची देखील नाही. खरे तर एसपीव्ही म्हणजे स्पेशल पर्पज व्हेईकल ऑफ म्युनिसिपल कार्पोरेशन असणार आहे. माननीय सदस्यांनी सूचना केली त्यानुसार बैठकीला आपण सर्व नेत्यांना बोलावणार आहोत. त्या बैठकीचा अजेंडा असा करणार आहोत की, ज्या वेगवेगळ्या सूचना आलेल्या आहेत त्या सूचनांवर एक कन्सेन्सस तयार करुन ॲक्रॉस द बोर्ड ज्या शहरामध्ये हे काम होणार आहे त्या शहरामध्ये सारखीच आपली जी मोडस ऑपरेंडी आहे त्याकरिता आपण बैठक बोलावणार आहोत.

....एक्स.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11219.....

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, आपण एसपीव्ही करणार आहात. हा 2900 कोटी रूपयांचा प्रकल्प आहे. केंद्र सरकारच्या गाईडलाईनसनुसार पुण्यातील औंध, बाणेर आणि बालेवाडी हा एरिया स्मार्ट सिटीसाठी निश्चित केला आहे. हे 2900 कोटी रूपये या एरियावरच खर्च होणार आहेत काय, असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. तसेच, या प्रकल्पासाठी कशा प्रकारे निधी उभारण्यात येणार आहे ? या प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाकडून 700 कोटी रूपये मिळणार आहेत. त्यामुळे शासन पुणेकरांना जादा कराचा बोजा लादणार आहे काय ? दुसरी बाब अशी की, ज्या ॲमिनिटी स्पेस ताब्यात आलेल्या आहेत त्या विकण्यात येणार आहेत काय ? या स्मार्ट सिटीसाठी शासन कशा पद्धतीने निधी उभा करणार आहे, हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. मुंबई-पुणे महानगरपालिकांना "अ" दर्जा आहे. या सक्षम महानगरपलिका आहेत. त्यांच्यासाठी एसपीव्हीला पर्याय द्यावा म्हणून केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात येणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, स्मार्ट सिटीच्या मूळ प्रस्तावामध्ये त्या शहराने कशात सहभाग घ्यायचा हे ठरवायचे आहे. त्यांना दोन प्रकारचे इनिशिएटीव्ह घेण्यास सांगण्यात आले होते. एक म्हणजे पॅन इनिशिएटीव्ह. यामध्ये संपूर्ण शहर कव्हर होईल असे एक इनिशिएटीव्ह होते. दुसरे सेक्टोरियल इनिशिएटीव्ह. यामध्ये रेट्रो फिटींग आहे म्हणजे जे जुने ले-आऊटस आहेत किंवा जेथे ब्राऊन फिल्ड डेव्हल्पमेंट आहे तेथील स्टँडर्ड अपग्रेड करण्याकरिता, स्मार्ट नेटवर्क करण्याकरिता, इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्याकरिता मदत करण्यात येणार आहे. तेव्हा यासंबंधातील निर्णय महानगरपालिकांना घ्यायचा आहे. आता माझ्याकडे माहिती नाही पण बाणेर हा एरिया रेट्रो फिटींगमध्ये त्यांनी घेतला असावा. त्यामुळे हे महानगरपालिकेने ठरवायचे आहे. पुणे महानगरपालिकेने तीन हजार कोटी रूपयांचा आराखडा तयार केला आहे. या आराखड्याला एक हजार कोटी रूपयांची एक्विटी आपण देणार आहोत. त्यामुळे आपल्याला 2000 कोटी रूपये

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11219.....

श्री.देवेंद्र फडणवीस....

रेझ करता येतील. आज आपल्या फायनान्सेसचा विचार केला तर त्यात आपण एवढे लिव्हरेजिंग करू शकत नाही. कारण सर्वांचा कमिटेड एक्सपेन्सेस जास्त आहे. या 1000 रूपयाच्या आधारावर आपली क्षमता निर्माण होईल. आपल्याला त्या क्षमतेतूनच काम करावयाचे आहे. ज्यावेळी आपण इन्फ्रास्टक्चर निर्माण करतो त्यातून आपल्याला कराच्या रूपाने पैसा परत मिळत असतो. त्यामुळे यात अतिरिक्त टॅक्स लावण्याची कुठलीही अट समाविष्ट केलेली नाही. पण जेएनएनयुआरएम मध्ये जे रिफॉर्म्स सांगितले होते त्याप्रमाणेच आपल्याला आपल्या टॅक्सची वसुली करावी लागणार आहे. आपल्याला पाणी पट्टी जास्त प्रमाणात वसुल करावी लागेल. आपल्याकडे पाणीपट्टी चोरीचे प्रमाण 40 टक्के असेल तर ते 30-20 टक्क्यांवर आणावे लागेल. आपले आता जे रिसोर्सेस आहेत त्याची योग्य ती वसुली करण्यासंबंधात महानगरपालिकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. यात ॲडिशनल टॅक्सेस लावण्याचे मॅंडेट कुठेही नाही.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, या सरकारने स्मार्ट सिटीसाठी एक गुडी-गुडी टर्म वापरला आहे असे मला वाटते. आपण सिटी स्मार्ट करणार आहात. पुणे शहरात कचऱ्याचा, झोपटपट्टीचा, स्लमचा मूलभूत प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहे. आज पुण्यात 560 झोपडपट्ट्या आहेत. त्याच बरोबर वाहतुकीचा आणि नदी प्रदूषणाचा देखील प्रश्न आहे. आपण स्लम तशाच ठेवल्या तर सिटी र्स्मोट कशी काय होणार आहे ? तेव्हा या मूलभूत प्रश्नांची प्रॉयॉरिटी काय आहे ? हे सर्व मूलभूत प्रश्न लक्षात घेतले तर आपण सिटी कशा प्रकारे स्मार्ट करणार आहात ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो. त्यांनी अतिशय मूलभूत प्रश्न विचारला आहे. कारण मघाशी येथे मंत्री स्मार्ट करणार काय अशी देखील विचारणा करण्यात आली. आपल्याकडे 'स्मार्ट' शब्दाचा अर्थ वेगवेगळा आलेला आहे. श्री.अमिताभ बच्चन यांना आणले की स्मार्ट होते असे नाही. आम्ही देखील थोडेसे स्मार्ट आहोत. आमचे राज्यमंत्री देखील स्मार्ट नाही असे काही नाही. ते देखील श्री.अमिताभ बच्चन एवढेच स्मार्ट

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11219.....

श्री.देवेंद्र फडणवीस...

आहेत. पुणेकर तर स्मार्टच असतात. स्मार्ट सिटीचा अर्थ कुठल्या तरी ॲफ्ल्युएन्ट लोकांकरिता, समाजातील वरच्या वर्गाकरिता काम करण्यासाठी आहे असा नाही. स्मार्ट सिटीतील इंटीग्रल पार्ट काय आहे. स्मार्ट ही सस्टीनेबल सिटी आहे. त्यात सर्वात पहिले 100 टक्के कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रशुद्ध पद्धतीने करायची आहे. सांडपाण्यावर 100 टक्के प्रक्रिया केल्यानंतर त्याचा पुनर्वापर करावयाचा आहे. स्मार्ट सिटीमध्ये सेफ सिटी हा इंटीग्रल पार्ट आहे. स्मार्ट सिटीमध्ये झोपडपट्टीतील माणसाला सोयी देणे, घर देणे हा इंटीग्रल पार्ट आहे. गुंतवणूक वाढविणे, तंत्रज्ञानाचा वापर करून आपण ज्या सेवा पुरवित आहोत त्याची क्षमता वाढविणे हे स्मार्ट सिटीचे मूळ तत्त्व आहे. सर्व्हीसेसची क्षमता वाढली की, त्याची किंमत कमी होते. आपण एखाद्या शहराला 100 एमएलडी पाण्याचा पुरवठा करतो आणि त्यातील 40 एमएलडी पाण्याचे बिलींग करतो. त्यावेळी उरलेल्या 60 एमएलडी पाण्याचे बिल, 40 एमएलडी पाणी जे लोक वापरतात त्यांच्याकडून वसूल करीत असतो. पण त्यांना प्रत्यक्षात पाणी देत नसतो. तेव्हा तंत्रज्ञानाचा उपयोग करून पाण्याचा प्रत्येक थेंब अकौंट फॉर करता येईल काय याचा विचार करणार आहोत. आज अशा स्मार्ट टेक्नॉलॉजीस उपलब्ध आहेत. त्यासाठी आपल्याला नेटवर्क टाकावे लागेल. वेगवेगळ्या प्रकारच्या पाईप लाईन्स टाकाव्या लागतील. आपल्याला फ्लो मिटर्सचा विचार करावा लागेल. या सगळ्या स्मार्ट टेक्नॉलॉजीचा वापर करून पायाभूत सुविधांमध्ये इन्व्हेसमेंट वाढवावी लागेल. त्याची क्षमता वाढवावी लागेल. त्याची श्रेणीवाढ करावी लागेल. त्याद्वारे सामान्य माणसाला अफोरडेबल अशा प्रकारच्या सर्व्हिसेस प्रोव्हाईड करण्याचा या मागचा कन्सेप्ट आहे. आपण समाजाच्या ज्या घटकांकरिता चिंता व्यक्त केली आहे त्या घटकांकरिताच स्मार्ट सिटी तयार करावयाची आहे.

..4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11219.....

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा सर्वसमावेशक प्रश्न आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा स्मार्ट सिटी योजनेमध्ये समावेश झालेला आहे. नुकतचे माननीय मुख्यमंत्री डोंबिवली येथे आले होते. त्यावेळी त्यांनी कल्याण-डोंबिवलीच्या स्मार्ट सिटीसाठी 6500 कोटीचे विशेष पॅकेज देण्याची घोषणा केली. त्याच बरोबर महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेली 27 गावे वगळून स्वतंत्र नगरपालिका करून त्यांनाही विशेष पॅकेज देण्याची घोषणा केली. आम्ही त्या घोषणेचे स्वागत करतो. माननीय मुख्यमंत्र्यांच्या घोषणेबद्दल मित्र पक्षांना शंका वाटत असेल आणि सरकारच्या बऱ्याच घोषणांची अंमलबजावणी झाली नसली तरी ही घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: केलेली असल्यामुळे व ते शब्दाचे पक्के असल्यामुळे आम्हाला खात्री वाटते की, याची अंमलबजावणी निश्चितपणे होईल. त्यामुळे कल्याण-डोंबिवलीच्या लोकांना गिफ्ट देण्यासाठी या घोषणेची अंमलबजावणी बजेट अधिवेशनपूर्वी होणार आहे काय ? तेव्हा या संबंधातील आश्वासन माननीय मुख्यमंत्री देणार आहेत काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माझे भाषण न ऐकता सन्माननीय सदस्यांनी माझी तक्रार निवडणूक आयोगाकडे केली. आता तेच याचे स्वागत करीत असल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. त्यावेळेस माझे स्वागत केले असते तर.... त्यावेळी माझी तक्रार केल्यामुळे मला निवडणूक आयोगाकडे माझे स्पष्टीकरण द्यावे लागले. माझे स्पष्टीकरण त्यांनी मान्य केले. कारण त्यावेळी मी सांगितले होते की, पॅकेजची घोषणा केलेली नाही. मी स्मार्ट सिटी इनिशिएटीव्हची घोषणा केली होती. स्मार्ट सिटीमध्ये केडीएमसीने कसे प्रपोजल तयार केले आहे ते मी तेथे सांगितले आहे. केडीएमसीने स्मार्ट सिटी संदर्भातील प्रस्ताव मंजूर करून पाठविलेला आहे. तो प्रस्ताव सहा हजार, सात हजार, आठ हजार कोटी रूपयांचा ..... (अडथळा).... कल्याण डोंबिवली महानगरपालिका स्मार्ट सिटी संदर्भात जो प्रस्ताव पाठवेल तो आम्ही मान्य करू.

Y-1....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 11219.....

प्रा.अनिल सोले :सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी महापौर म्हणूनही काम केलेले आहे. त्यामुळे एसपीव्ही मध्ये जो अध्यक्ष राहणार आहे तो महानगरपालिकेचा असणार आहे. त्यामध्ये कन्फ्यूजन ठेवण्याचे कारण नाही. यामध्ये असे सूचवले आहे की, आयुक्त किंवा आयएएस अधिकारी राहणार आहे. मी आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, पुणे महापानगरपालिकेने एसपीव्हीचा अध्यक्ष महापौर असला पाहिजे अशी सूचना केली असून ही भावना महाराष्ट्राची आणि महाराष्ट्र शासनाचीही राहणार आहे काय ? यासंदर्भात महाराष्ट्र शासन केंद्रशासनाला तशा प्रकारची सूचना करणार आहे काय ? एसपीव्ही डिझॉल्यूशनची एक प्रोसिजर ठेवावी लागत असते. नागपूर महानगरपालिकेमध्ये जशी 24X7 करता एसपीव्ही आहे तशीच एनएमपीएल म्हणून परिवहन करिता आम्ही एसपीव्ही केली होती. परंतु सीएनसी ॲक्ट बदलला आणि महाराष्ट्राचा एमएमसी ॲक्ट लागू झाल्यानंतर आम्ही एसपीव्ही डिझॉल्व्ह करुन परिवहन मंडळ स्थापन केले. डिझॉल्यूशनची काही प्रोसिजर यामध्ये अधोरेखित केली जाणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मी मघाशीही दिलेले आहे की, यासंदर्भात राज्य सरकारकडे ज्या ज्या सूचना आल्या त्या सगळया सूचनांच्या संदर्भात केंद्रसरकारशी चर्चा केली जाईल. यामध्ये निर्वाचित प्रतिनिधींना अधिक महत्व मिळाले पाहिजे अशी आमची देखील भूमिका आहे. अपेक्षा एवढीच आहे की, निर्वाचित प्रतिनिधींनी हे समजून घेतले पाहिजे की, निर्वाचित प्रतिनिधी हा मालक नसून जनता मालक आहे. त्यामुळे जनतेच्या भावना काय आहेत हे समजून निर्वाचित प्रतिनिधींनी काम केले तर जास्त यश त्यामध्ये मिळू शकेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, कोणतेही एसपीव्ही आपण तयार करतो त्यावेळी त्या एसपीव्हीमध्ये डिझॉल्यूशनची प्रक्रिया ही द्यावीच लागत असते. डिझॉल्यूशनच्या प्रक्रियेशिवाय एसपीव्ही तयार होत नाही. त्यामुळे डिझॉल्यूशनची प्रक्रिया एसपीव्ही तयार होतांनाच त्यामध्ये अंतर्भूत असेल. एसपीव्ही जेव्हा कॉन्स्टीटयूट होते तेव्हा त्या कॉन्स्टीटयूशनमध्ये आपण जे काही मेमोरंडम तयार करतो त्यामध्ये याचे डिझॉल्यूशन कशा प्रकारे होईल हे नमूद करावेच लागते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 11219.....

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, प्रश्न जरी पुण्यापुरता मर्यादित असला तरी सुध्दा राज्यात ज्या ज्या ठिकाणी हे प्रकल्प होणार आहेत त्या सगळयांसाठी हा अतिशय महत्वाचा विषय आहे. कोणतीही नवीन संकल्पना राबविताना त्याला जो बेसिक रेजिस्टन्स असतो तो सगळीकडे दिसून येत असतो. परंतु हे प्रकल्प तयार करताना काही गोष्टी आपण गृहीत धरलेल्या असतात. त्यातील महत्वाचा भाग असा आहे की, वाढते शहरीकरण आणि वाढते स्थलांतर, ही योजना राबविताना येत्या पाच वर्षामध्ये पुणे, नाशिक किंवा कोणतेही शहर असेल त्याचा आजची लोकसंख्या काय आहे व येत्या पाच वर्षामध्ये त्यामध्ये कितीची भर पडणार आहे यावर आपण काही नियंत्रण आणणार आहात काय ? जर लोकसंख्या वाढत गेली तर आपण केलेल्या योजना वाढत्या लोकसंख्येला उपयोगी पडणार नाही अशी त्यामध्ये भिती असू शकते. दुसरी बाब अशी आहे की, महापालिकेच्या क्षेत्रामध्ये काही ठिकाणी राजकीय अपरिहार्यतेमुळे आपण गावे घ्यावयाची किंवा गावे घ्यावयाची नाहीत याचे निर्णय करीत असतो. गेल्या काही वर्षात मुंबईचा अपवाद वगळता सर्व महानगरपालिकांची क्षेत्र विस्तारीत होत गेलेली आहे व त्यामध्ये अधिकचा समावेश होत गेलेला आहे. त्यामुळे यावर आपण नियंत्रण ठेवणार काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, एसपीव्ही म्हणजे इनकॉरपोरेटेड कंपनी असणार,त्याला इक्वीटी कॅपिटल असणार आणि त्यामधून त्यांनी निधी उभा करावयाचा असून त्याला व्याज लागणार आहे. त्यामुळे याचा परतावा आणि व्याज देण्यासाठी जी सक्षमता असते त्यासाठी बाहेरुन येणाऱ्या भांडवलाच्या व्यतिरिक्त जे काही येणार आहे ते खाजगी कंपन्याचे येणार आहे काय? इतर ठिकाणी या क्षेत्रातील कोणी तरी कॉरपोरेट्स या निमित्ताने आपल्याला पैसा देऊ करतील आणि त्या शहरांचा ताबा मग कदाचित पुढे रिलायन्स शहर असे शहराचे नाव होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या अशा ज्या काही शक्यता आहेत त्याचा शासन विचार करेल काय, आणि त्याबद्दल शासनाची भूमिका काय राहणार आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, शासन सगळया शक्यतांचे विचार करीत आहे,करेल, करीत राहील. सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या शंका व्यक्त केल्या आहेत त्यासंदर्भात मी आपल्याला एवऐच सांगू इच्छितो की, यातील खूप गोष्टी ऐच्छिक आहेत. उदा.आपल्याला समजा जर कर्ज उभारावयाचे असेल तर कर्ज उभारा. प्रायव्हेट इक्वीटी घ्यावयाची असेल तर प्रायव्हेट इक्वीटी घ्या. कर्ज उभारत असताना एसपीव्ही का तयार केली आहे, तर प्रत्येक प्रकल्पाची

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 11219.....

श्री.देवेंद्र फडणवीस .....

एक क्षमता असते. मुळामध्ये आपल्याला असे वाटते की, सरकारी प्रकल्प असेल तर तो सरकारच्या पैशातूनच झाला पाहिजे. परंतु असे नाही. प्रत्येक प्रकल्पाच्या परताव्याची क्षमता कमी अधिक प्रमाणात असते. त्यामुळे अशा प्रकारचा प्रकल्प तयार करताना त्याचा आयआयआर काय आहे, एफआरआर काय आहे अशा प्रत्येक गोष्टीचे कॅलक्यूलेशन करतो. कॅलक्यूलेशन केल्यानंतर तो प्रकल्प व्हायबल असेल तर बँक कर्ज देते व आयआयआरच्या माध्यमातून कर्ज मिटते. समजा प्रकल्प व्हायबल होत नसेल तर त्यामध्ये अधिकची इक्वीटी टाकावी लागत असते. इक्वीटीच्या माध्यमातून व्हायबिलीटी गॅप फंडींग करुन आपल्याला आयआयआर अचिव्ह करावा लागतो व त्यातूनच क्षमता वाढत असते. आपण जर गंगाजळी सारखे काम करीत राहिलो तर आतापर्यंत आपण गंगाजळीच देत गेलो. त्यामुळे कोठे इनव्हेस्ट केले ते आपल्याला माहिती नसते व त्यातून काय परतावा आलेला आहे याची देखील माहिती नसते. त्यामुळे हे स्पेसिफिक असली पाहिजे की, याची ईफिशिअन्सी आणि हे प्रकल्प चालविण्याची क्षमता तसेच या दोन्ही गोष्टी अकौंटॅबिलीटी असली पाहिजे. तरी देखील आपण ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचा आम्ही विचार केलेला आहे, करणार आहे आणि करत राहू.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*uमुंबई शहराच्या पुनर्विकास नियमावलीबाबत*

*(२) * १२४७८ uuश्री.किरण पावसकर, श्री.राहुल नार्वेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) मुंबई शहरात पुनर्विकास नियमावलीच्या ३३/७ व ३३/९ अंतर्गत पुनर्बांधणीची कामे विकासकांकडून होत असताना इमारतीचे काम पूर्ण झाल्याचे रहिवासी प्रमाणपत्र (ओ.सी.) मिळाल्याचे सांगून घरांची विक्री केली जाणे, मात्र इमारत पुर्ण झाल्याचे सर्टीफिकेट (बी.सी.सी.) न घेता काही वर्षांनी वाढीव चटई क्षेत्र मिळाल्याचे दाखवून त्याच इमारतीवर अधिक मजल्यांचे बांधकाम अथवा इतर वाढीव बांधकाम केले जात असल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, विकासक महानगरपालिकेकडे सादर केलेल्या इमारतीच्या आराखड्यातील नमुद मजल्यांपेक्षा अधिक मजले उभे करत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,*
*(३) असल्यास, हे करत असताना ज्या लोकांनी घरे खरेदी केली त्यांच्या जिवितास व सदर इमारतीस धोका निर्माण होऊ शकतो, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा कारभार सर्रास सुरु असल्याने परिणामी रहिवाशी प्रमाणपत्र (ओ.सी.) बरोबरच बिल्डींग पुर्णत्वाचा दाखला (बी.सी.सी.) घेण्याचा कायदा करण्याविषयी शासनाकडून कार्यवाही केली जाणार आहे काय,*
*(४) असल्यास, बी.सी.सी. घेण्यास जाणीवपूर्वक विलंब करुन वाढीव बांधकाम करणाऱ्या विकासकांच्या बाबतीत नियमावली केली जाणार आहे काय अशा विकासकांवर कार्यवाही ी करण्यात येणार आहे काय ,*
*(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय ?*
*डॉ.रणजित पाटील, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या करिता : (१) असे निदर्शनास आलेले नाही.*
*(२) नाही.*
*(३) ते (५) विकास नियंत्रण नियमावलीचे तरतूदीनुसार अधिक चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध होत असल्यास त्याप्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे क्रमप्राप्त रहाते. तथापि अशा चटई क्षेत्र निर्देशांकाचा भार पेलण्यास इमारत सक्षम असल्याबाबत संरचनात्मक स्थैर्याबाबत (structuaral stability) प्रमाणपत्र प्राप्त करुनच पुढील कार्यवाही करणेत येते.*

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांना या प्रश्नाच्या उत्तरामध्ये बदल करावयाचा आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरामध्ये कोणताही बदल करावयाचा नाही.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात 31 तारखेला एक लक्षवेधी सूचना सभागृहात झाली होती त्यावेळेस माननीय मंत्री महोदयांनी मला या प्रश्नावर उत्तर दिले होते की, धोरणात्मक निर्णय घेण्याच्या बाबतीत अधिवेशन संपल्यानंतर संबंधित विषयास अनुसरुन तातडीने बैठक घेण्यात येईल. या विषयाच्या संदर्भात मी आपल्याला 5 ऑगस्ट,8 सप्टेंबर, 2015 रोजी पत्र दिले होते. या विषयावर आजपर्यंत कोणतीही बैठक झालेली नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Y-5

SGJ/ AKN/ ST/ 14:10

ता.प्र.क्र. : 12478....

श्री.किरण पावसकर......

सभापती महोदय, मुंबईमध्ये ज्या इमारती बांधल्या जातात त्या 33(7) आणि 33(9) पुरता विषय नाही. नवीन इमारती जेव्हा बांधल्या जातात त्यामध्ये आपले घर असावे म्हणून आयुष्याची सर्व कमाई टाकून माणूस घर घेत असतो. घरासाठी पैसे देऊन झाल्यानंतर घराचे कन्स्ट्रक्शन झाल्यानंतर ओ.सी.मिळाल्यानंतर त्या घरामध्ये लोक राहण्यायाठी जातात. इमारत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र घेतले जात नाही. बीसीसी किती कालावधीत घ्यावे याबाबत आपल्याकडे कोणताही नियम नाही. असंख्य इमारतींमध्ये पार्किंगचा वापर ऑफिससाठी केला जातो. रिफ्यूज एरिया ओरिजनल आराखडयात दाखवला जातो. परंतु 4-5 वर्षानंतर रिफ्यूज एरिया कनव्हर्ट करुन नवीन घर किंवा ऑफिस तयार झाले असे कारण देऊन ते विकले जाते, त्याचे रजिस्ट्रेशन केले जाते. ज्यांनी अशा प्रकारची घरे खरेदी केलेली आहेत, त्या इमारतीच्या लोकांच्या डोक्यावर कनस्ट्रक्शन चालू करता, त्यांच्या जिवीताला हाणी होते. यासंदर्भात उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, स्ट्रक्चरल ऑडीट केल्यानंतर वाढीव चटईक्षेत्र देण्यात येईल्.

Z-1/......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12478.....

श्री.किरण पावसकर.....

मुंबईत एखादी अनधिकृत झोपडीचे बांधकाम असेल तर ते बांधकाम पाडण्यासाठी आपण तातडीने प्रयत्न करता. पण अशाप्रकारे अनधिकृत बांधकाम करणाऱ्या बिल्डर्सवर कारवाई करण्याकरिता आपण त्या नियमांमध्ये बदल का करीत नाही? आपण लेखी उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "असे निदर्शनास आले नाही" म्हणून मी आपणास उत्तरामध्ये सुधारणा करायची आहे काय असा प्रश्न विचारला होता. मी मागील अधिवेशनात दिनांक 31 जुलै, 2015 रोजी ही बाब उपस्थित केली होती. विकासपालिकेमध्ये सादर केलेल्या आराखड्यातील नमूद मजल्यापेक्षा अधिक मजले उभे केलेले आहेत अशा सुमारे 2 हजार 670 इमारती मुंबईत असून त्या इमारतींना अद्यापि निवासी दाखला देखील देण्यात आलेला नाही. लोक त्या ठिकाणी राहत आहेत. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहेत की, "असे निदर्शनास आले नाही." वाढीव चटईक्षेत्र मिळाल्यानंतर तुम्ही घरे बांधू शकता. आपणच त्यांना घरे बांधण्यासाठी परवानगी देत आहात. मुंबईमध्ये करोडो रुपये मोजून घर घेतल्यानंतर त्या इमारतीचे काही मजले पाडण्यासाठी सांगणार आहात काय ? इमारतीचे वरचे मजले पाडल्यामुळे इमारतीमध्ये राहणाऱ्या सर्वांचे नुकसान होणार आहे. कारण पाण्याची टाकी टेरेसवर आहे. लिफ्ट टेरेसपर्यंत असते. अशा इमारती 2 हजारांच्यावर असतील तर अशा कामांवर निर्बंध आणण्यासाठी आपण तातडीने कोणत्या उपाययोजना करणार आहात? आपण स्मार्टसिटीसाठी इतका वेळ दिला, मुंबई तशीही स्मार्ट आहे, मुंबईला अनधिकृत बांधकामापासून वाचविण्यासाठी नियमात काही बदल करणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न मागील अधिवेशनात देखील विचारला होता. त्या विषयाच्या संदर्भात दिनांक 8.9.2015 रोजी माझ्या दालनात बैठक बोलाविली होती. सन्माननीय सदस्यांना त्या बैठकीसाठी बोलाविले होते. परंतु त्यांना येण्यास उशीर झाला. हे अधिवेशन झाल्यानंतर पुन्हा एकदा बैठक बोलाविण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारले त्याबाबत शासनाचे धोरण स्पष्ट आहे. प्लिन्थपेक्षा जास्त बांधकाम केले असेल तर वाढीव एफएसआय घेता येणार नाही असे शासनाचे धोरण आहे. या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाचा निर्णय आपल्या माहितीसाठी वाचून दाखवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12478.....

डॉ.रणजित पाटील....

".....the Municipal Authority that the existing structure is strong enough to withstand the additional load due to additional FSI on the basis of Structural Stability Certificate from a licensed Structural Engineer as per the known norms in that regard, the Petitioners may be permitted to avail of the benefit of amended provisions of Government Resolution dated 21st May, 2011...". मी आपणास त्या निर्णयाची प्रत देतो. या संदर्भात उच्च न्यायालयाचा निर्णय स्पष्ट आहे. ओ.सी. आणि बी.सी.सी. या गोष्टींचा फायदा घेत अतिरिक्त एफ.एस.आय. घेताना ओ.सी.आणि बी.सी.सी. घ्यायची नाही या प्रिटेक्स्टखाली पुढचे मजले वाढवावयाचे. क्रॉम्प्रमाईज होण्याचे कारण असे की, एक्झिस्टींग लोक त्या सोसायटीमध्ये राहत असतात आणि त्यांच्या सर्व सेवांवर आणि राईट टू लीव्हवर घाला घातला जातो. सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते सत्य आहे. आपला डी.पी.प्लान येत आहे त्यामध्ये ओ.सी. आणि बी.सी.सी. या दोन्ही गोष्टी सोबत देण्याबाबत निश्चितपणे सूचना देण्यात येतील.

**सभापती :** ओ.सी. आणि बी.सी.सी.यामध्ये जो काही ग्रे एरिया राहिलेला आहे आणि त्याचा गैरफायदा घेतला जात आहे. या संदर्भात आपण तपशीलवार बैठक घेण्याचे मान्य केलेले आहे. त्याबैठकीला या विषयाशी संबंधित असलेल्या सर्वांना बोलवावे.

ॲड.राहूल नार्वेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी सांगितले की, मुंबई शहरामध्ये जवळपास 2 हजार 600 इमारतींना ओ.सी.मिळालेली नाही. महानगरपालिका मानवतेच्या दृष्टीकोनातून या इमारतींना पाणी आणि वीज कनेक्शन जास्त दराने देत आहे. इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम झालेले असल्यामुळे ओ.सी.घेतलेली नाही हे त्या मागील कारण आहे. ओ.सी.घेतली नसल्यामुळे ती फाईल वॉर्डमध्ये जात नाही आणि फाईल वॉर्डमध्ये न गेल्यामुळे त्यावर कारवाई होत नाही. ज्या इमारतींनी ओ.सी.घेतलेली नाही पण त्या इमारतींना पाणी आणि वीज कनेक्शन आहे अशा किती इमारती आहेत, त्यांना किती वर्षापासून पाणी आणि वीज कनेक्शन दिलेले आहे, अशा इमारतींवर कोणती कारवाई करणार आहात ?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12478.....

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या इमारतींना ओ.सी.नाही पण पाणी व वीज कनेक्शन आहे याबाबत प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये अशाप्रकारची किती बांधकामे आहेत याची तपशीलवार माहिती घेण्यात येईल. यामध्ये अजून एक मेख अशी आहे की, यामध्ये पार्ट ओ.सी.दिली जाते. ज्या ठिकाणी पार्ट ओ.सी. दिल्या असतील त्याची देखील माहिती घेतली जाईल.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझे दोन स्पेसिफीक प्रश्न आहेत. पहिल्या प्रश्नाचे उत्तर "असे निदर्शनास आले नाही" असे देण्यात आलेले आहे. हे उत्तर दिशाभूल करणारे आहे. विकास नियंत्रण निमावली 1991 च्या कलम 33 (7) आणि 33(9) च्या अन्वये पुनर्विकसित झालेल्या किती इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत आणि त्यापैकी किती इमारतींचे काम पूर्ण झालेले आहे, त्यापैकी किती इमारतींनी ओ.सी आणि बी.सी.सी. घेतलेली आहे ? दुसऱ्या लेखी प्रश्नाचे उत्तर "नाही" असे दिलेले आहे. अंधेरीमध्ये काही बिल्डर्सनी 15 मजल्याची सी.सी आणि ओ.सी. घेतली असताना 18 मजले बांधलेले आहेत.त्या ठिकाणी कॅम्पाकोका इमारतीसारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते. तेव्हा अंधेरी भागामध्ये अशी जी बांधकामे होत आहेत त्यावर आपण कारवाई करणार आहात काय ? तसेच पार्किंग आणि रिफ्युज एरियामध्ये जी अनधिकृत घरे बांधली जात आहेत त्यावर कारवाई करणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम 33(7) आणि 33 (9) चा मुद्दा मांडला. ज्या इमारतींनी ओ.सी.घेतलेली नाही परंतु आपण त्यांना पाणी आणि विजेची सुविधा दिलेली आहे याबाबत प्रश्न विचारलेला आहे. त्यांनी हे जाणीवपूर्वक केलेले आहे काय असा ही प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत मी आधीच सांगितलेले आहे की, या संदर्भात सर्वंकष आढावा घेण्यात येईल. किती इमारतींना पार्ट ओ.सी. दिलेल्या आहेत याची देखील माहिती घेण्यात येईल. काही पळवाटांचा फायदा घेऊन कोणी अतिरिक्त एफएसआय मिळविण्याचा प्रयत्न करीत असतील तर त्याला आळा घालण्यात येईल. तसेच त्यांना डिमार्केट करुन ओ.सी. आणि बी.सी.सी. देऊन त्यांना अतिरिक्त एफएसआय कसा मिळणार नाही याबाबत उपाययोजना केली जाईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12478.....

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, महानगरपालिकेच्या इस्टेट विभागातील अधिकाऱ्यांना आणि महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम 33(7) आणि 33(9) मधील सर्व गोष्टी माहीत असतात. माननीय मंत्र्यांनी येथे उच्च न्यायालयाचा आदेश वाचून दाखविला. या संदर्भात कोणी तरी न्यायालयात गेले म्हणून न्यायालयाने तसे आदेश दिलेले आहेत. महानगरपालिकेचे अधिकारी, इस्टेट विभागाचे अधिकारी आणि बिल्डर्सच्या संगनमताने हे सर्व होत असते. तेव्हा या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये अधिकारी सामील असल्याचे आढळून आले तर त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात येईल.

------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नंदनवन (नागपूर) येथील पोलीस स्टेशनच्या**

**इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत**

**(3) * ११०४९ प्रा.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नंदनवन (नागपूर) येथे पोलीस स्टेशन आहे, हे खरे आहे काय ,

(2) असल्यास, ह्या पोलीस स्टेशन करिता इमारत नसल्याने स्टेशन परिसरात पिण्याचे पाणी, स्वच्छता गृह ह्या प्राथमिक सोयी देखील उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदरील इमारत बांधकामाकरिता निधी उपलब्ध करुन दिला आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त पोलीस स्टेशनचे बांधकाम निधी उपलब्ध केल्यानंतरही सुरु न होण्याची कारणे काय आहेत,

(5) तसेच, सदरील इमारतीचे बांधकाम पूर्ण होवून यातून कामकाजास सुरुवात केंव्हा होईल ?

**डॉ.रणजित पाटील, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.

(2) हे खरे नाही.

(3) हे खरे आहे.

(4) व (५) एकूण रुपये १,०२,४६,०००/- एवढा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांच्याकडे बांधकामाकरीता जमा करण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, पोलीस स्टेशनकरिता इमारत नसल्याने स्टेशन परिसरात पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह या प्राथमिक सोयी देखील उपलब्ध नाहीत हे खरे आहे काय, या प्रश्नाचे उत्तरे "हे खरे नाही" असे दिलेले आहे. तेथील पोलिसांना बाहेर टपरीवर जावे लागते. सध्या हे पोलीस स्टेशन समाज भवनामध्ये भ्रत आहे. पोलीस तंबू टाकून त्यामध्ये बसत आहेत अशी त्याठिकाणी परिस्थिती आहे, या गोष्टीकडे लक्ष देण्यात येईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11049....

प्रा.अनिल सोले....

तसेच गेल्या एक वर्षापासून 1 कोटी 2 लाख 46 हजार रुपयांचा निधी उपलब्ध असताना सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणत्याही प्रकारचे बांधकाम केलेले नाही. सभापती महोदय, मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, सार्वजनिक बांधकाम विभागाला हे बांधकाम करणे शक्य नसेल तर, नागपूर सुधार प्रन्यासला एजन्सी नेमून व त्यांच्याकडे हे काम देऊन सदरहू बांधकाम पूर्ण करण्यात येईल काय ?

**सभापती** : माझ्या माहितीनुसार कालच भाड्याच्या जागेत सुरु असलेल्या नागपूर येथील पाच पोलीस स्टेशनच्या संदर्भात नियम 46 अन्वये निवेदन करण्यात आलेले आहे. मला वाटते हा विषय त्यामध्ये बसतो काय हे माननीय मंत्र्यांनी पहावे. त्यामध्ये हा विषय बसल्यास हा विषय संपून जाईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हा विषय वेगळा आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाला 'होय' असे उत्तर आहे. दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, नंदनवन येथील पोलीस स्टेशन इमारतीच्या बांधकामाच्या प्रस्तावावर गेल्या तीन-चार वर्षांपासून बांधकाम विभागाकडून फॉलोअप होत आहे. सदरहू प्रकरण आता अंतिम टप्प्यात आहे. या क्षणाला ही बाब एनआयटीकडे सोपविल्यास पुन्हा विलंब होईल. त्यामुळे या प्रकरणात मी जातीने लक्ष घालून, येत्या 15 दिवसात या बांधकामाबाबतची निविदा काढण्याची प्रक्रिया सुरु करतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सदरहू पोलीस स्टेशनच्या बांधकामासाठी 1 कोटी 2 लाख 46 हजार रुपये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जमा केले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदरहू बांधकामाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही झाली हे सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विचारावे लागत आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, या विषयी पाठपुरावा करीत आहोत. महोदय, बांधकाम विभाग हा मंत्रिमंडळाचा एक भाग आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या शहरातील एखाद्या ठिकाणी तरतूद उपलब्ध असताना सुध्दा पोलीस स्टेशनचे बांधकाम होत नसेल तर ते दुर्दैव आहे. सन्माननीय सदस्यांनी नंदनवन (नागपूर) येथे पोलीस स्टेशन आहे काय, असा लेखी प्रश्न विचारलेला होता. मला वाटते त्यांनी नागपूरमध्ये कायदा व



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11049....

श्री.धनंजय मुंडे....

सुव्यवस्था आहे काय, असा प्रश्न विचारावयास पाहिजे होता. नागपूरमध्ये कायदा व सुव्यवस्था नसेल तर पोलीस स्टेशन बांधून काय उपयोग होणार आहे ? हा विषय अतिशय गंभीर आहे. या बाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावयास पाहिजे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी नंदनवन (नागपूर) येथे पोलीस स्टेशन आहे काय, असा लेखी प्रश्न विचारलेला होता. त्या प्रश्नाला 'होय' असे लेखी उत्तर दिले आहे. त्यामुळे मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा संबंध येत नाही.

**सभापती** : मला वाटते सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना त्यांचा प्रश्न वेगळ्या आयुधाच्या माध्यमातून विचारता आला तर विचारावा. त्याला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## *राज्याच्या सागरी सुरक्षेबाबत*

***(४) * ११२८१ अॅड. हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, अॅड.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-***

*(१) राज्यात दहशतवाद्यांकडून घातपाती कारवायांची शक्यता गुप्तचर यंत्रणेकडून व्यक्ती केली जात असल्याने मुंबईसह राज्याच्या पश्चिम किनारपट्टीवरील सुरक्षेबाबत फारशी दक्षता बाळगली जात नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, सागरी सुरक्षेसाठी पोलिसांना तटरक्षक दलामार्फत प्रशिक्षण दिले जात असून वेगवान बोटी चालविण्यासाठी एक हजार चार पदे मंजूर असली तरी प्रत्यक्षात ४०९ पदेच भरण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,*
*(३) असल्यास, राज्यातील सागरी सुरक्षेसाठी असलेल्या गस्तीसाठीच्या अनेक बोटी नादुरुस्त असून वापराविना किनाऱ्यावर पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,*
*(४) तसेच, मुंबईच्या अति महत्वाच्या किनारपट्टीच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या तटरक्षक दलाच्या ५० % पोलिसांना पोहता येत नसल्याचा प्रकार माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,*
*(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार सागरी सुरक्षा पोलिसांची रिक्त पदे भरण्याबाबत तसेच गस्तीसाठीच्या बोटी दुरुस्त करण्यासंदर्भात व सागरी सुरक्षा पोलिसांना योग्य ते प्रशिक्षण देऊन राज्याची सागरी सुरक्षा मजबूत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*प्रा.राम शिंदे, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता* **:** *(१) हे खरे नाही.*
*केंद्रीय गुप्तचर यंत्रणेकडून वेळोवेळी मिळालेल्या सतर्क संदेशाच्या अनुषंगाने सर्व सागरी जिल्हयांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या जातात. सागरी जिल्हयाकडून सागरी सुरक्षा संदर्भात वेळोवेळी आवश्यक त्या उपाययोजना करुन सुरक्षा यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यात येत असते.*
*(२) होय, हे खरे आहे. वेगवान बोटी चालविण्यासाठी १००४ तांत्रिक पदे मंजूर करण्यात आलेली असून त्यापैकी ४०९ पदे सद्य:स्थितीत कार्यरत आहेत. उर्वरित पदांच्या सेवाप्रवेश नियमात दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.*
*(३) हे खरे नाही. सागरी गस्तीकरिता पुरविण्यात आलेल्या बोटींची देखभाल व दुरुस्ती वेळोवेळी करुन त्या बोटी गस्तीकरिता वापरल्या जातात.*
*(४) हे खरे नाही.*
*मुंबईच्या सागरी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना तटरक्षक दलाकडून पोहण्याचे प्रशिक्षण देण्यात येत असून आतापर्यंत ८४% पोलिसांना पोहता येत असून उर्वरितांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.*
*(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.*

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11281....

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, राज्यात दहशतवाद्यांकडून घातपाती कारवाया करण्याची शक्यता गुप्तचर यंत्रणांकडून वारंवार व्यक्त केली जाते. मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला किंवा मुंबईत घडवून आणलेले बॉम्बस्फोट, यासाठी सागरी किनाऱ्याचा वापर झाल्याचे आपल्या निदर्शनास आले आहे. परंतु या प्रश्नाला असे लेखी उत्तर देण्यात आले आहे की, "सागरी जिल्ह्याकडून सागरी सुरक्षा संदर्भात वेळोवेळी आवश्यक त्या उपाययोजना करुन सुरक्षा यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यात येत असते." परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, वेगवान बोटी चालविण्यासाठी 1004 तांत्रिक पदे मंजूर असताना केवळ 409 पदे भरण्यात आली आहेत आणि उर्वरित 600 पदे रिक्त आहेत. तसेच तट रक्षक दलाची पोलीस भरती करण्यात आली. त्या ठिकाणी असलेल्या 50 टक्के पोलिसांना पोहता येत नाही. या व्यतिरिक्त अजून एक धक्कादायक बाब अशी निदर्शनास आणून देते की, सागरी किनाऱ्यावर असलेल्या गस्ती बोटींपैकी 23 बोटी नादुरूस्त होऊन त्या तशाच पडून आहेत. प्रश्न क्रमांक 3 च्या उत्तरात नमूद केले आहे की, "सागरी गस्तीकरिता पुरविण्यात आलेल्या बोटींची देखभाल व दुरूस्ती वेळेवर करुन त्या बोटी गस्तीकरिता वापरल्या जातात." परंतु हे चुकीचे उत्तर देण्यात आले आहे. प्रश्न क्रमांक 4 च्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "मुंबईच्या सागरी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना तटरक्षक दलाकडून पोहण्याचे प्रशिक्षण देण्यात येत असून, आतापर्यंत 84 टक्के पोलिसांना पोहता येत असून उर्वरितांना प्रशिक्षण देण्यात येत आहे."

सभापती महोदय, या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारते की, गस्ती बोटी चालविण्यासाठी मंजूर केलेल्या पदांपैकी केवळ 409 पदे भरलेली असल्यामुळे उर्वरित पदे नेमकी कधी भरण्यात येतील, तसेच ज्या ज्या गोष्टींची पूर्तता केलेली नाही त्यांची पूर्तता कधीपर्यंत करण्यात येईल आणि ही सर्व यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी आपण काय उपाययोजना करणार आहात ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, गुप्तचर आणि आय.बी.च्या माध्यमातून जी माहिती मिळते त्या अनुषंगाने सर्व पोलीस स्टेशन्स अलर्ट केली जातात. त्यामुळेच लेखी उत्तरामध्ये 'आवश्यक त्या' हा शब्दप्रयोग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11281....

प्रा.राम शिंदे....

करण्यात आला आहे. गुप्तचर संस्थेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची दखल घेण्याची आवश्यकता असते. त्या अनुषंगाने सागरी तट रक्षक दलाला सूचना दिली जाते. त्यामुळे "आवश्यक त्या उपाययोजना करुन" असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. वेगवान बोटी चालविण्यासाठी 1004 तांत्रिक पदांची निर्मिती केली होती. त्यापैकी 409 पदे भरलेली आहेत. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, कालच दिनांक 15 डिसेंबर, 2015 रोजी 186 पदांचे अतिरिक्त तांत्रिक मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीवर नेमण्यात आले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तटरक्षक दलातील कर्मचाऱ्यांना पोहता येत नाही. मी सांगू इच्छितो की, सागरी किनारी नेमलेल्या स्टाफपैकी 84 टक्के कर्मचाऱ्यांना पोहता येते आणि उरलेल्या 16 टक्के पोलिसांना पोहण्याचे प्रशिक्षण देण्याची उपाययोजना आमच्या स्तरावरुन सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी अजून एक मुद्दा नादुरुस्त बोटींचा मांडला. मी सांगू इच्छितो की, गोवा शिपयार्ड लिमिटेड यांना ऑगस्ट-2014 मध्ये ठेका दिलेला आहे. त्यामुळे वेळोवळी बोटींची जशी दुरूस्ती करण्याची आवश्यकता आहे त्यानुसार बोटींची दुरूस्ती केली जाते. या कामी त्यांना तीन वर्षांचा ठेका दिला आहे. अशा प्रकारे गृह विभागाच्या माध्यमातून वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जात आहेत. याशिवाय पोलीस बोटी, सागरी पोलीस स्टेशन्स, सागरी चेक पोस्ट, सागरी ऑपरेशनल रूम, सागरी प्रशिक्षण केंद्र असतील या बाबत दक्ष आहोत. बोटींचे कलर कोडींग हे जिल्ह्यानुसार दिले जातात. शिवाय बायोमेट्रिक कार्ड सुध्दा दिले जाते. मत्स्य व्यवसाय विभागामार्फत 1 लाख 40 हजार 132 लोकांना.....

**सभापती** : मला वाटते माननीय राज्यमंत्र्यांनी या संदर्भातील तपशीलवार माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

प्रा.राम शिंदे : ठीक आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, त्या बोटींवर जे खलाशी ठेवण्यात आलेले आहेत ते कायमस्वरुपी नाहीत. मंत्री महोदयांनी सांगितले की, कंत्राटी पध्दतीवर ते काम कंपनीला दिले स्वरुपात पदे भरली जातात. ते अतिरेकी आहेत, गुंड आहेत की अजून कोण आहे, याची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11281....

श्री.जयंत प्र.पाटील....

आहे. अतिरेक्यांवर लक्ष ठेवण्यासाठी या बोटी घेतल्या आहेत. परंतु त्या कंपनीकडून तात्पुरत्या कोणतीही नोंद वा चौकशी केली जात नाही. या बोटींसाठी कुठेही मरीना किंवा धक्का बनविण्यात आलेला नाही. यासाठी सरकारकडे निधी नसेल तर किमान मरीना फ्लोटींग तरी आपण करणार आहात की नाही ? तसेच राज्य सरकारने गोवा शिपयार्ड लिमिटेला हे कंत्राट दिले आहे. त्यांचा महाराष्ट्रात ड्रायडॉक आहे काय ? बोटी वर आणल्याशिवाय त्यांची दुरुस्ती करता येत नाही. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, ज्या कंपनीला हे काम दिले आहे त्या कंपनीचा आपल्या राज्यात वर्कशॉप किंवा ड्रायडॉक आहे काय ?

..2बी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11281....

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. 1004 पदांची निर्मिती केली आहे. परंतु अद्यापपर्यत ती पदे भरली गेलेली नाहीत ही वस्तुस्थिती खरी आहे. ती मान्य केलेली आहे. ही पदे भरण्याच्या संदर्भात नॉर्म्सप्रमाण् व्यक्ती लागतात, त्याप्रमाणे अद्यापपर्यंत त्या मिळत नाहीत. त्यामुळे नॉर्म्समध्ये बदल करण्याच्या दृष्टीकोनातून आता प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. उदाहरणार्थ, 165 सें.मी. उंची असलेला जवान असावा लागतो, त्यासाठी 157 सें.मी. असे नियमात काही गोष्टी ....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मुख्य कारण असे आहे की, या बोटींच्या कॅप्टनना 10 हजार रूपये पगार देत आहात. माझ्या बोटीवरील कॅप्टनला 1 लाख रूपये पगार आहे. कॅम्प्टनला स्केलने पगार दिला पाहिजे. शासनाचे नॉर्म्स यासाठी बदलावे लागतील. खास बाब म्हणून .... बोटींमुळे अतिरेक्यांपासून संरक्षण मिळणार आहे. बुलेटप्रूफ बोटी आहेत. सन्माननीय सदस्यांनी अतिशय सुंदर प्रश्न विचारला आहे. योग्यता असली पाहिजे. पेमेंट देत नाहीत. 10 हजार रूपये पेमेंटवर कोण येणार आहे, कंपाऊंडरचा पेमेंट एमबीबीएस झालेल्या डॉक्टरला देऊ लागले तर तो कसा येईल, शासन कॅप्टन, खलाशाच्या पेमेंट बाबतीतील नॉर्म्स बदलण्याचे धोरण आखेल का ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा बोटींमधील अनुभव जास्तीचा आहे हे मलाही मान्य आहे. सन्माननीय सदस्यांनी वर्कशॉबाबत सांगितले. गोवा शिपयार्ड कंपनी लिमिटेडला दुरूस्तीचे टेंडर दिले आहे त्या संदर्भात संगितले. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, इतर खलाशांच्या तुलनेत यांना पगार अतिशय कमी मिळतो. त्यामुळे यामध्ये रूल्स व रेग्यूलेशन बदलण्याच्या दृष्टीने प्रस्ताव ....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांची काळजी दिसत आहे. पश्चिम किनाऱ्याला दहशतवादाचा धोका असल्यामुळे ही काळजी आहे. त्यामुळे यामध्ये कॉंट्रॅक्ट लेबर असे न करता प्रोफेशनल मॅनेजमेंट करून काही तरी किंमत द्यावी लागेल तरी ती द्या, पगार द्या. आपण त्या दृष्टीने तसा विचार करावा.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11281....

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तरात सांगितले की, "बोटी चालविण्यासाठी 1004 तांत्रिक पदे मंजूर करण्यात आलेली असून त्यापैकी 409 पदे सद्य:स्थितीत कार्यरत आहेत. उर्वरित पदांच्या सेवाप्रवेश नियमात दुरूस्ती करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सरकार तांत्रिक पदे किती दिवसांत भरणार आहे ? देशात, मुंबईत झालेले मोठे, दहशतवादी हल्ले सागरी किनाऱ्याहून देशात घुसखोरी करून झाले आहेत. सन 1993 चा बॉंबस्फोट सागरी किनाऱ्याहून घुसखोरी करून झाला. 26.11 चा हल्लाही सागरी किनाऱ्याहून घुसखोरी करून झाल. त्यामुळे अशी ही तांत्रिक पदे कॉंट्रॅक्ट बेसिसवर देऊन चालविणार का, देशाच्या सुरक्षेसंबंधी काटकसर करत आहोत हे भान सरकारने ठेवले पाहिजे. माझा प्रश्न असा आहे की, सरकार ही पदे किती दिवसांत भरणार आहे ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. उत्तरातही देखील सांगितले आहे. 1004 पदे वेगवान बोटी चालविण्यासाठी असून 409 पदे भरली आहेत. कॉंट्रॅक्ट बेसिसवर 104 पदे भरली आहेत. परंतु पदे भरताना काही अडचणी येत आहेत उदा. ट्रेंड माणसे असावी लागतात. सभापती महोदय, त्या क्वॉलिफिकेशनची माणसे अनेक वेळा जाहिराती देऊन सुध्दा मिळत नाहीत. त्यामुळे नियमात बदल करण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये पगाराचाही ॲडिशनल मुद्दा समाविष्ट करून त्या संदर्भात एक महिन्याच्या आत सविस्तर बैठक घेऊन त्यातील त्रुटी निवारण करण्याच्या दृष्टीकोनातून पाहिले जाईल. अतिशय महत्त्वाचा प्रश्न असल्यामुळे एक महिन्याच्या आत बैठक घेऊन त्यावर निर्णय घेऊ.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, 26.11 चा हल्ला झाला, तोपर्यंत 12 नॉटिकल माईलपर्यंतची हद्द पोलीस सांभाळत होते. परंतु 26.11 नंतर ही हद्द कोस्ट गार्डकडे दिली गेली. आजही या हद्दीवर कोणत्याही प्रकारचे संरक्षण होत नाही असे वेगवेगळे प्रश्न आहेत. पोहता येत नाही. मी स्वत: जाऊन पाहिले आहे की, बऱ्याच पोलिसांना पोहताही येत नाही. राम प्रधान समितीने ज्या शिफारशी याबातीत केल्या आहेत या शिफारशींची अंमलबजावणी झाली आहे का ? राम प्रधान समितीने या संदर्भात शिफारशी दिल्या होत्या. परवा पाहिले की, ज्या कुलाब्यातून हा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11281....

ॲड. अनिल परब ....

हल्ला झाला, तिकडे चौकी आहे, पण तेथे एकही पोलीस नाही. राम प्रधान समितीने 26.11 च्या बाबतीत निष्कर्ष काढले होते, त्या निष्कर्षांच अंमलबजावणी झाली आहे की नाही, अंमलबजावणी झाली नसेल तर, ती न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, पोलीस स्टेशनच्या संदर्भात .... जवळपास 44 पैकी 43 पोलीस स्टेशन निर्माण करण्यात आली आहेत. जुनी 25 होती. पहिल्या फेजमध्ये 12 नवीन पोलीस स्टेशन निर्माण झाली आहेत आणि दुसऱ्या फेजमध्ये 7 पालीस स्टेशन निर्माण झाली आहेत. त्या अनुषंगाने अगोदरही सांगितले आहे की, सुरक्षेच्या संदर्भातील हा विषय असल्यामुळे 1 महिन्याच्या आत या संदर्भात सविस्तर अशी बैठक बोलावून त्यामध्ये निर्णय घेऊ. त्रुटी असतील तर ....

**सभापती** : माझी सूचना आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे ज्येष्ठ आहेत. ते विचारत आहेत. माझ्या दालनात पुढील महिन्यात सर्वंकष अशी बैठक बोलावून, त्यामध्ये ज्यांना यायचे आहे, त्यांना बोलावून घ्यावे.

प्रा. राम शिंदे : होय.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, म.वि.प. नियम 289 अन्वये मी या सभागृहासमोर पुढीलप्रमाणे सूचना देत आहे.

सभापती महोदय, राज्यात 4 वर्षांपासून ग्रामविकास विभागामार्फत केंद्र शासन व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने संगणकीकृत ग्रामीण महाराष्ट्र संग्राम हा प्रकल्प चालू आहे. या प्रकल्पास महाऑनलाईनकडून प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक तर पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर दोन संगणक परिचालकांची नियुक्ती करण्यात येत असणे, संगणक परिचालकांनी काम केल्यामुळे राज्य शासनाच्या ग्रामविकास विभगाला ई-पंचायतमध्ये देशात तीन वर्षे प्रथम पारितोषिक मिळणे, परंतु कंपनीने संगणक परिचालकांची आर्थिक व मानसिक पिळवणूक केल्यामुळे शासनाने सर्व संगणक परिचालकांना पदनिश्चिती करून शासन सेवेत घेण्यासाठी व मासिक 15 हजार रूपये वेतन मागणीसाठी उपोषण, मोर्चा व धरणे आंदोलन करण्यात येत आहे. संगणक परिचालकांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय आतापर्यंत घेतलेला नाही. एकीकडे शासन डिजिटल इंडिया व डिजिटल महाराष्ट्राची घोषणा करीत आहे. नागरिकांसाठी ऑनलाईन सेवा हमी कायदा अंमलात आणला जात आहे. पंरतु सेवा उपलब्ध करून देणाऱ्या संगणक परिचालकांना उपाशी ठेवण्याचे काम केले जात आहे. संगणक परिचालकांना पदनिश्चिती करून किमान वेतन देण्यात यावे यासाठी नागपूरच्या अधिवेशनावर काल मंगळवार, दिनांक 15 डिसेंबर, 2015 रोजी 20 हजार संगणक परिचालकांचा धडक मोर्चा आलेला आहे. मोर्चेकऱ्यांची दखल घेण्याऐवजी पोलिसांकडून आज सकाळी बळाचा वापर करून, जवळजवळ 200-300 संगणक परिचालकांवर लाठीचार्ज केला. त्यात 5 महिला जखमी झाल्या आहेत. एका महिलेचे फ्रॅक्चर आहे. अनेक परिचालकांना अमानुषपणे लाठीचार्ज करून मारहाण केली आहे. नागपूरचे अधिवेशन मोर्चे, धरणे, आंदोलनाचे अधिवेशन म्हटले जाते. फार अपेक्षेने येथे संबंधित विषयावर नागपूरच्या अधिवेशनाच्या वेळी मोर्चे काढले जातात. ते मोर्चे काढल्यानंतर सरकारची जबाबदारी असते की, त्यांचे प्रश्न समजून घेणे आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

प्रश्न समजून घेऊन सरकारच्या माध्यमातून जेवढे मार्गी लागतील तेवढे प्रश्न मार्गी लावणे. मात्र असे न होता पोलिसांचा वापर करून अमानुषपणे त्यांच्यावर लाठीचार्ज केला, ज्यांनी लाठीचार्ज केला असेल, जे पोलीस जबाबदार असतील, त्या पोलिसांची चौकशी करून त्यांना निलंबित करणे आवश्यक आहे. नागपूरचा इतिहास वेगळा आहे. नागपूरला पोलिसांकडून एकदा बळाचा वापर केला आणि येथे गोवारी हत्याकांड झाले होते. तेथेच संगणक परिचालकांना सुध्दा पोलिसांकडून बळ वापरून मारहाण करण्यात आली. परिचालकांच्या मेहनतीवर गेली 4 वर्षे आपल्या राज्याला देशामध्ये पारितोषिक मिळत आहे.

....2C

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

त्यांची माफक अपेक्षा आहे. यापूर्वीही मागील वर्षभरामध्ये या प्रश्नाच्या संबंधी अनेक वेळा लक्षवेधी उपस्थित करण्यात आली होती. महाऑनलाईन सोडून एक वेगळी कंपनी आली होती, त्या कंपनीच्या संदर्भात आम्ही आक्षेप घेतले होते, त्याबाबत संबंधित मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते आणि नंतरच्या कालावधीत त्या कंपनीला काढून टाकण्यात आले. त्याबाबत आम्ही स्वागत करतो.

सभापती महोदय, आज या लोकांची अपेक्षा काय आहे ? राज्यात या योजनेमध्ये जे संगणक परिचालक आहेत त्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे आणि त्यांना कमीतकमी किमान वेतन 15 हजार रुपये द्यावे, अशी त्यांची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आजही संपूर्ण राज्यातील प्रत्येक गावातील संगणक परिचालक आपल्या मागण्यांसाठी रस्तावर बसले आहेत. आज त्यांच्याकडे खाण्यापिण्यासाठी काही नाही. मी आज सकाळी त्या ठिकाणी मोर्चाला भेट देण्यासाठी गेलो होतो. पोलिसांच्या अमानुष लाठीमारात जखमी झालेल्यांची भेट घेतली. आज त्यांच्यासमोर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी नियम 289 अन्वये चर्चा सभागृहात सुरु व्हावी. या मोर्चामध्ये आलेल्या तरुण, तरुणींच्या बाबतीत सरकार काय निर्णय घेणार आहे, हे देखील या चर्चेतून स्पष्ट होईल.

सभापती महोदय, या मोर्चेकऱ्यांवर लाठीचार्ज करण्याची ऑर्डर कोणी दिली होती, कोणत्या पोलीस अधिकाऱ्याने, कोणत्या मॅजिस्ट्रेटने ऑर्डर दिली होती, त्यांचे काय चुकले होते, हे देखील स्पष्ट झाले पाहिजे. आज सर्व वर्तमानपत्रात विशेष करुन इंग्रजी वर्तमानत्रांनी सुध्दा या मोर्चाची दखल घेतली आहे. (अडथळा......)

सभापती महोदय, सर्वच वृत्तपत्रांनी दखल घेतली आहे, हे मी सांगत आहे.

**सभापती :** राष्ट्रीय वृत्तपत्रांनीही दखल घेतली, असे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना म्हणावयाचे आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, इंग्रजीचा एवढा व्देष करणे बरोबर नाही. मराठी भाषेचा अभिमान जसा तुम्हाला आहे, तसा तो आम्हालाही आहे. स्वाभाविक आहे की, एखाद्या

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.........

सरकारच्या विरोधात मोर्चा येणे आणि मोर्चाला तोंड देण्यापलीकडे एखाद्या सदस्याने या मोर्चाबाबत आणि त्यांच्या मागण्यांबाबत सभागृहात चर्चा उपस्थित केल्यानंतर अन्य कोणत्या तरी मुद्यावर त्यांना थांबविणे सन्माननीय मंत्री महोदयांना शोभणारे नाही.

सभापती महोदय, माझी एवढीच अपेक्षा आहे की, या मोर्चाला आलेल्या तरुणांची सरकारने दखल घ्यावी आणि ती जर घेतली नाही तर या मोर्चाला आलेले 20 हजार तरुण येथून हलणार नाहीत. लाठीचार्जमुळे त्यांच्या मनामध्ये फार मोठा असंतोष निर्माण झाला आहे. या मोर्चेकऱ्यांच्या मागण्याही रास्त आहेत. सध्या त्यांना केवळ 3 हजार रुपये मासिक वेतन मिळत आहे. आपल्या राज्याने मोलकरणींकरिता कायदा केला. आज मोलकरणींना किमान मासिक वेतन 6500 रुपये मिळत आहे. आज हे संगणक परिचालक प्रत्येक गावात, गावातील सर्व गोष्टींची नोंद संगणकावर करीत आहेत. त्यांची एवढीही कदर आपण करायची नाही ? प्रत्येक गावाला केंद्र सरकारकडून आणि राज्य सरकारकडून 8 हजार रुपये, 9 हजार रुपये मिळत असतात. या संगणक परिचालकांची मागणी 15 हजार रुपये वेतनाची आहे. परंतु, सरकारला जे काही 7 हजार रुपये, 8 हजार रुपये द्यावयाचे असतील ते द्यावेत आणि या संदर्भातील आपली भूमिका स्पष्ट करावी. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, अन्य सर्व कामकाज बाजूला सारुन या विषयावर नियम 289 अन्वये आपण चर्चा मान्य करावी.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, कंत्राटीकरणातून कोणता राक्षस जन्माला येतो, जनतेचे कसे वाटोळे केली जाते आणि तरुणांना कसे वैफल्यग्रस्त केले जाते, याचा पुरावा म्हणजे आज सकाळी झालेला लाठीमार आहे.

सभापती महोदय, या संगणक परिचालकांची फसवणूक झाली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी गेल्या अधिवेशनात चर्चा उपस्थित केली होती आणि त्या माध्यमातून ती कंपनी रद्द झाली. हजारो लोकांना रोजगार देत असताना त्यांच्या पदरात काही टाकायचे नाही पण कंत्राटदाराचे खिसे भरावयाचे, असे हे चालले आहे. राज्यकर्ते आणि कंत्राटदार यांचे संगनमत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील........

असते. त्यामधून निर्माण झालेला हा प्रश्न आहे. आज 27 हजार पैकी 26 हजार संगणक परिचालक मोर्चात आले आहेत. ते कालपासून तेथे आहेत. त्यांची दखल घेऊन, त्यांचा प्रश्न समजावून घेऊन, त्यांच्याशी बोलले गेले असते तर ते लोक तेथून निघून गेले असते. त्याऐवजी या तरुणांना लाठीमाराने उत्तर देणे हे या सरकारला शोभणारे नाही. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न सरकार स्वतः निर्माण करीत आहे. शांततेने, सनदशीर मार्गाने ते येऊ पहात आहेत, आपला प्रश्न मांडू मागत आहेत, गांधीजींच्या मार्गाने ते आंदोलन करीत आहेत, त्यांना लाठीहल्ल्याने उत्तर दिले जात आहे. त्यांच्या संदर्भातील चर्चा या सभागृहात झाली पाहिजे. या संगणक परिचालकांची अशी मागणी आहे की, त्यांना शासनाच्या सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्यात यावे. हे सहज शक्य आहे. हजारो कोटी रुपयांचा मलिदा कंत्राटदारांना देण्याऐवजी या लोकांना त्यांच्या कष्टाचा मोबदला दिला गेला तर प्रश्न सुटु शकतो. सरकार आपल्या कायद्याविरुध्द वर्तन करु शकत नाही. सरकारी पातळीवर कंत्राटीकरण होता कामा नये, असा कायदा आहे. परंतु, या संबंधीचा कोणताही स्वतंत्र कायदा न करता या पध्दतीने कंत्राटीकरणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील हजारो तरुण, तरुणींना दारिद्र्यात आणि वैफल्यात ढकलले गेले असताना त्याची दखल सरकारने ताबडतोब घ्यावी आणि ही चर्चा सुरु करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन 2014 च्या नागपूर येथील अधिवेशनामध्ये या संगणक परिचालकांच्या आंदोलनाचे नेतृत्व विद्यमान अर्थ मंत्री महोदयांनी केले होते. ते या आंदोलनकर्त्यांना घेऊन आले होते. सकाळी मी त्या ठिकाणी गेलो होतो. गेल्या अधिवेशनात मी आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी हा प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित केला होता. या राज्यामध्ये 28900 ग्राम पंचायती आहेत. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये एक संगणक परिचालक आहे. पंचायत समित्यांमध्ये, जिल्हा परिषदांमध्येही परिचालक आहेत. यापूर्वी एका कंपनीने प्रति परिचालक 5000 रुपयांचा मलिदा खाल्ला होता. टोनरच्या नावाखाली 6000 रुपये

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील........

दाखविले गेले. माझी या चर्चेच्या माध्यमातून विनंती आहे की, राज्यकर्त्यांनी, शासनाने याची ताबडतोब दखल घेऊन रस्त्यावर बसलेल्या या संगणक परिचालकांना सुखरुप घरी जाता येईल असे ठोस आश्वासन द्यावे ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी अमानुष लाठीहल्ला केलेला आहे त्याची न्यायालयीन चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी मी करतो आणि आजचे सर्व कामकाज बाजुला ठेऊन यावर चर्चा सुरु करावी, अशी आपल्याला विनंती करतो.

सभापती : आज दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजी सर्वश्री धनंजय मुंडे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश् चव्हाण, विक्रम काळे, ख्वाजा बेग, प्रकाश गजभिये, वि.प.स.यांनी सकाळी 9 वाजून 6 मिनिटांनी तसेच कपिल पाटील, वि.प.स.यांनी 11 वाजून 52 वाजता "राज्यात चार वर्षापासून ग्राम विका सविभ्ंागातर्फे केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने राज्यात संगणकीकृत ग्रामीण महाराष्ट्र (संग्राम) हा प्रकल्प चालू असणे, प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या संगणक परिचालकांची कंपनीने आर्थिक व मानसिक पिळवणूक केली असणे, शासनाने सर्व संगणक परिचालकांची पदनिश्चिती करुन शासन सेवेत घेण्यासाठी व मासिक पंधरा हजार रुपये वेतन मागणीसाठी त्यांनी उपोषण, मोर्चा व धरणे आंदोलन करणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधाचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल.

यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे.

वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे.

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती........

मला स्वतःला सकाळी 7 वाजेपासून फोन येत होते. सकाळी 6 ते 7 वाजेपासूनच फोन येण्यास सुरुवात झाली होती. एकंदर या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून शासनाने ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी लाठीचार्जला परवानगी दिली असेल किंवा परवानगी नसताना ज्यांनी लाठीचार्जची ऑर्डर दिली असेल, लाठीचार्जची परवानगी दिली असेल तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कोणत्या परिस्थितीत परवानगी दिली, याचा सविस्तर अहवाल सभागृहाला सादर करण्याची आवश्यकता आहे. या लाठीचार्जच्या घटनेमुळे नागपुरच्या अधिवेशनाला गालबोट लागले आहे, असे मला स्वतःला वाटते. त्यामुळे आजच्या आज या संबंधीचा चौकशीचा अहवाल शासनाने विधानपरिषदेत आणावा आणि उचित कारवाई करुन आवश्यक वाटले तर लाठीचार्जला कारणीभूत ठरलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करावे.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, या मोर्चाची कल्पना मलाही होती. ग्राम विकास विभागाची संगणक संग्राम ही अतिशय प्रभावी योजना आहे आणि या योजनेला सतत 3 वर्षे माननीय पंतप्रधानांच्या हस्ते पारितोषिक मिळाले आहे. या मोर्चेकऱ्यांच्या मागण्यांच्या संदर्भात सरकार संवेदनशील आहे. एवढेच नाही तर काल माझ्या दालनात मी या संगणक परिचालकांच्या संघटनेच्या प्रतिनिधींबरोबर बैठक घेतली आणि मी त्यांना हे आश्वासन दिले की, 15 जानेवारीपर्यंत संग्राम-2 म्हणजे आपला जो संग्राम आहे, त्याबद्दलची संकल्पना येथे असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांना आहे. तेराव्या वित्त आयोगाचे पैसे होते त्यामधून प्रत्येक ग्राम पंचायतीसाठी 8 हजार रुपये संगणकीकृत ग्रामीण महाराष्ट्रासाठी खर्च व्हावेत आणि त्याबद्दलचा निर्णय मागील सरकारने घेतला होता.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...DD-1.....

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

श्रीमती पंकजा मुंडे........

याबद्दल मागील सरकारने निर्णय घेतला होता. ज्यावेळी आम्ही सत्तेमध्ये आलो त्यावेळी कोणाला 3,200/- रुपये तर कोणाला 2,800/- रुपये मानधन मिळत होते. आम्ही ते मानधन 4,500 रुपये केले. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे टोनरचा खर्च आहे. याबाबतीत त्यांचे किंवा इतर सन्माननीय सदस्यांचे ऑब्जेक्शन होते की, त्यासाठी जो स्टेशनरीचा खर्च आहे तो अगोदर जी कंपनी यामध्ये होती ती कंपनी तो स्टेशनरीचा खर्च घ्यायची आणि स्टेशनरी प्रोव्हाईड करीत होती. त्याबद्दल आपल्याला शाश्वती व्हावी आणि आम्ही स्टेशनरीचे पैसे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे राखून ठेवले आहेत. त्यामुळे कंपनीकडून स्टेशनरी खरेदी करण्याचे अधिकार देखील काढून घेण्यात आले आहेत. ती कंपनी यातून बाहेर व्हावी, त्या कंपनीला यातून बाहेर काढावे, अशा प्रकारची मागणी मागील अधिवेशनात झाली होती. त्यावेळी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी देखील या संदर्भात चर्चा केली होती. आम्ही त्या कंपनीला यातून बाहेर काढण्याचा निर्णय घेतलेला आहे. आता 13 व्या वित्त आयोगाची मुदत संपलेली आहे. आपल्याकडे आता 13 व्या वित्त आयोगाचा निधी शिल्लक नाही. 14 व्या वित्त आयोगाच्या ज्या गाईड लाईन्स आहेत त्या केंद्र शासनाच्या गाईड लाईन्स आहेत. खरे तर त्यामध्ये संग्राम कन्टीन्यू करता येईल काय हा सुद्धा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. ती मुले तेथे मानधनावर काम करीत होती. हा प्रोजेक्टच कन्टीन्यू करता येतो किंवा नाही या विषयी शंका निर्माण झालेली आहे. त्यांना शासकीय सेवेत सामावून घेणे हा प्रश्न थोडासा गंभीर आहे. मी काल त्या मुलांना व्यवस्थित समजावून सांगितले. माझी इच्छा आहे की, त्या मुलांनी त्या लेव्हलवर काम करावे. त्यांना शासन जे मानधन देते त्या पलीकडे ते जे सर्टिफिकेस्ट काढतात, ज्या झेरॉक्स काढतात त्यावर त्यांना प्रती झेरॉक्स प्रमाणे पैसे मिळतात आणि त्यांचे इनकम वाढते. त्यामुळे व्हिलेज लेव्हल इंटरप्रेन्युअर्स अशी त्यांना टर्म वापरली गेली आहे. त्यांना 14 व्या वित्त आयोगामध्ये समाविष्ट करावे यासाठी मी प्रयत्न करीत आहे, शासन कटिबद्ध आहे. आयटी डिपार्टमेंट बरोबर, मुख्य सचिवांबरोबर आमच्या विभागाच्या अनेक बैठका झालेल्या आहेत. याच्या गाईड लाईन्स आम्ही 15



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती पंकजा मुंडे........

जानेवारी पर्यंत जाहीर करु, असे आश्वासन मी त्या डेलिगेशनला दिलेले आहे. यामुळे त्यांचे समाधान झालेले आहे. मी त्यांना सांगितले की, तुम्हाला केंद्रबिंदू ठेऊनच आम्ही ही संकल्पना डिझाईन करीत आहोत. तुम्हाला यामध्ये कोणतीही यंत्रणा नको आहे. महाऑनलाईन ही मधली यंत्रणा नाही. महाऑनलाईन ही शासनाचीच यंत्रणा आहे. त्यांना यामध्ये कोणतीही खाजगी यंत्रणा नको आहे. त्याबद्दलही आम्ही पाहिजे तसा निर्णय घेऊ.

सभापती महोदय, त्या मुलांनी सांगितले की, आम्हाला ग्रामपंचायतीमार्फत पगार नको. मी त्यांना सांगितले की, आम्ही या सर्व गोष्टी विचारात घेऊन गाईड लाईन्स तयार करु आणि 15 जानेवारी रोजी त्या गाईड लाईन्स जाहीर कर. 13 व्या वित्त आयोगाची मुदत संपल्यामुळे संग्राम योजना संपुष्टात आलेली आहे. त्यांचे असे म्हणणे होते की, आम्ही जे पैसे वाचविले ते पैसे कंपनीच्या खिशात जात होते. ते पैसे आम्ही आमच्याकडे वर्ग केले आणि त्या पैशातून आम्ही आज त्या मुलांना मानधन देत आहोत. आम्ही 13 व्या वित्त आयोगाचा निधी राखून ठेऊन त्या मुलांना मानधन देत आहोत. आम्हाला 14 व्या वित्त आयोगाचे पैसे यावर खर्च करण्याची अद्याप मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे आता ही संकल्पना डिझाईन होत आहे. आम्ही 15 जानेवारी पर्यंत त्यांना गाईड लाईन्स देणार आहोत. त्यांच्या बरोबर सामंजस्याने चर्चा पार पडली आणि ती मुले मला भेटून निघून गेली होती. त्यामुळे आंदोलनानंतर रात्री तेथे काय झाले याबद्दल मी खेद व्यक्त करते. लाठीचार्ज कशामुळे झाला, एवढा आक्रोश का झाला, पोलीस आणि ही मुले कशामुळे एकमेकांच्या अंगावर धावली, याचा खरोखर शोध घेण्याची आवश्यकता आहे. मी सभागृहाच्या माध्यमातून विनंती करते की, गृह विभागाने याची सखोल चौकशी करुन आजच्या आज निवेदन करावे. म्हणजे खात्याने याची दखल घेतली नाही असा जो आपला संभ्रम आहे तो मुळात चुकीचा आहे. कारण, कालच त्यांच्या बरोबर आमची बैठक झालेली आहे. गृह विभागाने यावर निवेदन करावे, असे मी माझे मत व्यक्त करते.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांकडून अतिशय समाधानकारक उत्तर आलेले आहे. परंतु, मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात 14 व्या वित्त आयोगात संग्राम 2 होईल किंवा नाही, असा संशय निर्माण केला आहे. माझी आपल्या माध्यमातून शासनाला अशी विनंती आहे

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.......

की, देशात सलग 3 वर्षे राज्याला पंचायत राजमध्ये पहिले पारितोषिक मिळाले आहे. आपण सुद्धा शिफारस केली पाहिजे की, संगणक परीचालकांच्या माध्यमातून चांगले काम होत असेल तर राज्य मंत्रिमंडळाने केंद्रात आपले वजन वापरुन त्यांच्या मनात जो संशय आहे तो दूर केला पाहिजे आणि 14 व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये टोनरच्या बाबतीत जो काही खर्च आहे तो खर्च कमी करुन त्यांची जी मासिक मागणी आहे. त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत आज बोलणे योग्य नाही. ज्यावेळी अर्थसंकल्प सभागृहाला सादर होईल त्यावेळी यावर बोलणे योग्य होईल. परंतु, आपण याबाबतीत खात्री दिलेली आहे. मोर्चाच्या बाबतीत सकाळी काय झाले आणि पोलिसांनी असे का केले याबाबत शासनाने आज संध्याकाळ पर्यंत निवेदन करावे. तरच हे मोर्चेकरी परत जातील. त्याशिवाय हे मोर्चेकरी तेथून हलतील, असे मला वाटत नाही.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) :** माननीय सभापतींनी याबाबत निर्णय दिलेला आहे.

---------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** लेखी उत्तरे

**मु.शी.:** तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) अग्निशमन दलाकडे रासायनिक वायुप्रतिबंधक मास्कमध्ये ऑक्सिजनचे पुनर्भरण करण्याची यंत्रणा नसल्याबाबत करावयाची कार्यवाही" या विषयावरील श्री.मोहन जोशी, माजी वि.प.स. व इतर वि.प.स. यांच्या दिनांक 31 मार्च, 2010 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 3239 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.दिवाकर रावते (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2013-2014 या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.प्रकाश महेता (गृहनिर्माण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोलापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, सोलापूर यांचा सन 2006-2007 व 2007-2008 या वर्षांचा अनुक्रमे अठरावा व एकोणिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-------

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने क्लिअरिंग आणि फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळ, मुंबई यांचा सन 2007-2008, 2008-2009, 2009-2010, 2010-2011, 2011-2012, व 2012-13 या वर्षांचा अनुक्रमे सतरावा, अठरावा, एकोणिसावा, विसावा, एकविसावा व बाविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-------

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन 2011-2012 या वर्षाचा सत्ताविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोल्हापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, कोल्हापूर यांचा सन 2012-2013 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती :** वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दि रेल्वे गुड्स क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेट्स लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन 2012-2013 या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने किराणा बाजार व दुकाने मंडळ (बृहन्मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांकरिता) यांचा सन 2012-2013 व 2013-2014 या वर्षांचा अनुक्रमे त्रेचाळीसावा व चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-------

..2E-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लातूर व उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लातूर यांचा सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या वर्षांचा अनुक्रमे बाविसावा व तेविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले.

----

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक यांचा सन २००७-२००८ व २००८-२००९ या वर्षांचा अनुक्रमे चौथा व पाचवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले.

---

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचा सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचा अनुक्रमे तिसावा व एकतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले.

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, सर्व 9 अहवाल पाहिले तर सन 2006 चा अहवाल सन 2015 मध्ये ठेवण्यात आलेला आहे, यामध्ये मंत्री महोदयांची चूक आहे की, माथाडी कामगार मंडळाची चूक आहे की, कामगार खात्याची चूक आहे याची मला माहिती नाही. माथाडी मंडळाचा कारभार चुकीचा असेल तर मंत्री महोदयांनी त्या ठिकाणी लक्ष दिले पाहिजे. त्या ठिकाणी ऑडीटर नियुक्त केला जात नाही. माथाडी मंडळे जाहीर होत नाहीत. चेअरमनची नियुक्ती वेळेवर होत नाही. माथाडी कामगारांचा कारभार माथाडी बोर्डामध्ये होत नाही. असे अहवाल उशिरा येत असतील तर मंत्री महोदयांनी लक्ष घालून भविष्यातील अहवाल वेळेवर यावेत अशी माझी नम्र विनंती आहे.

**तालिका सभापती** : अहवाल वेळेवर येतील याबाबत दक्षता घेण्यात यावी.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मागील दहा ते बारा वर्षाचे अहवाल आता येत आहेत, माथाडी मंडळाचा कारभार सन्माननीय सदस्य माथाडी मंडळावर असल्यामुळे तो कारभार व्यवस्थित चालला आहे व सर्व अहवाल व्यवस्थित आले आहेत, असे समजून त्याच्या खोलात न जाता आहे तसे अहवाल मंजूर करावेत, सन 2014-15 चे अहवाल आपण एकत्र बसून तयार करता येतील.

------

श्रीमती पंकजा मुंडे (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे सन २०१२-२०१३ चे एकत्रित वित्तीय व महसूली लेखे सभागृहासमोर ठेवते.

**तालिका सभापती** : वित्तीय व महसुली लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.अनंत गाडगीळ (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा चौथा, पाचवा व सहावा अहवाल सभागृहास सादर करतो.

**तालिका सभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करण्यात आला.

----

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. महादेव जानकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा चौथा व पाचवा अहवाल सभागृहास सादर करतो.

**तालिका सभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्यात आला.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती स्मिता वाघ (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा तिसरा अहवाल सभागृहास सादर करते.

**तालिका सभापती** : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्यात आला.

-------

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा मांडायचा आहे.

**तालिका सभापती** : आपला औचित्याचा मुद्दा माननीय सभापती महोदयांनी नाकारलेला आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** नियम 93 अन्वये सूचना

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)**: आज बुधवार दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजी मला प्राप्त झालेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेसंदर्भातील निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्या ॲड. हुस्नबानू खलिफे यांनी " कोकण किनारपट्टीचे रासायनिक उद्योगांमुळे प्रदुषणात वाढ होऊन नगदी पिकांचे नुकसान होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी " राज्यात अपंगाच्या शिक्षणाविषयी शासकीय पातळीवर असलेली कमालीची उपेक्षा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी " राज्यातील शिक्षकांची पती-पत्नी एकत्रिकरण योजनेअंतर्गत बदली होत नसल्याने त्यांच्या कौटुंबिक जीवनावर होत असलेला विपरित परिणाम" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसले यांनी " पुणे महानगरपालिका हद्दीतील 23 गावातील टेकड्यांवरील बीपीडीचे आरक्षण करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी " अकोला जिल्ह्यातील डाबकी रोड येथील श्री.संतोष गवळी यांनी उसनवारीचे पैसे न दिल्यने श्री. आनंद जाधव यांनी त्यांची किडनी विकल्याचा प्रकार उघडकीस येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...7...

सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित, यांनी "बीड जिल्ह्यातील गेवराईसह अनेक दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये नवीन औद्योगिक वसाहत निर्माण करुन उद्योग सुरु करण्याची आवश्यकता." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी " राज्यात शेतकऱ्यांना वाटप करावयाच्या सौरपंप खरेदी प्रक्रियेत झालेला भ्रष्टाचार." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.ख्याजा बेग यांनी " यवतमाळ पणन महासंघाच्या माध्यमातून सीसीआयने खरेदी केलेल्या कापसाचा चुकारा शेतकऱ्यांना अद्याप न मिळणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी " स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व अन्य विद्यापीठांतून पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अंतरिम पदवी प्रमाणपत्र देण्यात न येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी " नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांची आवश्यक सोयी सुविधा व नियोजनाअभावी झालेली गैरसोय." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...8...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी " कृषी विभागामार्फत एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत करण्यात येणारी कामे शासन निर्णयास अनुसरून होत नसणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, यांनी " राज्यातील प्लॅनमधील शाळा नॉन प्लॅनमध्ये घेऊन त्यांना आरटीईप्रमाणे भौतिक सुविधा पुरविण्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे, यांनी " महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने इंधन समायोजन आकाराच्या नावाखाली राज्यातील वीज ग्राहकांकडून दरवाढ घेणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

**तालिका सभापती** : आता नियम 93 चे निवेदन घेण्यात येईल त्या निवेदनावर संबंधित सन्माननीय सदस्यांना फक्त एकच प्रश्न विचारता येईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : राज्यातील खुल्या प्रवर्गातील उमेदवारांच्या सरकारी नोकर भरतीकरिता आवश्यक असलेल्या वयोमर्यादेत इतर राज्यांमध्ये असलेल्या वयोमर्यादेप्रमाणे वाढ करण्याची होत असलेली मागणी, याबाबत श्री.सतिश चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.राम शिंदे (गृह राज्य मंत्री (ग्रामीण)) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

...10...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, या निवेदनात अत्यंत सविस्तर उत्तर देण्यात आलेले आहे, वयोमर्यादा वाढविण्याची सरकारची इच्छा दिसत नाही. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे मुख्यमंत्री महोदयांना आठ दिवसापूर्वी भेटले होते, त्यांनी अशी घोषणा केली होती डिसेंबर महिन्यात वयोमर्यादा वाढविण्यात येईल. निवेदनातील एका उत्तराला माझा आक्षेप आहे, सर्व साधारण उमेदवाराने पदवी प्राप्त केल्यानंतर सध्याच्या कमाल वयोमर्यादेनुसार राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी 11 ते 12 संधी मिळतात असे निवेदनात नमूद केले आहे. माझ्या महिती प्रमाणे 25 व्या वर्षी तो पहिल्यांदा परीक्षेला बसतो, त्यानंतर दोन किंवा तीन वर्षानंतर पुन्हा परीक्षा येते, दर दोन किंवा तीन वर्षानंतर एकदा परीक्षा देण्याची त्या उमेदवाराला संधी मिळते. अशा प्रकारे दोन ते तीन संधी त्या उमेदवाराला मिळतात. यामध्ये अजून एक आक्षेपार्ह वाक्य असे आहे की, आजच्या स्पर्धेच्या युगात तरुण उमेदवाराबाबत स्पर्धेमध्ये वयोधिक्य असलेले उमेदवार मागे पडतात, त्यामुळे सेवा प्रवेशासाठी वयोमर्यादा वाढवून उपयोग होईलच असे म्हणता येणार नाही. या वाक्याला माझा आक्षेप आहे. निवेदनात आणखी असे नमूद करण्यात आले आहे की, आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या तरुण अधिकाऱ्याची शासकीय कामासाठी आवश्यकता आहे. मंत्री महोदय, आपण देखील खेडेगावात शिक्षण घेतले आहे. खेड्यातील मुलाला नवीन तंत्रज्ञान वापरण्यासाठी 12 वी उजाडावी लागते. तो कॉलेजमध्ये गेल्यानंतर त्याला संगणक बघायला मिळतो. त्यामुळे यामध्ये शहरी मुले पुढेच जातात. माझी विनंती आहे की, या निवेदनावरुन आपण असा निर्णय घेतला असला तरी वयाच्या 25 व्या वर्षी त्याला तंत्रज्ञान बघायला मिळते त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांसाठी तरी ही वयोमर्यादा वाढविणार आहात काय ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी दोन तीन मुद्दे उपस्थित केले, त्याबाबत त्यांनी निवेदनाच्या शेवटचा परिच्छेद वाचला तर ही बाब आपल्या निदर्शनास निश्चित येईल. राज्यातील नोकरीसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय 33 वरुन 40 वर्षे करणे व पोलीस उप निरीक्षक पदासाठी वय 28 वरुन 31 वर्षे करण्यासाठी विविध

...11..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.राम शिंदे...

लोकप्रतिनिधी, परीक्षार्थी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या कमाल वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत शासन स्तरावरुन तपासणी करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी दिलेली सूचना व्यवहारी आहे, या दृष्टीकोनातून निवेदन करताना शासनाने आश्वस्त केले आहे की, ही बाब तपासून घेण्यात येत आहे. तपासणीचा अहवाल आल्यानंतर इतर राज्याच्या तुलनेत आपली काय परिस्थिती आहे त्याची देखील आकडेवारी देण्यात आली आहे. जे मुद्दे देण्यात आले आहेत त्याचा विचार करण्यात येत आहे, आणखी काही मुद्दे असतील तर त्याचा देखील तपासणीमध्ये समावेश करुन त्याचा रिपोर्ट तयार करण्यात येईल. शासन आपल्या मताशी सकारात्मक आहे, त्या दृष्टीकोनातून शासन निर्णय करणार आहे.

------

...FF-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : बीड जिल्हयातील बेरोजगार युवक रिक्षा चालकांना
शासनाच्या जाचक अटीमुळे परवाना मिळण्यास
व नूतनीकरण प्रक्रियेत होत असलेल्या अडचणी याबाबत
श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, बीड हा दुष्काळी जिल्हा आहे. या दुष्काळी जिल्हयात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या अधिक असताना रिक्षा परमिट नूतनीकरण करण्यासाठी 15 हजार रुपये रक्कम निश्चित केली आहे ती रक्कम 2500 पर्यंत कमी करण्यात यावी तसेच शैक्षणिक अर्हता दहावी ऐवजी पाचवी उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. मंत्री महोदय हे दोन निर्णय घोषित करतील काय? मागील आर्थिक वर्षात बीड जिल्हयात जे रिक्षा अपघात झाले त्यामधून असे दिसून आले की, रिक्षा परवाना नसणे, विमा काढलेला नसणे, टॅक्स भरलेला नसणे, यामुळे अपघातग्रस्त प्रवाशांना कोर्टात दावा दाखल करुनही नुकसानभरपाई मिळू शकली नाही. रिक्षा चालकाला अटक केली जाते, त्यांना कोर्टाकडून शिक्षा सुनावण्यात येते. परंतु रिक्षात बसून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची यात चूक नसते. परिस्थितीची अपरिहार्यता पाहता खास बाब म्हणून मराठवाड्यासाठी मी विनंती केल्याप्रमाणे निर्णय बदलले जातील काय?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, राज्यामध्ये 1998 मध्ये रिक्षा परवाने देणे बंद करण्यात आले. त्यानंतर नवीन रिक्षा परवाने 2015 पर्यंत देण्यात आलेले नव्हते. जून्या परवान्यांचे नूतनीकरण करण्यात येते. 1998 मधील काही परवान्यांचे अद्याप नूतनीकरण करण्याचे राहिले आहे. नव्याने जे परवाने देण्याचे सुरु करण्यात आले होते त्याकरिता आठवी व दहावी उत्तीर्ण ही शैक्षणिक अर्हता मागील सरकारने निश्चित केली होती. या संदर्भातील अडचण लक्षात घेऊन मी महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात फिरलो. रिक्षा चालकांच्या संघटनांबरोबर बैठका घेतल्या. रिक्षा परवान्याची मुदत संपल्यानंतर त्यांनी फक्त 100 रुपये भरुन परवान्याचे पुनरुज्जीवन करायचे आहे. संबंधित व्यक्तीला वेळेवर रिक्षा परवान्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी जाता आले नाही तर सहा महिन्यापर्यंत पुनरुज्जीवन करण्याची संधी देण्यात आली आहे. सहा महिन्यापैकी दुसऱ्या महिन्यात अर्ज केला तर 100 रुपये फी व 200 रुपये दंड भरुन परवान्याचे पुनरुज्जीवन करण्यात येणार आहे. सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर मोटार वाहन नियमाप्रमाणे प्रत्येक दिवसाला 100 रुपये दंडाची आकारणी केली जाणार आहे. अनेक रिक्षा चालकांनी त्यांच्या परवान्याचे सहा महिन्याची मुदत संपूनही नूतनीकरण केले नाही. आहे त्याच स्थितीत रिक्षा चालविण्यात येत आहेत. याकडे लक्ष देऊ नका असे त्यांना कोणी सांगितले याची मला माहिती नाही. त्यामुळे एका एका रिक्षा चालकाला 30 ते 32 हजार रुपये दंड लागू झालेला आहे. त्यांचा रोजगार बुडू नये म्हणून

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मी सामुदायिक निर्णय घेण्याचे ठरविले. मुंबईमध्ये पहिल्यांदा सर्व रिक्षा चालक संघटनांची बैठक घेणारा मी एकमेव मंत्री आहे. त्यांच्याशी विचारविनिमय केला. त्यांना दंड परवडत नाही आणि शासनाचे यातून 1000 कोटी रुपये बुडतील हे लक्षात आल्यानंतर त्यांनी काही तरी सवलत द्यावी अशी विनंती केली. संपूर्ण महाराष्ट्रात 1.40 लाख रिक्षा परवान्याचे पुनरुज्जीवन व्हायचे आहे. त्यांचा रोजगार वाचविण्यासाठी दंडाची रक्कम 15 हजार रुपयापर्यंत कमी करण्यात आली आहे. त्यासाठी एक महिन्याची मुदत दिली होती. परंतु एक महिन्याच्या काळात कोणीही परवान्याचे पुनरुज्जीवन केले नाही. पुन्हा एकदा लोकप्रतिनिधी, आमदार यांनी परिवहन मंत्र्यांना विनंती केल्यानंतर 30 नोव्हेंबरपर्यंत मुदत वाढविण्यात आली. परवान्याचे नूतनीकरण करताना व 15 हजार रुपये दंडाची वसुली करताना बँकेच्या लोनचा हप्ता दिला आहे की नाही, विम्याची रक्कम भरली आहे की नाही हे पाहिले जाते. रिक्षा परवान्याचे पुनरुज्जीवन करताना वाढवून दिलेल्या मुदतीमध्ये 15 हजार रुपये घेऊन नूतनीकरण करण्याची सवलत त्यांना दिली आहे. त्यांना पुनश्च रोजगार प्राप्त व्हावा यासाठी शासनामार्फत प्रामाणिकपणे केलेला प्रयत्न होता. योगायोगाने बीड जिल्हयामध्ये या सवलतीचा फायदा घेतला गेला नाही. मराठवाड्यातील इतर जिल्हयामध्ये फायदा घेतला गेला. माननीय सदस्यांनी मांडलेला प्रश्न हा जून्या रिक्षा चालकांचा आहे. नवीन रिक्षा खरेदी केली तर दुष्काळी भागातील परिस्थितीचा विचार करता सवलत देणार काय असा प्रश्न असेल तर त्याबाबत विचार होऊ शकतो. परंतु जूने रिक्षाचालक आहेत ते शासनाने दिलेल्या सवलतीकडे दुर्लक्ष करीत आलेले आहेत. माझ्याकडे छायाचित्र आहेत. विना क्रमांकाच्या रिक्षा चालविल्या जात आहेत. विमा काढण्याची जबाबदारी त्यांची आहे. तपासण्याची जबाबदारी परिवहन विभागाची आहे. अशा परिस्थितीत रिक्षा चालविल्या जातात आणि जे अपघात घडतात ते दुर्दैवी आहे. अशा प्रकारची परवाना पुनरुज्जीवन करण्याची सवलत काहींनी घेतली आहे. बीड हा एकमेव जिल्हा आहे, ज्या जिल्हयात फक्त 15 लोकांनी सवलतीचा लाभ घेतला आहे. बीड जिल्हयात 4111 रिक्षा आहेत त्यापैकी 3362 रिक्षा चालकांनी सवलतीचा लाभ घेतलेला नाही, उर्वरित रिक्षा चालकांकडे परवाना आहे. माननीय सदस्यांनी केलेल्या विनंतीनुसार तीन महिने मुदत वाढवून दिली. सरकारने रिक्षा चालकांसाठी सकारात्मक पाऊल उचलले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, परवान्याचे नूतनीकरण करीत असताना अशा प्रकारची सवलत देता येत नाही असे मंत्री महोदयांनी सांगितले. बीड जिल्हयात फक्त 15 नूतनीकरणाच्या केसेस झाल्या आहेत. तेथील लोकांचा आर्थिक स्तर पाहता ही रक्कम भरणे शक्य होत नाही म्हणून मी विनंती केली आहे. ज्या भागात सर्वाधिक आत्महत्या घडत आहेत, उत्पन्नाचे स्त्रोत कमी होत आहेत त्या भागासाठी किमान विद्यार्थी शाळेत जात असताना त्यांना शाळेत घेऊन जाणाऱ्या रिक्षा बंद होता कामा नयेत म्हणून मंत्री महोदयांनी 15 हजार रुपयांऐवजी किमान 10 हजार रुपयापर्यंत रक्कम निश्चित करावी. शैक्षणिक अर्हता दहावी ऐवजी आठवी उत्तीर्ण निश्चित करुन पुन्हा एकदा सवलत देता येईल का?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दिलेल्या तीन महिन्याच्या मुदतीत प्रयत्न केला असता तर निश्चित या संधीचा फायदा घेता आला असता, तो घेतला गेला नाही. इतर ठिकाणी फायदा घेतला गेला आहे. या संदर्भात उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आली होती. अवैध वाहतूक तातडीने थांबविण्यासाठी उच्च न्यायालयाने अत्यंत कडक निर्णय दिलेला आहे. उच्च न्यायालयाने सरकारला कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की, "Any undue interference, caused or forced, is used to interfere in the functioning of the Committee by any person or third agency the same will be dealt strictly by taking coercive action." उच्च न्यायालयाच्या कचाट्यातून यांना सोडविण्यासाठी आणि त्यांना रोजगार मिळण्यासाठी आम्ही प्रयत्न केला आहे. त्याला चांगला प्रतिसादही मिळाला आहे. यापुढे ज्या रिक्षा सोडत निघाल्या त्याकरिता शैक्षणिक अर्हतेची अट दहावी ऐवजी आठवी उत्तीर्ण अशी केली आहे. पूर्वीच्या सरकारने दहावी व आठवी उत्तीर्ण अशी अट घातली होती. आम्ही दहावी ऐवजी आठवी उत्तीर्ण असण्याची सूट दिलेली आहे.

------

**तालिका सभापती :** माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या सूचना क्रमांक 12 वरील निवेदन पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचना क्रमांक 8 चे निवेदन दुसऱ्या क्रमांकावर असताना आपण इतरांची सोय बघत आहात. मला कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला जायचे आहे.

2जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : मी सर्वांची सोय बघत असतो. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त साहेब आपल्याला कामकाज सल्लागार समितीमध्ये जावयाचे आहे यासंदर्भात आपण माझ्याशी बोलला नाहीत किंवा आपण मला चिठ्ठी देखील पाठवली नाही त्यामुळे आपण कशासाठी उभे आहात ते कळाले नाही. आता सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांची सूचना क्रमांक 8 घेण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांचा आग्रह पाचवी पास झालेल्या उमेदवारांना ड्रायव्हींग लायसेन्स देण्याच्या संदर्भातील मुद्दा होता व तो ग्राहय धरण्याची आवश्यकता होती. आपण आता आठवी पर्यंतचे शिक्षण सक्कीचे व मोफत केलेले आहे. परंतु हा कायदा 1 एप्रिल, 2010 मध्ये अंमलात आलेला होता. 18 वर्षाच्या वरील मुलांनाच फक्त लायसेन्स मिळू शकते त्याच्या अगोदर आठवी पर्यंतचे शिक्षण सक्तीचे आणि मोफत नव्हते. त्यामुळे त्या आधीची जी मुले 18 वर्षाची आहेत त्यांना ती संधी मिळाली नव्हती म्हणून पाचवी पास पर्यंत लायसेन्सची अट ठेवणे हे कायद्याने आवश्यक आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय परिवहन मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. (अडथळा) विषय संपलेला असताना सुध्दा मी आपले म्हणणे ऐकून घेतलेले आहे. आपल्या भावना रेकॉर्डवर आलेल्या असून आपल्या भावना मंत्री महोदयांपर्यंत पोहचविण्याची व्यवस्था करतो. आता सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांची सूचना क्रमांक 8 वर आपले विचार व्यक्त करावेत.

--

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** :आदिवासी विकास विभागातील वसतीगृहातील विद्यार्थी आदिवासी विकास मंत्र्यांच्या भेटीसाठी वाड येथे आलेले असताना त्यांना मारहाण होणे याबाबत श्री.संजय दत्त,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा. राम शिंदे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 8 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, राज्यभरातील आदिवासी विकास विभागातील वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्यांच्या संदर्भातील शिष्टमंडळ माननीय मंत्री महोदयांना भेटावयास गेले होते. हा विषय सोडविण्याऐवजी मंत्री महोदयांच्या समर्थकांनी त्यांना मारहान केली ही मुळ तक्रार आहे. या निवेदनात जे उत्तर देण्यात आलेले आहे ते मुळ विषयाला पांघरुण घालण्याचा प्रयत्न आहे, साप सोडून लाठी झोडपण्याचा हा प्रकार आहे. त्यामुळे या प्रकरणाची नेमकी चौकशी कोणी केली आहे ? या प्रकरणाची फेर चौकशी वरिष्ठ अधिकाऱ्याकडून केली जाईल काय ?

प्रा.राम शिंदे : या विषयाच्या संदर्भात निवेदनात सविस्तर माहिती देण्यात आलेली असून त्या अनुशंगाने 6 आरोपींना अटक देखील केलेली आहे. डीवायएसपी, जवाहर विभाग श्री. प्रदिप जाधव यांच्या मार्फत या प्रकरणाची पुढील चौकशी सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुशंगाने केसेस सुरु असून त्यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. विद्यार्थ्यांचा पहिला मोर्चा आला होता त्यांच्यावरही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. श्रमजिवी संघटनेच्या माध्यमातून मोर्चा आला त्यांच्यावरही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. ज्या विद्यार्थ्यांना मारहाण करण्यात आली त्या अनुशंगाने 29 तारखेलाच गुन्हा दाखल केलेला आहे. गुन्हा दाखल करण्यात आलेल्या पोलीस स्टेशनकडे चौकशीचे काम दिले नाही. या प्रकरणाची चौकशी जवाहर विभागाचे डियायएसपी श्री. प्रदिप जाधव यांच्या मार्फत सुरु आहे.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांच्या सूचने संदर्भात मंत्र्यांकडे माहिती न आल्यामुळे ती पुढे ढकलण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. सतिश चव्हाण साहेब कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीसाठी गेले असल्यामुळे त्यांची सूचना उद्या घेण्यात येईल. आता सन्माननीय सदस्य श्री. आनंद ठाकूर यांनी आपल्या सूचना क्रमांक एक मांडावी.

--

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** :पालघर जिल्हयातील तारापूर अणुऊर्जा तसेच तारापूर बीएआरसीमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांकडून पगारातील 100 रुपये रक्कम कंत्राटदार परस्पर लंपास करीत असणे याबाबत श्री.आनंद ठाकूर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. प्रकाश महेता ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आनंद ठाकूर: सभापती महोदय, निवदेनामध्ये सर्व माहिती बरोबर दिलेली आहे. परंतु या विषयाच्या संदर्भात मला काही प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत. या ठिकाणी कंत्राटी काम करणारे कामगार हे प्रकल्पविस्थापित आहेत. हे कामगार भिवली आणि अक्करपट्टी या गावातील ही मंडळी आहेत. त्यांना गरज असल्यामुळे ते अनेक वर्षापासून अन्याय सहन करीत आहेत. हा प्रकल्प केंद्राचा असून सुरक्षेच्या दृष्टीने कोणालाही त्या ठिकाणी प्रवेश मिळत नाही. आयकार्ड असेल तरच कामगारांना प्रवेश दिला जातो. हा विषय आपल्या अधिकार क्षेत्रात पुर्णपणे नसला तरी इमरजन्सी ग्रील असेल किंवा वेगवेगळया गोष्टी करीत असताना आपल्या अधिकाऱ्यांना बरोबर घेऊनच करावे लागत असते. आपल्या अधिकाऱ्यांशी समन्वय ठेवून काम केले जातात. कंत्राटी कामगारांकडून पैसे घेतले जातात असा आरोप यामध्ये करण्यात आलेला आहे. ऑन रेकॉर्ड खाल्लेले पैसे आपल्याला दिसतात परंतु या व्यतिरिक्तही पैसे खाल्ले जातात. कामगारांना गरज असल्यामुळे ते तोंडघशी पडतात. त्यामुळे राज्य सरकारच्या यंत्रणेने मार्फत वॉच ठेवून न्याय देण्यात यावा एवढीय या प्रसंगी माझी सूचना आहे.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात निवेदन सविस्तरपणे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. या ठिकाणी कंत्राटदार कंत्राटी कामगारांवर अन्याय करीत आहे. यासंदर्भात प्रविण नामदेव हंबिरे व इतर 12 कंत्राटी कामगारांनी तक्रार केल्याबरोबर त्यासंदर्भात गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. या विषयाच्या संदर्भातील सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या श्रम आयुक्तांना कळविण्यात आलेली आहे. थोडयाच दिवसात या विषयाच्या संदर्भात बैठक घेऊन तसेच यासंदर्भात कामगारांकडून स्पष्टीकरण घेऊन कंत्राटी कामगारांना न्याय देण्याचा निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांची सूचना क्रमांक 11 असून ते कामकाज सल्लागार समितीसाठी गेले असल्यामुळे त्यांची सूचना नंतर घेण्यात येईल. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे साहेब यांची सूचना आहे परंतु ते देखील कामकाज सल्लागार समितीसाठी गेले असल्यामुळे त्यांची सूचना नंतर घेण्यात येईल. आता सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांची सूचना क्रमांक 6 असून त्यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

---

....8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** :राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र शाळा संहिता तयार करण्याबाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.दिलीप कांबळे ( सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 6 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

...9...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे :सभापती महोदय, राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रमशाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शाळा संहिता लागू करावी यासाठी मी हा विषय उपस्थित केली आहे. हे शासन पैशाची कोणतीही मागणी मान्य करीत नाही. कोणतीही आर्थिक मागणी केली की, हे शासन पैसे नाही म्हणून रडत बसते. शाळा संहिता विषय हा बिनपैशाचा आहे. शाळा संहिहतेमध्ये सरकारला पाच नये पैसे सुध्दा द्यावे लागणार नाही. शाळा संहिता सन 2008 मध्ये तयार झाली होती. शाळा संहिता तयार होऊन आज जवळपास सात वर्षाचा कालावधी झालेला आहे. शाळा संहितेच्या संदर्भात मी प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित करीत असतो. सर्व शिक्षक आमदार शाळा संहितेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करीत असतात. शाळा संहिता होऊ नये यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित आहे की, काय अशी शंका आमच्या मनात येत आहे. शाळा संहिता झाली तर आमच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळू शकणार आहे.

2H-1/......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे..

माननीय मंत्री कोणते उत्तर देणार आहेत याची मला माहिती आहे. आम्ही त्यांच्याकडे एक वजनदार मंत्री म्हणून पाहत आहोत. मंत्री महोदयांनी दोन पानांचे निवेदन दिलेले आहे. ते निवेदन आम्ही वाचलेले आहे. आम्हाला असे वाटले होते की, निवेदनाच्या शे्वटच्या ओळीमध्ये तरी शाळा संहिता मंजूर करण्यात आलेली आहे असे वाचावयास मिळेल. परंतु तसे झालेले नाही. आजपर्यंत शाळा संहिता का मंजूर झालेली नाही ? ही शाळा संहिता होऊ नये किंवा ती उशिराने व्हावी म्हणून एखादी यंत्रणा कार्यान्वीत आहे की काय अशी शंका आमच्या मनात येते. तेव्हा आपण या संदर्भात चौकश्ी करणार आहात काय ? मंत्री महोदयांनी मागील अधिवेशनात उत्तर दिले होते की,आपणास पुढच्या अधिवेश्नात हा प्रश्न विचारावा लागणार नाही. हे अधिवेशन संपण्यापूर्वी ही शाळा संहिता मंजूर करुन त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करणार येईल काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन 2003 मध्ये तत्कालीन सामजिक न्याय मंत्री महोदयांनी ही घोषणा केली होती. सन 2003 पासून या विषयावर वेगवेगळ्या समित्या, चर्चा, उप समित्या झाल्या. मी याठिकाणी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, सामाजिक न्याय विभागाने शाळा संहितेची प्रक्रिया पूर्ण केली आहे. आरटीआय कायद्यांतर्गत शिक्षण विभागाकडे ती मंजुरीसाठी पाठविलेली आहे. शिक्षण विभागाकडून तपासून आल्यानंतर ज्या दिवशी ती संहिता येईल त्याच दिवशी जी.आर.काढण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हे सरकार पैसे नाहीत, पैसे नाहीत असे सांगते, त्यांनी सांगितलेली बाब खरी आहे. कारण मागच्या सरकारने काहीच शिल्लक ठेवले नाही. परंतु ज्या ठिकाणी पैसे द्यायची गरज आहे त्या ठिकाणी सामाजिक न्याय विभागाने पैसे दिलेले आहेत आणि हे सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना देखील माहीत आहे.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते ):** आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

( दुपारी 3.43 ते 4.13 वाजेपर्यंत मध्यंतर )

....... 2I-1

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**<u>शासनाच्या संकेतस्थळावर राष्ट्रपुरुषांच्या चुकीच्या जन्मतिथी अपलोड केल्याबाबत</u>**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, काल पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असताना सामान्य प्रशासन विभागाने राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या जयंती/पुण्यतिथी निमित्त काढलेल्या शासन निर्णयाचा संदर्भ देऊन, राष्ट्रपुरुष व महापुरुषांच्या जन्मतारखा कशा बदलल्या जातात याचा पुरावा मी माननीय सभापतींकडे दिला होता. महोदय, राज्य सरकारकडून या संदर्भात एकदा नव्हे तर दोनदा परिपत्रक काढण्यात आले. दिनांक 30 नोव्हेंबर, 2015 रोजी दुपारी 3 वाजून 49 मिनिटे 45 सेकंदांनी शासनाच्या संकेत स्थळावर एक शासन निर्णय अपलोड केला गेला. त्या शासन निर्णयात राजर्षी शाहू महाराजांची जयंती 26 जून ऐवजी 26 जुलैला दर्शविण्यात आली. महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे, म्हणून मी उपस्थित करीत आहे. तसेच महात्मा बसवेश्वर आणि राणा महाराणा प्रताप यांच्या जन्मतारखेच्या बाबतीत सुध्दा असेच घडले आहे. हा विषय मी पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केला होता. सभापती महोदय, दिनांक 3 डिसेंबर, 2015 रोजी सायंकाळी 5 वाजून 5 मिनिटे 34 सेकंदाला शासनाच्या संकेत स्थळावर अगोदरचा शासन निर्णय बदलून नवीन शासन निर्णय अपलोड केला. त्यामध्ये राजर्षी शाहू महाराजांची जन्मतारीख 26 जून असल्याचे नमूद केले आहे. यावरुन आपल्या लक्षात येईल की, राज्य सरकारकडून राष्ट्रपुरुषांच्या जन्मतारखेबाबत कशा प्रकारे बदल केला जात आहे. हा विषय सभागृहात उपस्थित करुन सुध्दा शासनाकडून कसल्याही प्रकारचा खुलासा केला जात नाही. वास्तविक पाहता शासनाच्या संकेत स्थळावर शासन निर्णय अपलोड करीत असताना त्यासाठी विशिष्ट प्रक्रिया पार पाडावी लागते. दि. 30 नोव्हेंबर, 2015 रोजी काढलेल्या शासन निर्णयामध्ये दुरुस्ती करण्याबाबत काहीही सांगितले गेले नाही. राज्य सरकारने सुधारित शासन निर्णय काढलेला नाही. त्याची प्रक्रिया सुध्दा फॉलो केली नाही. महापुरुषांच्या जन्मतारखांच्या बाबतीत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ AKN/ ST/ 16:16

श्री.धनंजय मुंडे....

सरकारकडून अशा प्रकारे राजकारण होत असेल, एवढ्या भयंकर चुका होत असतील तर त्याची दखल घेतली पाहिजे. माझी विनंती आहे की, आपण शासनाला या विषयी खुलासा करण्याचे निदेश द्यावेत.

**उप सभापती** : ठीक आहे. मला वाटते अगोदर विनियोजन विधेयक संमत करु या.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** (तृतिय पुरवणी) विनियोजन विधेयक

**L. A. BILL NO. LXVIII OF 2015**

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2016.)

श्री.दीपक केसरकर : (वित्त राज्यमंत्री ) :सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-68, दिनांक 31 मार्च, 2016 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती :** ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शासनाच्या संकेतस्थळावर राष्ट्रपुरुषांच्या चुकीच्या जन्मतिथी अपलोड केल्याबाबत**

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी जो विषय अवगत करुन दिला त्या अनुषंगाने सांगू इच्छितो की,...

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ज्यांनी चुकीच्या तारखा अपलोड केल्या असतील त्यांना निलंबित केले पाहिजे. शासनाच्या संकेतस्थळावर राष्ट्रपुरुष किंवा थोर व्यक्तींच्या चुकीच्या जन्मतारखा अपलोड केल्याबाबतचा हा विषय आहे. अगोदर चुकीच्या जन्मतारखेचा अपलोड केलेला शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावरुन काढून पुन्हा नव्याने अपलोड केला आहे.

..2जी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अशा प्रकार होत असेल तर ते योग्य नाही. माननीय मंत्र्यांनी किमान निवेदन तरी केले पाहिजे.

**उप सभापती** : मी तेच सांगत आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, काल माननीय मुख्यमंत्र्यांनी ॲडव्होकेट जनरल श्रीहरी अणे यांच्या संदर्भात निवेदन करण्याचे आश्वासन दिले होते. मी आपल्या माध्यमातून माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना आठवण करून देतो. आता संध्याकाळ झाली आहे. कृपया ते निवेदन करावे.

**उप सभापती** : ठीक आहे. आता दुष्काळाच्या प्रस्तावावरील चर्चेच्या उत्तराला सुरुवात होत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात पडलेला भीषण दुष्काळ, अवकाळी पाऊस व गारपीट आणि तीव्र टंचाई यामुळे निर्माण झालेली परिस्थिती तसेच अवकाळी पाऊस,गारपीटीमुळे खरीप व रब्बी पिकांच्या झालेल्या हानीमुळे राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट

**मु.शी.**: "राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात पडलेला भीषण दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट आणि तीव्र टंचाई यामुळे निर्माण झालेली परिस्थिती" या विषयावर ***सर्वश्री.धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, अमरसिंह पंडित, जयंत प्र.पाटील, शरद रणपिसे, सतिश चव्हाण, संजय दत्त, संदीप बाजोरिया, विक्रम काळे, ख्वाजा बेग, प्रकाश गजभिये, प्रा.जोगेंद्र कवाडे, राजेंद्र मुळक, अमरनाथ राजूरकर, सुभाष झांबड, चंद्रकांत रघुवंशी, जयवंतराव जाधव, अब्दुल्ला खान दुर्राणी, श्रीमती दिप्ती चवधरी, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, वि.प.स.*** यांचा प्रस्ताव तसेच "अवकाळी पाऊस, गारपीटीमुळे खरीप व रब्बी पिकांच्या झालेल्या हानीमुळे राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट" या विषयावर श्री.पांडुरंग फुंडकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.गोपीकिशन बाजोरिया, प्रा.अनिल सोले, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री विजय गिरकर, महादेव जानकर, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरू ....

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, गेली 2 दिवस सभागृहात राज्यात पडलेल्या भीषण दुष्काळाच्या संदर्भात चर्चा सुरू आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत सहभाग घेतला. यादी फार मोठी आहे. चर्चेत सहभाग घेतलेल्या सन्माननीय सदस्यांचे मी आभार मानतो. सन्माननीय सदस्यांनी चर्चेच्या माध्यमातून अनेक चांगल्या, उपयुक्त सूचना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

शासनाला केल्या. राज्यात दुष्काळ हा काही नवीन नाही. गेल्या अनेक वर्षांत पडलेल्या दुष्काळापेक्षा आताच्या दुष्काळाची तीव्रता मोठी आहे. पूर्वीच्या कालखंडात सन 1972 मध्ये राज्यभरात दुष्काळाची तीव्रता जाणवली. त्यावेळी सर्व राज्यात दुष्काळ होता. आता दुष्काळाची स्थिती साधारणत: 15 हजार गावांमध्ये आहे. 15747 गावांत दुष्काळाची झळ मोठ्या प्रमाणात आहे. 15747 गावांत राज्य सरकारच्या माध्यमातून विविध उपाययोजनांना सुरुवात केली आहे. महाराष्ट्राच्या अर्थकारणाच्या माध्यमातून दुष्काळ निवारण करण्यासाठी तात्पुरत्या उपायोजना, काही दीर्घकालीन उपायोजना आतापर्यंत अनेक तज्ज्ञांनी सुचविल्या होत्या.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आहे. त्यामध्ये दुष्काळ, आत्महत्याग्रस्त परिसर, कर्जमुक्ती, कर्जमाफी, न झालेले शेती उत्पादन, शेती मालाला भाव नसणे या संदर्भातील विषय होते. दुष्काळ, यावर्षी पडलेला पाऊस आणि त्यावर केलेल्या उपायोजना एवढ्यापुरते मर्यादित उत्तर देण्याचे कारण नाही.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांना सर्व विषय माहीत आहेत, त्यांनी सर्व टिपण्ण्या आणल्या आहेत. माननीय मंत्र्यांचे भाषण सुरू झाल्यानंतर ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी असे मध्येच उठून बोलणे आपल्या परंपरेला साजेसे नाही असे मला वाटते. भाषण झाल्यावर जर काही राहिले असेल तर त्याची आठवण केली असती तर ठीक आहे. भाषणास सुरुवात झाली तोपर्यंत भाषणाच्या मध्ये बोलणे बरोबर नाही. आपण ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहात. सभापती महोदय, आपण त्यांना सांगावे अशी विनंती आहे. मी समज द्यावी असे म्हणणार होतो. पण म्हणत नाही. पण आपण सांगावे एवढी विनंती करतो.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, प्रस्तावात असलेल्या प्रश्नांप्रमाणे आम्हाला उत्तर मिळाले पाहिजे. एकच विषय घेऊन उत्तर देऊ नये.

**उप सभापती** : माननीय मंत्र्यांनी उत्तर सुरु केले आहे. माननीय मंत्र्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे मला आपले आश्चर्य वाटते, आपण ज्येष्ठ आहात. राज्यातील प्रमुख पक्षाचे काही काळ प्रमुख होता. (अडथळा) त्यांनी तहयात रहावे अशी माझी शुभेच्छा आहे. वरचे अनुकरण खाली करावे. मला त्याबद्दल हरकत घेण्याचे कारण नाही. पण आपण सुरूवात केली. पुढचा शब्द बोलण्याअगोदर मध्येच उठला. आपण ज्येष्ठ आहात. तुम्ही माझे मार्गदर्शक आहात. (अडथळा) घोषणा करण्याअगोदर असे केले तर कसे होईल. दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, गारपीट, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे विषय देखील येतील. सुरूवात कुठून तरी करावी लागते. त्यामुळे मी दुष्काळापासून सुरूवात केली. विजेच्या कनेक्शनच्या संदर्भातील देखील विषय येतील.

सभापती महोदय, दुष्काळाची भीषण तीव्रता लक्षात घेता मागच्याही आणि आताच्या कालखंडातही अनेक उपाययोजना राज्य शासनाने केलेल्या आहेत. महाराष्ट्रातील अर्थकारण, कृषी विज्ञान, सिंचन विज्ञान, जलभूमिसंबंधाचा शास्त्रीय अभ्यास या माध्यमातून विविध तज्ज्ञांनी आतापर्यंत काही सूचना केल्या त्या सुचनांचाही नीट विचार शासनाने केला. दुष्काळ हा मनुष्यनिर्मित आहे, निसर्गनिर्मित आहे, सरकारनिर्मित आहे की अन्य कशामुळे दुष्काळ आहे हा भाग निराळा आहे. दुष्काळ हा दुष्काळ होतो. राज्यात आत्महत्या होत आहेत हे नाकारता येत नाही. सरकार कोणाचे होते, काय होते, किती आत्महत्या झाल्या, आताच कमी झाल्या का, जास्त झाल्या का याला अर्थ नाही. राज्याच्या दृष्टीने दुर्दैवाची बाब ही आहे की, राज्यात आत्महत्या होत आहेत. गेल्या 15 वर्षांच्या कालखंडात विविध उपायोजना करून सुध्दा आत्महत्यांचे प्रमाण म्हणावे तसे कमी झालेले नाही. आता उपाययोजना सांगत आहात, गेली 2-3 दिवस सभागृहाचे कामकाज बंद पडले, ते एका कारणासाठी बंद पडले की, कर्जमुक्तीची घोषणा झाली पाहिजे. कर्जमुक्ती झाली पाहिजे. आपण यासाठी 3-4 दिवस आग्रह धरला. सरकार म्हणून मी सांगू इच्छितो की, कर्जमुक्ती हा एकमेव उपाय आत्महत्या थांबण्यासाठी नाही. एक उपाय होऊ शकतो. मागच्या वर्षामधील अनुभव या संदर्भात आहे, त्याचा विचार करून कशारितीने त्या आत्महत्या थांबविता येतील, याबाबतची उपाययोजना मागच्या व याही सरकारने मोठ्या प्रमाणावर केली. मघाशी उल्लेख केला गेला की, माननीय श्री शरदचंद्र पवार साहेबांनी जवळपास 70 हजार कोटी रूपयाचे शेतकऱ्यांचे कर्ज

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

देशभरात माफ केले. आपले सरकार असताना 70 हजार कोटी रूपये माफ झाले, नंतरही 20 हजार रूपयांपर्यंत शेतकऱ्यांच्या कर्जाला सवलत आपले सरकार असताना दिली. तेव्हा असे वाटले होते की, आता शेतकरी कर्जमुक्त झाला. 70 हजार कोटी रूपये दिले. नंतरच्या कालखंडात आपण सूचनेनुसार मदत केली, मी आपल्यला असे म्हणत नाही की मदत केली नाही. प्रश्न असा आहे की, हे केल्यानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी झाले का ? उत्तर 'नाही' असे आहे. कर्जमुक्ती केल्यानंतरही, एवढा पैसा दिल्यानंतरही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये घट आली नाही. उलट आकडेवारी सांगत आहे की, दुष्काळ पडला त्यावेळी आत्महत्यांचे प्रमाण काही प्रमाणात वाढले. स्वाभाविक आहे. दुष्काळ पडल्यानंतर आत्महत्यांचे प्रमाण वाढणे स्वाभाविक आहे. मागच्याही वर्षी दुष्काळ होता आणि याही वर्षी आहे. आकडे आले आहेत. यावेळी पहिल्यांदा असे घडले आहे की, दुष्काळ पडल्यानंतर आत्महत्यांचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाल्याचे दिसत आहे. आम्ही विचार करीत आहोत. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, कर्जमुक्ती करा. ठीक आहे. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, विजेचे सर्व बिल माफ करावे. मला आठवते की, मागच्या सरकारने विजेचे बिल 3 हॉर्सपॉवरपर्यंत पूर्णतः माफ केले होते. आताही या सरकारने कृषी संजीवनी योजनेच्या माध्यमातून विज बिलामध्ये 50 टक्के सवलत देण्याचे धोरण घेतले आहे.

....2K

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे........

100 टक्के वीज बिल माफ केल्यानंतर किंवा 50 टक्के वीज बिल माफ केल्यानंतर राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण घटले का ? याचे उत्तर 'नाही', असे आहे. ज्या ठिकाणी दुष्काळ पडला, मोठ्या प्रमाणावर कर्जाची मर्यादा संपलेली आहे, पत राहिलेली नाही, कर्ज भरण्याइतपत पैसे नाहीत, त्या ठिकाणी कर्जाचे पुनर्गठण केले पाहिजे, हा निर्णय आजचा नाही. गेल्या काही वर्षांपासून या राज्यामध्ये कर्जाचे पुनर्गठण करण्याचा निर्णय प्रत्येक सरकारने घेतलेला आहे. दुष्काळ पडला की, सातत्याने कर्जाचे पुनर्गठण करणे, शालेय विद्यार्थ्यांची फी माफ करणे, वीज बिलामध्ये 33 टक्के सवलत देणे, रोजगार हमी योजनेच्या कामांना मान्यता देऊन मोठ्या प्रमाणावर कामे घरापर्यंत पोहोचविणे, दुष्काळ, टंचाई असेल त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी टँकर पुरविणे आणि त्याबाबतचे अधिकारी तहसीलदारांना देणे, जनावरांच्या चारा छावण्या उभ्या करुन त्यासंदर्भातील मदत करणे, या संदर्भात शासनाचे स्थायी आदेश आहेत. यात नवीन काहीही नाही. या वर्षी शासनाने असा निर्णय घेतला आहे की, कर्जाचे पुनर्गठण करीत असताना 3 वर्षाची मुदत आपण 5 वर्षापर्यंत वाढविली आहे. आता शेतकऱ्यांना पाच वर्षाच्या कालावधीत कर्जाचा परतावा करता येईल. कर्जावरील व्याज 12 टक्के आहे. पुनर्गठणाच्या पहिल्या वर्षाचे 100 टक्के व्याज सरकारने भरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यावरील एक वर्षाचा व्याजाचा बोजा कमी झाला आहे आणि पुढील राहिलेल्या 4 वर्षाच्या 12 टक्के व्याजातील 6 टक्के व्याज शेतकऱ्यांने भरावयाचे आहे व उर्वरित 6 टक्क्याच्या रकमेचा परतावा शासनाकडून करण्यात येणार आहे. म्हणजे पुढील 4 वर्षाचा 6 टक्के व्याजाचा बोजाही सरकारने घेतला आहे. तसेच, ज्या शेतकऱ्याच्या कर्जाचे पुनर्गठण करण्यात आले आहे त्यांना नवीन कर्ज मिळाले पाहिजे, या संदर्भातील सूचनाही राज्य सहकारी बँकेला देण्यात आल्या आहेत. कर्जापासून कोणी शेतकरी वंचित राहू नये, याची काळजी राज्य सरकारने घेतलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना मी सांगू इच्छितो की, परवा यवतमाळ जिल्ह्याची आकडेवारी मी घेतली. या जिल्ह्यामध्ये 28 टक्के शेतकऱ्यांनी कर्ज उचलले आहे. ही टक्केवारी राज्याच्या सरासरी टक्केवारीपेक्षा जास्त नाही. आपण जर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे........

कर्जमुक्तीचा निर्णय घेतला तर 28 टक्के शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा मिळेल उर्वरित 72 टक्के शेतकऱ्यांचे काय करायचे ? 100 टक्के कर्ज माफ केल्यानंतर आत्महत्या थांबतील, असा आपला दावा असेल तर त्याचा फायदा केवळ 28 टक्के शेतकऱ्यांनाच होणार आहे आणि 72 टक्के शेतकऱ्यांचा प्रश्न अनुत्तरीतच राहणार आहे. आत्महत्यांच्या संदर्भात असे लक्षात आले की, नापिकीमुळे, कर्जामुळे, सावकाराकडील कर्जाची परतफेड करु न शकल्यामुळे आत्महत्या झाल्या.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, या सरकारने सावकाराचे कर्ज माफ केले आणि सावकाराचे भले केले. ही गोष्ट खरी आहे की, या राज्यामध्ये सावकारांना पैसे दिले, कशासाठी दिले ? सावकारांचे भले करण्यासाठी नाही, सावकाराकडे शेतकऱ्यांची जमीन गहाण होती, घर गहाण होते, त्याच्या अगेंस्ट सरकारने पैसे दिले आणि शेतकऱ्यांची सर्व शेतजमीन, घर सावकाराच्या पाशातून मुक्त करुन दिली. (अडथळा.....) सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड साहेब आपण कृपया बसावे. तुमची सावकारी मला माहीत आहे.

सभापती महोदय, सावकाराच्या कर्जातुन मुक्त केल्यामुळेच त्या शेतकऱ्याला बँकांकडून कर्ज मिळाले. सावकाराला पैसे देत असताना जे अधिकृत परवानाधारक सावकार आहेत आणि ज्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात कर्ज दिलेले आहे, त्यांना पैसे परत देत असताना ज्या शेतकऱ्याकडून त्याने लिहून घेतले असेल, स्टॅम्प पेपरवर तारण किंवा गहाण ठेऊन घेतले असेल, अशी जमीन सोडविल्याशिवाय त्यांना पैसे दिलेले नाहीत. सावकाराला पैसे देत असताना शासनाने शेतकऱ्याला कर्जमुक्त केले नाही का, त्या शेतकऱ्याची शेतजमीन सावकारी पाशातून मुक्त केली नाही का ? या पुढेही आम्ही अशा प्रकारे सावकाराचे कर्ज फेडू. अजूनही सावकाराकडून कोणी कर्ज घेतले असेल तर अशा राहिलेल्या शेतकऱ्यांचे सावकाराकडील 100 टक्के कर्ज मुक्त करण्याची राज्य सरकारची तयारी आहे.

सभापती महोदय, मी विरोधी पक्षाला विचारु इच्छितो की, या सावकारांना सावकारीचा परवाना कोणी दिला आहे ? सावकारांना परवाना देणे गैर आहे का ? या सावकारांना कायद्याने

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे........

परवाना दिलेला आहे. तो सहकारामधील नियम आहे. ज्यावेळी कोठुनही कर्ज मिळत नाही त्यावेळी त्याला सावकारी कायद्याने कर्ज देण्याचा अधिकार हा सरकारने दिलेला आहे. या सावकारांना सावकारीचा परवाना तुमच्या कालखंडात दिलेला आहे. कालच माननीय उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका सावकाराला 10 लाख रुपये भरावेत, असा आदेश दिलेला आहे. माननीय श्री.सानंदा, खामगाव यांची सावकारीच्या संदर्भात नागपूर उच्च न्यायालयात काल तारीख होती. श्री.सानंदांनी सांगितले की, "हो, मी सावकारी करतो." त्यांना 10 लाख रुपयाचा दंड झाला होता. सावकाराला किती पाठीशी घालावे ? न्यायालयाने केलेला दंड तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सरकारी तिजोरीतून भरला होता. कोणी संरक्षण दिले सावकारीला ? काल उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या जस्टिस चौधरी यांनी असे ताशेरे ओढले आहेत की, "जनतेच्या करातून आलेला पैसा, गरीब माणसाकडून टॅक्सच्या रुपाने आलेला पैसा तुम्ही सावकाराचा दंड भरण्यासाठी भरत." त्या सावकाराला त्यांनी सुनावले की, पहिल्यांदा सरकारला पैसे परत कर. हा सानंदा कोण आहे, किती वर्ष, कोणामध्ये आहे, अजूनही कोणामध्ये आहे ? सावकाराला आम्ही पाठीशी घालत होतो की, तुम्ही घालीत होता ? मी काल जे घडले ते सांगत आहे. (अडथळा....) ते माझेही मित्र आहेत. सावकार मित्र असू नये, असा काही नियम आहे का ? अधिकृत आहे, परवानाधारक आहे. सानंदाकडे लायसन्स आहे. मी त्याबद्दल बोलत नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी मला हे सांगावयाचे आहे की, ज्या शेतकऱ्याचे अजूनही सावकाराकडे कर्ज असेल, जे कार्यक्षेत्राच्या बाहेर आहे आणि जे माफ झाले नाही, त्यासंदर्भातील निर्णय हे सरकार घेईल. (अडथळा....) शेतकऱ्यांचा सातबारा तुम्ही कोरा केला होता ना ? माननीय पवार साहेबांनी पीक कर्ज माफ केले त्यावेळी सातबारा कोरा केला होता.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, यवतमाळचा आणि माझ्या नावाचा उल्लेख मंत्री महोदयांनी केला आहे. सावकाराच्या माध्यमातून शेतकऱ्याचे कर्ज माफ झाले, असे मंत्री महोदय सांगत आहेत. यवतमाळ जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त आत्महत्या, जास्त कर्जबाजारी शेतकरी आणि

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.......

आणि यवतमाळ जिल्ह्यामध्ये 70 लाख रुपयांचे कर्ज सावकारांचे... ती प्रकरणेही डीडीआरकडे पडून आहेत. 200 शेतकरी आहेत. एकाही शेतकऱ्याला अद्याप एक पैसाही मिळालेला नाही. गहाणखत आणीत नाही, तोपर्यंत प्रकरण अंतिम होत नाही, ही अट त्यामध्ये आहे आणि ती बरोबर आहे. त्या सावकाराने जिल्हाधिकाऱ्यांकडे गहाणखत आणले नाही, डीडीआरकडे जमा केले नाही. 200 पैकी 70 लाख रुपये त्यामध्ये आहेत. फार मोठी रक्कम यवतमाळ जिल्ह्याची नाही. 195 कोटी रुपयांचे कर्ज सावकाराच्या माध्यमातून माफ करता, असे म्हणत आहात.

........LL-1.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे......

किंवा त्याबाबत भाषणात उल्लेख करुन त्या आधारावर आम्ही सर्व कर्जमाफ करतो, असे म्हणत आहात. मला असे वाटते की, वास्तविकता वेगळी आहे. ती मला मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, उत्तराचे भाषण सुरु असताना सन्माननीय सदस्यांनी असे मध्येच उभे राहून बोलणे हा कोणता प्रकार आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेबांच्या वेदना मी समजू शकतो. जशा तुमच्या वेतना आहेत, तशाच माझ्याही आहेत. परंतु, माझा त्यांना प्रश्न आहे की, तुम्ही इतकी वर्षे सत्तेत होता, सत्ताधारी पक्षाचे अध्यक्ष होता. मग शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची सुरुवात यवतमाळ पासूनच का झाली ? मागील 15 वर्षाच्या काळात तुम्ही यवतमाळमध्ये काय केले ? तुम्हाला बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. तुमच्या गावापासून, तुमच्या जिल्ह्यापासून आत्महत्यांची सुरुवात झाली. तुम्ही सत्तेत असताना, पक्षाचे अध्यक्ष असताना, तुमच्या पक्षाचे सरकार सत्तेत असताना तुम्हाला 15 वर्षात आत्महत्या थांबवित्या आल्या नाहीत. तुम्हाला बोलण्याचा नैतिक अधिकार आहे काय ? शेतकऱ्यांना सावकारीतून मुक्त करणे यावर मी बोलत होतो. तुम्ही ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सुचनांचा शासन आदरच करणार आहे. तुम्ही मोठ्या प्रमाणावर सूचना केलेल्या आहेत आणि त्या चांगल्या सूचना आहेत, याबद्दल दुमत नाही. फक्त माझ्या मनात प्रश्न असा आहे की, या सर्व सुचनांचा अवलंब करुनही आत्महत्या थांबतील काय ? प्रयत्न तर केलेच पाहिजेत, मदत तर दिलीच पाहिजे. सर्व कारणे तपासून पाहिली. आपण कालच भाषणामध्ये सांगितले की, इयत्ता 12 वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलीकडे फी भरण्यासाठी पैसे नव्हते. मी त्याची नोंद घेतली आणि त्या कुटुंबाची माहिती घेतली. त्या कुटुंबाकडे ट्रॅक्टर आहे, बागायती शेती आहे आणि आता राज्य सरकारने इयत्ता 12 वी पर्यंतची फी देखील माफ केलेली आहे. परंतु, सुसाईड नोटमध्ये त्यांनी लिहून ठेवले, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. कारण काहीही असू शकतात. सरकारला चिंता नाही काय ? नापिकी हे एक कारण आहे, आम्ही देखील ते पाहतो. परंतु, तुम्ही म्हणता की, अशी कारणे दिली. व्यसनामुळे आत्महत्या केली, अमूक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.......

कारणामुळे आत्महत्या केली. शेतकऱ्याने कशामुळे आत्महत्या केली याबाबत केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने कधीही आपले मत व्यक्त केलेले नाही. नॅशनल क्राईम रिपोर्टमध्ये जो उल्लेख केला होता तो रिपोर्ट प्रत्येक वर्षी प्रसिद्ध होतो. संपूर्ण देशाचा एनसीआरचा रिपोर्ट प्रसिद्ध होतो आणि त्यामध्ये कारणे दिलेली असतात. ती कारणे आपण व्यक्त केलेली नाहीत. ती नॅशनल क्राईम रिपोर्टमध्ये प्रसिद्ध झालेली कारणे असतात. परंतु, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या कारणासाठी होवोत का अन्य कारणासाठी होवोत. एवढे नक्की आहे की, आता पर्यंत शेतकऱ्यांच्या मनात नैराश्येचे वातावरण निर्माण झालेले आहे. मागील काही वर्षातील कारणे वेगवेगळी असतील. पूर्वी 15-20 वर्षाच्या काळात जे काही घडले असेल ते आणखी वेगळे असेल. परंतु, मागील 15 वर्षाच्या काळात शेतकरी खचला, नैराश्येच्या गर्तेत गेला, त्याने स्वतःचा आत्मविश्वास गमविला, शेतकऱ्याची संकटाशी मुकाबला करण्याची जी शक्ती आहे ती दिवसेंदिवस कमी होत आहे. ज्या ठिकाणी माणूसच नैराश्यात गेला, त्याने आत्मविश्वास गमविला आणि त्यामुळे किरकोळ कारणासाठी आत्महत्या होत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होता कामा नयेत.

सभापती महोदय, विधानसभेत काही सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, समुपदेशन करावे. परंतु, सरकार समुपदेशन करते त्यावरही टिका केली जाते. गावामध्ये समुपदेशन करण्यासाठी समित्या स्थापन केल्या तर त्यावरही टिका केली जाते. तो उपाययोजनेचा एक भाग असतो. एनजीओ असतील, समाजातील चांगल्या व्यक्ती असतील त्यांनी जर शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला तर त्यांचे मनोबल उंचावते. अभिनेते श्री.नाना पाटेकर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले. त्यांनी शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. यामुळे तुमच्या माझ्यासह सर्वांचेच मनोबल उंचावते. आज शेतकरी अडचणीत आहे आणि अशा अडचणीच्या परिस्थितीत जर त्याचे मनोबल उंचवायचे असेल तर पैसा कितीही द्यावा, काही लोकांकडे पैसे नाहीत काय ? मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, राज्यात सर्वात जास्त आत्महत्या जर कोणत्या जिल्ह्यात झाल्या असतील तर त्या जळगाव जिल्ह्यात झालेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये जळगाव जिल्ह्याचा पाचवा क्रमांक आहे. मी जळगाव जिल्ह्यात राहतो. मी शेतकऱ्यांच्या घरी जातो. आपल्या जिल्ह्यात असे का

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.......

व्हावे याबाबत मी जिल्हाधिकारी यांच्या बरोबर एका वर्षात जवळपास 10-12 बैठका घेतलेल्या आहेत. जळगाव जिल्ह्यात केळी बागायतदार आहेत, तो देखील आत्महत्या करतो. ज्यांची जमीन कॅनॉलखाली, सिंचनाखाली गेलेली आहे तोही आत्महत्या करतो. यावर्षी देखील जळगाव जिल्ह्यात दुष्काळाची तीव्रता मोठ्या प्रमाणावर आहे. परंतु, मागील वर्ष दोन वर्षात ज्यांना काही प्रमाणात उत्पन्न मिळत होते किंवा शिक्षणाच्या निमित्ताने, नोकरीच्या निमित्ताने ज्या कुटुंबातील एखाद दुसरी व्यक्ती परदेशात गेलेली आहे त्यांच्याही कुटुंबात देखील आत्महत्या झाल्याचे उदाहरण आहे. आत्महत्या कशामुळे होतात हे लक्षात येत नव्हते. जळगाव जिल्ह्यात बागायतदार शेतकरी आहे, त्याने कर्ज घेतलेले नाही, त्याची शेती नापिक नाही तरी एवढ्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या का झाल्या ? आम्ही त्या ठिकाणी अनेक संस्थांना आवाहन केले. मी याबाबत बाहेर बोललो नाही. मी माझ्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अनेक वेळा दाखला दिला की, तुम्ही गडचिरोली, अमरावती जिल्ह्यातील मेळघाट, धुळे, नंदूरबार, ठाणे जिल्ह्यातील आदिवासींकडे बघावे, कोकणकडे बघावे. ते संकटाशी मुकाबला करुन आहे त्या स्थितीत राहू असा निर्णय घेतात. परंतु, आत्महत्येस परावृत्त होत नाहीत. आम्ही आमच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हे समुपदेशनाच्या माध्यमातून सांगितले. तुम आगे बढो, सरकार तुमच्या पाठीशी आहे, समाज तुमच्या पाठीशी आहे. परंतु, आत्महत्या करु नका. परंतु, मानसिकता नाही. या मागचे कारण काय आहे हे तुम्हाला आणि मला आता पर्यंत शोधता आलेले नाही. आम्ही ते शोधण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी अशी मागणी करता, ते गैर नाही. मी विरोधी पक्षात असतो तर मी देखील हीच मागणी केली असती. परंतु, मला या संदर्भात तुमच्याकडून मार्गदर्शन पाहिजे होते, या सभागृहाच्या माध्यमातून मार्गदर्शन पाहिजे होते की, होय, नाथाभाऊ हे करावे. विरोधी पक्ष म्हणून, सत्ताधारी पक्ष म्हणून आम्ही गॅरंटी देतो की, आत्महत्यांचे प्रमाण कमी होईल, आत्महत्या थांबतील. परंतु, आम्ही नाही देऊ शकत. परंतु, दुर्दैवाने त्यांनी आत्मविश्वास गमविला आणि आमचाही आत्मविश्वास इतका नाही की, हे सर्व करीत असताना वर्ष-सहा महिन्यात आत्महत्या थांबतील असे चित्र नाही. यासाठी तुम्हाला आणि

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.......

मलाही काही काळ द्यावा लागेल. शेवटी, शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, उस्मानाबाद जिल्ह्यात खायला अन्न नव्हते. म्हणून आत्महत्या केली. मी स्वत: जिल्हाधिकाऱ्यांबरोबर बोललो की, याबाबत नक्की काय परिस्थिती आहे ? त्यांनी सांगितले की, अशी परिस्थिती नाही. त्यांनी जो रिपोर्ट दिला तो वेगळा होता. मी या संदर्भात माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांबरोबर चर्चा केली. असे होऊ शकते. सातत्याने दुष्काळ, नापिकी, आर्थिक कमजोरी, सावकाराकडचे कर्ज यामुळे असे होऊ शकते की, त्या कुटुंबाला अन्न मिळू शकले नसेल. राज्य शासनाने निर्णय घेतला की, जे 14 जिल्हे आत्महत्याग्रस्त आहेत त्या जिल्ह्यातील सर्व नागरीकांना, सर्व शेतकऱ्यांना 2 रुपये किलो दराने गहू आणि 3 रुपये किलो दराने तांदुळ देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी एका वर्षाला 1 हजार कोटी रुपये खर्च झाले. अन्न नसल्यामुळे कोणी मरता कामा नये. म्हणून आम्ही शेतकरी मोठा आहे का लहान आहे अशी अट न घालता, त्याच्याकडे पिवळे कार्ड आहे का पांढरे कार्ड आहे हे न तपासता, तो शेतकरी आहे, तो अन्न नसल्यामुळे मरता कामा नये, म्हणून शासनाने हा मोठा निर्णय घेतला आणि त्यासाठी 1 हजार कोटी रुपये एका वर्षाला आम्हाला खर्च करावे लागले. आम्ही त्यांना अन्न दिले. ज्या ठिकाणी हाताला काम पाहिजे त्या संदर्भात मागील केंद्र शासनाने आणि याही केंद्र शासनाने मनरेगाच्या माध्यमातून गाव पातळीपर्यंत नियोजन करण्याचे अधिकार दिले. नरेगाच्या माध्यमातील नियोजन गावातील लोकांनी करावे, कोणत्या रस्त्यांची कामे करावयाची आहेत, सिंचनाची कोणती कामे करावयाची आहेत आणि फक्त नियोजनाचा अधिकारच दिला असे नाही तर पंचायत समितीच्या माध्यमातून सरळ त्यांच्या खात्यात पैसे जमा करण्याचा जो निर्णय आहे तो आणखी मजबूत केला. मागेल त्याला काम ही मागील संकल्पना होती. आम्ही ती अधिक रुढ करण्याचा प्रयत्न केला. एखाद्या व्यक्तीने ग्रामपंचायतीकडे कामाची मागणी केली आणि त्याला काम मिळाले नाही असा आता राज्यात एकही व्यक्ती नाही.

..2M-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे..

आम्ही त्याला सांगितले की, बाहेर काम नसेल तर तुझ्या गावात काम कर. जॉबकार्ड काढलेले असेल, नोंदणी केली असेल आणि गावात पाच किंवा 50 मजूर असले तरी त्यांना पंचक्रोषीत काम मिळाले पाहिजे. त्या लोकांना काम मिळाले नाही तर तेथील तलाठी व ग्रामसेवकांना जबाबदार धरण्यात येईल. ग्रामसेकांकडे अधिकार असताना त्या लोकांना काम दिले नाही आणि त्याचे उद्या बरेवाईट झाले तर तलाठी व ग्रामसेवकांवर जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. त्यामुळे रोजगाराचा प्रश्न त्याच ठिकाणी सुटलेला आहे.

सभापती महोदय, या राज्यात मागील काळात अनेक उपाययोजना केल्या आहेत, मोठमोठी धरणे बांधली आहेत, धरणांच्या कामासाठी आजपर्यंत शासनाने कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. अपेक्षेप्रमाणे सिंचनाखाली क्षेत्र येऊ शकले नाही. मोठ्या धरणांची कामे होत राहतील, जमिनीत खोलपर्यंत ओलावा वाढावा यासाठी जलयुक्त शिवार योजना केली पाहिजे म्हणून ती योजना मागील वर्षात सुरु करण्यात आली आहे. या योजनेसाठी एका वर्षात 14 हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. जलयुक्त शिवार ही योजना 'पाणी जिरवा पाणी अडवा' या धर्तीवर सुरु करण्यात आली आहे. या योजनेचे रिझल्ट चांगले आले आहेत. ज्या ठिकाणी पाऊस पडला तेथील रिझल्ट बऱ्यापैकी आले आहेत. या योजनेची व्याप्ती वाढवीत असताना शासनाने असे ठरविले की, 15708 टंचाईग्रस्त गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेसारखी कामे केली पाहिजेत. या व्यतिरिक्त इतर गावातील कामांना मनरेगाच्या माध्यमातून मंजुरी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. नाला रुंदीकरण, सरळीकरण, शेत तळे, बंधारे, छोटे बंधारे, के.टी.वेअर, नाला बांध, सिमेंट बंधारे छोटे तलाव, गाव तळे, मालगुजारी तलाव या सर्व तलावांमधील गाळ काढून त्यांचे नुतनीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सभापती महोदय, शेततळ्यांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली असल्यामुळे शेततळ्यांची संख्या वाढवा, त्यांचा कोटा वाढवा, अशी मागणी लोकांकडून येऊ लागली आहे, जलयुक्त शिवार योजनेचे हे फलित आहे, यापूर्वी लोक रस्त्याची मागणी करीत होते, समाज मंदिराची मागणी करीत होते, शाळा खोल्या बांधकाम करण्याची मागणी करीत होते, आता आमदार व खासदारांकडे जनता आमच्या गावात जलयुक्त शिवार योजना करावी अशी मागणी करीत आहेत. आता

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...2...

श्री.एकनाथराव खडसे..

शेतकऱ्यांमध्ये जागृती वाढली आहे. कारण या योजनेचे रिझल्ट चांगले येऊ लागले आहेत. त्यामुळे राज्य सरकारने असा निर्णय घेतला की, जो शेतकरी मागणी करेल मग तो लहान शेतकरी असेल किंवा कितीही मोठा शेतकरी असला तरी त्याच्यामध्ये कोणताही भेदभाव करण्यात येणार नाही. अशा सर्वच शेतकऱ्यांना शेततळे करण्यासाठी पैसे देण्यात येतील. जो शेतकरी पाणी अडविण्याचे काम करीन त्या शेतकऱ्याला शेततळे करण्यासाठी 50 हजार रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या शेतकऱ्यांने एक, दोन किंवा चार लाख रुपयांचे शेततळे केले तरी त्यासाठी 50 हजार रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, उर्वरित पैसे शेतकऱ्यांनी उभे करावयाचे आहेत. यासाठी कोणतीही अट नाही, जॉबकार्ड नाही, जेसीबी मशीनने शेततळे केले तरी चालेल, मनरेगाच्या माध्यमातून मागील काळात जी कामे करण्यात आली ती कामे आता देखील करता येतील.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली आहे की, जलयुक्त शिवारात मनरेगाची कामे करताना अडचणी येतात, त्या ठिकाणी मशीनरी वापरता येत नाही. इच्छा असून मनरेगाचा पैसा वापरता येत नाही. यासंदर्भातील निर्बंध अतिशय कडक आहेत, त्यामध्ये जॉबकार्ड काढा, मजूर घ्या, ग्रामपंचायतीकडे नोंदणी करा. बँकेत खाते उघडा, अशा अडचणी आहेत. आता ऑनलाईन पध्दती असल्यामुळे पैसा रिलीज केल्यास एका क्षणात दिल्लीला कळते. गुगल मॅपच्या माध्यमातून एका क्षणात कळते की, कोणत्या स्पॉटवर किती मजूर आहेत, मजूर कामे करीत आहेत किंवा नाही. असे निर्बंध असल्यामुळे त्या ठिकाणी कामे होत नव्हती. त्यामुळे शासनाने ठरविले आहे की, आम्ही 50 हजार रुपये देणार आहोत. 10 हजार रुपये आता लगेच ॲडव्हांस देण्यात येतील. तेथील कामे जेसीबी किंवा मजुरांच्या माध्यमातून केली तरी चालतील फक्त पाणी अडविले पाहिजे. शेतात पाणी अडविण्याचे काम करीत असताना आता अल्पभूधारक, पिवळे कार्ड धारक कोणत्याही अटीची अडचण येणार नाही,

सभापती महोदय, सरकारने असे ठरविले आहे की, वर्षभरात किमान एक लाख शेततळे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे..

तयार झाली पाहिजेत. सिंचनाचे क्षेत्र वाढले पाहिजे. शेतकऱ्याला मजबूत करायचे असेल तर त्याच्या शेतातील सिंचन वाढले पाहिजे. यासाठी राज्य सरकारने जलयुक्त शिवाराचा निर्णय घेतला आहे, तसाच शेततळ्यांच्या संदर्भातील निर्णय घेतला आहे. शेतकऱ्याला संरक्षण मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, शेतकरी शेतामध्ये काम करतो तो सर्पदंशाने मरण पावला, झाडावरुन पडला, विहिरीत पडून मरण पावला, बैलगाडी खाली गेला, रस्त्याने चालताना अपघातात मरण पावला तर त्याचा संपूर्ण परिवार उघड्यावर पडतो. यासाठी माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी जनता अपघात विमा योजना सुरु केली आहे. त्याच धर्तीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना विम्याचे संरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी कंपन्याकडून टेंडर मागविण्यात आले आहे, त्याची छाननी करुन शेतकऱ्यांच्या विम्याच्या हप्त्याची रक्कम 1 कोटी 37 लाख रुपये सरकारच्या तिजोरीतून भरण्यात आली आहे. शेतकरी जर दुर्दैवाने अपघातात मरण पावला, कायमचे अपंगत्व आले तर त्याच्या परिवाराला दोन लाख रुपयांचे संरक्षण देण्याचा निर्णय विमा कंपनीच्या माध्यमातून शासनाने घेतला आहे. शेतकरी समृध्द झाला पाहिजे, त्याच्या कुटुंबीयांना आधार मिळाला पाहिजे. दोन लाख रुपये विम्याचे संरक्षण देण्याचा निर्णय घेत असताना एक रुपया देखील शेतकऱ्यांना भरावा लागणार नाही. हा संपूर्ण पैसा सरकारच्या तिजोरीतून घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. असे वेगवेगळे निर्णय घेत असताना शेतकऱ्यांचे हीत पाहण्याची भावना सरकारने ठेवली आहे.

सभापती महोदय, सिंचन विकास कार्यक्रम विदर्भासाठी राबविण्यात आला आहे, या कार्यक्रमाअंतर्गत एक लाख विहिरी मागील काळात पंतप्रधान पॅकेजच्या माध्यमातून काँग्रेस सरकारच्या कालखंडात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या कामांना सुरुवात झाली आहे, त्या योजनेचा विस्तार करुन त्या संदर्भातील काही अटी शिथिल करुन राज्य सरकारने स्वतःच्या खर्चाने अशा विहिरी विदर्भात बांधण्याचा निर्णय घेतला आहे. ऊर्जा मंत्री महोदयांना सांगितले की,

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे..

आम्हाला वीज मिळाली पाहिजे. पाच ते सात लाख विहिरी बांधावयाच्या आहेत त्यासाठी वीज कशी उपलब्ध करावी, यासाठी सौरशक्तीवर चालणाऱ्या वीज पंपाचे नियोजन करण्यात आले आहे. शेततळ्यात पाणी जमा झाल्यानंतर एखादे दुसरे पाणी पिकाला देण्याची आवश्यता असेल तर सौरशक्तीवर चालणाऱ्या पंपाचा विचार करण्यात यावा. तशी आवश्यकता नसेल तर त्या तळ्यात झिंगा उत्पादन करण्यासाठी राज्य सरकार झिंग्याचे बी किंवा मत्सबीज मोफत देईल अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

सभापती महोदय, गडचिरोली येथील एक आदिवासी शेतकरी मला मागील आठ ते दहा दिवसांच्या अगोदर प्रदर्शनामध्ये भेटला होता. मी आदिवासी लोकांचे कौतुक यासाठी करतो की, नक्षलग्रस्त भागात राहणारा आदिवासीचा मुलाने एलएलबी केले आहे. तो मला भेटला व त्यांनी सांगितले की, साहेब तुम्हाला एक प्रयोग दाखवायचा आहे. मी म्हटले कसला प्रयोग आहे, तो म्हणला की, गडचिरोली येथे मी मोत्याची शेती केली आहे, मोत्याची शेती गडचिरोली येथे कशी काय शक्य आहे. तेथे समुद्र नाही, तर ही शेती कशी केली. मी गेल्या तीन वर्षापासून मोत्याची शेती करतो, या शेतीच्या माध्यमातून मला 30 ते 35 लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. हे एक मॉडेल आहे मी त्या मुलाला माननीय मुख्यमंत्री यांची भेट घेण्यासाठी बोलविले. मुख्यमंत्री महोदयांना मी म्हणालो की, हा आदिवासी मुलगा आहे, त्याच्यामध्ये कल्पकता आहे, त्या ठिकाणी पैनगंगा नदी जाते त्या नदीच्या माध्यमातून (..अडथळा..) तुम्हाला आवडत नसेल, तुम्ही हसत असाल तर मी खाली बसतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृह नेत्यांचे उत्तर आम्ही अतिशय गंभीरपणे ऐकत आहोत. संसदीय कार्यमंत्री महोदय मोती आणि गडचिरोली या विषयाचा संदर्भ जुळत नव्हता त्यामुळे आम्ही स्वाभाविकपणे विचार करीत होतो की, हे कसे शक्य होईल.

.....NN-1..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

म्हणून एक विषय निघाला. आम्ही उत्तराबाबत गंभीर आहोत. सभागृहाच्या नेत्यांचे भाषण सुरु असताना आमच्या हालचालीकडे लक्ष आहे, तेवढेच लक्ष शेतकऱ्यांबाबत असावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचा आभारी आहे. मी एका गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. एकीकडे केळी उत्पादक, द्राक्ष उत्पादक, ऊस उत्पादक शेतकरी आत्महत्या का करतो? कारण त्याचे आत्मबल कमी झाले आहे. दुसरीकडे हा आदिवासी विपरित परिस्थितीत एका हेक्टरमध्ये वर्षाला 35 लाख रुपयांचे उत्पन्न घेत आहे. या आदिवासी शेतकऱ्याचे आत्मबल मोठे आहे. संकटाशी सामना करण्याची जिद्द आहे. ती जिद्द आमच्या शेतकऱ्यांमध्ये निर्माण करण्याचे काम तुमचे आमचे सर्वांचेच आहे. पहिल्यांदा त्या शेतकऱ्यामध्ये आत्मविश्वास जागृत करायचा आहे. मी एका आदिवासी शेतकऱ्याचे उदाहरण दिले. नापिकी जमीन आहे किंवा अन्य काही कारणे आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांचे आत्मबल कमी झाले आहे.

सभापती महोदय, मागच्या काळात दिल्ली येथील सेंट्रल हॉलमध्ये मी माननीय श्री.शरद पवार यांच्याशी चर्चा करीत होतो. मी त्यांच्यासमोर दुष्काळाचा विषय काढला. 1972 चा दुष्काळ तुम्ही पाहिला आहे. त्या जनसंघाच्या काळात दोन पंचायत समिती सभापती होते. त्यातील एक माझा होता. त्या काळातील दुष्काळ मी फिरुन पाहिला आहे. 1972 च्या दुष्काळासाठी अनेक उपाय केले गेले. त्या काळात जे कोणी होते त्यांनी केलेले उपाय आज करु शकतो का, त्याच्याही पुढे जाऊ शकतो का, शेतकऱ्यांना काय आधार देता येईल, कशाप्रकारे वाचविता येईल? या संदर्भात चर्चा करीत असताना त्यांनी एक उपाय मला सांगितला. ज्यावेळी राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मी काम पहात होतो त्या काळात मी फळबाग लागवड योजना रोजगार हमी योजनेतून घेतली होती. फळबाग लागवडीसाठी रोजगार हमी योजनेतून 100 टक्के पैसे देण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. त्याचे चांगले परिणाम दिसून आले. कोकणचा कॅलिफोर्निया करायचा की नाही, तो झाला की नाही या वादात मी जाणार नाही. परंतु कोकणामध्ये जी आंबा पिकाची लागवड झाली त्यामागील यश हे श्री.शरद पवार यांनी रोजगार हमी योजनेतून घेतलेल्या फळबाग लागवड योजनेचे आहे. मी या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. आम्ही आता असे

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.......

ठरविले आहे की, या राज्यामध्ये जेवढी काही जमीन असेल त्या जमिनीवर नरेगाच्या माध्यमातून 100 टक्के फळबाग लागवड करायची. पूर्वीची योजना पुनरूज्जीवित करायचे ठरविले आहे. नरेगा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदान पूर्वीच्या योजनेमध्ये सुधारणा करून द्यायचे आहे. यापुढे जमीन नापिकी आहे असे म्हणता येणार नाही. त्यामध्ये 40 फळांचा समावेश करीत आहोत. त्यात बोर, जांभूळ, सीताफळ, डाळिंब, आंबा व पेरु आदी डोंगराळ स्वरूपाच्या व नापिकी क्षेत्रात उत्पादन देणाऱ्या फळ झाडांचा समावेश आहे. आम्ही शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणार आहोत. फळबागांच्या संदर्भात रोपे लागवड करणे, पाणी देणे, कंपाऊंड यासाठी पैसे देण्याबरोबर ठिबक सिंचनासाठी सुध्दा काही प्रमाणात पैसे कसे देता येतील आणि याच्या संरक्षणासाठी लागणारी व्यवस्था करू प्रसंगी सरकारी तिजोरीतून 5-10 टक्के देता आले तर तेही देऊ. यापुढे आंब्याची 50 झाडे लावली, जांभळाची 50 झाडे लावली तर वर्षाला किमान 50 हजार रूपये तरी उत्पन्न मिळू शकते. एक झाड वर्षाला 1000 ते 500 रूपये उत्पन्न देणार आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, कृषी मंत्री सभागृहात चांगले विषय मांडण्याचा प्रयत्न करीत आहेत. पूर्वीपासून रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्यात मोठया प्रमाणात लागवड झालेली आहे. परंतु विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशात फळझाडे जगण्याचे प्रमाण किती आहे याची माहिती कृषी मंत्र्यांकडे उपलब्ध असली पाहिजे. यामुळे सगळे प्रश्न सुटणार असतील तर आम्ही मान्य करू. परंतु मागील काळाचा इतिहास काय सांगतो हे सभागृहाला कळले तर अधिक बरे होईल.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सत्य सांगण्यासाठी हिंमत लागते. मी माननीय श्री.शरद पवार साहेबांचे कौतुक केले, त्याबाबत वावडे ठेवून कसे चालेल? जे चांगले केले त्याचे कौतुक केले पाहिजे. श्री.शरद पवार यांचे नाव घेताना मला काही वाटले नाही. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना का दु:ख होऊ लागले.

सभापती महोदय, संभाजीनगर, दौलताबाद येथे सीताफळ, जांभूळ या फळझाडांची मोठया प्रमाणात लागवड झालेली आहे. कोकणामध्ये खडकाळ जमिनीमध्ये आंब्याचे उत्पादन घेतले जाते. हा उपाय जर यशस्वी झाला तर शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये खूप मोठा बदल होऊ शकतो. फळझाड

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.........

लागवडीनंतर काळजी घेतली आणि झाड मोठे झाले तर आयुष्यभर सातत्याने काही ना काही देणार आहे. शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहन देण्याची योजना राज्य सरकारने घेतली आहे. या संदर्भात शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळत नाही हा विषय आंतरराज्य आहे. दुष्काळात पीक गेले, नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, काही ठिकाणी वादळ, गारपीट, पाऊस पडला नाही यामुळे शेतीची हानी झाली. काही ठिकाणी कमी पाऊस झाल्याने शेतीचे नुकसान झाले.

सभापती महोदय, मी केंद्र सरकारचे अभिनंदन करतो. वर्षानुवर्षे परंपरा आहे की, 50 टक्क्यापेक्षा अधिक नुकसान झाले तर नुकसानभरपाईची रक्कम दिली जाते. केंद्र सरकारने निर्णय घेतला की, यापुढे 33 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले तरी शेतकऱ्यांना लाभ देता येईल. 33 टक्के नुकसान झाले तरी तातडीने मदत देण्याच्या संदर्भात एनडीआरएफ फंडातून मागणी करता येईल. केंद्र सरकार यावर्षी नुकसान तर देणारच आहे. त्यांनी आम्हाला सांगितले की, 15708 गावे तुम्ही जाहीर केली आहेत, त्या गावांमध्ये अशा स्वरूपाची मदत आम्ही देणार आहोत. जी पिके 90 ते 120 दिवसात घेता येणारी आहेत, त्याबाबत पूर्वीच्या काळात संरक्षण मिळत नव्हते. अशा पिकांना संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. पूर्वीच्या काळात कापसापासून केळीपर्यंत फलोत्पादनासाठी फळबाग विमा योजना, पीक विमा योजना लागू होती. आता केंद्र सरकारने याची व्याप्ती वाढविली आहे. विमा कंपन्यांना त्यांनी सूचना केली आहे. मागील वर्षी काही लाभ झाला नाही. यावर्षी विदर्भातील सोयाबीनचे पीक गेले, कापसाचे पीक गेले. जे काही पीक नष्ट झाले, ज्यांनी विमा काढला आहे ते विम्याचे संरक्षण 15708 गावांना देण्याचा विमा कंपनीने आमच्याजवळ मानस व्यक्त केला. आता विमा कंपनीकडून नुकसानीची भरपाई मिळेल. 15708 गावांव्यतिरिक्त मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील जी गावे दुष्काळी म्हणून जाहीर झालेली नाहीत त्या ठिकाणची परिस्थितीजन्य आकडेवारी आमच्याकडे आली आहे.

सभापती महोदय, कापसाबाबत जे अपेक्षित उत्पादन होते ते आले नाही. एकरी 40 किलो, 50 किलो उत्पादन आले आहे. क्विंटलवर उत्पादन गेले नाही. टंचाईग्रस्त गाव किंवा दुष्काळग्रस्त गाव जाहीर झाले त्यांना पिकाच्या संदर्भात आम्ही मदत देणार आहोत. त्याच धर्तीवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्यांचे नुकसान झाले आहे, परंतु टंचाईमध्ये नाही अशा सर्व ठिकाणी आम्ही सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

..2ओ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

सभापती महोदय, शेतकऱ्यांना संरक्षण नाही ही वस्तुस्थिती आहे. आज शेतकरी येऊन भेटत आहेत आणि आम्हाला सांगतात की, माझे नुकसान झालेले आहे.शेतकऱ्यांसंबंधी राज्य सरकार निर्णय घेणार आहे व तसा निर्णय आज घेतला देखील आहे. पंतप्रधानांनी रूपये 330/- भरून पेन्शन घेण्याची योजना सुरू केलेली आहे. सदर योजना राज्यभरात त्यांना लागू करण्यासंबंधी राज्य शासन विचार करीत आहे. स्वर्गीय श्री.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना आम्ही आमच्या राज्यात सुरू केली. त्याच धर्तीवर त्याला विम्याचे संरक्षण लाईफ इन्श्युरन्स सारखे मिळाले पाहिजे यासाठी देखील आम्ही प्रयत्न करणार आहोत. ही केंद्र शासनाची योजना आहे. त्याच्याकडे 330 रूपये भरण्यासाठी नसेल तर काही पैसा आपल्याला भरता येईल काय याचाही सरकार आता विचार करीत आहे. जेणे करून त्याचा कोणत्याही कारणासाठी मृत्यू झाला तर त्या पेन्शनमधून त्याच्या वारसाला काही पैसा देता येईल.

या राज्यात शेतकऱ्यांना सॉईल हेल्थ कार्ड देण्याचे काम आम्ही केले आहे. माती परिक्षणासहीत आम्ही सॉईल हेल्थ कार्ड दिलेले आहे. मला सांगायला अभिमान वाटतो की, देभभरात सॉईल हेल्थ कार्ड देण्यामध्ये महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे. आपण साडे चौदा लाख सॉईल हेल्थ कार्ड वाटप केलेली आहेत. दुसऱ्या क्रमांकावर जे राज्य आहे त्यांनी फक्त 4 लाख सॉईल हेल्थ कार्ड वाटप केलेले आहे. या माध्यमातून आम्ही शेतकऱ्यांपर्यंत जाण्याचा प्रयत्न केलेला आहे. बी.टी.कॉटन बियाण्याचे भाव कमी करण्यासंबंधी मी मागच्या वर्षी आग्रह धरला होता. बीटी कॉटन बियाणांचा भाव रूपये 830 आणि रूपये 930 इतका होता. हा दर खूप महाग होता. हा भाव कमी करण्यासाठी आम्ही भांडलो म्हणून प्रति किलो रूपये 250 भाव कमी करावा लागला. यासाठी न्यायालयीन संघर्ष देखील झाला. ही केस हायकोर्टापर्यंत गेली होती. हायकोर्टाने आपल्या बाजूने निर्णय दिला. या राज्यामध्ये असे पहिल्यांदा घडले की, आम्ही संघर्ष करून बीटी बियाणांचा भाव प्रति किलो रूपये 250/- ने कमी केलेले आहेत. अशा प्रकारे अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांना काही प्रमाणात मदत करण्यात आली आहे. ..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, येथे बीटी बियाणांच्या भावासंबंधी उल्लेख करण्यात आला आहे. येथे माननीय मंत्र्यांनी पहिल्यांदा असा शब्द प्रयोग केला आहे. यापूर्वी सुद्धा बीटी बियाण्यांचे भाव कमी करण्यासंबंधी चर्चा झालेली आहे. ते भाव कमी करून एका मर्यादे पर्यंत बांधून देण्यात आले होते. श्री.बाळासाहेब थोरात कृषी मंत्री होते त्यावेळी बीटी बियाण्यांचे भाव बांधून देण्यात आले होते. कदाचित आपणास ते माहीत नसेल. बीटी बियाण्यांचे भाव बांधून देण्यासंबंधी बैठक घेऊन त्यामध्ये भाव बांधून देण्याचा निर्णय झाला होता, हे मला माहीत आहे. त्याची आपण माहिती घ्यावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दर कधी कमी केले आहेत ते त्यांनी सांगावे. बियाणांचे भाव कमी झाले असे या राज्यात घडले असेल तर मी माझे शब्द मागे घेतो. मी पहिल्यांदा असा शब्द प्रयोग केला आहे तो मागे घेऊन दुसऱ्यांचा असा शब्दप्रयोग करेन.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी या सरकारने प्रयत्न केला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने मदत केली आहे. एफआरपी संबंधी शेतकरी संघटनेसह विरोधी पक्षाने आग्रह धरला होता. या ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी एफआरपीचे 80:20 असे सूत्र राज्य सरकारने ठरविले आहे. सलग दोन वर्षातील ऊस खरेदी कर माफ करण्यात आलेला आहे. साखर कारखान्यांना एफआरपी देता यावी यासाठी केंद्र शासनाकडून रूपये 6000 कोटी रूपयांची मदत मागण्यात आली. त्यापैकी राज्याला 2022 कोटी रूपयांची मदत देण्यात आली आहे. हा पैसा शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये आरटीजीएसद्वारे भरण्यात आलेला आहे. 129 साखर कारखान्यांना 1644 कोटी रूपयांचे बिनव्याजी कर्ज देण्यासंबंधातील निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी केंद्र शासनाचे 4 हजार रूपये प्रति मेट्रीक टन, तर राज्याने 1 हजार रूपये प्रति मेट्रीक टन अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. कधी नव्हे एवढा प्रतिसाद राज्यातील शेतकऱ्यांनी कृषि पीक विमा योजनेला दिलेला आहे. आजवरच्या इतिहासात मिळाली नाही इतकी मोठी मदत शेतकऱ्यांना मिळाली आहे. विम्याच्या माध्यमातून सुमारे 43 लाख शेतकऱ्यांना 1806 कोटी रूपये देण्यात आले आहेत. खरीपाच्या 2015 च्या हंगामात 405 कोटी

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

रूपयांचा प्रीमियम भरून 8500 कोटी रूपयांचा विमा उतरविण्यात आला आहे. राज्यातील 1 कोटीच्यावर शेतकऱ्यांपैकी 83.57 लाख शेतकरी विम्याच्या कक्षेत आले आहेत. आता 52 लाख हेक्टर क्षेत्राचा विमा काढण्यात आलेला आहे. हे प्रमाण जवळपास 70 टक्के आहे. राष्ट्रीय कृषी विमा योजनेच्या अंतर्गत सन 2012-13 मध्ये 189 कोटी रूपयांचा हप्ता भरला होता आणि 667 कोटी रूपये मिळाले होते. सन 2013-14 मध्ये 117 कोटीचा हप्ता भरला होता आणि 103 कोटी रूपये मिळाले होते. सन 2014-15 मध्ये 198 कोटी रूपयांचा हप्ता भरला होता आणि 1806 कोटी रूपयांची नुकसान भरपाई मिळाली आहे. मी मघाशी सांगितले की, सोयाबीनला विम्याचे संरक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादकांना यावर्षी विम्याचा लाभ मिळणार आहे. त्याला एप्रिल-मे पर्यंत विम्याची रक्कम मिळणार आहे. राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ 14 आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांना मिळावा अशा स्वरूपाचा निर्णय आम्ही घेतला आहे. या बरोबरच कृषी वीज ग्राहकांना दिलासा देण्यासाठी कृषी संजीवनी योजनेलाही मुदतवाढ देण्यात आलेली आहे. यासंबंधी राज्य सरकारने वेगवेगळ्या माध्यमातून मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. येथे केंद्र शासनाकडे प्रस्ताव उशिरा पाठविला असे वारंवार सांगण्यात आले. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, या राज्यात 15 नोव्हेंबर आणि 15 डिसेंबर पर्यंत अंतिम आणेवारी काढण्याची प्रथा गेल्या 50 वर्षापासून सुरू आहे. या वर्षी आपण हा कालावधी 15 दिवसांनी कमी केला आहे. जो पर्यंत अंतिम आणेवारी जाहीर होत नाही तो पर्यंत आपल्याला केंद्र शासनाकडे मदतीसाठीचा प्रस्ताव पाठविण्यात येत नाही. तात्पुरती किती मदत लागेल यासंबंधीचा आकडा आपण केंद्र शासनाला कळवितो. आपण केंद्र शासनाकडे 9 नोव्हेंबर रोजी प्रस्ताव पाठविला. केंद्र शासनाची समिती तातडीने या राज्यात आली व त्यांनी पाहणी केली. एका पाहणीमध्ये मी स्वत: त्यांच्या बरोबर होतो. ती पाहणी झाल्यानंतर मी दिल्लीला जाऊन आलो. आदरणीय श्री.राजनाथ सिंहजी, आमचे श्री.अरूण जेटलीजी, माननीय कृषी मंत्री श्री.राधा मोहन सिंहजी यांच्याशी देखील मी चर्चा केली. या राज्यात पहिल्यांदा असे घडले की, आपला प्रस्ताव जाण्याच्या आधी या राज्याला 500 कोटी रूपयांची मदत केंद्राकडून नॅशनल डिझास्टर फंडमधून येऊन गेली. मागणी करण्याच्या आधीच पैसा आला होता. असे कधीच घडले नव्हते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथ खडसे ....

सभापती महोदय, मी ज्या दिवशी सेंट्रल हॉलमध्ये बसलो होतो त्यावेळेस माननीय अशोक चव्हाण साहेबांनी प्रश्न विचारला होता. त्यावेळी जी चर्चा झाली होती त्यासंदर्भातील प्रोसिडींग माझ्याकडे उपलब्ध आहे. हे प्रोसिडींग मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. तुम्ही म्हणत असलेले एक तरी वक्तव्य माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. राधा सिंग यांनी केले होते ते प्रोसिडींगमध्ये दाखवून द्यावे. माननीय अशोक चव्हाण साहेबांनी असे सांगितले होते की, "राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे प्रस्ताव आलाच नाही, महाराष्ट्राचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे उशिरा आला". परंतु आपण म्हणत असलेले मा.कृषी मंत्र्यांचे एकही वक्तव्य या प्रोसिडींगमध्ये नाही. माननीय श्री. अशोक चव्हाण साहेब मला त्या दिवशी सेंट्रल हॉलमध्येच भेटले होते.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, हा विषय प्रोसिडींगचा नाही. राज्यसभेत त्या दिवशी प्रश्नोत्तरामध्ये जे संभाषण झाले होते त्यामध्ये ते स्वतः बोलल्याचे आम्ही स्वतः ऐकले आहे. हा भाग प्रोसिडींगमध्ये आहे की, नाही हा भाग महत्वाचा नाही. परंतु लोकसभेत सुध्दा माननीय अशोक चव्हाण साहेबांनी विचारलेल्या प्रश्नासंदर्भात केंद्रीय कृषी मंत्र्यांचे उत्तर आम्ही ऐकलेले आहे. ती बातमी वृत्तपत्रात सुध्दा आली होती. आम्ही ऐकल्यानंतरही ते तसे नाहीच आहे असे म्हणने कितपत बरोबर आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे साहेब आपल्याकडे जो कागद आलेला आहे तो वाचून दाखवावा. आपल्याजवळ प्रोसिडींग आहे की, वर्तमानपत्राणे कात्रण आहे ते प्रथम सांगावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, त्या दिवशी जो उल्लेख करण्यात आला होता त्याची माहिती दैनिक भास्कर, देशोन्नती,तरुण भारत या वर्तमानपत्रात आलेला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी स्वतः त्या दिवशी तेथे उपस्थित होतो. त्या दिवशी मी केंद्रीय कृषी मंत्र्यांकडेच जेवण देखील केले होते. प्रत्यक्ष सेंट्रल हॉलमध्ये बसून मी ही चर्चा ऐकलेली आहे. तुम्ही ऐकले आहे असे म्हणत असाल तर ते म्हणणे प्रोसिडींगमध्ये दाखवून द्या. लोकसभेचे प्रोसिडींग विधानसभेच्या प्रोसिडींग सारखेच आहे. प्रोसिडींग मध्ये आपण बोललेला प्रत्येक शब्दन्शब्द येत असतो. जर त्यांनी असे म्हटले असेल तर या सभागृहामध्ये मी दिलगिरी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथ खडसे ....

व्यक्त करेन. वाटले तर तुम्ही आपले सभागृह सुरु असे पर्यंत प्रोसिडींग घेऊन या. प्रोसिडींगमध्ये "महाराष्ट्र सरकारने केंद्रसरकारकडे उशिरा प्रस्ताव पाठविला" असा एक जरी शब्द असला तर मी आपली दिलगिरी व्यक्त करीन.

सभापती महोदय, हे अधिवेशन विदर्भात सुरु आहे. आता केळीला भाव नसल्यामुळे केळी उत्पादकांचा वेगळाच प्रश्न निर्माण झाला आहे. नाशिककरांच्या कांद्याला भाव नाही म्हणून ते रस्त्यावर उतरत आहेत. कापसाला भाव नाही म्हणून कापूस उत्पादक रस्त्यावर उतरत आहे. या ठिकाणी संत्रा उत्पादकांचे प्रश्न अनेक सन्माननीय सदस्यांनी मांडलेले आहेत. ही गोष्ट खरी आहे की, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भाव नसल्यामुळे कापसाला इच्छा असली तरी आपण वाढीव भाव देऊ शकत नाही. परंतु शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी झाला पाहिजे यासाठी शासनाने पाऊले उचलण्यास सुरुवात केलेली आहे. (अडथळा) त्या दिवसाचे प्रोसिडींग आता माझ्या हातात आलेले आहे परंतु ते वाचून मी त्यामध्ये सभागृहाचा वेळ घालवू इच्छित नाही. केंद्राचे प्रोसिडींग मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. "राज्य सरकारने केंद्राला मदतीचा प्रस्ताव उशिरा सादर केला" या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की, "डॉट मॅन्यूअल प्रमाणे राज्य शासन ऑक्टोबरमध्ये हंगामी पैसेवारी जाहीर करते वगैर वगैर...." या प्रश्नाला मा.केंद्रीय कृषी मंत्र्यांनी उत्तर दिले आहे. आता सर्व प्रोसिडींग येथे वाचणे शक्य होणार नाही. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री. हरिसिंग राठोड बसल्या बसल्या "प्रोसिडींग मॅनेज केले का" असे बोलत आहे. हे अवघडच प्रकरण दिसते.

सभापती महोदय, विदर्भामध्ये संत्रा उत्पादक रस्त्यावर आला आहे. विदर्भात अधिवेशन सुरु असून संत्रा उत्पादकांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी संत्रा उत्पादन प्रक्रिया करण्याच्या संदर्भात प्रक्रिया आणि विकास कार्यक्रम राज्य सरकारने हाती घेण्याचे ठरवले आहे. राज्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या विकासासाठी शासनाने अनेक पावले उचलली असून त्यामध्ये संत्र्यांच्या नवीन जातीचा विकास करणे, उत्पादनामध्ये वाढ व उत्पादनाला योग्य किंमत मिळण्यासाठी बाजारपेठांचा विकास, प्रक्रिया उद्योग निर्माण करणे अशा प्रकारचे काम केले जाणार आहे. संपूर्ण देशात आता संत्रापिकाची लागवड केली जात आहे. संत्रा पिकासाठी बाजार नसल्यामुळे संत्रा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथ खडसे ....

उत्पादकांना भाव मिळत नाही त्यामुळे ऑरेंज उन्नती प्रकल्प पब्लीक प्रायव्हेट लिमिटेड पार्टनरशिपच्या माध्यमातून केले जाणार असून संपूर्ण लिंबूवर्गीय फळांचा विकास व शेतकऱ्यांना माहिती देणे, प्रशिक्षण देणे, उत्पादनाची व्यवस्था, संशोधन, असे प्रकल्प हाती घेण्याचे सरकारने ठरवलेले आहे. नवीन जातींचा विकास करुन, शेतकऱ्यांबरोबर कराराने शेती करुन पिकविलेल्या मालाची, बायबॅकची हमी देऊन शेतकऱ्यांचे संत्रा माल खरेदी करण्यात येणार आहे. यापुढे 3 वर्षामध्ये हे क्षेत्र आपल्याला वाढवावयाचे आहे. कनिंग प्लॅन्ट अमरावती येथे करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून 40 प्रक्रियाअंतर्गत बुटीबोरी-नागपूर येथे शेतकरी प्रशिक्षणाच्या संदर्भात निर्णय घेतलेला आहे. इन्डो इस्त्राईल कराराच्या माध्यमातून संत्र्यांच्या संदर्भात इस्त्राईल सरकारशी आपण एक करार केलेला आहे. संत्र्याचा विकास करण्याच्या संदर्भात नागपूर जिल्हयातील मोर्शी, वरुड येथे प्रोजेक्ट केला जाणार आहे. वरुड येथे संत्रा जल निर्जलीकरण केंद्र उभे करण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतलेला आहे. या प्रकल्पासाठी तात्पुरती सुरुवात करीत असल्यामुळे या मशिनरीची किंमत 90 लाख रुपये असून त्याकरिता खेळते भांडवल शासनाकडून दिले जाणार आहे. संत्रा निर्जलीकरण प्रकल्प, पॅक हाऊस, ज्यूस एक्स्टॅशन, बॉटलिंग, निर्जलीकरण, प्रयोगशाळा, अन्न सुरक्षा उपकरणे, रेफर व्हॅन हे सर्व सुरुवातीपासून वाढविले जाणार आहे. या ठिकाणी संत्रा यावा त्याचे निर्जलीकरण व्हावे, त्याची पावडर तयार करुन ती मार्केटमध्ये न्यावी अशा स्वरुपाची बाजारपेठ कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. राज्यातील 10 शहरांमध्ये व परराज्यातील 4 शहरांमध्ये 1500 मे.टन संत्रा रोज जावा यादृष्टीने करारनामा कालच करण्याचे ठरविण्यात आले आहे. 5 हजार मे.टन संत्र्यांच्या विक्रीचे थेट नियोजन या माध्यमातून करण्यात आले असून प्रक्रिया उद्योगाशी करारनामा करुन तशा प्रकारे आपल्याला तो देता येईल. संत्रा निर्यात करीत असताना महाऑरेंज सीएआयएम यामार्फत निर्यातक्षम संत्रा उत्पादकाचे प्रशिक्षण व कार्यशाळेचे नियमित आयोजन करणे, संत्रा कोलंबो पर्यंत पाठविणे. संत्र्यांच्या संदर्भामध्ये कोकाकोलाच्य माध्यमातून वरुड येथे .....

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती :** आता 5 वाजून 28 मिनिटे झालेली आहेत. आज सायंकाळी 6 वाजता राज्यपाल महोदयांनी सर्व सदस्यांसाठी चहपानाचा कार्यक्रम ठेवलेला आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृह नेत्यांचा प्रस्तावाच्या संदर्भातील रिप्लाय झ ाल्यानंतर राईट टू रिप्लायचा नियम 260 अन्वये आम्हाला अधिकार आहे. आम्हाला राईट टू रिप्लायची संधी मिळावी व त्यानंतर सभागृहाचे कामकाज किती वाजेपर्यंत चालवायचे त्यासंदर्भात आपण निर्णय घ्यावा....(अडथळा)....

QQ-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती :** मी संसदीय कार्य मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांचा राईट टू रिप्लाय ऑन लेग ठेवावा, पण त्यांना राईट टू रिप्लाय मिळाला पाहिजे, असे मत नोंदविलेले आहे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

मी सभागृहाची बैठक 10मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5.30 ते 5.40 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

........ 2R-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**उप सभापती :** सभागृहाची बैठक मी पुन्हा सायंकाळी 5.50 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5.40 ते 5.50 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---------

..2एस....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : आपण स्थगितीपूर्वी सुरूअसलेल्या विषयावर योग्य तोडगा काढू. आता माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी कामकाज सल्लागार समितीचे कार्यवृत्त सभागृहाच्या मान्यतेसाठी मांडावे.

**पृ.शी./मु.शी.** : कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करून घेणे.

श्री. गिरीष बापट (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

कामकाज सल्लागार समितीची बैठक बुधवार, दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजी दुपारी 3.30 वाजता विधान भवन, नागपूर येथे झाली. सदर बैठकीत समितीने विचारविनिमय करुन गुरुवार, दिनांक 17 डिसेंबर, 2015 ते बुधवार, दिनांक 23 डिसेंबर, 2015 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला.

डिसेंबर, 2015

गुरुवार, दिनांक 17 : (1) शासकीय विधेयके

(2) भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधान या विषयावर चर्चा

(3) विरोधी पक्षाचा प्रस्ताव

शुक्रवार, दिनांक 18 : (1) शासकीय विधेयके

(2) शासकीय ठराव (मानवी अवयव प्रतिरोपण)

(3) अशासकीय कामकाज (विधेयके)



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गिरीष बापट ....

शनिवार, दिनांक 19 : बैठक होणार नाही.

रविवार, दिनांक 20 : सुट्टी

सोमवार, दिनांक 21 : (1) शासकीय विधेयके

(2) महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय संरक्षण मंत्री, माननीय श्री. शरदचंद्र पवार यांचे अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन व अभिनंदनपर प्रस्ताव

मंगळवार, दिनांक 22 : (1) शासकीय विधेयके

(2) सत्तारूढ पक्षाचा प्रस्ताव

(3) अंतिम आठवडा प्रस्ताव

बुधवार, दिनांक 23 : शासकीय विधेयके

**सभापती** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## माननीय राज्यपालांनी दिलेल्या आमंत्रणाबाबत

**सभापती** : आता माननीय राज्यपालांनी त्यांच्याकडे येण्याचे आपल्या सर्वांना आमंत्रण दिले आहे. तेथे वेळेवर जाणे, त्यांचा सन्मान राखणे हे आपले कर्तव्य आहे. माझ्या समजुतीने सभागृहाच्या माननीय नेत्यांचे भाषण व्यवस्थित करून घेतले तर राईट ऑफ रिप्लाय आजच्या आज संपवू आणि त्यानंतर माननीय राज्यपालांकडे जाऊ. आता माननीय मंत्र्यांनी भाषणास सुरूवात करावी.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात पडलेला भीषण दुष्काळ, अवकाळी पाऊस व गारपीट आणि तीव्र टंचाई यामुळे निर्माण झालेली परिस्थिती तसेच अवकाळी पाऊस,गारपीटीमुळे खरीप व रब्बी पिकांच्या झालेल्या हानीमुळे राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट

**मु.शी.**: "राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात पडलेला भीषण दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट आणि तीव्र टंचाई यामुळे निर्माण झालेली परिस्थिती" या विषयावर ***सर्वश्री.धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, अमरसिंह पंडित, जयंत प्र.पाटील, शरद रणपिसे, सतिश चव्हाण, संजय दत्त, संदीप बाजोरिया, विक्रम काळे, ख्वाजा बेग, प्रकाश गजभिये, प्रा.जोगेंद्र कवाडे, राजेंद्र मुळक, अमरनाथ राजूरकर, सुभाष झांबड, चंद्रकांत रघुवंशी, जयवंतराव जाधव, अब्दुल्ला खान दुर्राणी, श्रीमती दिप्ती चवधरी, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, वि.प.स.*** यांचा प्रस्ताव तसेच "अवकाळी पाऊस, गारपीटीमुळे खरीप व रब्बी पिकांच्या झालेल्या हानीमुळे राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट" या विषयावर श्री.पांडुरंग फुंडकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.गोपीकिशन बाजोरिया, प्रा.अनिल सोले, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री विजय गिरकर, महादेव जानकर, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरू ....

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्यात दिवसेंदिवस जसा उन्हाळा येईल तशी दुष्काळाची तीव्रता वाढत जाईल अशी स्थिती आहे. राज्यातील जलाशयाची विद्यमान स्थिती अशी आहे की, कोकणमध्ये शिल्लक पाणी साठा 82 टक्के आहे, गेल्या वर्षी हा 85 टक्के होता. मराठवाड्यात फारच भीषण परिस्थिती असून फक्त 13 टक्के पाणी साठा शिल्लक आहे, गेल्या

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

वर्षी याच वेळी हा साठा 32 टक्के होता. नागपूरमध्ये पाणी साठा 48 टक्के आहे, मागच्या वर्षी तो 52 टक्के होता, अमरावतीत पाणी साठा 57 टक्के आहे, मागच्या वर्षी तो 65 टक्के होता. नाशिकमध्ये पाणी साठा 50 टक्के आहे, मागच्या वर्षी तो 78 टक्के होता. पुण्यामध्ये पाणी साठा 53 टक्के आहे, मागच्या वर्षी 81 टक्के होता. इतर धरणांमध्ये किंवा छोट्या एमआय टँकमध्ये 64 टक्के पाणी साठा शिल्लक आहे, गेल्या वर्षी हा 78 टक्के होता. पिण्याच्या पाण्याची टंचाई भासण्याची परिस्थिती लक्षात घेता, टंचाईसदृश्य परिस्थितीत निर्णय घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना विभाग प्रमुख म्हणून नेमण्यात आले आहे. पूर्वीच्या कालखंडात देखील जिल्हाधिकारी रहायचे. पण जिल्हधिकाऱ्यांना विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती नव्हती. जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती यासाठी करावी लागली की, वेगवेगळ्या खात्यांचे अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना दिली तरी काम करीत नव्हते, इरिगेशनचे अधिकारी त्यांच्या अधिकाऱ्यांचे ऐकत होते, विद्युत विभागाचे अधिकारी म्हणायचे की, माझ्या मुख्य अभियंत्यांना विचारले पाहिजे. त्यामुळे त्यामध्ये विस्कळीतपणा होता. आपण जिल्हाधिकाऱ्यांना असे विशेष अधिकार देण्याचे ठरविले आहे की, आता दृष्काळाशी, टंचाईशी संबंधित असलेल्या कोणत्याही खात्याचा कोणताही अधिकारी असला तरी त्याच्यावर आता जिल्हाधिकाऱ्यांचे नियंत्रण राहील, त्याला निलंबित करणे, त्यावर कारवाई करणे, त्याची चौकशी करणे असे सर्व अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील. प्रस्ताव दुसऱ्या विभागाकडे यायचा. दुसऱ्या विभागाने परवागनी दिल्याशिवाय जिल्हाधिकाऱ्यांना कार्यवाही करता येत नव्हती. धरणातील पाणी साठा राखून ठेवण्याचे आधिकारही आता संपूर्णत: जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. सध्या राज्यात 570 गावांमध्ये, 910 वाड्यांमध्ये 748 टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत आहे. कधी नव्हे तो ऑगस्ट महिन्यापासून आपल्याला चारा छावण्या सुरू कराव्या लागल्या. आजघडीला 41 चारा छावण्या सुरू आहेत. 72 हजार लहान-मोठी जनावरांचा चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यात आला आहे. अजूनही या ठिकाणी मोठ्या प्रमाणात चारा छावणीची मागणी आहे. जिल्हाधिकाऱ्यांना चारा छावणी सुरूकरण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. परिस्थिती पाहून

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

जिल्हाधिकाऱ्यांनी त्या संदर्भातील निर्णय घ्यायचा आहे. 33 जिल्ह्यांत 1 लाख 66 हजार हेक्टरवर चारा लागवड वैरण विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत करण्यात येणार आहे आणि 33 लाख टन त्यामधून चारा अपेक्षित आहे. हायड्रोफोनिक अशा स्वरूपाचे चारा लागवडीसाठी विकसित केलेली यंत्रे आहेत किंवा त्या संदर्भातील व्यवस्था आहे, त्यालाही 50 टक्के सबसिडी देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. माती विरहित चारा, हिरवा चारा अशी त्यातील संकल्पना आहे, ती यशस्वी रितीने आता पार पाडली जाते. आता मी त्याचे डिटेल्स सांगत नाही. परंतु त्या संदर्भातील एक निर्णय सरकारने घेतला आहे. नव्याने दुष्काळ मदतीचा प्रस्ताव आहे. बरीच टीका झाली की, राज्य शासनाने किती खर्च केला आहे. 9 तारखेला प्रस्ताव दिला. केंद्र शासनाने पैसे दिले अशी टीका झाली, कमी खर्च होत आहे अशीही टीका झाली. पण मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, आघाडीच्या कालखंडात देण्यात आलेली मदत सन 2010-11 ला 42 कोटी रुपये अवर्षणासाठी होती, 802 कोटी रुपये अतिवृष्टी व गारपीटीला मदत झाली, सन 2011-12 ला अवर्षणाला 1100 कोटी रुपये व अतिवृष्टीला 256 कोटी रुपये, सन 2012-13 ला 1404 कोटी रुपये व अतिवृष्टीला 100 कोटी रुपये, सन 2013-14 ला 1296 कोटी रुपये आणि अतिवृष्टीला 883 कोटी असे अवर्षणासाठी 3842 कोटी रुपये देण्यात आले, अतिवृष्टीला 2041 कोटी रुपये अशी एकूण 5883 कोटी रुपये आतापर्यंत तुम्हाला या 4 वर्षांत मदत केंद्र सरकारकडून मिळाली.

सभापती महोदय, आमच्या सरकारच्या कालखंडात एकाच वर्षात म्हणजे नोव्हेंबर, 2014 ते नोव्हेंबर, 2015 या कालखंडात अवर्षणासाठी 3973 कोटी 94 लाख रुपये व अतिवृष्टीसाठी 2230 कोटी 15 लाख रुपये असे एकूण 6203 कोटी रुपये केंद्र सरकारच्या आणि आमच्या माध्यमातून खर्च केले. 4 वर्षांत तुमच्या काळात 5883 कोटी रुपये होते आणि या एका वर्षात 6203 कोटी रुपये दुष्काळासाठी खर्च करण्यात आले. नव्याने सरकारकडे प्रस्ताव पाठविताना, आता पुरक मागण्या मंजूर केल्या. आज विनियोजन विधेयक समोर आहे. 4 हजार कोटी रुपयांची तरतूद या पुरक मागण्यांमध्ये दुष्काळासाठी केली आहे. पैसा केंद्र सरकारचा असो किंवा राज्य शासनाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

असो हा प्रश्न नाही. पैसा कमी पडू देणार नाही. आम्ही त्यासाठी प्रत्यक्ष तरतुदी केल्या आहेत. 4 हजार कोटी रुपयांची तरतूद याच पुरक मागण्यांमध्ये केली आहे. त्यामुळे केंद्र सरकारने दिले, राज्य शासनाने दिले नाही, उशिरा दिले, लवकर दिले हे प्रश्न राहत नाहीत. आता केंद्र सरकारकडे वारंवार आग्रह धरत आहोत. मला अपेक्षा आहे की, अजुनही दोन ते अडीच हजार कोटी रुपयांची मदत केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्य शासनाला मिळेल.

....2T

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे..........

दुष्काळामुळे बाधित झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याला आपण मदत करीत आलो आहोत. ही मदत राष्ट्रीय आपत्ती निवारणाच्या माध्यमातून केली. दुष्काळामुळे बाधित झालेल्या 15747 गावांमध्ये शेतकऱ्यांना 7412 कोटी रुपयांची मदत रोख स्वरुपात दिली जाईल. रोख स्वरुपात आपण ही रक्कम त्यांच्या खात्यात जमा करु अशा प्रकारे वेगवेगळ्या माध्यमातून मदत देण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. 7411 कोटी रुपयांची मदत रोख स्वरुपात आम्ही देणार आहोत. बाधित 53 लाख 12 हजार शेतकऱ्यांचे निविष्टा अनुदान पुढील कालखंडात पेरणीसाठी देता आले पाहिजे व अन्य व्यवस्थांसाठी करता आले पाहिजे यासाठी 3578 कोटी रुपये अनुदानाच्या माध्यमातून एकूण 19 हजार शेतकऱ्यांना देण्याचाही निर्णय शासनाने घेतलेला आहे. सन 2015 च्या खरीपामध्ये ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा उतरविला आहे अशा सर्व शेतकऱ्यांना राष्ट्रीय पीक विमा योजनेच्या माध्यमातून मदत दिली जाईल. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या वर्षी सन 2015 मध्ये 82 लाख शेतकऱ्यांनी त्यांच्या पिकाचा विमा उतरविला आहे. हा एक प्रकारचा उच्चांक आहे. याचा अर्थ असा आहे की, पीक विमा योजना शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय होत आहे. 1 कोटी 37 लाख खातेदार शेतकरी आहेत व त्यापैकी 82 लाख शेतकऱ्यांनी पीक विमा उतरविला आहे देशातील आतापर्यंतची ही सर्वाधिक संख्या आहे व पीक विम्याच्या माध्यमातून शेतकरी तयार झाले आहेत. या माध्यमातून विमा कंपनीकडून आकडेवारी घेतली असता 2800 कोटी रुपयांची मदत या विमा कंपनीच्या माध्यमातून देण्याचे विमा कंपनीने आम्हाला कळविलेले आहे. हा पैसा तपासणीनंतर मार्च अखेरपर्यंत दिला जाईल.

सभापती महोदय, काही सोयाबीन आणि कापुस उत्पादक शेतकऱ्यांनी विमा उतरविलेला नाही. मघाशी मी सागितले की, काही शेतकरी असे आहेत की, सोयाबीनचे नुकसान झाले पण विमा उतरविला नाही, काही असे आहेत की, कापसाचे उत्पादन कमी आले पण त्यांना नुकसान भरपाई देता येत नाही. कारण त्यांची गावे टंचाईग्रस्त म्हणून जाहीर झालेली नाहीत. पीक विमा उतरविलेल्या शेतकऱ्यांना मिळणाऱ्या रकमेच्या 50 टक्के रक्कम या पॅकेजच्या माध्यमातून सर्व

...2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे..........

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळेल. यासाठी अंदाजे 1 हजार 34 कोटी रुपयांचा निधी त्यांना देण्यात येईल. सोयाबीन आणि कापुस उत्पादक, ज्यांना विम्याचे संरक्षण नाही, ज्यांचे उत्पादन कमी झाले म्हणून फटका बसला आहे, जी गावे टंचाईग्रस्त नाहीत, अशांना हा पैसा देण्याचे ठरविलेले आहे.

सभापती महोदय, जलयुक्त शिवार योजने अंतर्गत निवडलेल्या गावांमध्ये सर्व योजनांचे रुपांतर केल्यानंतर तुट भरुन काढण्यासाठी 1 हजार कोटी रुपयांचा जादा निधी उपलब्ध करुन देण्याचाही निर्णय सरकारने घेतलेला आहे. जलयुक्त शिवार योजनेचे अधिक सक्षमीकरण करणे, संरक्षित सिंचनाच्या वैयक्तिक सुविधा निर्माण करणे, यासाठी मागेल त्याला शेततळे हा कार्यक्रम राबविण्यात येईल आणि ही शेततळी शेतकऱ्यांकडून पूर्ण करण्यात येतील. यासाठीचे अनुदान थेट त्याच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. प्रत्येक शेततळ्यासाठी 50 हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या संदर्भात रोजगार हमी योजनेचे निकष शिथिल करुन जेसीबी किंवा अन्य यंत्राचा वापर करता येईल. साधारणपणे 250 कोटी रुपये मागेल त्याला शेततळे या योजनेसाठी राखून ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे.

सभापती महोदय, धान खरेदीसाठी प्रति क्विंटलमागे 200 रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. अंदाजे 17 लाख क्विंटल धान खरेदीसाठी 34 कोटी रुपये देण्याचाही निर्णय आज सरकारने घेतलेला आहे. एकंदर वेगवेगळे निकष शिथिल करणे, प्रत्येक घटकाला पैसा किंवा मदत उपलब्ध करुन देणे, यासाठी साधारणत: 9128 कोटी रुपये या वर्षी देण्याचे शासनाने ठरविलेले आहे. धान खरेदीसाठी 34 कोटी रुपये, असे मी सांगितले होते. तथापि, ते 100 कोटी रुपये आहेत, असे मुख्यमंत्री महोदय सांगत आहेत. कारण हा आकडा वाढलेला आहे. 23 हजार नवीन विहिरींना मंजुरी द्यावयाची आहे. या विहिरी मनरेगामधील नाहीत. सिंचनाच्या व्यवस्था कराव्यात यासाठी राज्य सरकारकडून या 33 हजार विहिरींना मान्यता देण्यात येईल. त्यासाठी 750 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याचा निर्णय आज सरकारने घेतलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3...

श्री.एकनाथराव खडसे..........

सभापती महोदय, इन्फ्रा-2 ही योजना पूर्वीची होती. परंतु पैसे नव्हते. आता या माध्यमातून काही पैसा उपलब्ध झालेला आहे. राज्य सरकार म्हणजे वीज कंपनीही यामध्ये योगदान देणार आहे. असे एकत्रितपणे 1000 कोटी रुपये इन्फ्राच्या माध्यमातून वीज जोडणीसाठी देण्याचाही निर्णय आज राज्य सरकारने घेतलेला आहे.

सभापती महोदय, एकूण 10512 कोटी रुपये उपलब्ध करुन देऊन विविध मार्गाने शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. अशा अडचणीच्या कालखंडात, राज्याची आर्थिक स्थिती तेवढी ठीक नसताना सुध्दा राज्य सरकारने हा पैसा उभा करुन शेतकऱ्यांना पोहोचविण्याचा निर्णय घेतलेला आहे. याही पेक्षा अधिकचा पैसा लागला तर तो उभा करण्याची तयारी सरकारने दाखविलेली आहे. हे सर्व तात्पुरते उपाय असतील, काही दीर्घकालीन उपाय असतील पण शेतकऱ्यांच्या जीवनामधील अंधार दूर करण्याचा आपला प्रयत्न आहे. मग तो आत्महत्याग्रस्त भाग असेल किंवा ज्या ठिकणी आत्महत्या होत नाहीत, असा भाग असेल त्या ठिकाणी या सर्व व्यवस्था निर्माण करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. आपण सर्वांनी या चर्चेत सहभाग घेतला त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्यातील शेतकरी या चर्चेकडे आणि सरकारच्या उत्तराकडे फार अपेक्षेने पाहतो आहे. स्वाभाविकपणे या हिवाळी अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांसाठी हे सरकार काही तरी मोठे निर्णय करील, अशी अपेक्षा होती. सन्माननीय सभागृहाच्या नेत्यांच्या उत्तरानंतर हे स्पष्ट झाले की, पुन्हा एकदा हे सरकार शेतकऱ्यांचे नाही. त्यांनी पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केलेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

सभापती महोदय, लहान असताना शाळेमध्ये कधी कधी जादुचे प्रयोग व्हायचे. तो जादुगार आपल्या रुमालातून कबुतर काढायचा, ते लहान असताना एकाग्रचित्ताने पहायचो आणि नवल वाटायचे.

सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांचे भाषण मी ऐकले. आम्हाला वाटले होते की, त्यांच्या कागदांमधून शेतकऱ्यांच्या बाबतीत काही तरी निघेल. पण त्यांच्याकडून हीच अपेक्षा होती की, त्या शेतकरी बांधवाला, तो संकटात असताना कर्जमुक्तीच्या बाबतीत निर्णय करुन काही तरी दिलासा दिला जाईल. या सरकारचा आम्ही आपल्या माध्यमातून निषेध करतो. अशा संकटाच्या काळात शेतकऱ्याच्या कर्जमुक्तीच्या बाबतीत सरकारने कसलाही निर्णय केलेला नाही. सन्माननीय सभागृह नेत्यांचे उत्तर मी ऐकले आहे. उत्तरामध्ये डिसेंबर महिन्यामध्ये जे पॅकेज जाहीर केले त्या संबंधी जो निर्णय करावयाचा होतो, त्याची देखील अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. माझ्या भाषणात मी याबाबतचा उल्लेख केला होता. मागील वेळी सर्व जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून 4500 कोटी रुपयांची मागणी केली असताना या सरकारने 3800 कोटी रुपये दिले. 1 हजार कोटी रुपये मागील डिसेंबर महिन्यात जाहीर केले ते अद्याप मिळालेले नाहीत. हे आम्हालाही कळावयास पाहिजे होते. त्या ठिकाणी 1 हजर कोटी रुपयांच्या बाबतीत शेतकऱ्यांना फसविले. आता आम्ही कितीही गळा काढला किंवा पोटतिडिकीने सांगितले तरी हे सरकार शेतकऱ्यांसाठी काही करणार नाही. हे आम्हाला समजावयास हवे होते. पण लक्षात आले नाही. असे वाटले की, सरकार सकारात्मक आहे, चर्चा करावी. त्याप्रमाणे आम्ही चर्चा केली. पण शेतकऱ्यांच्या बाबतीत हे सरकार सकारात्मक नाही. हे फक्त व्यापाऱ्यांच्या बाबतीत सकारात्मक आहेत. सावकार आणि सरकार यामधील एक शब्द बदलला तर सर्व बदलते. आज या सभागृहामध्ये सावकाराकडून घेतलेले कर्ज माफ केल्याबद्दल सरकार स्वत:ची पाठ थोपटून घेत आहे. एकीकडे आम्ही सर्व जण 1 कोटी 38 लक्ष शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे, अशी मागणी करीत आहोत. आपण सावकाराकडून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...5....

श्री.धनंजय मुंडे........

घेतलेले कर्ज माफ केले. शासकीय आकडेवारी बघितली तर फक्त अडीच लाख शेतकरी आहेत. त्यांच्यासाठी आपण हा निर्णय घेतला आणि आपली पाठ थोपटून घेतली. पण राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या बाबतीत आपण कोणताही निर्णय करीत नाही. हे या राज्यातील शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे. आता सभागृहाच्या नेत्यांनी संगितले की, आम्ही शेतकऱ्यांसाठी 6 टक्के व्याज माफ केले आहे.

..UU-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

शेतकऱ्याला 1 लाख रुपयांपर्यंत शून्य टक्के व्याज दराने आणि 3 लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेचे कर्ज असेल तर 3 टक्के व्याज दराने कर्ज मिळते. मग आता 6 टक्के कोठे ? त्या जादुगाराचे कबुतर कसे आहे हे भान आल्यानंतर आपल्याला कळते. ही संपूर्ण जगलरी आहे. शासनाने सावकरांच्या बाबतीत निर्णय घेतला. आपण श्री.सानंदा यांच्या बाबतीत सांगितले. परंतु, श्री.संचेती कोण आहेत हे जर भाऊ आपण बघितले तर आम्हाला आनंद होईल. औरंगाबाद विभागात सावकारांचे 1 कोटी 67 लाख रुपयांचे कर्ज माफ झाले. त्यामध्ये सावकार श्री.संचेती यांचे 80 लाख रुपयांचे कर्ज माफ झाले. अधिवेशन सुरु झाल्यानंतर औरंगाबाद विभागातील आकडेवारी वाढविण्यात आली. सावकारांचे जे प्रस्ताव होते ते तुम्ही मंजूर केले. परंतु, वस्तुस्थिती अशी आहे की, अधिवेशन सुरु होण्यापूर्वी आपण मागील वर्षी मंजूर केलेल्या योजनेचा फक्त 716 शेतकऱ्यांना फायदा झालेला आहे. हा तुमचा कारभार आहे ? हे रयतेचे, शेतकऱ्यांचे राज्य आहे, असे कोणीही म्हणणार नाही. ठीक आहे, आज तुम्हाला जे करावयाचे आहे ते तुम्ही करावे. परंतु, शेतकरी तुम्हाला कधीही माफ करणार नाही. आज त्यांच्यावर वेळ आलेली आहे आणि त्या संकटात तुम्ही जर धावून गेला नाहीत तर उद्या तो शेतकरी सुद्धा धावून येणार नाही, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

सभापती महोदय, शासनाने विहिरींच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. 1 लाख विहिरींच्या बाबतीत अगोदर निर्णय घेतला आणि त्या विहिरी एमआरईजीएसमध्ये घ्यावयाच्या आहेत. एमआरईजीएस मधून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना 1 विहीर देण्याचा जो निर्णय शासनाने घेतला त्या विहिरी कशातून देण्यात येणार आहेत ? त्या विहिरी एमआरईजीएस मधून देण्यात येणार आहेत. एमआरईजीएसच्या बाबतीत त्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील जॉबकार्ड काढण्यापासून तर कुशल, अकुशलचे पेमेंट घेण्यापर्यंत ही आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची थट्टा आहे. आपले हे प्रेम आहे शेतकऱ्यांवर ? शासनाने आज जे निर्णय घेतले त्या प्रत्येक निर्णयात जगलरी आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

सभापती महोदय, माननीय कृषी मंत्र्यांनी सोयाबीन पिकाच्या संदर्भात सांगितले. आता सोयाबीन पिकाची काढणी पूर्ण झालेली आहे. मग आपण सोयाबीन पिकाची काढणी पूर्ण झाल्यानंतर मदत देण्यासाठी कोणता फॉर्म्युला वापरणार आहात ? आपण याचाही विचार केला पाहिजे. आपण पीक विम्याच्या बाबतीत सांगितले की, आम्ही 2803 कोटी रुपये देणार आहोत. पीक विम्याची रक्कम देण्याचा तुमचा काय संबंध आहे आणि आपल्याला खरोखर पीक विम्याची रक्कम द्यावयाची असेल तर पुरवणी मागण्यांमध्ये 2803 कोटी रुपयांच्या हिशोबाने राज्य सरकारचा हिस्सा किती असावयास पाहिजे होता ? पुरवणी मागण्यांमध्ये राज्य शासनाचा हिस्सा किती आहे, हे आपण बघावे. राज्य शासनाचा हिस्सा फक्त 20 कोटी रुपये आहे. तो 20 कोटी रुपयांच्या पलीकडे नाही आणि या पिक विम्याचे क्रेडीट देखील तुम्ही घेत आहात ? त्या हिशोबाने पीक विम्याच्या रक्कमेत आम्हाला राज्य शासनाचा हिस्सा दिसला असता तर आम्ही क्रेडीटही दिले असते आणि राज्य शासनाचे शेतकऱ्यांवरील प्रेम देखील आम्हाला दिसले असते. आम्ही तुमचे अभिनंदन केले असते. बीटी कॉटन बियाण्यांचे दर कोणत्या तारखेला कमी झाले ? बीटी कॉटन बियाण्याचे दर पेरणी होण्यापूर्वी कमी झाले का पेरणी झाल्यानंतर कमी झाले, हे आपण आम्हाला सांगावे. हा विषय देखील महत्वाचा आहे. एखादा विषय उपस्थित केल्यानंतर तो विषय कसा बाजूला गेला पाहिजे हे समोर बसलेल्या लोकांना जेवढे जमते तेवढे कोणालाच जमत नाही.

सभापती महोदय, शासनाने ईजीएसच्या कामांच्या बाबतीत आणि छावन्यांच्या बाबतीत सांगितले. मराठवाड्यातील 3 जिल्ह्यातील छावण्यांचा जो निर्णय झाला त्याबाबत मी सभागृहाला माहिती देतो. बीड जिल्ह्यात 50 छावन्या मंजूर झालेल्या आहेत. त्यापैकी फक्त 16 छावन्या सुरु झाल्या आणि त्या 16 छावन्यांमध्ये 16,267 जनावरे आहेत. लातूर जिल्ह्यात 15 छावन्या मंजूर झालेल्या आहेत. त्यापैकी एकही छावनी सुरु झालेली नाही आणि त्यामध्ये एकही जनावर नाही. उस्मानाबाद जिल्ह्यात 38 छावन्या मंजूर झालेल्या आहेत. त्यापैकी फक्त 14 छावन्या सुरु झाल्या आणि त्यामध्ये 16,014 जनावरे आहेत. मराठवाड्यात एकूण 103 छावन्या मंजूर असून त्यापैकी

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

फक्त 30 छावन्या सुरु झालेल्या आहेत आणि त्यामध्ये फक्त 32,281 जनावरे आहेत. मघाशी राणा भिमदेवी थाटात सांगण्यात आले की, छावन्यांमध्ये 78 हजार जनावरे आहेत, अमूक एवढ्या छावन्या आहेत. शेतकऱ्यांना फसवू नये, एवढीच माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत राज्यात 15,294 कामे सुरु आहेत. दिनांक 28.11.2015 पर्यंतची आकडेवारी मी सांगत आहे. संपूर्ण राज्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांची उपस्थिती 1,24,190 इतकी आहे. मी ही राज्याची माहिती दिली. आता मी मराठवाडा विभागाची माहिती देतो. मराठवाड्यात एकूण 2,384 कामे सुरु आहेत आणि त्या कामांवर 32,299 मजूर आहेत. मी आपल्याला दिनांक 28 नोव्हेंबर, 2015 रोजीची आकडेवारी सांगत आहे. मुख्यमंत्री महोदय, मला ही आकडेवारी शासनाकडूनच मिळते. आकडेवारी गोळा करण्यासाठी माझ्याकडे वेगळी यंत्रणा नाही. आपल्याकडून जी आकडेवारी मिळते तीच मी सांगत आहे. तुम्ही 15 वर्षे विरोधात असताना शेतकरी संकटात सापडल्यानंतर तुम्ही पोटतिडकीने शेतकऱ्यांची बाजू मांडत होता. परंतु, मुख्यमंत्री महोदय सत्तेत आल्यानंतर शेतकरी राजाच्या बाबतीत थोडेसे प्रेम, पाषाण हृदयाला थोडा जरी पाझर फुटला असता तर आम्ही तुमचा सत्कार केला असता. भाऊ आपण म्हणालात की, मदत करावयाची तर मदत केल्याने आत्महत्या थांबत नाहीत. आज तुम्ही त्या पदावर बसल्यानंतर असे म्हणता की, विरोधी पक्षाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाहीत अशी भूमिका घ्यावी. आम्ही त्यांना मदत करायला तयार आहोत. हे आपले बोलणे झाले काय ? जन्म, मृत्यू कोणाच्या हातात नाही. माझा जन्म आणि मृत्यू माझ्या हातात नाही. माझ्या मनात नैराश्य आले, मला आत्महत्या करावी असे वाटले तर मी आत्महत्या करीन. परंतु, आपल्याला आता मदत करावयाची नाही. मग बोलावयाचे काय ? तुम्ही म्हणता की, तुम्ही एवढे कर्जमाफ केले तरी आत्महत्या कमी झाल्या काय ? आम्ही कर्जमाफ केले. तुम्ही आम्हाला विचारता की, तुम्ही मागील 15 वर्षात काय केले ? आम्ही मागील 15 वर्षात शेतकऱ्यांचे 72 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. आम्ही तर आता फक्त 7 हजार

..4...

श्री.धनंजय मुंडे........

कोटी रुपयांचेच कर्जमाफ करावे असे म्हणत आहोत. हे कर्जमाफ का होऊ नये ? आम्ही कर्जमाफ केल्यानंतर तुम्ही म्हणता की, त्याचा बँकांना फायदा होतो आणि तुम्ही कर्जमाफ केल्यानंतर म्हणता की, त्याचा शेतकऱ्यांना फायदा होतो, सावकारांना फायदा होत नाही. आपण ही जगलरी थांबवावी. माझी विनंती आहे की, आपण गंभीर व्हावे. आता आपण सत्तेत आलेला आहात. महाराष्ट्रातील जनतेने आपल्याला सत्तेत बसविले आहे. फक्त एलबीटी माफ करणाऱ्या व्यापाऱ्यांनी तुम्हाला मतदान केलेले नाही, तर महाराष्ट्रातील खेडोपाडी राहणाऱ्या शेतकऱ्यांनी देखील तुम्हाला मतदान केलेले आहे. म्हणून तुम्ही या खुर्चीवर बसलेला आहात. अशा पद्धतीने होणे चुकीचे आहे. आम्ही मागणी केली होती की, शेतकऱ्याच्या मालाला किती हमी भाव मिळणार आहे ? आज शेतकऱ्यांच्या शेतात धान्य पिकले नाही म्हणून विकले नाही आणि जे धान्य पिकले ते विकाताना त्याला भाव मिळाला नाही. शेतकऱ्याचे कर्ज फिटले नाही. म्हणून नैराश्य येऊन तो आत्महत्या करीत आहे. आम्ही ओरडून सांगत आहोत. परंतु, शेती मालाच्या हमी भावाबाबत आपण आपल्या उत्तराच्या भाषणात एका शब्दाचाही उल्लेख केला नाही. कापसाला पूर्वी प्रती क्विंटल 5,500/- रुपये मिळत होता. आज कापसाला तेवढा भाव मिळेल याबाबत तुम्ही खात्री दिली काय ? आज सोयाबीनचा भाव 3,200/- रुपये प्रती क्विंटलवर आलेला आहे. पूर्वी सोयाबीनला 4 हजार रुपये प्रती क्विंटल भाव होता. सोयाबीनला 4 हजार रुपये भाव मिळेल, याची तुम्ही खात्री दिली काय ? एखाद्या सोयाबीन शेतकऱ्याने आत्महत्या केली नसती. हे आपले अपयश नाही काय ? तुम्ही एका वर्षात ज्या गोष्टी करावयास पाहिजे होत्या त्या तुम्ही करु शकला नाहीत आणि आज मदत करण्याच्या वेळी देखील जगलरी करुन शेतकऱ्यांची निराशा केली. शेतकरी तुम्हाला कधीच माफ करणार नाही. म्हणून या ठिकाणी विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी एकमुखाने मागणी केली होती की, आपण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी आणि ती करण्यासाठी जर सरकारला कर्ज घ्यावे लागले तरी चालेल. शासनाची आजही कर्ज घेण्याची ऐपत आहे. कर्जमाफ करण्यासाठी कर्ज घेतले तर आम्ही पुढील 5 वर्षे कर्ज का घेतले म्हणून आरोप करणार नाही

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

आणि कर्ज घेऊन कर्जमाफी देणार असाल तर आम्ही सरकारचे जाहीर स्वागत करू परंतु, हा प्रसंग देखील सरकारला ओढवून घेता आला नाही. याचा अर्थ एवढाच आहे की, हे सरकार शेतकऱ्यांच्या विरोधात आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी एका वर्षापासून तुम्हाला सत्तेवर बसविले आहे. शेतकरी येणाऱ्या संधीची वाट पाहत आहे. परंतु, यामध्ये सुधारणा होईल असे मला वाटत नाही. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आम्ही आताही आपल्याला संधी देतो. भाऊ तुम्ही एका ओळीत जाहीर करु शकला असता की, आम्हाला चर्चेची आवश्यकता नाही, आम्ही कर्जमाफी जाहीर करतो. आपल्याला एक संधी आणखी आहे. तुम्ही आता कर्जमाफी जाहीर करावी.

..2V-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

या सरकारने कर्जमाफी जाहीर केली नाही व मदत देखील दिली नाही. पुन्हा मागच्या वर्षात सात हजार कोटी रुपयांचे पॅकेज व आता दहा हजार कोटी रुपयांचे पॅकेजची घोषणा केली आहे. त्या पॅकेजमधून शेतकऱ्यांना मागेही काहीच मिळाले नाही व आता पुढेही काही मिळण्याची अपेक्षा नाही म्हणून आम्ही या सरकारचा जाहीर निषेध करतो. या सरकारने शेतकऱ्यांना फसविले आहे. हे सरकार शेतकऱ्याच्या विरोधात आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे वेळेअभावी कोणालाही राईट ऑफ रिप्लायवर बोलावयास मिळणार नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, केवळ एक गोष्ट विरोधी पक्ष नेत्यांना सांगतो की, तुम्ही जी कर्जमाफी केली, त्या कर्जमाफीची एकूण रक्कम सात हजार कोटी रुपये होती ते पैसे बँकेला देण्यात आले आहेत. आम्ही दहा हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना देत आहोत. त्यामुळे विरोधी पक्ष सदस्यांच्या घोषणा बेगडी आहेत, तुम्हाला शेतकऱ्यांशी काही देणेघेणे नाही.

**सभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** वेगळ्या विदर्भ राज्याबाबतची राज्य शासनाची भूमिका व यासंदर्भात राज्याचे महाधिवक्ता श्री.श्रीहरी अणे यांनी जाहीर कार्यक्रमात व्यक्त केलेली भूमिका.

**मु.शी.:** "वेगळ्या विदर्भ राज्याबाबतची राज्य शासनाची भूमिका व यासंदर्भात राज्याचे महाधिवक्ता श्री.श्रीहरी अणे यांनी जाहीर कार्यक्रमात व्यक्त केलेली भूमिका." याबाबत श्री.संजय दत्त, श्रीमती नीलम गोऱ्हे, श्री.जनार्दन चांदूरकर व अन्य सदस्यांनी नियम 289 अन्वये दिलेली सूचना.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.संजय दत्त, श्रीमती नीलम गोऱ्हे, श्री.जनार्दन चांदूरकर व अन्य सदस्यांनी "वेगळ्या विदर्भ राज्याबाबतची राज्य शासनाची भूमिका व यासंदर्भात राज्याचे महाधिवक्ता श्री.श्रीहरी अणे यांनी जाहीर कार्यक्रमात व्यक्त केलेली भूमिका" या विषयावर नियम 289 अन्वये जी सूचना दिली होती. तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रसे : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे, गुरुवार दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी सकाळी 10 ते 12.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल, या विशेष बैठकीत सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 24 मिनिटांनी, गुरुवार दिनांक 17 डिसेंबर 2015 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही